# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— १०/३/२०१७

दि. १०/३/२०१७ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती
सभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १०/३/२०१७ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सभापती |
| २ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ३ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| ४ | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| ५ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| ६ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |
| ७ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ८ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | सदस्या |
| ९ | श्रीमती इंदिरा उदासी | सदस्या |
| १० | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर, २. श्री. उमेश सुरेश कालानी, ३. श्रीमती आशा जिवन इदनानी, ४. श्रीमती पुष्पाताई नाना बागुल, ५. श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त, मुख्यालय
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
४. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
५. श्री. संतोष जाधव, सहा. मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
७. श्री. महेश शितलानी, कार्यकारी अभियंता, साबांवि
८. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
९. श्री. शैलेश दोंदे, उप कर निर्धारक व संकलक
१०. श्री. बालाजी लोंढे, सहा. आयुक्त (प्रशिक्षक)
११. श्री. प्रमोद मवाढे, सहा. आयुक्त (प्रशिक्षक)
१२. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, आरोग्य
१३. श्री. मनिष हिवरे, सहा. आयुक्त
१४. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१५. श्री. नितेश रंगारी, कर निरिक्षक
१६. श्री. धनराज, विद्युत विभाग

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. बाळु भांगरे

सांयकाळी ४.२५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय हया आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ झाल्या.

महापालिका सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :– मागील सभेचे दिनांक १८/११/२०१६, १३/१२/२०१६ व २८/१२/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–मागील सभेचे दिनांक १८/११/२०१६, १३/१२/२०१६ व २८/१२/२०१६ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १** :– मागिल सभेचे दिनांक १८/११/२०१६, १३/१२/२०१६ व २८/१२/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्रीमती रेखा ठाकूर

अनुमोदकाचे नांव : श्रीमती अंजली साळवे

स्थायी समिती ठराव क्र. :– ११५ अ दिनांक : १०/३/२०१७

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक १८/११/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते १३ पर्यंतचे, दिनांक १३/१२/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते २९ पर्यंतचे, दिनांक २८/१२/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते १९ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २** :– पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती अंतर्गत उल्हासनगर शहरातील मनपा २८ शाळेत संगणक व प्रिंटर सह (प्रत्येकी २ संच) उपलब्ध करून देणेबाबत माहितीची नोंद करणे.

---

काही सदस्य:–पास,पास.......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. २ :—** पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती अंतर्गत उल्हासनगर शहरातील मनपा २८ शाळेत संगणक व प्रिंटर सह (प्रत्येकी २ संच) उपलब्ध करून देणेबाबत माहितीची नोंद करणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. सभापती, सौ. नेहा (बेबी) नंदू भोईर, पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती, यांचे दि. २८/०७/२०१६ च्या मागणी पत्रानुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या २८ शाळांमध्ये इन्व्हेटर बॅटरी उपलब्ध करून देणेबाबत कळविले होते. त्यानुसार उमपा २८ शाळांमध्ये इन्व्हेटर बॅटरी उपलब्ध करून देणेबाबत सादर करण्यात आले होते. पण मा. लेखा अधिकारी यांनी "सभापती शिक्षण समिती यांनी वरील बाबी ऐवजी संगणक व प्रिंटर दयावे असे सुचित केल्याने ते घेणे आवश्यक आहे" असे अभिप्राय दिले होते. त्यानुसार मनपा पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती २८ शाळांना (प्रत्येकी २ संच) उपलब्ध करून देण्या करिता प्रति संगणक व प्रिंटर मुळ बाजार भाव जाणुन घेण्या करिता मे. नमन एन्टरप्राईझेस मधुन दर पत्रक हाती घेण्यात आली. संगणक व प्रिंटर करिता २४,९९,९८०/— एवढा अंदाजित खर्चे अपेक्षित होते. उल्हासनगर महानगरपालिका वर्ष २०१६—१७ चे अर्थसंकल्पातील 'अ' अंदाजपत्र भाग — १ — लेखाशिर्ष — क — ४ शिक्षण मधील उपलेखाशिर्ष (२). पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मध्ये क्र. २५.०० लक्ष (रू. पंचवीस लक्ष मात्र) इतकी तरतूद केलेली आहे. उपरोक्त शाळाकरिता संगणक व प्रिंटर साहित्याचा खर्च या तरतूदीतुन करावयाचा आहे. या करिता ई निविदा प्रसिध्द करणे करिता मा. आयुक्त सो यांनी दि. ०६/०९/२०१६ अन्वे मंजुरी दिलेली होती.

तसेच महापालिकेतील पूर्व प्रार्थमिक व माध्यमिक शिक्षण समिती ने उल्हासनगर शहरातील मनपा २८ शाळेत संगणक व प्रिंटर (प्रत्येकी २ संच) उपलब्ध करून देणे करिता दिनांक २८/०९/२०१६ च्या दै. अमृत कलश व नगर न्युज, द्वारे निविदा सूचना महापालिकेच्या संकेत स्थळवर प्रसिध्द केली होती.

मा. अति. आयुक्त यांचे मंजुरीने दि. १३/१०/१६ रोजी निविदा क्र. १२०५ तांत्रीक भाग उघडण्यात आला. सदर निविदेस खालील प्रमाणे तीन निविदाकार यांनी प्रतीसाद दिलेला आहे.

| अनु. क्र. | निविदाकाराचे नाव | ई. एम. डी. पावती क्र. |
|---|---|---|
| १ | मे.सिध्दांत एंटरप्राईजेस, उल्हासनगर | २४४६० |
| २ | मे. विघ्नेश एंटरप्राईजेस, उल्हासनगर | २४४६१ |
| ३ | मे. ओम मनिष एंटरप्राईजेस, उल्हासनगर | २४४६२ |

| अनु. क्र. | निविदाकाराचे नाव | नोंदणी दाखला प्रमाण पत्र | ई.एम.डी. २५,०००/— | शासकिय / निमशासकिय संस्थेचा दाखला | विक्रीकर पत्र (VAT) | पॅन कार्ड | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. ओम मनिष एंटरप्राईजेस | होय | होय | होय | होय | होय | पात्र |
| २ | मे. सिध्दांत एंटरप्राईजेस | होय | होय | होय | होय | होय | पात्र |
| ३ | मे. विघ्नेश एंटरप्राईजेस | होय | होय | होय | होय | होय | पात्र |

सदर निविदेचे सादर करावयाचे दस्तऐवज निविदा समितीने छाननी केली व निविदा अटी शर्तीनुसार पुरतता केलेली असल्याने सर्व तीन ही निविदा पात्र आहेत.

तरी उपरोक्त निविदाकांराच्या निविदाचा आर्थिक भाग दि. १७/१०/१६ रोजी मा. अति. आयुक्त सो यांच्या अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक , उप आयुक्त (पू.प्रा.मा.शि.स) यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याचा तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे.

तुलनात्मक तक्ता

| PRODUCT | Quantity | M/s Om Manish Enterprises | | M/s Vignesh Enterprises | | M/s Siddhant Enterprises | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | (28x2=56) | price per unit | Amount | price per unit | Amount | price per unit | Amount |
| Intel Core TM Core 2 Due CPU New Generation | 56 | 29200 | 1635200 | 31500 | 1764000 | 29850 | 1671600 |
| Key Board, Mouse, UPS | 56 | 3900 | 218400 | 4100 | 229600 | 3950 | 221200 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Laser Printer | 56 | 11500 | 644000 | 11700 | 655200 | 11750 | 658000 |
| Total | | | 2497600 | | 2648800 | | 2550800 |

तरी उपरोक्त तक्त्यानुसार में. ओम मनिष एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांचे निविदेत सादर केलेले दर रू २४,९७,६००/– (रू. चोविस लाख सत्याण्णव हजार सहाशे मात्र) हे तीन निविदाकारांपैकी व बाजारभावा प्रमाणे न्युनतम आहे. त्यानूसार में. ओम मनिष एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांची निविदा मंजुरीस्तव सादर करण्यात आली होती.

मा. आयुक्त सो. यांच्या आदेशान्वये, दि. १/१२/१६ रोजी में. ओम मनिष एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांच्याशी वार्षिक देखभाल व दरा बाबत वाटाघाटी करण्यात आली. वाटाघाटी नंतर त्यांनी दिलेले सुधारित दर पुढील प्रमाणे आहेत.

| Particular | Old Rate | | | Revised Rate | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | M/s Om Manish Enterprises (Old rate) | | | M/s Om Manish Enterprises(Revised rate) | | |
| PRODUCT | Quantity (28x2=56) | price per unit | Amount | Quantity (28x2=56) | price per unit | Amount |
| Intel Core TM Core 2 Due CPU New Generation | 56 Nos. | 29200.00 | 1635200/- | 56 Nos. | 28950.00 | 1621200/- |
| Key Board, Mouse, UPS | 56 Nos. | 3900.00 | 218400/- | 56 Nos. | 3750.00 | 210000/- |
| Laser Printer | 56 Nos. | 11500.00 | 644000/- | 56 Nos. | 11300.00 | 632800/- |
| Maintenance Contract | | | 1 Year | Maintenance Contract | | 3 year |
| Total | | | 24,97,600/- | Total | | **24,64,000/-** |

तरी उपरोक्त तक्त्यानुसार में. ओम मनिष एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांनी वाटाघाटी नंतर ३ वर्षाचे देखभाल दुरूस्ती सह सादर केलेले सुधारित दर रू २४,६४,०००/– (चोविस लाख चौसष्ठ हजार मात्र) इतके आहे. सदर प्रस्तावास मा. आयुक्त सो. यांनी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (ड) (Maharashtra Municipal Corporation Act, Sec 73 (d) every contract made by the commissioner involving an expenditure exceeding {five lakhs rupees} and not exceeding {twenty five lakh rupees} or such higher amount as may for the time being be prescribed under clause (c ) shall be reported by him, within fifteen days after the same has been made to the Standing Committee.) नुसार दि. २१/१२/२०१६ रोजी मंजूरी दिलेली आहे.

तरी सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ११६ <u>दिनांक:– १०/३/२०१७</u>

सूचकाचे नांव : श्रीमती अंजली साळवे

अनुमोदकाचे नांव : श्रीमती रेखा ठाकूर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती अंतर्गत उल्हासनगर शहरातील मनपा २८ शाळेत संगणक व प्रिंटर सह (प्रत्येकी २ संच) उपलब्ध करून देणेबाबत माहितीची नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिति सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३ :—** मा. महापौर निधीतून आयोजित करण्यात येणा—या ''होम मिनिस्टर चषक'' च्या कार्यक्रमाचे आयोजनासाठी मागविण्यात आलेल्या साहित्याची माहिती नोंद करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ३ :—** मा. महापौर निधीतून आयोजित करण्यात येणा—या ''होम मिनिस्टर चषक'' च्या कार्यक्रमाचे आयोजनासाठी मागविण्यात आलेल्या साहित्याची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात होम मिनिस्टर चषक कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २०/१२/२०१६ ते २१/१२/२०१६ रोजी करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी लागणाऱ्या खर्चास दिलेल्या मंजुरीची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजूर रक्कम | एजन्सीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.महापौर निधीतून आयोजीत करण्यात येणाऱ्या “होम मिनिस्टर चषक” च्या कार्यक्रमाचे आयोजनाचेसाठी लागणारे साहीत्य मागविणेबाबत. | ९,९७,३००/— | मे. मोहिनी एंटरप्रायझेस उल्हासनगर— ०३ |

तरी सदरची माहिती मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

स्थायी समिति ठराव क्र. ११७ दिनांक:— १०/३/२०१७

सूचकाचे नांव : श्रीमती रेखा ठाकूर

अनुमोदकाचे नांव : श्रीमती अंजली साळवे

ही स्थायी समिति वरील प्रस्तावनेनुसार मा. महापौर निधीतून आयोजित करण्यात येणा—या ''होम मिनिस्टर चषक'' च्या कार्यक्रमाचे आयोजनासाठी मागविण्यात आलेल्या साहित्याची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिति सभा

महापालिका सचिव :— विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

**विषय क्र. ४ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ''कल्चरल सिंधी मेला वरसो ना विसार'' या कार्यक्रमाचे आयोजनासाठी मागविण्यात आलेल्या साहित्याची माहिती नोंद करणे.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ४ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ''कल्चरल सिंधी मेला वरसो ना विसार'' या कार्यक्रमाचे आयोजनासाठी मागविण्यात आलेल्या साहित्याची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकाक्षेत्रात "कल्चरल सिंधी मेला वरसो ना विसार" कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २५/०४/२०१६ ते ०८/०५/२०१६ या कालावधीत करण्यात आले होते. त्याकामी झालेल्या खर्चाची माहीती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजूर रक्कम | एजन्सीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात "कल्चरल सिंधी मेला वरसो ना विसार" या कार्यक्रमाकरीता साहित्य मागविणेबाबत. | ११,९९,०००/— | मे. मोहित एंटरप्रायझेस उल्हासनगर—४ |

तरी सदरची माहीती मा. स्थायी समितीच्या अवलोनार्थ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ११८ दिनांकः—१०/३/२०१७

सुचकाचे नाव :— श्रीमती अंजली साळवे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती रेखा ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ''कल्चरल सिंधी मेला वरसो ना विसार'' या कार्यक्रमाचे आयोजनासाठी मागविण्यात आलेल्या साहित्याची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

**विषय क्र. ५ :—** उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005930200 Old No. 31/0253 [Bk No. 825 Room No. 2 UNR-3] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी दाखल म्युनिसिपल अपिल व इतर दाव्यामध्ये न्यायालयाचा निर्णय प्रलंबित असल्याने मिळकतीचे वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करणेसाठी पारीत करण्यात आलेला स्थायी समिती

---

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>कोण अधिकारी आहे उत्तर देणारे?

<u>श्री. शैलेश दोंदे, उप कर निर्धारक व संकलक :–</u>सुरुवातीला याचे आपण १८००० रक्कम लावली होती. कोर्टात दोन्ही पक्ष गेले त्यात काही निर्णय झाला नाही.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>हे तुम्हांला किती वेळा सांगितले की ही गोष्ट चुकीची आहे. पास केले नाही पाहिजे अशी किती वेळा चर्चा चालली. माझे स्पष्ट मत होते की कोर्टाच्या अधिन राहुन तुम्ही पारीत करा. नको हा विषय, हा विषय कोर्टाचा आहे, एकतर वगळा किंवा रद्द करा. वारंवार माझा आग्रह होता, आता तुम्ही सांगता रद्द करायला नेमके आम्ही काय करायचे? याचा अर्थ तुम्ही चुकीची माहिती देत आहात. आता तुम्हीच पाठवित आहात रद्द करायला. आम्ही पास केलेला आहे आणि आता आम्ही रद्द कसे करायचे ते सांगा. दुसरी गोष्ट कोर्टाचा त्यामध्ये काय आदेश आहे ते सांगा.

<u>श्री. शैलेश दोंदे, उप कर निर्धारक व संकलक :–</u>कोर्टाचा आदेश आला नाही.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>मग रद्द करायला कसा आला?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आम्ही रद्द नाही करणार. जसा आहे तसाच राहु दया.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:–</u>हा विषय कोर्टाच्या अधिन राहुनच असु दया.

<u>श्री. शैलेश दोंदे, उप कर निर्धारक व संकलक :–</u>कोर्टाचा निर्णय अंतिम झाला नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे :–</u>आम्ही त्यावेळेस कोर्टाच्या निर्णयाच्या अधिन राहुनच म्हटले होते. आता रद्द का करतात? आम्ही अगोदरच सांगितले आहे तुम्हांला कोर्टाच्या निर्णयाच्या अधिन राहुनच करा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>आम्ही रद्द नाही करणार, आम्ही सर्वांनी मिळुन हा विषय पास केला आहे. जसा आहे तसाच ठेवा. तुम्ही ५०००/– आकारणी सुरु ठेवा त्यानंतर कोर्ट जो निर्णय घेईल तो. आता हा विषय रद्द करु नका.

<u>महापालिका सचिव :–</u>यामध्ये ठराव असा येईल की रद्द करण्यास मान्यता देत नाही, असा ठराव करु का?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे :–</u>नाही, तसा नको.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>नाही नाही, पहिलेचा ठराव तर आपण केला आहे ना.

<u>महापालिका सचिव :–</u>मग ठरावात कसे लिहु? तुम्ही आधीच लिहिले आहे कोर्टाच्या निर्णयाच्या अधीन राहुन.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे :–</u>होय मग त्यामध्ये तसे नमुद करा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>नाही, रद्द करायचे आहे तर रद्दच करा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे :–</u>नाही, नाही, जर रद्द करायचे आहे तर तसे कारण तर लिहावे लागेल ना. कारण का नाही दयायचे?

<u>महापालिका सचिव:–</u>तुम्ही कारण दया ना.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे :–</u>कारण तेच आहे. कारण दयावे लागेल ना.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आम्ही जेव्हा ठराव केला होता त्यामध्ये कारण टाकले होते. आता दोन गोष्टी आहेत एक तर रद्द करा किंवा नको करा. आम्ही रद्द नाही करत.

<u>महापालिका सचिव :–</u>ठरावात लिहिते की यास मान्यता देत नाही. कारण मा. न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्याने मान्यता देत नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आपण ठराव केला होता की ५००० रुपये कर योग्य मुल्य निश्चित करुन त्याचे भाडे निश्चित करायचे आहे. ते आमचे कायम आहे. परंतु आता येथे रद्द करण्यासाठी आले आहे तर ते आम्हांस मान्य नाही, त्यास रद्द करु नका.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे :–</u>रद्द नाही करायचे तर कारण काय?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आपण या आधी ठराव केला आहे ना?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे :–</u>अहो मी सांगतो ना, आम्हांस सदस्यांना अडचणीत आणायचे नाहीयामध्ये. कोर्टाचा निर्णय आहे, मी सर्व सदस्यांना विनंती करतो की, कारण प्रशासन खेळ करते ते आमच्याकडे घेवुन येते आणि आता म्हणते रद्द करा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>हे आयुक्तांचे काम आहे की जर ठराव रद्द करायचा आहे तर शासनाकडे पाठवावा की हा ठराव रद्द केला आहे जर तेथुन पास होवुन येते तर हा ठराव रद्द करावा. महासभेत सुध्दा असे होते की ठराव रद्द करायचा असेल तर आयुक्त शासनाकडे पाठवतात व शासन निर्णय देते तेव्हा रद्द करता येतो.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे :–</u>माझी विनंती आहे की तुम्ही कायदेशीर पहा.

<u>श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>यामध्ये चुक झाली आहे त्यांच्याकडुन. परंतु आता हा जो प्रशासनाने ठराव दिला आहे. आधी चुक झाली आहे प्रशासनाकडुन आता हा जो येथे रद्द करण्यासाठी प्रस्ताव आला आहे तर आपण यामध्ये म्हणत आहात की शासनाकडे रद्द करण्यासाठी पाठवावा तर तो कधी पाठविण्यात येतो की तो प्रस्ताव प्रशासकीय असेल तरच. हा प्रस्ताव प्रशासकिय नाही. प्रशासनाकडुन चुक झाली आहे ही बाब बरोबर आहे. परंतु आपल्या सुरक्षिततेसाठी रद्द करण्यास आणला आहे. प्रशासनाकडुन जी चुक झाली आहे, परंतु यात जोपर्यंत कोर्टाचा निर्णय होत नाही तोपर्यंत हे दयायला नको होते. हे दयायला नको होते परंतु आता जी चुक झाली आहे त्यास आपण सुधारणा करत आहोत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>महोदया आपण एकीकडे पत्र दिले आहे की जे काही धोरणात्मक निर्णय आहे ते आपण आता ठरवु शकत नाही.

<u>श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u>हा धोरणात्मक निर्णय नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>होय हे धोरणात्मक निर्णय आहे ना. यानंतरचा विषय सुध्दा तुम्ही आणला तो सुध्दा धोरणात्मक निर्णयाचा आहे. हा सुध्दा धोरणात्मक निर्णय आहे ना की, ५००० चा निर्णय घेणे.

<u>श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u>असे काही नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>कारण हेच की स्थायी समिती ठराव क्र. ९५ दिनांक १८/११/२०१६ ला आम्ही जशी मान्यता दिली होती तशीच ठेवणार. आम्ही ५००० रुपये करमुल्य ठेवण्यात आले होते. हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. कर आकारणी मुल्य ५००० लावले पाहिजे. तरी सुध्दा मी म्हणतो की त्यात एक मुद्दा जोडा की न्यायालयाने जो निर्णय दिला तो मान्य असेल. अमान्य करा.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:–</u>तेच तर म्हणत होतो. आता सुध्दा तेच म्हणावे लागेल.

<u>महापालिका सचिव :—</u>ठरावात असे टाकते की, हा ठराव अमान्य करीत आहे कारण हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>हा रद्द करुन पुर्वीचा आहे तोच.

<u>महापालिका सचिव :—</u>होय,. मी ठराव वाचते.

ही स्थायी ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005930200 Old No. 31/0253 [Bk No. 825 Room No. 2 UNR-3] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी दाखल म्युनिसिपल अपिल व इतर दाव्यामध्ये न्यायालयाचा निर्णय प्रलंबित असल्याने मिळकतीचे वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करणेसाठी पारीत करण्यात आलेला स्थायी समिती ठराव क्र. ९५, दिनांक १८/११/२०१६ रद्द करण्याचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

<u>कारण</u>

सदर प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५ :—** उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005930200 Old No. 31/0253 [Bk No. 825 Room No. 2 UNR-3] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी दाखल म्युनिसिपल अपिल व इतर दाव्यामध्ये न्यायालयाचा निर्णय प्रलंबित असल्याने मिळकतीचे वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करणेसाठी पारीत करण्यात आलेला स्थायी समिती ठराव क्र. ९५, दिनांक १८/११/२०१६ रद्द करणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

स्थायी समिती ठराव क्र. ९५, दिनांक १८/११/२०१६ नुसार उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005930200 Old No. 31/0253 [Bk No. 825 Room No. 2 UNR-3] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीचे न्यायालयाच्या निर्णयाच्या (म्युनिसिपल अपिल व इतर दावे) अधिन राहुन वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/- गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करून वर्ष २०१६-२०१७ करीता बिल लागु करणेसाठी जा. क्र. उमपा/कर विभाग/युनिट ५/९०/१६, दिनांक २१/११/२०१६ अन्वये आदेश जारी करण्यात अला आहे.

तथापि, वेणुगोपाळ एम. शेट्टी (वादी) यांनी दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उल्हासनगर येथे दाखल सुट क्र. १२६/२००२ मध्ये पुजा इंदर माखिजा (प्रतिवादी) यांचेविरूध्द संदर्भित मिळकतीचे भाडे रू. ५,०००/- निश्चित करणेसाठी दावा दाखल केला आहे. सदर प्रकरणात महानगरपालिका प्रतिवादी नाही. तसेच सदर प्रकरणात वेणुगोपाळ एम. शेट्टी यांचे असे म्हणणे "मिळकतीचे भाडेपोटी प्रतिमाह रू. ५,०००/- पुजा इंदर माखिजा यांना न्यायालयाचे निकालानंतर अदा करण्यात येईल" दि. ६/१/२००२ रोजी न्यायालयाने दाखल करून घेतले आहे. परंतु सदर प्रकरणात अंतिम निर्णय झालेला नाही.

वेणुगोपाळ एम. शेट्टी (वादी) यांनी दिवाणी न्यायालय, उल्हासनगर येथे मिळकतीचे प्रमाणित भाडे निश्चित करणेबाबत पुजा इंदर माखिजा (प्रतिवादी) यांचेविरूध्द दाखल केलेले Misc Application No. 65/2005 मध्ये ही निर्णय झालेला नाही.

वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा यांनी भाडे निश्चितीबाबत दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कल्याण येथे दाखल म्युनिसिपल अपिल क्र. २७/२००६, ७/२००७, २/२०१२ मध्ये उल्हासनगर महानगरपालिका प्रतिवादी असुन सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा (अपिलार्थी) यांनी भाडे निश्चितीबाबत दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उल्हासनगर येथे दाखल आर. सी. एस. नं. ७५/२०११ मध्ये उल्हासनगर महानगरपालिका प्रतिवादी असुन सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

मा. आयुक्तांचे दालनात दिनांक १५/१२/२०१६ रोजी झालेल्या चर्चेअंती सदर प्रकरणात न्यायालयीन बाब प्रलंबित असल्याने स्थायी समिती ठराव क्र. ९५ दिनांक १८/१२/२०१६ मध्ये फेरबदल अथवा रद्द करणे अशी धारणा स्पष्ट झाली आहे. तसेच मा. सभापती, स्थायी समिती यांचेकडील पत्र क्र. उमपा/स्थास/१५५/१६, दिनांक २१/१२/२०१६ अन्वये सदर प्रकरणात मा. न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत स्थायी समिती ठराव क्र. ९५, दिनांक १८/११/२०१६ स्थगित ठेवावा किंवा सदरचा विषय स्थायी समितीपुढे पुन्हा चर्चेसाठी सादर करणेबात कळविले आहे.

त्याअनुषंगाने संदर्भित मिळकतीचे करयोग्य मुल्य निश्चित करणेसाठी दिनांक २१/११/२०१६ रोजी जारी केलेल्या आदेशास स्थगिती देण्यात आली आहे. तसेच पुर्वीप्रमाणे कराची रक्कम समाविष्ट करून सुधारीत बिल जारी करण्यात आले आहे.

उल्हासनगर महानगरपालिका नियम १९९७ मधील स्थायी समितीचे कामकाज यातील नियम १२ नुसार स्थायी समितीस, वसतुस्थिती किंवा कायदेशिर बाजूबद्दल चुकीची कल्पना करून, संमत करण्यात आलेल्या कोणत्याही ठरावामध्ये फेरबदल करता येईल किंवा तो रद्द करता येईल.

उक्त बाबी पाहता उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005930200 Old No. 31/0253 [Bk No. 825 Room No. 2 UNR-3] अन्वये नोंद असलेल्या मिककतीसाठी दाखल म्युनिसिपल अपिल व इतर दाव्यामध्ये न्यायालयाचा निर्णय प्रलंबित असल्याने मिळकतीचे वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/- गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करणेसाठी पारीत करण्यात आलेला स्थायी समिती ठराव क्र. ९५, दिनांक १८/११/२०१६ रद्द करणेसाठी स्थायी समितीपुढे सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ११९ दिनांकः—१०/३/२०१७

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005930200 Old No. 31/0253 [Bk No. 825 Room No. 2 UNR-3] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी दाखल म्युनिसिपल अपिल व इतर दाव्यामध्ये न्यायालयाचा निर्णय प्रलंबित असल्याने मिळकतीचे वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करणेसाठी पारीत करण्यात आलेला स्थायी समिती ठराव क्र. ९५, दिनांक १८/११/२०१६ रद्द करण्याचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

कारण

सदर प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ६ :— सन् २०१७—२०१८ या आर्थिक वर्षाकरिता मालकी/वारस हक्कांचे नाव हस्तांतरण प्रकरणात नाव हस्तातरण शुल्कात वाढ करणे.

---

महापालिका सचिव :—हा शेवटचा विषय आहे, शासनाकडुन परिपत्रक आले आहे की कोणतेही धोरणात्मक निर्णय घ्यायचा नाही.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—विषय कसा आला?

महापालिका सचिव :—हा आधीच सभापती महोदयांनी विषय घेतला. नंतर परिपत्रक आले आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे :—प्रशासन आम्हांला पाठविते का गोषवारा कुठला? तयार आहेत का गोषवारे सर्व?

महापालिका सचिव :—हा विषय पुर्वीच सबमिशनवर होता, आणि तो घेतला गेला. नंतर शासनाचे परिपत्रक आले आहे. धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही. तर हा विषय तुम्ही पुढील सभेत घेवु शकता.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—मग आता या विषयाचे काय करायचे?

<u>महापालिका सचिव :–</u>आता हा विषय वगळावा लागेल. तेव्हा पुढील सभेत नविन येईल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>ठिक आहे, विषय वगळा.

<u>काही सदस्य :–</u>ठिक आहे वगळण्यात यावा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६ :–** सन् २०१७–२०१८ या आर्थिक वर्षाकरिता मालकी/वारस हक्कांचे नाव हस्तांतरण प्रकरणात नाव हस्तातरण शुल्कात वाढ करणे.

<u>प्रस्तावना</u>

भारताच्या स्वातंत्र्यानंतर फाळणीमुळे मोठया प्रमाणावर निर्वासित पाकिस्तानातील सिंध प्रांतातून भारतात आले. या निर्वासितांची पर्यायी सोय तातडीने करणे आवश्यक होते. स्वातंत्र्यानंतर ब्रिटीश सैन्य गेल्यामुळे उल्हासनगर येथील लष्करी बॅरेक्स रिकाम्या असल्याने त्या मदत व पुर्नवसन विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आल्या, या ठिकाणी मुंबई आणि परिसरात आश्रय घेतलेल्या हजारो निर्वासित कुटूंबांचे पुर्नवसन करण्याचा निर्णय घेण्यात आला. सन १९४९ पासून ते १९७३ सालापर्यत या पुर्नवसन वसाहतीचे व्यवस्थापन केंद्र सरकारकडून करण्यात येत होते. यासाठी शासनाकडुन निर्वासितांची मालमत्ता अधिनियम, १९५०, निर्वासित व्यक्ती (भरपाई व पुर्नवसन) अधिनियम, १९५४ व त्यासंबंधीचे इतर कायदयानुसार या वसाहतीत शासनाने बांधलेल्या मालमत्ता व इतर रिकामी जागा यांचे वितरण करण्यात आले. सन १९७१ मध्ये केंद्र शासनाकडून या वसाहतीचे व्यवस्थापन राज्य शासनाकडे सोपविण्यात आले. १९९२ साली महसूल विभागाने उल्हासनगर येथे स्वतंत्र उपविभाग स्थापन करून आतापर्यंत या वसाहतीतील जमिनींचे वितरणाचे काम त्यांच्यामार्फत सुरु आहे. सुरुवातीस वाटप करण्यात आलेल्या जागांव्यतिरिक्त निर्वासितांनी पुढे राहण्यासाठी तसेच व्यवसाय यासाठी उपलब्ध असलेल्या जागांवर अनधिकृत कब्जा करुन तेथे अतिक्रमणे केलेली होती. आखिल भारतीय सिंध पंचायत फेडरेशनच्या सभासदांनी केंद्र शासनासोबत चर्चा करुन ही अतिक्रमणे नियमित करण्याची मागणी केली होती. त्यावरुन दिनांक ११/५/१९६५ पर्यंतची अतिक्रमणे नियमीत करण्याबाबत तत्कालीन केंद्रीय पुर्नवसन सचिवांनी आश्वासन दिले होते. त्यानुसार भुमी अभिलेख विभागाने सन १९६५ ते १९७१ या कालावधीत उल्हासनगर शहराचे सर्व्हेक्षणात जी अनधिकृत बांधकामे निदर्शनास आली या अतिक्रमणांच्या जागा निर्वासितांना देणेबाबत अद्यापही कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

२) अशा परिस्थितीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १२७ व १२९ तसेच अनुसूचितील प्रकरण ८ (कराधान नियम) मधील तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या इमारती व जमिनींवर **''मालमत्ता कर''** आकारणी करण्यात येते.

मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ **''मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्तीचे नावाची नोंद''** आवश्यक आहे. त्याअनुषंगाने कराधान नियमातील तरतुदीं पुढीलप्रमाणे आहेत.

**नियम १. मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र असलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काच्या सर्व हस्तांतरणासंबंधी आयुक्तास नोटीस देणे.**

(१)कोणत्याही जागेच्या संबंधात मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या अशा जागेसंबंधीच्या किंवा अशा जागेवरील मालकी हक्काचे हस्तांतरण करण्यात येईल तेव्हा तेव्हा ज्या व्यक्तीच्या मालकी हक्काचे असे हस्तांतरण करण्यात येईल त्या व्यक्तीने आणि ज्या व्यक्तीकडे उक्त मालकी हक्काचे हस्तांतरण करण्यात येईल त्या व्यक्तीने, हस्तांतरण संलेख करून देण्यात आल्यानंतर किंवा त्याची नोंदणी करण्यात आली असेल तर त्याच्या नोंदणीनंतर किंवा कोणताही लेख करून देण्यात आला नसेल तर अशा रीतीने हस्तांतरण करण्यात आल्यानंतर, तीन महिन्यांच्या आत हस्तांतरणासंबंधी आयुक्तास लेखी नोटीस दिली पाहिजे.

(२)वर सांगितल्याप्रमाणे प्रथमत: कर देण्यास पात्र असलेली कोणतीही व्यक्ती मरण पावल्यास मयत व्यक्तीच्या मालकी हक्काचे, वारस म्हणुन किंवा अन्यथा ज्या व्यक्तीकडे हस्तांतरण करण्यात येईल त्या व्यक्तीने मयत व्यक्तीच्या मृत्युपासुन एक वर्षाच्या आत अशा हस्तांतरणासंबंधी आयुक्तास नोटीस दिली पाहिजे.

३) उल्हासनगर महानगरपालिका आर्थिक उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असल्याने कर आकारणी पुस्तकात फक्त **''मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ''** मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्तीचे नावाची नोंद करण्यात येते. याचा मालकी हक्कांशी काहीही संबंध नाही.

४) मालमत्ता हस्तांतरण अधिनियमाचे कलम ५४ व नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम १७ मधील तरतुदीनुसार ज्या स्थावर मालमत्तेचे मुल्य रू. १००/– किंवा त्यापेक्षा अधिक आहे, अशा मालमत्तांचा हस्तांतरणाचा नोंदणीकृत व्यवहार होणे आवश्यक आहे.

५) महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाने नगरविकास विभागाच्या संमतीने दिनांक २७ मार्च १९९५ रोजी परिपत्रकाद्वारे स्थानिक स्वराज्य संस्था व प्राधिकरणाच्या क्षेत्रातील स्थावर मालमत्तां हस्तांतरणाबाबत नोंदणीकृत दस्तऐवजांची प्रमाणित नक्कल किंवा सदर दस्तऐवजांची सुचि क्र. २ ची प्रमाणित नक्कत पक्षकाराने दाखल केल्याशिवाय नगरपालिका/महानगरपालिकेच्या अभिलेख्यावर कर आकारणीसाठी सर मालमत्ता विकत घेणा–याच्या नावावर चढवू नये/करण्यात येवू नये, असे आदेश दिले आहेत.

६) शासन नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्रमांक:स्थासंक २०११/प्र.क्र.१३९/नवि–३४, दिनांक ३१ मार्च २०१२ तसेच दिनांक १७ एप्रिल, २०१२ रोजीचे शासन निर्णय शुध्दीपत्रक क्रमांक अन्वये मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात विक्री, देणगी किंवा फलोभोग गहाणाच्या संलेखाच्या बाबतीत संलेख्यात मांडण्यात आलेल्या संलेख्याद्वारे सुरक्षित रकमेवर १ टक्का अधिभार दिनांक १ जुले, २०१२ पासुन लागू करण्यात आला आहे. त्याअनुशंगाने अधिभारामुळे वसूल केलेल्या अतिरिक्त शुल्काच्या रकमेएवढे अनुदान महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.

७) मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे (ग्रा), सह. जिल्हा निबंधक वर्ग–१ ठाणे ग्रामीण यांचे कार्यालयाकडील दिनांक २७/०१/२०१४ व १६/०२/२०१५ रोजीचे पत्रान्वये केवळ रू. १०० चे मुद्रांक शुल्क लावुन नोटरी केलेले खरेदीखताचे आधारे मालमत्ता फेरफार नोंदविला जातो. नोंदणी अधिनियम १९०८ अन्वये स्थावर मिळकतीचे दस्तऐवजांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. अन्यथा नोंदणी न केलेल्या दस्तऐवजास कायदेशिर मुल्य प्राप्त होत नाही, असे कळविले आहे.

८) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अंदाजित १.७० लाख मिळकती अस्तित्वात असुन मालमत्ता कर आकारणी व वसुली व्यवस्थापन तसेच त्यासंबंधी इतर बाबींची पुर्तता करणेसाठी मिळकतींची विभागणी १ ते ५८ प्रभागात करण्यात आलेली आहे. तसेच प्रभागाचे व्यवस्थापनासाठी प्रभागांचे एकुण ८ युनिट मध्ये विभाजन करण्यात आले असुन प्रत्येक युनिट मध्ये १० प्रभाग आहेत. प्रत्येक प्रभागात अंदाजित मिळकतींची संख्या ३५०० किंवा त्यापेक्षा अधिक आहे. प्रतिवषी अंदाजित ५००० ते ६००० अर्ज मालमत्ता कर देण्यास प्रथम पात्र व्यक्तींचे नावात बदल करणेसाठी दाखल केले जातात. त्यामध्ये मनपा कर आकारणी पुस्तकात रू. १०० चे मुद्रांक लावुन नोटरी केलेले दस्ताऐवजाच्या आधारे नोंद केलेली प्रकरणांची संख्या अधिक आहे.

९) त्यातही मागील १० ते १५ वर्षापासुन एका पेक्षा अधिक व्यक्तींकडे मिळकतीचे मालकी /वारस हक्कांचे हस्तांतरण झालेले असुन संबंधित व्यक्तींनी कर आकारणी पुस्तकात स्वत:चे नावाची नोंद केलेली असुन सद्यस्थितीतील व्यक्ती नावाची नोंद करणेसाठी अर्ज दाखल करीत असल्याचे दिसुन येते.

१०) तसेच यासाठी स्थायी समिती ठराव क्र. ४ दिनांक २९/५/२०१५ व महासभा ठराव क्र. २६ दिनांक ९/७/२०१२ नुसार मालमत्ता नाव हस्तांतरण शुल्क खालीलप्रमाणे स्विकारण्यात येत आहे.

| अ. क्र | तपशिल | प्रस्तावित शुल्क आकारणी |
|---|---|---|
| १ | वारसा हक्काने मिळकती हस्तांतरण करणे | किमान रू. ५००/–<br>कमाल करयोग्य मुल्याच्या २ टक्के |
| २ | वारसा हक्काव्यतिरिक्त मिळकती हस्तांतरण करण्यास परवानगी मिळणेबाबत | किमान रू. ५००/–<br>कमाल करयोग्य मुल्याच्या २ टक्के |

११) उक्त बाबी पाहता महानगरपालिका क्षेत्रातील स्थावर मालमत्तां हस्तांतरणाबाबत नोंदणीकृत व्यवहार होत नसल्यामुळे शासकीय तसेच महानगरपालिका महसुल बुडत आहे.

१२) सदरील बाब मनपाच्या आर्थिक उत्पन्नाशी निगडीत असल्याने वर्ष २०१६–२०१७ पासुन मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ **''मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्तीचे नावाची नोंद''** हस्तांतरण शुल्क वाढीबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता. तथापि, सदरचा प्रस्ताव विचारार्थ स्थायी समितीपुढे घेण्यात आलेला नाही.

| वापर | दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. (अर्ज दाखल करताना भरणा करणे आवश्यक) | वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. (अर्ज दाखल करताना भरणा करणे आवश्यक) |
|---|---|---|
| **निवासी** | किमान रू. १,५००/–<br>कमाल करयोग्य मुल्याच्या २ टक्के<br>**किंवा**<br>चालु बाजारभावानुसार मिळकतीचे किंमतीच्या १ टक्के | किमान रू. १,०००/–<br>कमाल करयोग्य मुल्याच्या २ टक्के<br>**किंवा**<br>चालु बाजारभावानुसार मिळकतीचे किंमतीच्या १ टक्के |
| **अनिवासी** | किमान रू. ३,५००/–<br>कमाल करयोग्य मुल्याच्या २ टक्के<br>**किंवा**<br>चालु बाजारभावानुसार मिळकतीचे किंमतीच्या १ टक्के | किमान रू. २,५००/–<br>कमाल करयोग्य मुल्याच्या २ टक्के<br>**किंवा**<br>चालु बाजारभावानुसार मिळकतीचे किंमतीच्या १ टक्के |

सबब, मनपाच्या आर्थिक उत्पन्नाच्या दृष्टीने वर्ष २०१७–१८ पासुन स्थायी समितीच्या मंजुरीने नाव हस्तांतरण शुल्कात वरीलप्रमाणे वाढ करणेसाठी शिफारस करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ११९ अ                    **दिनांक:–१०/३/२०१७**

सूचकाचे नांव : श्रीमती रेखा ठाकूर

अनुमोदकाचे नांव : श्रीमती अंजली साळवे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन् २०१७–२०१८ या आर्थिक वर्षाकरिता मालकी/वारस हक्कांचे नाव हस्तांतरण प्रकरणात नाव हस्तातरण शुल्कात वाढ करण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे :–**यापुढे आणखीन एक सभा ठेवु या. जे सदस्य हजर राहतील ते वझीर राहतील

सांयकाळी ५.०५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. सुनिल सुर्वे यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:– २९/३/२०१७

**दि. २९/३/२०१७ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

१

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक २९/३/२०१७ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सभापती |
| २ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ३ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| ४ | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| ५ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| ६ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |
| ७ | श्री. विजय चाहु पाटील | सदस्य |
| ८ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ९ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | सदस्या |
| १० | श्रीमती इंदिरा उदासी | सदस्या |
| ११ | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर, २. श्री. उमेश सुरेश कालानी, ३. श्रीमती आशा जिवन इदनानी,४. श्रीमती पुष्पाताई नाना बागुल, ५. श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१७. श्री. सुधाकर शिंदे, आयुक्त
१८. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
१९. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, मुख्यालय
२०. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
२१. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
२२. श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि
२३. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विद्युत
२४. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
२५. श्री. गणेश शिंपी, प्र. प्रभाग अधिकारी
२६. श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी
२७. श्री. शैलेश दोंदे, उप कर निर्धारक व संकलक
२८. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
२९. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
३०. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
३१. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. बाळु भांगरे

सांयकाळी ४.०० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>चला मुख्य कोण आहे? त्याने येवून आयुक्तांच्या स्थानी बसावे, शहर अभियंता या तुम्ही बसा.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>नाही, जरा येवु दया ना उप—आयुक्त यांना.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>नेहमीच अधिका—यांना बोलवावे लागते का?

यावेळी श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त, मुख्यालय यांनी सभागृहात प्रवेश केला व आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १</u> :— उल्हासनगर महापालिकेसाठी ४ मोबाईल (फिरते) टॉयलेट व्हॅन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम (२) (२) अंतर्गत निविदा शिवाय मे. ओम मनिष इंटरप्राईझेस, उल्हासनगर यांच्याशी थेट संविदा करुन खरेदी करण्यात आली असून कार्योत्तर मंजुरीस मान्यता देणे.

---

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>कोण आहे? यात किती असे मोबाईल टॉयलेट असतील?

<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>साहेब, यामध्ये वाद होता, ३१ मार्चपर्यंत हे काम करायचे होते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>तुम्ही म्हणता, शहर हांगणदारी मुक्त आहे. परंतु काही शौचालय अशी आहेत त्यांना दरवाजे नाहीत, लाईट नाही. त्यामुळे अडचण होते, आपण दोन प्राकलने तयार केली होती व निविदा सुध्दा केल्या होत्या. परंतु त्याची वर्कऑर्डर झाली आहे की नाही, काय केले आहे माहित नाही. जेवढे पण शहरामध्ये शौचालय आहेत त्याचे काम का सुरु होत नाही?

<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>ज्यांचे दरवाजे, लाईट तुटले आहेत त्यांची यादी तयार केली आहे. ते ई—टेंडरींगसाठी प्रस्तावित आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>यादी नाही, आपण दोन निविदा काढल्या होत्या ना. कॅम्प नं. १,२,३ चे एक प्राकलन होते व ४, ५ चे एक प्राकलन होते. जेवढे काही शासनाचे शौचालय आहेत, त्यांचे दरवाजे दुरुस्ती करण्यासाठी फक्त माझ्या प्रभागाचे सांगत नाही तर संपुर्ण शहराचे सांगतो. दरवाजे आहेत, शौचालयांना कलर आहे, तसेच महिलांचे असो वा पुरुषांचे त्यामध्ये लाईट असणे आवश्यक आहे. जर आपल्या शहरास हांगणदारी मुक्त करायचे असेल तर आपणांस आधी शौचालय दुरुस्त करणे आवश्यक आहे. आमचे पुर्व आयुक्त होते त्यांनी याबाबत मान्यता दिली होती व त्याची निविदा सुध्दा काली होती. निविदा काढल्यानंतर निवडणूका आल्यात त्यामुळे त्याचा अहवाल आलेला नाही. ते काम झाले आहे की नाही?

<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u> सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत या कामाची कार्यवाही होते.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता :—</u>ठेकेदाराचे काम प्रगतीपथावर आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आपण त्यांना वर्कऑर्डर दिले आहे का?

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता :—</u>होय.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>दोन्हींचे दिले आहे?
<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता :—</u>होय.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. आयुक्त साहेब, हा विषय फार गंभीर आहे.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>या गोष्टीला ३—४ महिने झाले आहेत.

<u>सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :—</u>शहरातील सर्व शौचालय, झोपडपट्टीचे असो, घरातील असो, कुठलेही असो ते दुरुस्त करण्यासाठी मान्यता दयावी. माझ्या प्रभागातील झोपडपट्टी विभागातील शौचालय आहेत तेथे काम झालेले नाही. दरवाजे तुटले आहेत, लाईट नाही आहे. निवडणूकीच्यावेळी लोकांची एकच तक्रार असायची की शौचालयात दरवाजे नाहीत, त्याची भांडे तुटलेले आहेत, लाईटची व्यवस्था नाही, कलर लावलेला नाही. त्यात महिला शौचालय कोणते आहे, पुरुषाचे कोणते आहे याबाबत सूचना लिहिलेली नाही. तर मी असे म्हणतो की या कामास अति आवश्यक समजुन घ्यावे, कारण शासनाचा जो निर्णय आहे संपुर्ण शहर, हांगणदारी मुक्त भारत , जर आपले उल्हासनगर हांगणदारी मुक्त करायचे असेल तर ही गोष्ट प्राथमिकतेवर घेवुन ज्या ठेकेदारास हे काम दिले आहे त्याचा पाठपुरावा करावा. तीन महिन्यांपासुन कामे झालेली नाहीत. ती कामे लवकरात लवकर केली जावीत.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>शौचालयांची वाईट अवस्था आहेत परंतु त्यात स्वच्छता सुध्दा होत नसते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>शौचालयात लाईट नसल्यामुळे आज सुध्दा महिला रात्री उघडयावर येवुन शौचास बसतात. जर आज सुध्दा हांगणदारी मुक्त हा विषय आला तर महासभेत सुध्दा आम्ही याचा विरोध करु. जर आपण शहरातील सर्व शौचालय एक महिन्याच्या आत दुरुस्त करत असाल, त्यात भांडे लावणार, लाईट लावणार, कलर लावणार, नेमप्लेट लावणार, दरवाजे लावणार तर हे योग्य राहील शहरासाठी.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :—</u>३—४ महिने झाले आहेत तर अदयापपर्यंत का नाही झाले शौचलयाचे काम? इतकी वाईट अवस्था आहे शौचालयांची.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता :—</u>काम प्रगतीपथावर आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>प्रगती पथावर तर आहेत, परंतु प्रगतीपथावर काम नाही राहीले पाहिजे तर काम पुर्ण झाले पाहिजे.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :—</u>साधारणत: किती दिवस लागतील. मेंटेन तर केले पाहिजे ना. जर तीन महिने लागतील तर त्याची अवस्था किती खराब आहे, तर कोणी तरी मेंटेन तर केले पाहिजे, सफाई झाली पाहिजे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>हा फार गंभीर विषय आहे, आपण प्रयत्न करा. शौचालय दुरुस्त करणे आावश्यक आहे, ती केली पाहिजेत. ऑर्डर दिलेले आहे, परंतु कामे होत नाहीत. काय होणार याचे, मी सांगतो, हे इतिवृत्तात आले पाहिजे की तीन महिने झाले, आता आणखी तीन महिने लागतील, सहा महिने होतील, मग एक वर्ष होईल त्यानंतर त्या ठेकेदाराचे बिल बनेल. दरवाजे लावणार मग चोरी होतील अशी कामे होता कामा नये. आपण दरवाजे लावल्यानंतर शौचालयांचे फोटो काढावीत. आपण जेवढेपण शौचालय दुरुस्त करत आहात, दरवाजे लावुन तर त्यांची फोटो काढुन ठेवावीत.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :—</u>अशीही परिस्थिती आहे की लोक दरवाजे तोडुन देतात.

यावेळी आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे यांनी सभागृहात प्रवेश केला. व आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ झाले.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>ठिक आहे, हा विषय पास, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास……

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. १ :–** उल्हासनगर महापालिकेसाठी ४ मोबाईल (फिरते) टॉयलेट व्हॅन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम (२) (२) अंतर्गत निविदा शिवाय मे. ओम मनिष इंटरप्राईझेस, उल्हासनगर यांच्याशी थेट संविदा करुन खरेदी करण्यात आली असून कार्योत्तर मंजुरीस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयानुसार, ''स्वच्छ भारत अभियान'' धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणी सुरु आहे. या अभियाना अंतर्गत राज्यातील नागरी भाग हा ३१ मार्च २०१७ पर्यंत हागणदारी मुक्त करण्याचा निर्धार मा. मुख्यमंत्री व मा. मुख्य सचिव यांनी करुन तसे उद्‌दीष्ट राज्याने ठेवले आहे. शहर हागणदारी मुक्त करण्यासाठी आवश्यक २४४९ वैयक्तीक शौचालयांचे बांधकाम पुर्ण करण्यात येणार असून उघडयावर बसणा–या २२ ठिकाणी आवश्यक १० सामुदायीक शौचालये बांधली असून २ ठिकाणी जागा उपलब्ध नसल्याने सामुदायीक शौचालये बांधणे शक्य झाले नाही. व त्यानुसार आपल्या उल्हासनगरसह राज्यातील सर्व महानगरपालिका दि. ३१ मार्च २०१७ पर्यंत हागणदारी मुक्त करण्याचे उद्‌दीष्ट शासनामार्फत देण्यात आले आहे व त्यानुसार कार्यवाही करणेबाबत सक्त सुचना देण्यात आल्या आहेत.

उल्हासनगर महापालीकेस शहर हाणदारी मुक्त करण्यासाठी खालील ठिकाणी सामुदायीक शौचालय बांधण्यासाठी किमान ३ महिन्यांचा कालावधी लागणार असल्याने सदरचे उद्‌दीष्ट पुर्ण करुन घेण्यासाठी सदर ठिकाणी तातडीने पर्यायी व्यवस्था म्हणून मोबाईल टॉयलेट व्हॅन खेरदी करणे आवश्यक आहे.

त्यामुळे शहर हाणदारी मुक्त करण्यासाठी आवश्यक ४ ठिकाणी १) राजीव गांधी नगर, उल्हासनगर–१ २) काकाचा ढाबा जवळ, डॉल्फीन रोड, उल्हासनगर–३ ३) दुर्गा नगर, हनुमान नगर कडील रस्ता, डंपिंग ग्राउंड जवळ, उल्हासनगर–१ ४) बाल्कनजीबारी, उल्हासनगर–२ येथे मोबाईल टॉयलेट व्हॅन खरेदी करुन उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. मोबाईल टॉयलेट व्हॅनच्या सुविधामुळे सदची ठिकाणे हागणदारी मुक्त होवून उद्‌दीष्ट साध्य होणार आहे.

नागरीकांची सदर गैरसोय दुर करणेच्यादृष्टीने तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याच्या दृष्टीने व शहर हागणदारी मुक्त करण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी उघडयावर शौचास बसणा–या व्यक्तींसाठी उल्हासनगर महानगरपालिकेसाठी किमान ४ मोबाईल (फिरते) शौचालयाच्या वाहने खरेदी करणे आवश्यक होते. जेणेकरुन नागरीकांची गैरसोय दुर होवून शहरात रस्त्यावर होणारी दुर्गंधी व पसरणारे रोग यांचेवरही नियंत्रण ठेवणे सुलभ होईल.

तसेच महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय यांचे पत्र क्र. ५७३ दिनांक ६/३/२०१७ अन्वये शहर हागणदारी मुक्त घोषीत करण्यासाठी दिलेल्या सुधारीत सुचनांनुसार ज्या कुटूंबाकडे जागेची उपलब्धता नाही त्यांना ५०० मिटर अंतराच्या आत सामुदायीक शौचालयाची उपलब्धता असणे आवश्यक असल्याचे नमुद केले आहे. तसेच शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०१७/प्र.क्र.१०/नवि–०४ दिनांक २ मार्च २०१७ रोजी अन्वये दिनांक १ मे २०१७ नंतर हागणदारी मुक्त न होणा–या शहरांना राज्य शासनाच्या विशेष योजनेमधून अनुदान न देण्याचा निर्णय झाले असल्याने शहर हाणदारी मुक्त घोषीत करण्यासाठी ३१ मार्च २०१७ रोजी पर्यंत सदरची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तथापी सदरची खरेदी ई–निविदा प्रक्रीया करुन मुदतीत उपलब्ध करुन घेणे शक्य नसल्याने निविदा शिवाय थेट खरेदी करणे आवश्यक आहे.

त्यानुसार खुल्या बाजारातून अधिकृत विक्रेत्याकडून मोबाईल टॉयलेट व्हॅनचे दरपत्रक मागविण्यात आले. प्राप्त दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव | १० सिटर ची प्रति नग किंमत रुपये | ६ सिटर ची प्रति नग किंमत रुपये |
|---|---|---|---|
| १ | मे. ओम मनिष इंटरप्राईझेस, उल्हासनगर | <u>८,७५,०००/–</u> | <u>५,५०,०००/–</u> |
| २ | मे. साईली ट्रेडर्स, कल्याण | ९,३१,०००/– | ५,७३,०००/– |
| ३ | मे. व्हेन्टरकेज कॉर्पोरेशन, डोंबिवली | ९,२३,०००/– | ५,६५,०००/– |

उक्त प्राप्त निविदाकारांपैकी मे. ओम मनिष इंटरप्राइझेस, उल्हासनगर यांचे दर कमी असल्याने मा. आयुक्त व मुख्य लेखा परीक्षक यांनी त्यांना दरांच्या वाटाघाटीसाठी बोलाविण्यच्या सुचना दिल्या. त्यानुसार आवश्यक ४ मोबाईल टॉयलेट व्हॅनचे स्पेसिफीकेशन, देखभालबाबत व किंमतीबाबत दिनांक ४/३/२०१७ रोजी मा. आयुक्त सो व मुख्य लेखा परीक्षक यांनी अधिकृत पुरवठादार मे. ओम मनिष इंटरप्राईझेस, उल्हासनगर यांच्याशीचर्चा करुन सदर ४ मोबाईल टॉयलेट व्हॅन खालील प्रमाणे नमुद तपशीलाप्रमाणे सदरच्या व्हॅन थेट खरेदी करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

| अ.क्र. | तपशील | किंमत रुपये प्रति नग | आवश्यक नग | एकूण किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | १० सिटर टॉयलेट | ८,००,०००/— | १ | ८,००,०००/— |
| २ | ६ सिटर टॉयलेट | ५,१५,०००/— | ३ | १५,४५,०००/— |
| एकूण | | | | २३,४५,०००/— |

उक्त मोबाईल टॉयलेट व्हॅन निविदा काढून खेरदी करण्यास पुरेसा कालावधी नसल्याने निविदा प्रक्रीया न करता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम (२) (२) अंतर्गत सदर ४ मोबाईल टॉयलेट व्हॅन निविदा शिवाय थेट खरेदी करणे आवश्यक आहे.

तसेच शासनाच्या दिनांक २८/२/२०१७ रोजीच्या पत्रान्वेय अस्तित्वात असलेली स्थायी समिती कोणत्याही प्राकारचे आर्थिक निर्णय घेवू शकत नाही. त्यामुळे सदरचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीसाठी नविन स्थापन होणा—या मा. स्थायी समिती समोर ठेवण्यात येत आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम (२) (२) अंतर्गत सदर ४ मोबाईल टॉयलेट व्हॅन निविदा शिवाय मे. ओम मनिष इंटरप्राईझेस, उल्हासनगर यांच्याशी थेट संविदा करुन खरेदी करण्यात आली असून सदरचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीसाठी मा. स्थायी समिती समोर ठेवण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १२० — दिनांकः— २९/३/२०१७

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार उल्हासनगर महापालिकेसाठी ४ मोबाईल (फिरते) टॉयलेट व्हॅन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम (२) (२) अंतर्गत निविदा शिवाय मे. ओम मनिष इंटरप्राईझेस, उल्हासनगर यांच्याशी थेट संविदा करुन खरेदी करण्यात आलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २** :—प्रोक्लेन व जेसिबी मशिनद्वारे मोठया/छोटया नाल्याची सफाई करणे व तसेच मनुष्यबळाद्वारे शहरातील लहान नाले/गटारे/कल्व्हर्ट सफाई करणे व निघालेला कचरा/गाळ याची डंपरद्वारे वाहतुक डंपिंग ग्राऊंडवर करणेबाबतच्या वार्षिक कामासाठी न्युनत्तम दर सादर करणा—या निविदाकार मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन,

उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देणे.

---

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—हा विषय सुध्दा इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावा.

सदस्या श्रीमती अंजली साळवे:—याचे जरा विस्तृतपणे सांगा ना, लेबर नाही आहेत. प्रत्येक प्रभागात किती लेबर लागतात. याचे वर्कआउट कसे आहे? किती महिन्यासाठी आहे?

श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक :—दरवर्षी हा विषय येतो. या वर्षी मा. आयुक्त यांच्या आदेशानुसार पुर्णवेळ ३ वेळा नाले सफाई करणार आहोत. त्यासाठी आपण निविदा मागविली आहे. तद्नंतर ऑक्टोंबर महिन्यात व नंतर जानेवारी महिन्यात एकुण २५ हजार लेबर कामाला लावले. पहिल्या टप्प्यात १० हजार मॅनडेज लावले होते. दुस—या टप्प्यात साडेसात हजार व तिस—या टप्यात साडेसात हजार मॅनपावर लावले होते.

आयुक्त:—नाल्याची लांबी किती आहे?

श्री. राम जैसवार, शहर अभियंता :—४८ नाले मोठे आहेत.

आयुक्त :—तुम्हांला नाल्याची लांबी माहित नाही का? १३ चौरस किलोमिटरचे शहर आहे तुम्हांला माहित पाहिजे की नाल्याची लांबी किती असते. शहरातील रस्ते किती आहेत, नाले किती आहेत? ते नाले ४८ असु शकतात किंवा २ ही असू शकतात. तुम्ही हे पाहु शकतात ना की येथुन एवढा नाला. तुम्ही १० हजार मॅनडॅज म्हणतात ना तर ते कसे काढले?

श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—मोठे नाले, कल्वर्ट त्यासाठी लागणारे मॅनपावर दर प्रभागात १०—१० करुन लावायचे. ३ वर्षात प्रत्येक प्रभागात आपण ६ मॅनडेज लावले. प्रत्येक ठिकाणी मॅनडेज ६—६ करुन मॅनपावर लावले. दिड महिने काम चालु राहते.

सदस्या श्रीमती अंजली साळवे :—प्रत्येक पॅनलमध्ये कसे देणार? प्रत्येक पॅनलमध्ये कि प्रभागामध्ये?

श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—पॅनलमध्ये ६—६.

आयुक्त:—हे जे प्राकलन आहे ते कशाच्या बॅसिसवर आहे? मागील वर्षाच्या बॅसिसवर आहे का? ॲक्चुअल काम किती आहे ते पहा, नाले किती आहे ते पहा.

श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—होय साहेब.

आयुक्त:—प्रत्येक सफाई कामगाराने एका दिवसात काम केले पाहिजे ते कसे केले पाहिजे? प्रत्येक सफाई कामगारांनी एका दिवसात किती रस्ता केला पाहिजे? किंवा किती नाले केले पाहिजे तर याचे स्टॅटीकस्टीक आहे त्यानुसार प्राकलन आहे का हे? गेल्यावर्षी २०० लेबर लागले यावर्षी २५० लागले असे काही ढोबळपणाने आहे का? वर्षात एकदा नाले सफाई करत होते तेव्हा किती पैसा लागत होता? आता तीन वर्षात किती? याचा ढोबळपणा किती?

श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—याचे टेक्नीक बसत नाही. दरवर्षी निविदा काढावी लागतात. बजेटनुसार कामे होतात. आता बजेटच्या २ कोटी ४८ लाख होतात.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—यात काय होते साहेब मी सांगतो. ९७ मध्ये जेव्हा महापालिका झाली तेव्हा एक एक नाल्यांचे वेगवेगळया निविदा काढायचे, सफाई कामगारांद्वारे नाले सफाई होत होती. त्यावेळी कॅप्टन शुळ हे आयुक्त होते. जेव्हा आम्ही ९७ मध्ये नविन निवडून आलो होतो तेव्हा आम्ही पाहिले की प्रभागात ठेकेदारामार्फत ज्यांचे ३ लाखाचे काम होते, ४ लाखाचे काम होते त्यांनी २ लेबर सुध्दा सफाईसाठी लावले नव्हते. ४ लेबर कामाला लावल्यानंतर त्यांनी आपले बिले बनवावयास सुरुवात केली. त्यावेळी मी स्वत: आयुक्त महोदयांना तक्रार केली व महासभेत हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी कॅप्टन शुळ यांनी सर्व ठेकेदारांची बिले रोखून ठेवली होती. त्यावेळी पेमेंट रोखुन ठेवले होती की कामे झाली नाहीत तेव्हा तसा

स्वच्छता निरिक्षकांकडुन अहवाल देखील आला होता. त्यानंतर आम्ही दुस–या वेळेस दरवाढ केली की २०–२० सफाई कामगार यांना त्यावेळी १०० रुपये दर होता. २०–२० सफाई कामगार एक महिन्यासाठी म्हणजे जवळ जवळ ६०० सफाई कामगार एका प्रभागासाठी, जे लहान नाले असतील, म्हणजे प्राक्लेन मशिन सोडुन जेथे होवू शकेल तेथे ६९ प्रभागांमध्ये सफाई कामगार लावून काम केले होते. तेव्हापासून आता ही प्रथा संपली आहे. तेव्हा फक्त प्रोक्लेन मशिनच्या निविदा निघायच्या व सफाई कामगार आपण पुरवत होतो. त्यावेळी काय झाले की एक लेबर उच्च न्यायालयात गेला व मी लेबरचे काम करत आहे तर मला कायमस्वरुपी करा असे सांगितले. तेव्हापासुन ही प्रथा बंद झाली व आता लेबरसाठी निविदा काढु लागले. तर या निविदेप्रक्रियेत २० च्या जागी १० झाले, १० च्या जागी आता एका प्रभागात ६ लेबर मिळत आहेत. ६ लोक रोज काम करतात परंतु मोठया पातळीवरील नाले साफ करणे फारच अडचणीचे आहे. जसे माझ्या प्रभागातील नाला आहे तेथे १०–१५ लेबर संपुर्ण महिनाभर पाहिजेत. हे प्रभागवाईज नाही तर संपुर्ण झोनवाईज हे काम आहे. आपण जर प्रभाग समितीवाईज पाहाल तर आपणांस कळेल.

<u>आयुक्तः–</u>तुमचे काम म्हणणे आहे की ६ मॅनडॅज प्रत्येक प्रभाग समितीमध्ये. तर आपणाकडे किती प्रभाग आहेत ४. १२ होतात ठिक आहे.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवेः–</u>२–२ प्रभागांमध्ये १२–१२ होतात, पण किती दिवस देणार आहेत?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आपण किती दिवस हे लेबर आम्हांस देणार.

<u>श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक :–</u>१ महिन्यापेक्षा जास्त होवु शकतात.

<u>आयुक्तः–</u>तीन वेळा देणार. मे–जुन महिन्यात एकदा, ऑक्टोंबर मध्ये एकदा आहे जानेवारीत एक असे तिनदा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वेः–</u>आपण स्वतः जावुन आधी पाहून या की खरोखर किती लोक लागणार आहेत ते?

<u>आयुक्तः–</u>नाही आता आपण सेल्फी अॅटेंडन्स सिस्टमनेच करु ना जे काही करायचे आहे ते.

<u>सदस्य श्री. विजय पाटीलः–</u>मागील वर्षी सिस्टम नव्हती यावेळी तरी बनवा. प्रत्येक वेळा कोणी नविन आले तर सिस्टमच बदलते. आता तुम्ही येथे सांगतात परंतु पुढील वेळेस ते माणसच नसतात तेथे. तीच माणसे त्या त्या वेळी फिरवितात.

<u>आयुक्तः–</u>नाही, नाही, तसे नाही चालणार.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वेः–</u>तसे चालते म्हणुनच तुम्हांला सांगतो.

<u>आयुक्त :–</u>ज्या प्रभागाचे जे नगरसेवक आहेत त्यांची जबाबदारी आहे ना की तेथे जावुन ते काम बघायचे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वेः–</u>काम आम्ही पाहतो नगरसेवक म्हणुन पण ते सांगतात की माणसेच आली नाहीत.

<u>आयुक्त :–</u>माणसे येत नाही तर मग त्यांचे बिल नाही काढले पाहिजे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वेः– </u>पण ते बिल काढतात ना. काम लवकर होत नाही, मग लेबर मिळत नाहीत व कारणे अशी मिळतात. ६ लेबर त्यास दयायचे असतील तर त्यास २–३ च लेबर दिले जातात.

<u>आयुक्तः–</u>ठिक आहे, मला सांगा ही निविदा प्रक्रिया कोणी केली? ३ निविदा आल्या होत्या.

<u>श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षकः–</u>एकाला दिले आहे.

<u>आयुक्तः–</u>एकच क्वालिफाय आहे त्यास तुम्ही ते काम दिले. प्रक्रिया नीट पाहिली आहे काय? निविदा प्रक्रिया काय झाली, तेव्हा मी नव्हतो. हे जबाबदार आहेत. एडमिनिस्ट्रटीव्हली तर ते जबाबदार आहे ना त्यास. त्यांनी काय निर्णय घेतला तो तुम्हांला माहित पाहिजे काय आहे ते.

<u>सदस्य श्री. विजय पाटील:–</u>तो जो नाला ते साफ करतात ना, तर तेथे ते तोडफोड करतात. त्यावेळी तो त्यांनी बनवुन दिले पाहिजे ना. त्यावेळी असेच सोडुन देतात.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>साहेब, यामध्ये अशी आणखी एक तक्रार आहे, आपण जर पाहुन याल ना, तर मागील वर्षाचा जो कचरा काढला आहे तो त्यांना उचलायचा आहे, परंतु आज सुध्दा १००, १०० गाडया कचरा मोठे नाल्याचा किंवा प्रोक्लेनने निघालेला कचरा तो उचलला जात नाही. तो कचरा उचलला पाहिजे त्याचा व्हिडीओ काढला पाहिजे आणि दाखविला पाहिजे की आम्ही असा कचरा उचलला ते.  आज सुध्दा १००–१०० गाडया नाल्याच्या बाहेर कचरा पडलेला दिसतो.

<u>आयुक्त:–</u>इतिवृत्तात लिहून घ्या. सभागृहाला आणि सर्व प्रभाग अधिका–यांना निर्देश देत आहे की, ज्या ज्या दिवशी कचरा निघेल, त्या त्या दिवशी म्हणजे त्या कच–याचे पाणी ड्रेन व्हायला वेळ लागेल, तो ड्रेन झाल्यानंतरच सर्वच्या सर्व कचरा उचलायचा आणि त्याने प्रमाणीत करुन दयायचे आणि संबंधीत स्वच्छता निरिक्षकांनी लक्ष दिले पाहिजे.  दोन चार लोकांना फिक्स करा, त्याशिवाय ते होत नाही. मी आज शहरात जावुन पाहुन आलो की नाले सफाईची समस्या अत्यंत गंभीर आहे. आज सर्व लोक उपस्थित आहेत, मी आज काही शहरास फेरफटका मारला नाही. आय वील नॉट टॉलरेट नाल्यामध्ये ब्लॉकेज असणे, आय वील नॉट टॉलरेट टु ऑक्युपाय फुटपाथ, आय वील नॉट टॉलरेट टु मार्जीनेस पॅसेज, यु टेक ॲक्शन, ॲण्ड सस्पेंड इमीजेट. स्टॉफ टेक दिस रेकॉर्ड.  मी आज या शहरात फिरुन आलो आहे. फुटपाथवर चहावाल्याचे दुकान आहे, दुकानाच्या बाहेर टपरी काढली आहे.  हे काय आहे?  आपणाकडे सर्व प्रभाग समित्या आहेत.  मी पहिल्यांदा स्वत:हुन फिरुन आलो आहे. येथुन पुढे माझ्या निदर्शनास आले, प्रभाग समिती अधिकारी जबाबदार आहेत, त्यांच्यावर कारवाई करेल. कायदयामध्ये सर्वांच्या जबाबदा–या फिक्स आहेत. प्रभाग अधिकारी हा डिझेग्नेशन ऑफिसर आहे, अतिक्रमणाचा व स्वच्छतेचा स्वच्छता निरिक्षक डेझिग्नेशन आफिसर आहे.  यु टेक एक्शन.  आय वील टेक एक्शन ऐनीबडी ॲण्ड एव्हरीबडी. सर्वच्या सर्व रिकामे झाले तरी चालेल. वुई टेक लेबर कॉंट्रेक्ट ॲण्ड लिटरीली.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>पास, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

<u>काही सदस्य:–</u>पास,पास.......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :–** प्रोक्लेन व जेसिबी मशिनद्वारे मोठया/छोटया नाल्याची सफाई करणे व तसेच मनुष्यबळाद्वारे शहरातील लहान नाले/गटारे/कल्व्हर्ट सफाई करणे व निघालेला कचरा/गाळ याची डंपरद्वारे वाहतुक डंपिंग ग्राऊंडवर करणेबाबतच्या वार्षिक कामासाठी न्युनत्तम दर सादर करणा–या निविदाकार मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका आरोग्य विभागाकडून उक्त विषयांकीत कामासाठी दिनांक २१/१२/२०१६ रोजी दैनिक नवाकाळ, दै. प्रहार, व दै. उल्हास विकास या वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालिकेच्या वेब साईटवर ई–निविदा सुचना प्रसिध्द करून म.ज्मदकमतपदह निविदा मागविण्यात आल्या असता विहित मुदतीत खालील निविदाकारांनी त्यांच्या निविदा दाखल केलेल्या होत्या.

1. M/S Shubham Construction
2. M/S V.K. construction
3. M/S Maabhawani construction
4. M/S Chandrakant construction

प्राप्त निविदाकारांचे तांत्रिक लिफाफे दिनांक ०६/०१/२०१७ रोजी उघडण्यात आल्या होत्या. निविदा समितीने निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी व पडताळणी करुन निविदेच्या अटी व शर्तीनुसार सर्व कागदपत्राची तपासणी केली. निविदा समितीमधील खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा. अतिरीक्त आयुक्त तथा अध्यक्ष

२) उपायुक्त (आरोग्य)
३) मुख्य लेखा अधिकारी
४) मुख्य लेखा परीक्षक
५) शहर अभियंता

मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन यांनी दिलेल्या पुर्ण कागदपत्राची निविदेतील अटी नुसार पुर्ण दस्तऐवजची पुर्तता केली आहे. मेसर्स व्हि. के. कंन्स्ट्रक्शन यांनी Ownership document of At least one poclain machine & Having valid attested copy of Vat clearance certificate 2015-16 & Having valid attested copy of Income Tax Paid up to 2015- 16 ची पूर्तता करीत आहेत. तथापी मेसर्स चंद्रकांत कंन्स्ट्रक्शन व मेसर्स माभवानी कंन्स्ट्रक्शन यांनी Having valid attested copy of Vat clearance certificate 2015-16 & Having valid attested copy of Income Tax Paid up to 2015- 16 ची पुर्तता केली आहे. त्यामुळे मेसर्स चंद्रकांत कंन्स्ट्रक्शन व मेसर्स माभवानी कंन्स्ट्रक्शन यांना अपात्र ठरवण्यात आले व मेसर्स व्हि. के. कंन्स्ट्रक्शन यांच्याकडे अपुर्ण कागदपत्र दाखल केले असल्याने स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी दिनांक ०६/०१/२०१६ रोजी संध्याकाळी ५.३० वाजता मा. आयुक्त साो., यांच्या दालनात सर्व निविदा समिती सदस्य तसेच मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन व मेसर्स व्हि.के. कंन्स्ट्रक्शन निविदाकार यांना उपस्थित राहुन निविदा समिती समोर त्यांच्या मुळ कागदपत्राची तपासणी साठी उपस्थित समिती सदस्य यांनी दस्तऐवजाची पुर्तता करून पुनश:च संधी म्हणुन मुळ दस्तऐवज सादर करण्याबाबत मा. आयक्त साो., यांनी आदेश दिले.

त्याअनुषंगाने मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन व मेसर्स व्हि.के. कंन्स्ट्रक्शन निविदाकार यांना दि. ०९/०१/२०१७ रोजी संध्याकाळी ४.०० वा. मुळ दस्तऐवजसह उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले. परंतु सदर बैठकीत एक ही निविदाकार उपस्थित राहिले नाही. सदर बैठकीत ई–निविदा समिती अध्यक्ष व सर्व समिती सदस्य खालिल प्रमाणे उपस्थित होते.

१) मा. उपायुक्त (मुख्यालय) तथा अध्यक्ष

२) मा. उपायुक्त (आरोग्य)

३) मा. मुख्य लेखा अधिकारी,

४) मा. मुख्य लेखा परिक्षक,

५) मा. शहर अभियंता

प्राप्त झालेल्या ४ निविदामध्ये मे. शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांनी पुर्ण दस्तऐवजाची पुर्तता केली असल्याने ई– निविदा अध्यक्ष व समिती सदस्य यांनी मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांची ई–निविदा आर्थिक लिफाफा (Commerical Bid) उघडण्यास मान्यता दिली होती.

तथापी तद्नंतर मा. उपायुक्त (आरोग्य) यांनी दिलेल्या निर्दशनानुसार दि. १७/०१/२०१७ रोजी मा. आयुक्त साो., यांच्या अध्यक्षतेखाली ई– निविदा समिती यांच्यासह ई–निविदा आर्थिक लिफाफा (Commerical Bid) उघडण्या बाबत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत निविदा समिती यांनी पात्र निविदाकार मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांची ब्वउउमतबपंस ठपकष उघण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. निविदा समितीमधील खालील सदस्य उपस्थित होते.

१) उपायुक्त (आरोग्य)

२) मुख्य लेखा अधिकारी

३) मुख्य लेखा परिक्षक

४) शहर अभियंता

तद्नंतर दिनांक १७/०१/२०१७ रोजी दुपारी ३:०० वा. पात्र निविदाकार मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांची ब्वउउमतबपंस ठपकष उघडण्यात आली असुन त्यांनी सादर केलेले दराचा तपशील खालिल प्रमाणे आहे.

| No. | Particulars | Hrs/Nos | Price per unit | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | Poclain CK/LC70/80/90 EX-100/200 or equivalent –(With bucket) | 1750 Hrs. | 2450/- | 4287500/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | Excavator Loader (JCB 3D) or equivalent with front bucket and back hoe. | 1490 Hrs. | 1050/- | 1564500/- |
| 3 | Providing Dumper/Truck for Disposal of Sludge/Garbage | 4320 Hrs. | 500/- | 2160000/- |
| 4 | Unskilled Labour | 25000 Nos. | 850/- | 21250000/- |
| | Total | | 4850/- | 2,92,62000/- |

मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांनी सादर केलेल्या दरानूसार एकत्रित किमान रू. २,९२,६२०००/– खर्च हा अंदाजीत प्राकलन रक्कम रू. २,१७,०७,४००/– पेक्षा जास्त आहे. म्हणजेच अंदाजीत प्राकलनाच्या एकत्रित रू. ७५,५४,६००/– (३५%) जास्त दर प्राप्त झाले असल्याने, मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर निविदाकार यांच्या दरांबाबत वाटाघाटी करण्यासाठी मा. निविदा समितीने दिलेल्या निर्देशानुसार न्युनतम दराच्या निविदाकारांना वाटाघाटीसाठी जा.क्र.उमपा/आवि/उप.आ/३६०/१७ दि. १८/०१/२०१७ रोजी अन्वये दिनांक १९/०१/२०१७ रोजी दुपारी ३:०० वाजता मा. आयुक्त सो., यांच्या दालनात बोलवण्यात आले. त्यानुसार दिनांक १९/०१/२०१७ रोजी त्यांच्याकडील प्राप्त झालेले दरांनुसार मा. आयुक्त सो., यांच्या अध्यक्षतेखाली मा. निविदा सदस्य यांच्या उपस्थितीत त्यांच्याशी वाटाघाटी केल्या. त्यानुसार वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर वाजवी आहेत. सोबत सदरचे पत्रे जोडून सादर. आरोग्य विभागाने प्राप्त निविदा दराबाबत दिलेल्या अभिप्रायाशी इतर विभाग असहमत असल्यास त्यांचे देखील स्वयंस्पष्ट अभिप्राय नमूद करणे आवश्यक आहे. वाटाघाटी अंती प्राप्त दरांचा तक्ता खालीप्रमाणे आहेत.

| **No.** | **Particulars** | **Hrs/Nos** | **Price per unit** | वाटाघाटी अंती प्राप्त दर रुपये | **Total Amount** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Poclain CK/LC70/80/90 EX-100/200 or equivalent – (With bucket) | 1750 Hrs. | 2450/- | 2450/- | 4287500/- |
| 2 | Excavator Loader (JCB 3D) or equivalent with front bucket and back hoe. | 1490 Hrs. | 1050/- | 1050/- | 1564500/- |
| 3 | Providing Dumper/Truck for Disposal of Sludge/Garbage | 4320 Hrs. | 500/- | 500/- | 2160000/- |
| 4 | Unskilled Labour | 25000 Nos. | 850/- | **675/-** | 16875000/- |
| | Total | | | | 2,48,87000/- |

उक्त नमुद शहरातील लहान नाले/गटारे/कल्व्हर्ट सफाई करणे व निघालेला कचरा/गाळ यांची डंपरद्वारे वाहतूक डंपिंग ग्राऊंडवर करण्याबाबत मशिनरी व मनुष्यबळ पुरवठा करण्याकामी त्यांच्या समोर दर्शविलेल्या परीमाणा नुसार रू २,४८,८७,०००/– ( रुपये दोन करोड अठ्येचाळीस लाख सत्याऐंन्शी हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०१७–१८ च्या लेखाशिर्षक ड (iv) नाला व गटार सफाई खर्च या लेखाशिर्षकात तरतूदीच्या आधिन राहून तरतूद करण्यात आली आहे. यातून करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

तरी सदरच्या खर्चास व तसेच उक्त कामासाठी न्युनतम दर सादर करणा–या निविदाकार मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करीता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १२१ दिनांक:– २९/३/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रोक्लेन व जेसिबी मशिनद्वारे मोठया/छोटया नाल्याची सफाई करणे व तसेच मनुष्यबळाद्वारे शहरातील लहान नाले/गटारे/कल्व्हर्ट सफाई करणे व निघालेला कचरा/गाळ

याची डंपरद्वारे वाहतुक डंपिंग ग्राऊंडवर करणेबाबतच्या वार्षिक कामासाठी न्युनत्तम दर सादर करणा—या निविदाकार मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांच्याशी प्रशासनास संविदा करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ३ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत कॅम्प क्र. १ ते ३ मध्ये असलेले विविध बुस्टर पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणेच्या कामी मुदतवाढ देणे.

———————————————————————————————————————

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**यामध्ये बरेचसे असे विषय येतात जेव्हा वेळ संपते तेव्हा आपण म्हणतो नविन निविदा काढावी. त्यानंतर दोन दोन वर्ष, एक एक वर्षासाठी मुदतवाढीसाठी येते. १८ महिने मुदतवाढ झाली आहे आणि नंतर आता आले आहे. ही कोणाची जबाबदारी आहे. यात काय लिहिले आहे, जोपर्यंत दुसरे मुदतवाढ देत नाही तोपर्यंत त्याची निविदा काढणार तर मग कधी काढणार? एक वर्षाची निविदा होती, पंधरा महिने मुदतवाढीसाठी होता.

आयुक्त :—कोणाचा विषय आहे? का नाही निविदा काढली? यामध्ये जास्तीत जास्त तुम्हांला निविदा काढायला किती वेळ लागेल?

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**नविन निविदा निघेपर्यंत एक दिड महिन्याच्या आत होईल.

**आयुक्तः—**त्यास नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ दयावी.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**तारीख दया, नाहीतर हे काम २०२० पर्यंत होईल.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**साहेब, दोन महिन्याच्या आत होईल.

**आयुक्तः—**रेकॉर्डवर घ्या. श्री. सेलवन यांनी सांगितले की दोन महिन्यात आत होईल.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वेः—**आता मार्च आहे तर जुनपर्यंत.

**आयुक्त :—**होय, तीन महिने पकडा.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**३० जुनपर्यंत.

**आयुक्त :—**तीन महिने किंवा निविदा प्रक्रिया जे अगोदर होईल ते.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**पुढील विषय क्र. ४ व ५ सुध्दा असेच करा.

<u>आयुक्त:–</u>होय सारखेच.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>तिन्ही इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३** :– उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत कॅम्प क्र. १ ते ३ मध्ये असलेले विविध बुस्टर पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणेच्या कामी मुदतवाढ देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरात पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेसाठी कॅम्प नं. १ ते ३ येथे उभारण्यात आलेली विविध बुस्टर पंपिग स्टेशन बारा महिन्याच्या कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणे या कामाची निविदा काढण्यात आली होती. सदर कामाच्या निविदेस ''जे.एन.एन.यु.आर.एम.'' योजना कार्यान्वित होईपर्यंत तसेच लोकसभा निवडणूकीचे आदर्श आचारसंहिता असल्याने त्या कालावधीत निविदा काढणे शक्य होणार नव्हते. म्हणुन या कार्यालयाचे आदेश क्र.उमपा/पापु/काअ/४५९, दिनांक ०१/०३/२०१४ अन्वये मुदतवाढ देण्यात आलेली होती. तसेच''जे.एन.एन.यु.आर.एम.'' योजना पुर्ण करणेसाठी बराच कालावधी लागणार असल्याने, मा.स्थायी समिती ठराव क्र.७४, दिनांक ३०/०१/२०१५ अन्वये अस्तित्वात असलेले ठेकेदार मे.हर्षल टेक्नीक्स, नाशिक यांना व्दितीय मुदतवाढ देण्यात आलेली होती. ती मुदतवाढ दिनांक ३१/१२/२०१५ संपुष्टात आलेली आहे. परंतु मुदतवाढ देतांना मा.आयुक्त सो., यांनी पुढील काळासाठी ''जे.एन.एन.यु.आर.एम.'' योजनेचा आढावा घेऊन सुरु राहणाऱ्या आवश्यक तेवढे पंपिग स्टेशनसाठी निविदा प्रक्रिया सुरु करण्याची सुचना केली होती. त्यानुसार नवीन प्रस्ताव मंजुर झाला असुन निविदा कार्यवाही सुरु आहे.

सदर कामाची व्दितीय मुदतवाढ संपल्याने, मे.हर्षल टेक्नीक्स, नाशिक यांचे पत्र क्र. एचटी/इएक्सटी–१सी/१६,दिनांक २१/०१/२०१६ अन्वये या कामासाठी मुदतवाढ मिळणेसाठी विनंती केली आहे. सदर निविदे अंतर्गत असलेले काम हे अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने, नवीन निविदा मंजुर होईपर्यंत अस्तित्वातील ठेकेदाराकडून काम सुरु ठेवणे गरजेचे आहे. अन्यथा ठेकेदाराने आपले पंपचालक व हेल्पर व इतर कर्मचारी बंद केल्यास पंपिग बंद होऊन पाणी पुरवठा बंद होईल. त्यामुळे सर्व बाबींचा विचार करता सदर ठेकेदारास नवीन निविदा अंतिम होईपर्यंत मंजुर दराने मुदतवाढ देण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. तरी सदर प्रस्तावास मा. स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १२२      <u>दिनांक:– २९/३/२०१७</u>

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत कॅम्प क्र. १ ते ३ मध्ये असलेले विविध बुस्टर पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणेच्या कामी ३० जुन २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.** ४ :— उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत कॅम्प क. १ ते ३ मध्ये असलेले विविध एच. टी. पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणेच्या कामी मुदतवाढ देणे.

---

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**३१ मार्चपर्यंतची अमृत योजनेची जी भुयारी गटार योजना आलेली आहे, निगोशेशन करुन ते सुध्दा अंतिम करुन आज स्थायी समितीला दयायला पाहिजे होते. त्यानंतर पुन्हा जाणे व पुन्हा याठिकाणी वेळ होते, यामध्ये काय रस आहे मला समजत नाही, स्थायी समिती निर्णय घेईल. आज यायला पाहिजे होते, आमची आज मान्यता होती. मा. महापौर सुध्दा आपणाशी बोलल्या, स्थायी समिती सदस्य सुध्दा बोलले. अजुन वेळ नाही गेली, संध्याकाळपर्यंत आम्हांला दयाल तर फार बरे होईल. तुम्हांला विनंती आहे याबाबतीत, जे काही निर्णय स्थायी समिती घेईल, कारण की ते जर कायदयात बसुन आले असेल तर दयायला हरकत नाही. आणि जर स्थायी समितीला डावलुनच जर, जसे राज्य शासनाने केले की परिपत्रक काढुन काम थांबवुन टाकले. मला स्वत:ला उच्च न्यायालयात जावुन त्यासाठी आदेश काढावे लागले. पुन्हा एकदा सांगतो नाहीतर मला पुन्हा एकदा उच्च न्यायालयात जावे लागेल. आमच्या कालावधीत न आणता मुद्दाम ते गेले आहे पुढे. काही तरी कारणास्तव व कुणाच्यातरी दबावाखाली.

**आयुक्त:—**दबावाचा प्रश्नच नाही.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**तुमचे तांत्रिक काही गोष्टी असतील, पण स्थायी समितीला दिलेले अधिकार जर त्यामध्ये बसत नसेल तर आमच्याकडे फक्त दया, आम्ही निर्णय घ्यायला सक्षम आहोत.

**आयुक्त:—**मा. महापौरांशी व आपणांशी जी चर्चा केली, सिंगल टेंडरचा विषय आहे, यामध्ये नगरविकास विभागाकडुन मार्गदर्शन घ्यायला पाहिजे, एमजीपी कंन्स्ल्टंट आहे, त्या ठेकेदारास आम्ही निगोशिएशनसाठी बोलविले होते, ते निगोशिएशन करत असतांना ठेकेदाराने त्या फंडामेंटलसाठीच डाउट क्लिअर केले आहेत. त्यामध्ये त्यांचे म्हणणे आहे की फायलींगचे कामच त्यामध्ये इन्क्लुड नाही. आणि तो म्हणतो की मुलभुत निविदेच्या प्रक्रियेतच चुका आहेत, एकच सिंगल निविदा मिळालेली आहे, त्यामध्ये हया सगळया सीव्हीसीच्या गाईडलाईन, एमजीपीचे टेक्नीकल जे मार्गदर्शन असेल ते, नगरविकास विभागाच्या मार्गदर्शक सूचना त्यानुसार निर्णय घ्यायला पाहिजे आणि निविदाच चुकीची असेल फंडामेंटली तर त्यामध्ये त्याला निविदा जरी दिली तर त्यामध्ये काही एक्स्ट्रा आयटमचे पैसे घ्यायचे असतील, किंवा एखादा आयटम त्यामध्ये इन्क्लुड नाही हे एस्टीटीचे काम आहे, संपुर्ण महानगरपालिकेमध्ये एस्टीटी आहे, त्यामध्ये जर एखादा आयटम इन्क्लुडच नसेल तर त्याची जबाबदारी उदया कोणावर ठेवायची, कामाच्या क्वालीटीमध्ये काही समजुती झाल्या, आपण सर्व ॲडमिनीस्ट्रेटीव्ह आहोत तुम्ही सर्व राजकीय नेते आहात, त्याचे डीपीआर बनविणे, त्याच्या तांत्रिक गोष्टी करणे हे एमजीपी कॉम्पीटंट ॲथोरीटी आहे. त्यांचे मार्गदर्शन आल्यानंतर मला पुढे जाणे गैर वाटत नाही. हे दोन ज्या निविदा आहेत, जी गोष्ट करायची होती, रस्त्याची, तर त्यामध्ये निविदा प्रक्रियामध्ये जी पध्दत फॉलोप झाली ते आपण त्वरीत केल्या. मला असे वाटते त्यामध्ये दबाव वगैरे विषयच नाही. तांत्रिक मुद्दा आहे आणि काही १०—५ लाखाचे काम नाही आहे. २५ कोटीचा जो कोटा आहे, विशेष प्रकल्प आहे, त्या प्रकल्पात काही तांत्रिक अडचणी असतांना आपण पुढे जाणे गैर आहे.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**साहेब, या प्रश्नाबाबत एकच गोष्ट आहे, सर्वच निविदा ही एमजीपीने हाताळली आहे. त्याला एकवर्ष लावले आहे, या शहराला म्हणजे आपल्या महापालिकेच्या वास्तुला १५ कोटी दंड हरीत लवादाने दिल्यानंतर, त्याकरीता राज्य शासनाने अमृत योजनेमध्ये समाविष्ट केला आणि तो ३१ मार्चपर्यंत पुर्ण करण्यासाठी आजही पत्र पाहिले, दोन पत्र मी पाहिले. एक २४ तारखेचे पत्र आहे आणि एक २ तारखेचे पत्र आहे. ही दोन पत्र असून देखील त्यामध्ये आणि एमजीपीने सर्व प्रक्रिया केली असतांना आपले इंजिनिअर्स असतांना जर त्यात परिपुर्ण नाही असे आपण म्हणत आहोत म्हणजे हा वेळेचा प्रश्न आहे, आज घाण पाणी आमच्या लोकांना प्यायला लागत आहे, घाण पाणी पिण्यासाठी आज एवढा मोठा विषय झाला, सुप्रिम कोर्टाकडुन आपल्याला स्टे घ्यायला लागला आपल्याला झालेल्या दंडाबाबत. विषय गंभीर आहे आणि तशा

काही चुका तुम्हांला वाटत असतील तर आपण सुध्दा आपल्या गोषवा–यामध्ये आम्हांला देवु शकता. साहेब एक गोष्ट आहे, जर तो टेंडरर म्हणतो आहे की या गोष्टी एक्सेप्ट नाही तर त्याने निविदा भरायलाच नाही पाहिजे होती, मुख्यत: आणि आता तो म्हणत आहे तर तुमच्या अधिका–यांनी इस्टिमेशन करायला पाहिजे ना त्यामध्ये जस्टीफिकेशन करुन तुम्ही मंथन करायला पाहिजे. शहरात ३१ मार्चची डेडलाईन आहे. उच्च न्यायालयाची, आपण त्यांना दिलेले आहे कसेही करुन. शासनाने आपणांस अमृत योजना दिली. ते ३२ की ३५ कोटी होते, तेथे त्यांनी प्रथम पहिला टप्पा म्हणुन ती आपणांस ७२ कोटी की ७१ कोटी काहीतरी आपणांस दिले. ती सुरुवात होवून आमचे म्हणणे कसे की आज ते काम सुरु झाले असते, या शहराला आज जावे लागले उच्च न्यायालयात सभा लावण्यासाठी की आमचा कालावधी संपलेला नाही. आमचा कालावधी ५ एप्रिलपर्यंत संपुर्ण बॉडीचा कालावधी आहे. ३१ मार्चपर्यंत कालावधी आहे, त्याप्रमाणे ते आदेश कोर्टाने मान्य केले. आणि अजुनही आपल्या निविदेने जे काही तुम्हांला निगोशिएत केले किंवा पत्र पाठविले. त्याबाबत आपण ते पाठवुन निर्णय घेतला पाहिजे होता. त्यात आम्ही सुध्दा बांधित आहोत की चुकीचा निर्णय घेतला तर आम्ही सुध्दा बांधिल आहोत. आम्ही सदस्य आहोत जसे अधिकारी सदस्य आहेत, तर माझी तुम्हांला विनंती हीच राहिल या अनुषंगाने की आजचा दिवस आहे पाठविता आले तर पाठवा. नाहीतर आम्हांला कोर्टाचा दरवाजा ठोठावा लागेल. याची सर्वस्वी जबाबदारी अभियंता व एमजीपीची राहिल. कारण आपण तांत्रिक अधिकारी नाहीत किंवा मी तांत्रिक अधिकारी नाही.

आयुक्त:–मी आपणांस आता कॉन्स्टेप्ट डेफिक्नेशन सांगतो की, जी गोष्ट करण्यासाठी आम्हांला काही त्यामध्ये तांत्रिक अडचण नव्हती, त्याचा ताबडतोब आम्ही गोषवारा तयार करुन त्यांचे निगोशिएशन झालेले इतिवृत्त आम्ही तात्काळ पाठविले. परंतु एखादया गोष्टीमध्ये ठेकेदार स्वत: काम करणारा आहे तर तो स्वत:च फंडामेंटली टु कन्व्हीन्स आहे की हे काम निविदेच्या बाहेर आहे तर असे काम करुन आपण लोकांना त्या परिस्थितीत बांयडिंग करुन किंवा करार करणे कितपत योग्य आहे. हे आपण एमजीपीकडुन मार्गदर्शन मागवु. आले नाही का आपणांस निगोशीएशनचे लेटर अजुन? ठेकेदाराचे पत्र आपणांस प्राप्त झाले? कधी प्राप्त झाले?

श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता:–आजच प्राप्त झाले. आज दुपारी आले.

आयुक्त :–आज दुपारी प्राप्त झाले तर ...

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–साहेब, आज सकाळी ११.०० वाजता प्राप्त झाले. त्यानंतर काही हालचाल नाही, ते कुठल्या स्टेजला आहे ते माहित नाही.

श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता:–साहेब, डॉक्युमेंट्स नाही आले.

आयुक्त:–ठिक आहे, तुम्ही तात्काळ त्यांच्याकडुन काही जास्तीत जास्त डॉक्युमेंट्स असतील तर घ्या, आजच्या आज त्यांच्याकडुन तुम्ही घ्या. संध्याकाळच्या संध्याकाळी आणि ते पोच करा. तूम्ही प्रयत्न करा आम्हीही प्रयत्न करु.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–साहेब, तेव्हा एमजीपीने एक वर्ष लावला हा प्लान बनवायला आणि ही फॅक्ट आहे, एमजीपीची तीच अवस्था आहे आणि येथे सुध्दा तीच अवस्था आहे. कुठलाही इंजिनिअर परिपुर्ण आहे असे मला वाटत नाही. कारण परिपुर्ण असा शहराचा विचार करु शकत नाही. आता तुम्ही म्हणालात मी राउंड मारुन आलो मी परिस्थिती पाहिली आहे, तर ही एक दुर्देवाची गोष्ट आहे. असा गोष्टी तुम्ही येवुन जर कोणी करत नसेल तर यास एक महिना दोन महिना लागणार आहे. कुठलेही उत्तर लगेच देत नाही हे वारंवारचे आहे. आणि एमजीपीने जे केलेले आहे ना, ते कोण सचिव आहेत, श्री. संतोष कुमार कोणीतरी आहेत त्यांनी ते मागवुन ठेवले आणि ठेवुन दिले बाजुला. हे गेले दोन वर्ष सतत चालले आहे. मी सदस्यांतर्फे आणि नागरीकांतर्फे एवढेच म्हणेल की, मला नाईलाजास्तव कोर्टात जावे लागेल. मी अधिकार सांगितले आहे, तुम्ही तुमचे अधिकार वापरा, आम्ही आमचे अधिकार वापरतो. कारण की याचा विषयच असा आहे. ३–३ वर्ष, २–२ वर्ष निविदाच होत नाही, जाहीरातीची निविदा बघा यापासुन महापालिकेला उत्पन्नाचे सोर्स आहे परंतु दिड वर्ष झाले महापालिकेने जाहिरात दिलीच नाही. टॅकरचे टेंडर ते एक एक वर्ष, दिड दिड वर्ष स्लोट होतच नाही.

आयुक्त,:–जाहिरातीचे तर यायलाच पाहिजे. ५–१० कोटी इन्कम दरवर्षी येते.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>विचारा साहेब, कोठे निघते? दिड वर्ष होवून गेले या गोष्टीस मालमत्ताला विचारा. नसलेल्या मालमत्तेला विचारा.

<u>आयुक्त:—</u>कोण आहे?

<u>श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता :—</u>साहेब, मी आताच रुजु झालो आहे.

<u>आयुक्त:—</u> तुम्हांला माहित नाही काय? तुमच्या अगोदर कोण होते?

<u>श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता :—</u>साहेब, मी आताच आलो तीन दिवस झाले, श्रीमती विशाखा सावंत हया तेथे मालमत्ता व्यवस्थापक म्हणुन आहेत.

<u>आयुक्त:—</u>बोलवा त्यांना.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>एखादी फाईल एखादया अधिका—याकडे गेली तर आम्हांला जावे लागते सहीसाठी ही परिस्थिती आहे.

<u>आयुक्त :—</u>मला माहिती आहे, आपल्याला याच वातावरणामध्ये काम करावे लागते.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>नाही, नाही साहेब, हे शहराचे नुकसान आहे ना? उत्पन्नाच्या सोर्समध्ये सुध्दा आपण लक्ष देत नाहीत.

<u>श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक:—</u>२१ दिवसाची अपॉईंटमेंट केलेली आहे.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत कॅम्प क्र. १ ते ३ मध्ये असलेले विविध एच. टी. पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणेच्या कामी मुदतवाढ देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरात पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेसाठी ''टप्पा—१'' अंतर्गत कॅम्प नं.१ ते ३ येथे उभारण्यात आलेली विविध एच.टी.पंपिग स्टेशन बारा महिन्याच्या कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणे या कामाची निविदा काढण्यात आली होती. सदर कामाच्या निविदेस ''जे.एन.एन.यु.आर.एम.'' कार्यान्वित होईपर्यंत तसेच लोकसभा निवडणूकीचे आदर्श आचारसंहिता असल्याने त्या कालावधीत निविदा काढणे शक्य होणार नव्हते. म्हणुन या कार्यालयाचे आदेश क्र. उमपा/पापु/काअ/४५८, दिनांक ०१/०३/२०१४ अन्वये मुदतवाढ देण्यात आलेली होती. तसेच ''जे. एन.एन.यु.आर.एम.'' योजना पुर्ण करणेसाठी बराच कालावधी लागणार असल्याने, मा.स्थायी समिती ठराव क्र.७५, दिनांक ३०/०१/२०१५ अन्वये अस्तित्वात असलेले ठेकेदार मे.हर्षल टेक्नीक्स, नाशिक यांना व्दितीय मुदतवाढ देण्यात आलेली होती. ती मुदतवाढ दिनांक ३१/१२/२०१५ संपुष्टात आलेली आहे. परंतु मुदतवाढ देतांना मा.आयुक्त सो., यांनी पुढील काळासाठी ''जे.एन.एन.यु.आर.एम.'' योजनेचा आढावा घेऊन सुरु राहणाऱ्या आवश्यक तेवढे पंपिग स्टेशनसाठी निविदा प्रक्रिया सुरु करण्याची सुचना केली होती. त्यानुसार नवीन प्रस्ताव मंजुर झाला असुन निविदा कार्यवाही सुरु आहे.

सदर कामाची व्दितीय मुदतवाढ संपल्याने, मे. हर्षल टेक्नीक्स, नाशिक यांचे पत्र क्र. एचटी/इएक्सटी—१अे/१६, दिनांक २१/०१/२०१६ अन्वये या कामासाठी मुदतवाढ मिळणेसाठी विनंती केली आहे. सदर निविदे अंतर्गत असलेले काम हे अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने, नवीन निविदा मंजुर होईपर्यंत अस्तित्वातील ठेकेदाराकडून काम सुरु ठेवणे गरजेचे आहे. अन्यथा ठेकेदाराने आपले

पंपचालक व हेल्पर व इतर कर्मचारी बंद केल्यास पंपिग बंद होऊन पाणी पुरवठा बंद होईल. त्यामुळे सर्व बाबींचा विचार करता सदर ठेकेदारास नवीन निविदा अंतिम होईपर्यंत मंजुर दराने मुदतवाढ देण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. तरी सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १२३ दिनांकः— २९/३/२०१७

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत कॅम्प क्र. १ ते ३ मध्ये असलेले विविध एच. टी. पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणेच्या कामी ३० जुन २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या ''टप्पा—१'' अंतर्गत कॅम्प क्र. ४ ते ५ मध्ये असलेले विविध एच.टी.पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणेच्या कामी मुदतवाढ देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ५ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या ''टप्पा—१'' अंतर्गत कॅम्प क्र. ४ ते ५ मध्ये असलेले विविध एच.टी.पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणेच्या कामी मुदतवाढ देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरात पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेसाठी ''टप्पा—१'' अंतर्गत तसेच ''जे.एन. एन.यु.आर.एम.'' योजने अंतर्गत कॅम्प नं.४ ते ५ येथे उभारण्यात आलेली विविध एच.टी.पंपिग स्टेशन बारा महिन्याच्या कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणे या कामाची निविदा काढण्यात आली होती. सदर कामाच्या निविदेस ''जे.एन.एन.यु.आर.एम.'' कार्यान्वित होईपर्यंत तसेच लोकसभा निवडणूकीचे आदर्श आचारसंहिता असल्याने त्या कालावधीत निविदा काढणे शक्य

नव्हते. म्हणुन या कार्यालयाचे आदेश क्र.उमपा/पापु/काअ/४६०, दिनांक ०१/०३/२०१४ अन्वये मुदतवाढ देण्यात आलेली होती. तसेच ''जे.एन.एन.यु.आर.एम.'' योजना पुर्ण करणेसाठी बराच कालावधी लागणार असल्याने, मा.स्थायी समिती ठराव क्र.७६, दिनांक ३०/०१/२०१५ अन्वये अस्तित्वात असलेले ठेकेदार मे.हर्षल टेक्नीक्स, नाशिक यांना व्दितीय मुदतवाढ देण्यात आलेली होती. ती मुदतवाढ दिनांक ३१/१२/२०१५ रोजी संपुष्टात आलेली आहे. परंतु मुदतवाढ देतांना मा.आयुक्त सो., यांनी पुढील काळासाठी ''जे.एन.एन.यु.आर.एम.'' योजनेचा आढावा घेऊन सुरु राहणाऱ्या आवश्यक तेवढे पंपिग स्टेशनसाठी निविदा प्रक्रिया सुरु करण्याची सुचना केली होती. त्यानुसार नवीन प्रस्ताव मंजुर झाला असुन निविदा कार्यवाही सुरु आहे.

सदर कामाची व्दितीय मुदतवाढ संपल्याने, मे.हर्षल टेक्नीक्स, नाशिक यांचे पत्र क्र. एचटी/इएक्सटी–१बी/१६, दिनांक २१/०१/२०१६ अन्वये या कामासाठी मुदतवाढ मिळणेसाठी विनंती केली आहे. सदर निविदे अंतर्गत असलेले काम हे अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने, नवीन निविदा मंजुर होईपर्यंत अस्तित्वातील ठेकेदाराकडून काम सुरु ठेवणे गरजेचे आहे. अन्यथा ठेकेदाराने आपले पंपचालक व हेल्पर व इतर कर्मचारी बंद केल्यास पंपिग बंद होऊन पाणी पुरवठा बंद होईल. त्यामुळे सर्व बाबींचा विचार करता सदर ठेकेदारास नवीन निविदा अंतिम होईपर्यंत मंजुर दराने मुदतवाढ देण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. तरी सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १२४ — दिनांक:– २९/३/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या ''टप्पा–१'' अंतर्गत कॅम्प क्र. ४ ते ५ मध्ये असलेले विविध एच.टी.पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणेच्या कामी ३० जुन २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ६ :– ''महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास योजने योजनेअंतर्गत शासनाकडून महापालिकेस प्राप्त होणाऱ्या निधीअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांकरीता निम्न दराचे मे. जयहिंद –जयभारत – झा.पी (Joint Venture) यांच्या संविदेस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–हे जे रस्ते आहेत ते विकास आराखडयातमध्ये ६० फुटाचे आहे. त्यांनी त्या हिशोबाने निविदा काढलेली आहे. ४ नंबरचा रस्ता आहे तेथे बरीचसी कटींग होणार, बहुतेक लोकांची घरे पुर्णपणे जाणार, तर त्यांच्याकडे जरा लक्ष दिले पाहिजे. ज्यांचे सुपर्ण बांधकाम जाते त्यांचा विचार केला पाहिजे. तेथे ती लोक ३०–४० वर्षापासुन राहत आहेत, त्यांची पर्यायी व्यवस्था केली पाहिजे.

<u>आयुक्त:—</u>तसे जर झाले नाही तर निविदा करुन फायदा काय? उदया त्यास स्टे लागेल? यात धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>त्याकरीता आमची स्थायी समितीची विनंती असेल की, कुठलाही धोरणात्मक निर्णय असेल तर यांना सुध्दा तुम्ही सांगा.

<u>आयुक्त:—</u>होय, नक्कीच.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>कोणतीहा असा धोरणात्मक निर्णय होईल, कोणतेही पत्र असेल तर त्यांना कोठे ना कोठे मदत केली पाहिजे. असे धोरण केल्यावर करा आता नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>त्यात असे आहे की हे रस्ते ६० फुट करण्यासाठी उन्हाळयाचे दोन दिवस आहे आपणाकडे. समजा आज आपली स्थायी समिती मान्यता देते तर लवकरात लवकर ८—१० दिवसात वर्क ऑर्डर त्या ठेकेदारास दिली पाहिजे. नाहीतर पावसाळयात जर आम्ही तोडायचे तर ते अडुन राहील काम. म्हणुन आताच तोडुन घेतले पाहिजे ताबडतोब.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>लवकरात लवकर हे काम केले तर बरे होईल.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>प्रभाग समिती वेगवेगळया आहेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>प्रभाग समिती १,२,३ व ४ हे सर्व आहेत.

<u>आयुक्त:—</u>कोणाच्या प्रभागात आहे?

<u>श्री. गणेश शिंपी, प्र.सहा. आयुक्त:—</u>आमच्या प्रभागात नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>एक रस्ता आहे.

<u>आयुक्त :—</u>तो किती मध्ये आहे?

<u>श्रीमती अलका पवार, प्र. सहा. आयुक्त :—</u>प्रभाग समिती १ मध्ये आहे मी आताच जॉईंट झाली आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> एक महत्वाचा रस्ता आहे उल्हासनगर—३ येथे. प्रभाग समिती ३ मध्ये आहे. तेथिल प्रभाग अधिकारी सुध्दा नविन आहेत.

<u>श्री. बाजीराव जाधव, प्र. सहा. आयुक्त :—</u>मी सुध्दा आताच आलो आहे.

<u>आयुक्त:—</u>आज संध्याकाळी जावून पहा, एक अंदाज घ्या आणि मला सांगा किती स्ट्रक्चर अलाईटमेंट मध्ये येतात. किती वेळ लागेल. ठिक आहे, तेवढाच विषय आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>आणि साहेब, जो साठ फुटाचा जो रस्ता आहे ना तो आपल्या बॅरेकस्च्या जी काही मार्किंग आहे ती ॲक्युरेट मार्किंगने दया. माहित आहे का एखादयाला वाचविण्यासाठी समोरच्याला झोपवायचे.

<u>आयुक्त:—</u>झोपडपट्टीच असतील.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>तसे नाही होत. नंतर कोर्ट मॅटर होतात.

<u>आयुक्त :—</u>श्री. जैसवाल ही सरळपट्टीच आहे.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता :—</u>सेंट्रल लाईन धरुनच आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>बॅरेकस्च आहेत. एका जागेस वारंवार कटींग होत आहे. दोन वेळा तेथे कटींग झालेली आहे. आता सुध्दा ते सेंट्रल पकडुनच आहेत. काय होते एखादया व्यक्तीवर सारखे अन्याय होत आहे. माझे म्हणणे हेच आहे की उच्च न्यायालयामुळे रस्ता अडला आहे, त्यास कारण फक्त हेच आहे.

<u>आयुक्त:—</u>करतो मी.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>होय, ठिक आहे साहेब, हे लवकरात लवकर करा. इतिवृत्ताची वाट न पाहता हा ठराव पारीत करा.

<u>आयुक्त:—</u>हे रेकॉर्डवर घ्या, डिमार्केशन करतांना मला सांगुन मग पुढे जा.

<u>महापालिका सचिव :</u>साहेब, हे लिपिक आहेत, लघुलेखक नाही, त्यामुळे ते एवढया फास्ट लिहु शकत नाही.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता :—</u>गोषवा—यात सदर बाबतीत निविदा समितीने योग्य निर्णय घेतला आहे म्हटले आहे परंतु घेईल असे करा.

<u>म्हापालिका सचिव :—</u>ठिक आहे, मी करेक्शन करते.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६ :—** ''महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास योजने योजनेअंतर्गत शासनाकडून महापालिकेस प्राप्त होणाऱ्या निधीअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांकरीता निम्न दराचे मे. जयहिंद —जयभारत — झा.पी (Joint Venture) यांच्या संविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

शासन निर्णय क्रमांक—जीईएन—२०१६/प्र.क्र.२७५/नवि—१६ दिनांक १५ नोव्हेंबर, २०१६ या कार्यालयास प्राप्त झाला असून सदर शासन निर्णयान्वये ''महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास'' या योजनेअंतर्गत विविध विकास कामांकरिता ''अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर'' निधी वितरीत करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे खालील रस्त्यांची कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | रस्त्याची लांबी | अंदाजित प्राकलनिय किंमत |
|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर—३ येथील ६० फुट रुंद नेहरु चौक ते फॉलवर लाईन पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली/फुटपाथ व दुभाजकाचे काम करणे | ८५० मीटर | रुपये ५,५०,००,०००/— |
| २ | उल्हासनगर—३ येथील ६० फुट रुंद विठ्ठलवाडी स्मशानभुमी पर्यंतचा रस्त मार्गे काजल पेट्रोलपंप पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली/फुटपाथ व दुभाजकाचे काम करणे | ८५० मीटर | रुपये ५,५०,००,०००/— |
| ३ | उल्हासनगर—४ येथील ६० फुट रुंद व्हि.टी.सी. क्रिडा संकुल ते आशेळे गांव पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली/फुटपाथ व दुभाजकाचे काम करणे | ६००मीटर | रुपये ४,००,००,०००/— |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | उल्हासनगर–४ येथील ६० फुट रुंद वीर सावरकर चौक ते जिजामाता उद्यानापयटंत मार्गे उल्हास स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली/फुटपाथ व दुभाजकाचे काम करणे | ७५० मीटर | रुपये ५,००,००,०००/– |
| | **एकूण** | ३०५० मीटर | रुपये २०,००,००,०००/– |

वरील नमुद रस्त्यांचे प्राकलन तयार करुन कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.महासभेची मंजूरी मिळणेकरीता सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे प्रस्तावित केले असता मा. महासभेने ठराव क्रमांक ३१ दिनांक ०७/१२/२०१६ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे उक्त कामाच्या दिनांक २२/१२/२०१६ रोजी ई–निविदा मागविण्यात आल्या. (ई निविदा क्रमांक १३११) सदर निविदा प्रक्रियेत खालील दोन निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या.

१) मे.जयहिंद –जयभारत – झा.पी (Joint Venture) : २१.३३ टक्के जास्त

२) मे.श्री कृपा – साई सिध्दनाथ (Joint Venture) : २३.०० टक्के जास्त

वरील निविदाकारांपैकी निम्न दराचे मे.जयहिंद –जयभारत – झा.पी (Joint Venture) यांना या विभागाचे दिनांक ०४/०३/२०१७ चे पत्रान्वये वाटाघाटीकरीता बोलविण्यात आले. सदर वाटाघाटीच्या वेळी त्यांनी त्यांचे दर कमी करुन १७.०५ टक्के जास्त एवढया दरावर काम करण्यास तयारी दर्शविली. तद्नंतर मा. आयुक्त सो. यांनी संबंधित एजन्सी, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता, उप–अभियंता व निविदा समितीचे सदस्य यांचे समवेत दिनांक १५/०३/२०१७ रोजी बैठक घेतली. सदर बैठकीच्या वेळी झालेल्या चर्चेअंती संबंधित एजन्सीने ९.९८ टक्के जास्त एवढया दरावर काम करणेस सहमती दर्शविली. तसेच निविदा अटी व शर्तीतील Clause No.३.२.१२ नुसार देयक रक्कमेच्या १५% रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून ठेवण्याचे नमुद आहे. परंतू सदर बैठकीमध्ये संबंधित एजन्सीने देयक रक्कमेतून १५% रक्कम देयकातून कपात करण्याऐवजी बॅकगॅरंटीच्या स्वरुपात स्विकारणेबाबत विनंती केली आहे. सदर बाबत निविदा समिती योग्य निर्णय घेण्यात येईल.

संबंधित एजन्सीने त्यांचे दिनांक १५/०३/२०१७ चे पत्रान्वये उक्त नमुद केल्याप्रमाणे लेखी सहमती दर्शविली आहे.

तरी ''महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास'' योजनेअंतर्गत शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीअंतर्गत वरील तक्त्यात नमुद केलेल्या कामांकरीता मागविण्यात आलेल्या निविदाप्रक्रियेत निम्न दराचे मे.जयहिंद –जयभारत – झा.पी (Joint Venture) यांच्या ९.९८ टक्के जास्त दरास मान्यता मिळून त्यांचेशी संविदा करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस प्रस्तावित

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १२५ <u>दिनांक:– २९ /३/२०१७</u>

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार''महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास योजने योजनेअंतर्गत शासनाकडून महापालिकेस प्राप्त होणाऱ्या निधीअंतर्गत करण्यात येणाऱ्या वरील तक्त्यात नमुद केलेल्या कामांकरीता मागविण्यात आलेल्या निविदाप्रक्रियेत कामांकरीता निम्न दराचे मे. जयहिंद –जयभारत – झा.पी (Joint Venture) यांच्याशी प्रशासनास संविदा करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ७ :—''राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था रस्ता अनुदान अंतर्गत योजनेअंतर्गत शासनाकडून महापालिकेस प्राप्त होणाऱ्या निधीअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांकरीता निम्न दराचे मे. जयहिंद —जयभारत — झा.पी (Joint Venture) यांच्या संविदेस मान्यता देणे.

---

<u>आयुक्त:—</u>हे झा.पी. कोण आहेत.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>त्यांचे तसेच नाव आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>मागील रस्ते आणि हे रस्ते जेवढे फुट लिहिले आहे तेवढेच घेतले पाहिजे. यामध्ये ४० फुट आहे तर ४० फुट आणि ८० फुट असेल तर ८० फुट. काय आहे याचे आता आपण एका रस्त्याचीच चर्चा केली.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>हे पारीत करु या इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>माझ्या प्रभागातील पॅनल नं. १८ चे सुध्दा आहे, तेथे रस्त्याचे डांबरीकरण करायचे आहे.

<u>आयुक्त:—</u>जेथे जेथे असेल ते काम करा. १४ एप्रिलच्या आधी ही कामे झाली पाहिजेत.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील:—</u>मुख्य रस्त्याचे सुध्दा करा, मी तुम्हांला पत्र दिले आहे दोन—चार. मुख्य रस्त्यावरच खड्डे आहे, ते सुध्दा सहा इंच पडले आहे. खड्डे वाचवायला जातांना अपघात होतात.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>व्हायला पाहिजे होते, मी मागे का लागतो? पुढील बजेट कमीत कमी जुनपर्यंत जाणार नंतर रस्ते, नाले सफाईचे काम हे कामे लवकरात लवकर अगोदरच व्हायला पाहिजे होते.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ७ :—''राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था रस्ता अनुदान अंतर्गत योजनेअंतर्गत शासनाकडून महापालिकेस प्राप्त होणाऱ्या निधीअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांकरीता निम्न दराचे मे. जयहिंद —जयभारत — झा.पी (Joint Venture) यांच्या संविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

शासन निर्णय क्रमांक—जीईएन—२०१५/प्र.क्र.८२/नवि—१६ दिनांक ०८ मार्च, २०१६ या कार्यालयास प्राप्त झाला असून सदर शासन निर्णयान्वये ''राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत यांना रस्ता अनुदान योजनेअंतर्गत विविध महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांकरीता ''अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर'' निधी वितरीत आला असून सदर शासन निर्णयासोबतच्या अनुसूचीत अनुक्रमांक ७ वर ''ड'' वर्ग महानगरपालिका म्हणून उल्हासनगर महानगरपालिकेस एकूण रु.३,७५,००,०००/— (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी पंच्च्याहत्तर लक्ष मात्र) एवढी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे खालील रस्त्यांची कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | रस्त्याची लांबी | अंदाजित प्राकलनिय किंमत |
|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर–३ प्रबुध्द नगर येथील ४० फुट रुंद प्लायवूड फॅक्टरी ते गॅस गोडावून पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २२५ मीटर | रुपये ७५,००,०००/– |
| २ | उल्हासनगर–१ येथील ८० फुट रुंद बसस्टॅंडच्या बाजूचा परिसर, आशा कोल्ड्रींग्स ते पोलीस चौकी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण/ मजबुतीकरण करणे. | ९५ मीटर | रुपये ७५,००,०००/– |
| ३ | उल्हासनगर–५ येथील ८० फुट रुंद कैलाश कॉलनी चौक येथील रस्त्याचे डांबरीकरण/ मजबुतीकरण करणे. | २२० मीटर | रुपये १,५०,००,०००/– |
| ४ | उल्हासनगर–४ येथील ८० फुट रुंद श्रीराम चौक येथील स्वर्गीय आनंद दिघे प्रवेशद्वार जवळील रस्त्याचे डांबरीकरण/ मजबुतीकरण करणे. | १०० मीटर | रुपये ७५,००,०००/– |
| | एकूण | ६४० मीटर | रुपये ३,७५,००,०००/– |

वरील नमुद रस्त्यांचे प्राकलन तयार करुन कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.महासभेची मंजूरी मिळणेकरीता सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे प्रस्तावित केले असता मा. महासभेने ठराव क्रमांक ३२ दिनांक ०७/१२/२०१६ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे उक्त कामाच्या दिनांक २२/१२/२०१६ रोजी ई–निविदा मागविण्यात आल्या. (ई निविदा क्रमांक १३१२) सदर निविदा प्रक्रियेत खालील दोन निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या.

१) मे.जयहिंद –जयभारत – झा.पी (Joint Venture) : २१.३३ टक्के जास्त
२) मे.श्री कृपा – साई सिध्दनाथ (Joint Venture) : २३.०० टक्के जास्त

वरील निविदाकारांपैकी निम्न दराचे मे.जयहिंद –जयभारत – झा.पी (Joint Venture) यांना या विभागाचे दिनांक ०४/०३/२०१७ चे पत्रान्वये वाटाघाटीकरीता बोलविण्यात आले. सदर वाटाघाटीच्या वेळी त्यांनी त्यांचे दर कमी करुन १७.०५ टक्के जास्त एवढया दरावर काम करण्यास तयारी दर्शविली. तद्नंतर मा. आयुक्त सो. यांनी संबंधित एजन्सी, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता, उप–अभियंता व निविदा समितीचे सदस्य यांचे समवेत दिनांक १५/०३/२०१७ रोजी बैठक घेतली. सदर बैठकीच्या वेळी झालेल्या चर्चेअंती संबंधित एजन्सीने ९.९८ टक्के जास्त एवढया दरावर काम करणेस सहमती दर्शविली. तसेच निविदा अटी व शर्तीतील Clause No.३.२.१२ नुसार देयक रक्कमेच्या १५% रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून ठेवण्याचे नमुद आहे. परंतू सदर बैठकीमध्ये संबंधित एजन्सीने देयक रक्कमेतून १५% रक्कम देयकातून कपात करण्याऐवजी बॅकगॅरंटीच्या स्वरुपात स्विकारणेबाबत विनंती केली आहे. सदर बाबत निविदा समिती योग्य निर्णय घेतला आहे..

संबंधित एजन्सीने त्यांचे दिनांक १५/०३/२०१७ चे पत्रान्वये उक्त नमुद केल्याप्रमाणे लेखी सहमती दर्शविली आहे.

तरी ‘‘राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था रस्ता अनुदान योजनेअंतर्गत शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीअंतर्गत वरील तक्त्यात नमुद केलेल्या कामांकरीता मागविण्यात आलेल्या निविदाप्रक्रियेत निम्न दराचे मे.जयहिंद –जयभारत – झा.पी (Joint Venture) यांच्या ९.९८ टक्के जास्त दरास मान्यता मिळून त्यांचेशी संविदा करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १२६ दिनांक:– २९/३/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार‘‘राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था रस्ता अनुदान अंतर्गत योजनेअंतर्गत शासनाकडून महापालिकेस प्राप्त होणाऱ्या निधीअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांकरीता निम्न दराचे मे. जयहिंद –जयभारत – झा.पी (Joint Venture) यांच्याशी प्रशासनास संविदा करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८** :– उल्हासनगर महानगरपालिका मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने मा.सचिव, सुरक्षा रक्षक मंडळ, सानपाडा मुबई. यांचे द्वारा नियुक्त १० सुरक्षा रक्षकांना मुदतवाढ देणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत.

---

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–साहेब, यास सुध्दा मुदतवाढ दया. साहेब आपण जर पाहणार तर काम कोणाचे होत नाही. मुदतवाढ का करायची जर त्याची मुदत आहे, निविदा आहे. त्याच कंपनीस का दयायचे आहे, शासनातर्फे ब–याच कंपनी असतील ना. शासनाकडुन घ्यायचे आहे की शासनातर्फे निर्धारीत कंपनीकडुन घ्यायचे आहे. त्यात वेगवेगळे असतील ना की एकच आहे. म्हणजे आपण त्यांना मागवु शकतो.

आयुक्तः–ठिक आहे, तपासून घेवु, तात्पुरती मुदतवाढ दया. तपासुन जर नविन मुदतवाढ देता येत असेल तर जर आपल्याला कांम्प्युटेटीव्ह दर येत असेल, तर त्याची प्रक्रिया करा.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–यामध्ये काय आहे, आपण जर २२ लाख दर भरत आहेत, जर एका वर्षात आपल्या शहराचे १० लाख, ८ लाख वाचत असतील तर, आणि जर असा काही नियम असेल की त्यास न देता अन्य कोणास देता येत असेल तर देवु काही ना काही तरी वाचेल. तसेच आपण एवढया पैश्यात डबल सुरक्षा रक्षक घेवु शकतो. १० हजार सुरक्षा रक्षक आपणांस मिळतील. शासन निर्णय कंम्पलसरी आहे का? फायनांशिअल हिअर आहे. आपणांस मुदवाढ देण्याची सारखी आावश्यकता का वाटते? जर निविदा काढत असाल तर त्याच कंपनीला देत आहात ना, शासनातर्फे ब–याचशा कंपन्या असतील ना?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :–विषय असा करता येत नाही. शासनाचा आदेश आहे, त्यांच्याकडुन एकच एजन्सी असते.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–शासनातर्फे तर ब–याचशा कंपन्या असतील ना? मला फक्त एक सांगा की शासनाच्या जेवढया कंपनी आहेत त्यांच्याकडुन घ्यायचे आहे. वेगवेगळया कंपनी असतील ना की एकच आहे?

श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्तः–सुरक्षा मंडळ शासन एक मंडळ आहे. दुसरे नाही.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–मला फक्त एक सांगा की, आपण त्या १० सुरक्षा रक्षकांना आपण जेवढे पेमेंट देतो तर त्या मंडळाला करतो की दुस–यास. मी याबाबत का सांगत आहे की मी त्या सुरक्षा रक्षकांशी बोललो त्यांना फक्त १२ हजार रुपये मिळतात, असे त्यांचे म्हणणे आहे.

आयुक्त :–जे काही डिवायडंट किंवा इन्श्युरन्स आहे, मेडिकल सोयी आहेत ते सर्व महामंडळाच्या स्तरावर दिल्या जातात.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>आपण २० हजार देतो प्रत्येकी.

<u>आयुक्त:—</u>नाही, १८ हजार २५० देतो. त्यापैकी ७० टक्के लेव्ही आहे. ती शासनाकडे आपण करु, शासनाकडे चेक जातात. या सर्व गोष्टी महामंडळाच्या स्तरावर ठरविली जातात.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> कारण शंका अशी आली की आपण त्यांना १८ हजार ऐवजी १२ हजार देतो का?

<u>आयुक्त:—</u>त्यांना मिनिमम वेजेसप्रमाणे दिले जाते.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>आता आपण जी मुदतवाढ देत आहोत तर माझे असे म्हणणे आहे की शासन ती भरती करु शकत नाही काय? जर त्या जागा रिक्त असतील जर आपण त्या घेतल्या. तर त्या कुटुंबाला सरळ सरळ येथुन जो पगार मिळेल. जर तो इकडे बांधिल राहीत तर त्यास पगार मिळेल ना. तो आज येथे असेल उदया दुसरीकडे जाईल. तुम्हांला ते सुरक्षा रक्षक घ्यायचे असेल तर ते घ्या. आमचे म्हणणे असे आहे की कायम स्वरुपी आपणाकडे घ्या.

<u>आयुक्त:—</u>त्यांचा आस्थापना खर्च प्रचंड आहे, ते सर्व मुद्दे बघावे लागतील.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता ठराव पारीत करा.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ८ :—** उल्हासनगर महानगरपालिका मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने मा.सचिव, सुरक्षा रक्षक मंडळ, सानपाडा मुबई. यांचे द्वारा नियुक्त १० सुरक्षा रक्षकांना मुदतवाढ देणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

सुरक्षा विभागामार्फत सुरक्षा रक्षक मिळणे कामी विविध विभागाकडुन महापालिकेच्या मालमत्तेच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी सतत मागणी होत असते परंतु सुरक्षा विभागाकडे सुरक्षा रक्षक मागणीपेक्षा कमी असल्याने मा. आयुक्त सो. यांच्या दिनांक ०४/०४/२०१६ रोजीच्या मान्यतेने तसेच मा. स्थायी समिती ठराव क्रमांक २१ दिनांक १३/०६/२०१६ अन्वये. उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्तेचे रक्षण करणेसाठी मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्या करिता) यांचे कडील ०९ सुरक्षा रक्षक व १ सुरक्षा सुपरवायझर कार्यारत असुन त्यांची ०१ वर्षाची मुदत दिनांक १३ एप्रिल २०१७ रोजी संपुष्टात येत आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागाच्या आस्थापनेमधिल कर्मच्—याची कमी लक्षात घेता मागणीनुसार सुरक्षा रक्षक पुरविणे शक्य होत नाही, प्रसंगानुसार शहराच्या विविध समस्या घेउन नागरिकांव्दारे संप. मार्चा, घेराव, धरणे, व आंदोलने या सारखे प्रकार मोठया प्रमाणावर होत असतात. करीता अधिका—यांना अंगरक्षक तसेच मालमत्तेच्या संरक्षणासाठी यापूढे सुरक्षा रक्षकाची आवशकता लक्षात घेता तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्तेमध्ये दिवसें दिवस विस्तार होत असल्याकारणाने सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातुन महापालिका प्रशासकिय भवन, तसेच चार प्रभाग समित्या, इत्यादी ठिकाणी सुरक्षा रक्षकांची आवश्यक्ता आहे.

महापालिका सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडुन १० सुरक्षा जवानांना ०१ वर्षाची मुदत वाढ देणे बाबत दिनांक २०/०३/२०१७ अन्वये मा. आयुक्त सो यांची प्रस्तावास मान्याता प्राप्त झालेली आहे. प्रती सुरक्षा रक्षकास एक महिन्या करीता १८,२४९.२०/— तर ९ सुरक्षा रक्षकांना एक महिन्या करिता १,६४,२४२.८०/— तर ९ सुरक्षा रक्षकांना एका वर्षाकरीता १९,७०,९१३.६०/— तसेच एका सुरक्षा सुपरवायझर करीता एका महिन्याला १९,७८१.६५/— तर एक वर्षा करीता २,३७,३७९.८०/— एकुण १० सुरक्षा जवानांना एक वर्षा करीता २२,०८,२९३.४०/— येवढा खर्च अपेक्षीत आहे.

मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्याकरिता) यांचे कडुन घेण्यात येणा—या सुरक्षा रक्षकांच्या पगारात दर दोन वर्षानी व इतर भत्त्यात दर सहा महिन्याने वाढ होत असते. त्याच प्रमाणे मुळ वेतन +विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन, नोंदीत सुरक्षा जवानांचा किमान वेतनावर मुळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन मुख्य मालकाने ४६.७५ टक्के दराने लेव्ही देणे बंधनकारक आहे. त्याच प्रमाणे घर भाडे भत्ता, प्रवास भत्ता व अतिकालीन भत्ता यावर ४.७५ टक्के दराने लेव्ही देणे मुख्य मालकाला बंधनकारक राहिल. तसेच ज्या विभागामध्ये सुरक्षा रक्षकांना कामगार विमा योजना लागु नाही. अशा मुख्य मालकांनी ४३ टक्के लेव्ही किमान वेतनावर ( मुळ वेतन +विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन,) देणे बंधनकारक राहिल

सबब. मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्याकरिता) यांचे कडुन १० सुरक्षा जवानांना एक वर्षा करीता मुदत वाढ देणे आवश्यक आहे. त्यावर येणारा खर्च महापालिका अंदाजपत्रकातील अ. १(२४) आस्थापना खर्च रोजंदारी/मानधन इत्यादी या लेखाशिर्षकातील मंजुर तरतुदीतुन खर्च करणेसाठी मा स्थायी समिती समोर प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १२७ दिनांकः— २९/३/२०१७

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने मा. सचिव, सुरक्षा रक्षक मंडळ, सानपाडा मुबई. यांचे द्वारा नियुक्त १० सुरक्षा रक्षकांना मुदतवाढ देणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ९ :—मालमत्ता क्र. १२बीआय०१५२७६२०० जूना क्र. ११/०६६८ व १२बीआय०१५२३२८०० जूना क्र. ११/०६६८ अन्वये नोंद असलेल्या मिळकतींचे करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करणे.

---

श्री. शैलेश दोंदे, उप कर निर्धारक व संकलकः—कंपनीचा म्हणून रेट होता तसेच ०१/०८/२०१५ रोजी लिव्ह ॲण्ड लायसन्स रद्द करण्यात आले आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मी म्हणतो की संपुर्ण शहरात जो पाण्याचा त्रास आहे संपुर्ण सोसायटीमध्ये आहे तर प्रथम तो सुध्दा प्रस्ताव आणा. अशा प्रकारचे जे करआकरणीचे प्रस्ताव आहेत, जे प्रलंबित आहेत त्याचा लवकरात लवकर निपटारा झाला पाहिजे.

श्री. शैलेश दोंदे, उप कर निर्धारक व संकलकः—लेटर दिले आहे. एक—दोन महिने उशिरा पत्र दिले पण दिनांक १/८/२०१५ पासून बंद झाले आहे. पुढचे निर्लेखित करायचे आहे.

आयक्तः—खुप उशिर झाला. जसे जसे अर्ज हातात येतात तसे तसे लगेच काम झाले पाहिजे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—दोन्ही प्रस्ताव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वेः—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ९ :— मालमत्ता क्र. १२बीआय०१५२७६२०० जूना क्र. ११/०६६८ व १२बीआय०१५२३२८०० जूना क्र. ११/०६६८ अन्वये नोंद असलेल्या मिळकतींचे करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. १२बीआय०१५२७२६०० जूना क्र. ११/०६६८ व १२बीआय०१५२३२८०० जूना क्र. ११/०१३८ अन्वये नोंद असलेल्या मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे

१) मालमत्ता क्र.१२बीआय०१५२७६२०० जूना क्र. ११/०६६८
अ) कर देण्यास प्रथम पात्र व्यक्तीचे नाव:— नारायणदास दुलोनोमल गुरनानी
ब) करपात्र बाबींचा तपशिल

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Owner | Non Residential | 0 | 01-APR-01 | 895 | 0 | 895 |
| Rcc | Owner | Non Residential | 0 | 01-APR-01 | 1287 | 0 | 1287 |
| Open | Owner | Non Residential | 0 | 01-APR-86 | 135 | 0 | 135 |

२)मालमत्ता क्र. १२बीआय०१५२३२८०० जूना क्र. ११/०१३८
अ) कर देण्यास प्रथम पात्र व्यक्तीचे नाव:— राजेश पी वलेच्छा
ब) करपात्र बाबींचा तपशिल

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Owner | Non Residential | 0 | 01-APR-86 | 195 | 0 | 195 |
| Rcc | Owner | Non Residential | 0 | 01-APR-01 | 774 | 0 | 774 |
| Rcc | Owner | Non Residential | 0 | 01-APR-01 | 450 | 0 | 450 |

B) उक्त दोन्ही मिळकतीमध्ये भाडेकरू (केएफसीएच रेस्टॉरंट प्रा. लि.) असल्याचे दिसुन आल्याने संदर्भित दोंन्ही मिळकतीचे सुधारीत करयोग्य मुल्य प्रत्येकी वार्षिक भाडे रक्कम रू. २,४०,०००/— (प्रतिमाह भाडे रू. ४०,०००/—) इतकी गृहीत धरून निश्चित करणेसाठी वर्ष २०१३—२०१४ मध्ये संबंधितांचे नावे अधिनियमातील तरतुदीनुसार विशेष नोटीस दिनांक २५/३/२०१४ रोजी बजावण्यात आली. त्याचा करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

१) मालमत्ता क्र.१२बीआय०१५२७६२०० जूना क्र. ११/०६६८ नारायणदास दुलोनोमल गुरनानी

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Owner | Non Residential | 100000 | 01-APR-01 | 895 | 0 | 895 |
| Rcc | Owner | Non Residential | 100000 | 01-APR-01 | 1287 | 0 | 1287 |
| Open | Owner | Non Residential | 40000 | 01-APR-86 | 135 | 0 | 135 |

२) मालमत्ता क्र. १२बीआय०१५२३२८०० जूना क्र. ११/०१३८ नारायणदास दुलोनोमल गुरनानी

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Owner | Non Residential | 40000 | 01-APR-86 | 195 | 0 | 195 |
| Rcc | Owner | Non Residential | 100000 | 01-APR-01 | 774 | 0 | 774 |
| Rcc | Owner | Non Residential | 100000 | 01-APR-01 | 450 | 0 | 450 |

C) सदरील नोटीसच्या अनुषंगाने श्री. अशोक बी. छाप्रु, व श्री.नारायण दास गुरनानी यांनी यांनी दिनांक १६/०४/२०१४ रोजीचे पत्रान्वये सदरील मिळकतीसाठी वर्ष २०१३—२०१४ मध्ये पुर्ण वर्षाकरीता भाडोत्री गृहीत धरून निश्चित केलेली कर आकारणी चुकीची असल्याने ती रद्द करावी तसेच कराराचा कालावधीपासुन

(म्हणजेच माहे डिसेंबर २०१३) प्रतिमाह भाडे रू. ४०,०००/— नुसार भाडोत्री गृहीत धरून कर आकारणी करणेसाठी विनंती केली आहे. सोबत सह दुय्यम निबंधक, वर्ग—२, उल्हासनगर क्र. १ यांचे कार्यालयात श्री. नारायण दुल्हानोमल गुरनानी (लिहुन देणार) व केएफसीएच रेस्टॉरंट प्रा. लि. तर्फे ऑथराईज्ड सिग्नेटरी मोहम्मद रफीक बिन एम के. मुसा यांचे तर्फे कु. मु. धारक म्हणुन दिनेशकुमार नाग (लिहुन घेणार) यांचे दरम्यान अ. क्र. ६५८/२०१४,दिनांक ३/४/२०१४ रोजी नोदंणीकृत झालेल्या लिव्ह ॲड लायसन्सेस ची प्रत जोडली आहे.

D) वास्तविक पाहता नोदंणीकृत झालेल्या लिव्ह ॲड लायसन्सेस नुसार वर्ष २०१३—२०१४ करीता फक्त ४ महिने [01/12/2013 to 31/03/2014] या कालावधीसाठी भाडे रक्कम रू. १,६०,०००/— (प्रतिमाह रू. ४०,०००/—) गृहीत धरून सुधारीत कर आकारणी करणे आवश्यक होते.

परंतु संदर्भित मिळकतींसाठी वर्ष २०१३—२०१४ करीता संपुर्ण वर्षासाठी (१२ महिने) भाडोत्री गृहीत धरून भाडे रक्कम रू. ४,८०,०००/— (प्रतिमाह रू. ४०,०००/—) गृहीत धरून करयोग्य मुल्य निश्चित करण्यात आले आहे. अर्जदार यांनी दि. १८/०४/२०१४ रोजी संदर्भित मिळकतीचे कर आकारणीबाबत दाखल केलेल्या हरकती अर्जावर अद्यापही निर्णय झालेला नाही. तसेच नोंदणीकृत करारनामा पाहता अर्जदाराचे म्हणणे तथ्य असल्याचे दिसुन येते.

E] उक्त बाबींमुळे मालमत्ता क्र.१२बीआय०१५२७६२०० जूना क्र. ११/०६६८ व १२बीआय०१५२३२८०० जूना क्र. ११/०६६८ अन्वये नोंद असलेल्या मिळकतीचे खात्यात वर्ष २०१३—२०१४ करीता थकीत असलेली अतिरिक्त कर आकारणीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| १) मालमत्ता क्र.१२बीआय०१५२७६२०० जूना क्र. ११/०६६८ नारायणदास दुलोनोमल गुरनानी | | | |
|---|---|---|---|
| वर्ष | संपुर्ण वर्ष भाडोत्री गृहीत धरून करण्यात आलेली कर आकारणी | प्रत्यक्षात करावयाची कर आकारणी (१/४/१३ ते ३०/११/२०१३ स्वत: वापर व डिसेंबर २०१३ ते मार्च २०१४) फक्त ४ महिने भाडोत्री गृहीत धरून | अतिरिक्त कर आकारणी |
| २०१३—२०१४ | रू. १,५८,७६०/— | रू. ६२,१२४/— | रू.९६,६३६/— |

| २) मालमत्ता क्र. १२बीआय०१५२३२८०० जूना क्र. ११/०१३८. राजेश पी वलेच्छा | | | |
|---|---|---|---|
| वर्ष | संपुर्ण वर्ष भाडोत्री गृहीत धरून करण्यात आलेली कर आकारणी | प्रत्यक्षात करावयाची कर आकारणी (१/४/१३ ते ३०/११/२०१३ स्वत: वापर व डिसेंबर २०१३ ते मार्च २०१४ (फक्त ४ महिने) भाडोत्री गृहीत धरून | अतिरिक्त कर आकारणी |
| २०१३—२०१४ | रू. १,५८,७६०/— | रू. ६१,५८१/— | रू. ९७,१७९/— |

F] वास्तविक पाहता संदर्भित मिळकतींचे खात्यात थकीत असलेली अतिरिक्त कर आकारणी वसुल न होण्याजोगी आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने, कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसूल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्याच्या मते वसूल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल.

G] तसेच श्री. नारायणदास डी. गुरनानी यांनी दिनांक २८/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये भाडेकरू (केएफसीएच रेस्टॉरंट प्रा. लि.) निघुन गेल्याने स्वत: वापर नुसार कर आकारणी करणेसाठी विनंती केली आहे. सोबत सह दुय्यम निबंधक, वर्ग—२, उल्हासनगर क्र. १ यांचे कार्यालयात अ. क्र. २१९१/२०१५ अन्वये नोंदणीकृत केलेल्या Deed of Cancellation of the Leave and License Agreement ची प्रत सादर केली आहे.

H] संदर्भित दोन्ही मिळकतीची समक्ष तपासणी केली असता मिळकतीमधील भाडेकरू (केएफसीएच रेस्टॉरंट प्रा. लि.) जागा सोडुन गेल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच मिळकतीचे क्षेत्रफळ, बांधकाम प्रकार, वापर इ. मध्ये कोणत्याही प्रकारचा बदल झालेला नसुन सद्यस्थितीत मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा वापर (व्यवसाय) सुरू नाही. Deed of Cancellation of the Leave and License Agreement नुसार दिनांक ०१/०८/२०१५ रोजी लिव्ह ॲण्ड लायसन्स रद्द करण्यात आले आहे.

तसेच अर्जदार यांनी दिनांक ०६/०२/२०१५ रोजी मिळकतीमध्ये भविष्यात भाडेकरू ठेवल्यास त्याची माहिती महानगरपालिकेस स्वत:हुन सादर करण्यात येईल, असे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, १) मनपा कर आकारणी मालमत्ता क्र. १२बीआय०१५२७६२०० जूना क्र. ११/०६६८ व २०बीआय०१५२३२८०० जूना क्र. ११/०११३८ अन्वये नोंद असलेल्या मिळकतीचे खात्यात वर्ष २०१३–२०१४ करीता थकीत असलेली अतिरिक्त कर आकारणी अनुक्रमे रक्कम रू. ९६,६३६/– अधिक विलंब शास्ती व रक्कम रू. ९७,१७९/– अधिक विलंब शास्ती (वसुल न होण्याजोगा कर) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणे.

तसेच २) वर्ष २०१५–२०१६ करीता दिनांक ०१/०४/२०१५ ते ३१/०७/२०१५ या कालावधीत भाडेकरू गृहीत धरून व ०१/०८/२०१५ ते दिनांक ३१/०३/२०१६ या कालावधीत भाडोत्री नोंद रद्द करून परिसरातील प्रचलित दरानुसार संदर्भित मिळकतीचे करयोग्य मुल्य व आकारणी सुधारीत करून बिल देणेसाठी स्थायी समिती मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १२८ दिनांकः– २९/३/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१५–२०१६ करीता दिनांक ०१/०४/२०१५ ते ३१/०७/२०१५ या कालावधीत भाडेकरू गृहीत धरून व ०१/०८/२०१५ ते दिनांक ३१/०३/२०१६ या कालावधीत भाडोत्री नोंद रद्द करून परिसरातील प्रचलित दरानुसार मालमत्ता क्र. १२बीआय०१५२७६२०० जूना क्र. ११/०६६८ व १२बीआय०१५२३२८०० जूना क्र. ११/०६६८ अन्वये नोंद असलेल्या मिळकतीचे करयोग्य मुल्य व आकारणी सुधारीत करून बिल देणेसाठी मंजुरी देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १०** :– कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 11BO015119400 Old No. 11/0368 नुसार नोंद असलेल्या मिळकतीसाठी वर्ष २०१३–२०१४ व २०१४–२०१५ पासुन क्षेत्रफळ कमी करून मिळकतीचे खात्यात कर आकारणीपोटी थकीत असलेली अतिरिक्त रक्कम (वसुल न होण्याजोगा कर) रू. २०४७५९ + विलंब शास्ती निर्लेखित करणे.

---

श्री. शैलेश दोंदे, उप कर निर्धारक व संकलकः–याचा एरिया पास फार्मवेल होता. यामध्ये त्या व्यक्तीचे म्हणणे आहे की सन २०१३–१४ पासून फी शास्ती लावण्यात आली होती.

आयुक्त :–त्याचा कार्पेट एरिया जास्त होता?

श्री. शैलेश दोंदे, उप कर निर्धारक व संकलकः–होय.

श्री. युवराज भदाणे, कर निर्धारक व संकलकः–यामध्ये दोन मालक आहेत त्यात एकीकडे हॉटेल आहे, व दुस–या माळयावर डॉमीनज आहे, आपण त्यांना वेळेवर बील देत असतो त्यांना डबल बिल येते. म्हणुन ते

कमी करण्यासाठी मायनस करुन तो आपणाकडे १३ हजार रुपये भरायला तयार आहे. डबल बिल येत असल्यामुळे तो भरत नाही.

<u>आयुक्त :–</u>डबल का झाली?

<u>श्री. युवराज भदाणे, कर निर्धारक व संकलक:–</u>डबल कर आकारणीमुळे. तो व्यक्ती सुध्दा भरतो व हा व्यक्ती सुध्दा भरतो.

<u>आयुक्त:–</u>तो पण भरतो, हा पण भरतो?

<u>श्री. युवराज भदाणे, कर निर्धारक व संकलक:–</u>होय.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> जो पाण्याचा प्रस्ताव आहे तो तो सुध्दा करा. ज्यांचे डबल डबल बिल येते, जे विषय आपणाकडे प्रलंबित आहेत, ज्यामुळे लाखो कोटी रुपये येत नाहीत. त्याचा आपण लवकरात लवकर निपटारा करा.

<u>श्री. युवराज भदाणे, कर निर्धारक व संकलक:–</u>त्या व्यक्तीशी बोललो, हे इमीजेटली भरा.

<u>आयुक्त:–</u>होय आजच भरा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>सदरचा प्रस्ताव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १० :–** कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 11BO015119400 Old No. 11/0368 नुसार नोंद असलेल्या मिळकतीसाठी वर्ष २०१३–२०१४ व २०१४–२०१५ पासुन क्षेत्रफळ कमी करून मिळकतीचे खात्यात कर आकारणीपोटी थकीत असलेली अतिरिक्त रक्कम (वसुल न होण्याजोगा कर) रू. २०४७५९ + विलंब शास्ती निर्लेखित करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकातील मालमत्ता क्र. 11BO015119400 Old No. 11/0368 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन अनिल अर्जुनदास बालानी अशी नोंद आहे.

२) वर्ष २०१३–२०१४ करीता सदर मिळकतीचे सुधारीत करयोग्य मुल्य खालीलप्रमाणे करपात्र बाबीं गृहीत धरून निश्चित करणेसाठी संबंधिताचे नावे दिनांक १३/३/२०१४ रोजी अधिनियमातील नियम १५(२) विशेष नोटीस बजावण्यात आली होती.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Owner | Non Residential | 0 | 01-APR-86 | 6650 | 0 | 6650 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-APR-03 | 5560 | 0 | 5560 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 8268 | 0 | 8268 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 1600 | 0 | 1600 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 722 | 0 | 722 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 1444 | 0 | 1444 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 168 | 0 | 168 |
| AC Sheet Bricks | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 400 | 0 | 400 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 675 | 337.5 | 337.5 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 102 | 51 | 51 |

३) उक्त नोटीस विरूद्ध श्री. अनिल अर्जुनदास बालानी यांनी दिनाक २८/३/२०१४ रोजी खालीलप्रमाणे हरकत दाखल केली आहे.

<u>संदर्भित मिळकतीचे क्षेत्रफळ जास्त दर्शविलेमुळे करयोग्य मुल्यात व त्याअनुशंगाने कर आकारणीत वाढ झालेली आहे.</u>

४) हरकतीच्या अनुषंगाने संदर्भित मिळकतीचे मिळकतधारक श्री. अनिल बालानी यांचे समक्ष पुन्हा मोजमाप केले असता खालीलप्रमाणे करपात्र बाबी दिसुन आलेल्या आहेत.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Owner | Non Residential | 0 | 01-APR-86 | 6650 | 0 | 6650 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-APR-03 | 5560 | 0 | 5560 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 3783 | 0 | 3783 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 1452 | 0 | 1452 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 722 | 0 | 722 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 1444 | 0 | 1444 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 168 | 0 | 168 |
| AC Sheet Bricks | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 400 | 0 | 400 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 675 | 337.5 | 337.5 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 102 | 51 | 51 |

तसेच याबाबत पंचनामा केला असुन त्यावर श्री. अनिल बालानी यांनी ही स्वाक्षरी केलेली आहे.

५) सदरील मिळकतीचे इमारती मध्ये असलेले तळमजला व चौथा मजल्याचे क्षेत्राचा समावेश संदर्भित मिळकतीचे क्षेत्रात झालेला आइे. परंतु संबंधित मिळकतीस खालीलप्रमाणे स्वतंत्ररित्या कर आकारणी सुरू आहे.

अ) मालमत्ता क्र- 11BO020715800

कर देण्यास प्रथम पात्र व्यक्तीचे नाव :— अनिल अर्जुनदास बालानी (डोमिनोज पिज्जा इंडीया)

पत्ता :— प्लॉट नं. ६८० व ६९३, तळमजला, साईड पोर्शन, प्रेम भवन जवळ, उल्हासनगर—३

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| RCC | Tenant | Non Residential | 1471080 | 03-MAR-14 | 1020 | 0 | 1020 |

ब) मालमत्ता क्र. 11BO020715900

कर देण्यास प्रथम पात्र व्यक्तीचे नाव :— अनिल अर्जुनदास बालानी (मॅक्स न्युयॉर्क लाईफ इन्सुरन्स)

पत्ता :— प्लॉट नं. ६८० व ६९३, चौथा मजला, पोर्शन, प्रेम भवन जवळ, उल्हासनगर—३

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| RCC | Tenant | Non Residential | 624000 | 03-MAR-14 | 2465 | 0 | 2465 |

क) मालमत्ता क्र. 11BO020035100

कर देण्यास प्रथम पात्र व्यक्तीचे नाव :— अनिल अर्जुनदास बालानी (आयसीआयसीआय बॅंक)

पत्ता :— प्लॉट नं. ६८० व ६९३, जी + ५, टेरेस, तळमजला, प्रेम भवन जवळ, उल्हासनगर—३

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| RCC | Tenant | Non Residential | 265200 | 20-AUG-11 | 1000 | 0 | 1000 |

६) मनपा कर आकारणी पुस्तकातील मालमत्ता क्र. 11BO015119400 Old No. 11/0368 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी खालीलप्रमाणे करपात्र गृहीत धरून प्रथम वर्ष आकारणी परिसरातील प्रचलित वाजवी दरानुसार करयोग्य मुल्य वर्ष २०१५—२०१६ पासुन निश्चित करणेसाठी जा. क्र. उमपा/कर विभाग/युनिट २/३००/१३, दिनांक ५/१२/२०१५ अन्वये आदेश जारी करण्यात आला आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Owner | Non Residential | 0 | 01-APR-86 | 6650 | 0 | 6650 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-APR-03 | 5560 | 0 | 5560 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 3783 | 0 | 3783 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 1452 | 0 | 1452 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 722 | 0 | 722 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 1444 | 0 | 1444 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 168 | 0 | 168 |
| AC Sheet Bricks | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 400 | 0 | 400 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 675 | 337.5 | 337.5 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 102 | 51 | 51 |

७) तथापि, श्री. अनिल बालानी यांनी दिनांक ११/१२/२०१५ रोजीचे अर्जान्वये उक्त आदेश वर्ष २०१५–२०१६ पासुन लागु केला असल्याने सदर आदेशाची अंमलबजावणी हरकत दाखल केल्याच्या दिनांकापासुन करणेसाठी विनंती केली आहे.

८) वर्ष २०१३–२०१४ मध्ये मिळकतीचे वाढीव क्षेत्रानुसार करयोग्य मुल्य निश्चित करणेसाठी दिनांक १३/०३/२०१४ रोजी बजावण्यात आलेले विशेष नोटीस विरूध्द् विहीत मुदतीत श्री. अनिल बालानी यांनी हरकत दाखल केली आहे. परंतु सदरील हरकती अर्जावर वर्ष २०१३–२०१४ व २०१४–२०१५ मध्ये निर्णय झालेला नाही.

९) वास्तवित पाहता कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 11BO015119400 Old No. 11/0368 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी दाखल हरकती अर्जावर निर्णय न झाल्याने मिळकतीचे खात्यात वर्ष २०१३–२०१४ करिता रक्कम रू. ९२२७५. विलंब शास्ती व वर्ष २०१४–२०१५ करिता ११२४८४. विलंब शास्ती असे एकत्रित रक्कम रू. २०४७५९. विलंब शास्ती थकीत आहे.

१०) उक्त बाबी पाहता कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 11BO015119400 Old No. 11/0368 नुसार नोंद असलेल्या मिळकतीचे खात्यात कर आकारणीपोटी वर्ष २०१३–२०१४ व २०१४–२००५ पासुन थकीत असलेली अतिरिक्त रक्कम (वसुल न होण्याजोगा कर) रू. २०४७५९ + विलंब शास्ती निर्लेखित करणे आवश्यक आहे, असे इकडील मत आहे.

११) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने, कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसूल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्याच्या मते वसूल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, (१) कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 11BO015119400 Old No. 11/0368 नुसार नोंद असलेल्या मिळकतीसाठी वर्ष २०१३–२०१४ व २०१४–२०१५ पासुन खालीलप्रमाणे करपात्र बाबी गृहीत धरून करयोग्य मुल्य निश्चित करणे

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Owner | Non Residential | 0 | 01-APR-86 | 6650 | 0 | 6650 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-APR-03 | 5560 | 0 | 5560 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 3783 | 0 | 3783 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 1452 | 0 | 1452 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 722 | 0 | 722 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 1444 | 0 | 1444 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 168 | 0 | 168 |
| AC Sheet Bricks | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 400 | 0 | 400 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 675 | 337.5 | 337.5 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-MAR-14 | 102 | 51 | 51 |

(२) तसेच मिळकतीचे खात्यात कर आकारणीपोटी थकीत असलेली अतिरिक्त रक्कम (वसुल न होण्याजोगा कर) रू. २०४७५९ . विलंब शास्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणेसाठी शिफारस करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १२९ <u>दिनांकः– २९/३/२०१७</u>

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 11BO015119400 Old No. 11/0368 नुसार नोंद असलेल्या मिळकतीसाठी वर्ष २०१३–२०१४ व २०१४–२०१५ पासुन क्षेत्रफळ कमी करून मिळकतीचे खात्यात कर आकारणीपोटी थकीत असलेली अतिरिक्त रक्कम (वसुल न होण्याजोगा कर) रू. २०४७५९ + विलंब शास्ती निर्लेखित करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ११ :–सन् २०१७–२०१८ या आर्थिक वर्षाकरिता मालकी/वारस हक्कांचे नाव हस्तांतरण प्रकरणात नाव हस्तातरण शुल्कात वाढ करणे.**

---

आयुक्तः–किती वाढ होते? हा विषय कोणाचा आहे.

श्री. युवराज भदाणे, कर निर्धारक व संकलकः–आमचाच आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः–यांनी ५०० रुपये ठेवले आहेत. यास महासभेत आणा तेथे पारीत करु या. स्थायी समितीकडुन नंतर महासभेत पारीत करा. ही बॉडी सोडुन पुढील बॉडी पास करेल. यामध्ये शुल्क सांगा ना जे ५०० कॉपी आहे आहेत.

श्री. युवराज भदाणे, कर निर्धारक व संकलकः–मा. सभापती महोदय, आयुक्त साहेब, सदस्य, यामध्ये मालमत्ता हस्तांतरण करतांना जी हस्तांतरण फी आहे ती मालमत्तेच्या बाजारदराप्रमाणे २ टक्के आहे म्हणुन किमान आपण ५०० रुपये होते परंतु ते कमी वाटतात म्हणुन बाजारदर १००० केले. व बाजारमुल्य २ टक्के.

आयुक्तः–१००० कमी होतात दिड हजार करा. मालमत्तेच्या आकारावर नाही आहे का ते? एका माणसाचे छोटे झोपडे असेल आणि एका माणसाचा मोठा बंगला असेल त्यामध्ये काही फरक पाहिजे ना?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः–माझी सर्व सदस्यांना विनंती होती की यास परत बनवुन आणावे. त्यामध्ये एक स्केअर फुट ते १० तसेच ५०० ते १००० चे वेगळे असे बनवुन आाणावे. कारण यामध्ये काय होईल छोटयाच्या झोपडीला पंधराशे लागेल आणि लाखो रुपयाच्या बंगल्याला सुध्दा पंधराशे लागेल. व ५० लाखाच्या बॅरेकला सुध्दा पंधराशे लागतील. मला फक्त हे सांगा की आज उल्हासनगरमधील मालमत्ता ९० टक्के १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर आहे. हजार पंधराशे रुपये फारच कमी आहेत ना, जेव्हा आपण २ लाख किंवा ७ लाखाची रजिस्ट्री केली तर ६० टक्के लागतात. १० लाखाचे केले तर आपणांस ७० हजार लागतात. १० कोटीचे बॅरेक आहे तर त्याचे आपण ठेवा ना ५ हजार रुपये. आपण रजिस्ट्रीचे एक एक लाख भरतो ना. आपणांस १०० रुपयाच्या स्टॅम्पपेपरवर लिहावे लागते तर आपणांस रजिस्टारकडे रजिस्ट्री होत नाही. त्यासाठी आपण ५ हजार लावले तर फार कोणती मोठी गोष्ट येते येथे?

आयुक्त :–महासभेत मान्यता देवु या ना. आपण ५ हजार काय, दहा हजार रुपये लावु ना.

सदस्य श्री. विजय पाटीलः–साहेब, आपण असे कसे लावु शकतात दहा, दहा हजार?

आयुक्त :–महासभा कमी जास्त करेल ना.

सदस्य श्री. विजय पाटीलः–यामध्ये गडबड होईल ना.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—नाही, मी काय म्हणतो की, पंधराशेमध्ये झोपडे सुध्दा आले आणि २००० फुटाचा शेड सुध्दा आला.

सदस्य श्री. विजय पाटील:—एरियावाईज चालेल.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—जर येथेच पारीत करत असाल तर महासभेत कसाला? आपण अधिकारी आहात आपण जरा सांगावे. आपण नंतर निवडणूकी जवळ आल्यानंतर आणणार मग आम्ही वाढविणार काय कलेक्शन नाही करणार काय? मग शहर चालणार कसे?

सदस्य श्री. विजय पाटील :—श्री. जमनुजी जनतेला त्रास देवु नका.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—जनतेला त्रास कसला. २० लाखाची प्रापर्टी आहे आपण ६० टक्के १ लाख ४० हजार भरतात मग १०० रुपयेवर करु ना.

सदस्य श्री. विजय पाटील :—मग येथे सनद चालु करण्यासाठी ते आपल्या हातात नाही ना.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—चेंज ऑफ नेम १०० रुपयावर होते ना.

सदस्य श्री. विजय पाटील:—ज्यांच्याकडे कर पावती आहे व रस्त्यावर आपण ते तोडत आहात तर आपण त्यांना काही देत आहात काय?

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—आपण एक काम करु या, या विषयाला ५०० चे हजार करु या. सरसकट पंधराशे करुन कसे चालेल? झोपडी असेल तर त्याचे काय?

श्री. शैलेस दोंदे, उप कर निर्धारक व संकलक:—मुल्य वाढले तर २ टक्के सर्वांचेच वाढणार. बाकी महानगरपालिकेत १५ लाखाचे २ टक्के पकडले तर ३ हजार होतात.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—१०० रुपयाच्या स्टॅम्प पेपवर कसे तुम्ही करणार?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—पंधरा लाखाचे असेल तर २ टक्याने १५ लाखाचे ३० हजार होतात ३ हजार होत नाहीत. आपण जास्त लिहिले आहे ना, पंधराशे लिहिले आहेत आपण चुकीचे लिहिले आहे, पन्नास लाखाचे बॅरेक असेल तर आपण एक लाख घेणार काय? परत करप्शन वाढेल. दर फीक्स करा. २ टक्के एक टक्के नाही. २ टक्के प्रमाणे पंधराशेचा काहीच अर्थ राहत नाही ना.

आयुक्त:—हा धोरणात्मक निर्णय आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—नाही, नाही, रेडीरेकनरचा दर आपण पहा.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—पुर्वी किती घेत होतो?

श्री. शैलेस दोंदे, उप कर निर्धारक व संकलक:—५०० वर दोन टक्के. त्या विभागाचे बाजारमुल्य मिनिमम १५०० होते.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—पुर्वी दोन टक्के घेत होते. साहेब मला आता आपण सांगा, १० वर्षाचा आपण रेकॉर्ड काढा की आपण ५०० किमान दोन टक्के घेतले काय? एक सुध्दा मालमत्ता आहे का की त्याचे चेंज ऑफ नेम करतांना आपण २० लाख घेतले काय? कर योग्य मुल्याचे २० हजार येणार, कर योग्य मुल्य साहेब, आपण मालमत्तेचे मुल्य नाही काढणार. पंधरा लाखाच्या मालमत्तेचा कर योग्य मुल्य किती येतो? पाच हजार असेल, त्याचे दोन टक्के. कर योग्य मुल्याचे २ टक्याने काढले तर पंधराशेप्रमाणे येणार. पन्नास लाखाच्या प्रापर्टीचे कर योग्य मुल्य किती असते? दहा हजार रुपये तर आपण काय त्याचे २०० रुपये काढणार? आपण यास बरोबर करेक्शन करा. आपण २ टक्के लिहा किंवा पंधरायचे लिहा किंवा हजार लिहा. परंतु एकच लिहा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>पण एक हजार रुपये आपण पाचशेचे हजार करुन या ना.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>२ टक्के करा पंधराशे करु.

<u>आयुक्त :—</u>ऐका ना फेर प्रस्ताव करु. आपणांस ठेकेदाराने सांगितले की अडचण आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>साहेब, कुठेही अडचण नाही.

<u>महापालिका सचिव</u>:—यात ठराव कसा करायचा?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>यात दुरुस्ती करा.

<u>महापालिका सचिव :—</u>मी ठराव वाचुन दाखविते.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन् २०१७—२०१८ या आर्थिक वर्षाकरिता मालकी/वारस हक्कांचे नाव हस्तांतरण प्रकरणात नाव हस्तांतरण शुल्कात वाढ करण्याचा प्रस्ताव सुधारीत करुन प्रशासनाने फेरसादर करणेचे निर्देश देत आहे.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ११** :— सन् २०१७—२०१८ या आर्थिक वर्षाकरिता मालकी/वारस हक्कांचे नाव हस्तांतरण प्रकरणात नाव हस्तातरण शुल्कात वाढ करणे.

<u>प्रस्तावना</u>

भारताच्या स्वातंत्र्यानंतर फाळणीमुळे मोठया प्रमाणावर निर्वासित पाकिस्तानातील सिंध प्रांतातून भारतात आले. या निर्वासितांची पर्यायी सोय तातडीने करणे आवश्यक होते. स्वातंत्र्यानंतर ब्रिटीश सैन्य गेल्यामुळे उल्हासनगर येथील लष्करी बॅरेक्स रिकाम्या असल्याने त्या मदत व पुर्नवसन विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आल्या, या ठिकाणी मुंबई आणि परिसरात आश्रय घेतलेल्या हजारो निर्वासित कुटूंबांचे पुर्नवसन करण्याचा निर्णय घेण्यात आला. सन १९४९ पासून ते १९७३ सालापर्यत या पुर्नवसन वसाहतीचे व्यवस्थापन केंद्र सरकारकडून करण्यात येत होते. यासाठी शासनाकडुन निर्वासितांची मालमत्ता अधिनियम, १९५०, निर्वासित व्यक्ती (भरपाई व पुर्नवसन) अधिनियम, १९५४ व त्यासंबंधीचे इतर कायदयानुसार या वसाहतीत शासनाने बांधलेल्या मालमत्ता व इतर रिकामी जागा यांचे वितरण करण्यात आले. सन १९७१ मध्ये केंद्र शासनाकडून या वसाहतीचे व्यवस्थापन राज्य शासनाकडे सोपविण्यात आले. १९९२ साली महसूल विभागाने उल्हासनगर येथे स्वतंत्र उपविभाग स्थापन करून आतापर्यंत या वसाहतीतील जमिनींचे वितरणाचे काम त्यांच्यामार्फत सुरु आहे. सुरुवातीस वाटप करण्यात आलेल्या जागांव्यतिरिक्त निर्वासितांनी पुढे राहण्यासाठी तसेच व्यवसाय यासाठी उपलब्ध असलेल्या जागांवर अनधिकृत कब्जा करुन तेथे अतिक्रमणे केलेली होती. आखिल भारतीय सिंध पंचायत फेडरेशनच्या सभासदांनी केंद्र शासनासोबत चर्चा करुन ही अतिक्रमणे नियमित करण्याची मागणी केली होती. त्यावरुन दिनांक ११/५/१९६५ पर्यंतची अतिक्रमणे नियमीत करण्याबाबत तत्कालीन केंद्रीय पुर्नवसन सचिवांनी आश्वासन दिले होते. त्यानुसार भुमी अभिलेख विभागाने सन १९६५ ते १९७१ या कालावधीत उल्हासनगर शहराचे सर्व्हेक्षणात जी अनधिकृत बांधकामे निदर्शनास आली या अतिक्रमणांच्या जागा निर्वासितांना देणेबाबत अद्यापही कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

२) अशा परिस्थितीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १२७ व १२९ तसेच अनुसूचितील प्रकरण ८ (कराधान नियम) मधील तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या इमारती व जमिनींवर **''मालमत्ता कर''** आकारणी करण्यात येते.

मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ **''मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्तीचे नावाची नोंद''** आवश्यक आहे. त्याअनुषंगाने कराधान नियमातील तरतुदीं पुढीलप्रमाणे आहेत.

**नियम १. मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र असलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काच्या सर्व हस्तांतरणासंबंधी आयुक्तास नोटीस देणे.**

(१) कोणत्याही जागेच्या संबंधात मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या अशा जागेसंबंधीच्या किंवा अशा जागेवरील मालकी हक्काचे हस्तांतरण करण्यात येईल तेव्हा तेव्हा ज्या व्यक्तीच्या मालकी हक्काचे असे हस्तांतरण करण्यात येईल त्या व्यक्तीने आणि ज्या व्यक्तीकडे उक्त मालकी हक्काचे हस्तांतरण करण्यात येईल त्या व्यक्तीने, हस्तांतरण संलेख करून देण्यात आल्यानंतर किंवा त्याची नोंदणी करण्यात आली असेल तर त्याच्या नोंदणीनंतर किंवा कोणताही लेख करून देण्यात आला नसेल तर अशा रीतीने हस्तांतरण करण्यात आल्यानंतर, तीन महिन्यांच्या आत हस्तांतरणासंबंधी आयुक्तास लेखी नोटीस दिली पाहिजे.

(२) वर सांगितल्याप्रमाणे प्रथमत: कर देण्यास पात्र असलेली कोणतीही व्यक्ती मरण पावल्यास मयत व्यक्तीच्या मालकी हक्काचे, वारस म्हणुन किंवा अन्यथा ज्या व्यक्तीकडे हस्तांतरण करण्यात येईल त्या व्यक्तीने मयत व्यक्तीच्या मृत्युपासुन एक वर्षाच्या आत अशा हस्तांतरणासंबंधी आयुक्तास नोटीस दिली पाहिजे.

३) उल्हासनगर महानगरपालिका आर्थिक उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असल्याने कर आकारणी पुस्तकात फक्त **''मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ''** मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्तीचे नावाची नोंद करण्यात येते. याचा मालकी हक्कांशी काहीही संबंध नाही.

४) मालमत्ता हस्तांतरण अधिनियमाचे कलम ५४ व नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम १७ मधील तरतुदीनुसार ज्या स्थावर मालमत्तेचे मुल्य रू. १००/— किंवा त्यापेक्षा अधिक आहे, अशा मालमत्तांचा हस्तांतरणाचा नोंदणीकृत व्यवहार होणे आवश्यक आहे.

५) महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाने नगरविकास विभागाच्या संमतीने दिनांक २७ मार्च १९९५ रोजी परिपत्रकाद्वारे स्थानिक स्वराज्य संस्था व प्राधिकरणाच्या क्षेत्रातील स्थावर मालमत्तां हस्तांतरणाबाबत नोंदणीकृत दस्तऐवजांची प्रमाणित नक्कल किंवा सदर दस्तऐवजांची सुचि क्र. २ ची प्रमाणित नक्कत पक्षकाराने दाखल केल्याशिवाय नगरपालिका/महानगरपालिकेच्या अभिलेख्यावर कर आकारणीसाठी सर मालमत्ता विकत घेणा—याच्या नावावर चढवू नये/करण्यात येवू नये, असे आदेश दिले आहेत.

६) शासन नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्रमांक:स्थासंक २०११/प्र.क्र.१३९/नवि—३४, दिनांक ३१ मार्च २०१२ तसेच दिनांक १७ एप्रिल, २०१२ रोजीचे शासन निर्णय शुध्दीपत्रक क्रमांक अन्वये मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात विक्री, देणगी किंवा फलोभोग गहाणाच्या संलेखाच्या बाबतीत संलेख्यात मांडण्यात आलेल्या संलेख्याद्वारे सुरक्षित रकमेवर १ टक्का अधिभार दिनांक १ जुले, २०१२ पासुन लागू करण्यात आला आहे. त्याअनुशंगाने अधिभारामुळे वसूल केलेल्या अतिरिक्त शुल्काच्या रकमेएवढे अनुदान महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.

७) मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे (ग्रा), सह. जिल्हा निबंधक वर्ग—१ ठाणे ग्रामीण यांचे कार्यालयाकडील दिनांक २७/०१/२०१४ व १६/०२/२०१५ रोजीचे पत्रान्वये केवळ रू. १०० चे मुद्रांक शुल्क लावुन नोटरी केलेले खरेदीखताचे आधारे मालमत्ता फेरफार नोंदविला जातो. नोंदणी अधिनियम १९०८ अन्वये स्थावर मिळकतीचे दस्तऐवजांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. अन्यथा नोंदणी न केलेल्या दस्तऐवजास कायदेशिर मुल्य प्राप्त होत नाही, असे कळविले आहे.

८) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अंदाजित १.७० लाख मिळकती अस्तित्वात असुन मालमत्ता कर आकारणी व वसुली व्यवस्थापन तसेच त्यासंबंधी इतर बाबींची पुर्तता करणेसाठी मिळकतींची विभागणी १ ते ५८ प्रभागात करण्यात आलेली आहे. तसेच प्रभागाचे व्यवस्थापनासाठी प्रभागांचे एकुण ८ युनिट मध्ये विभाजन करण्यात आले असुन प्रत्येक युनिट मध्ये १० प्रभाग आहेत. प्रत्येक प्रभागात अंदाजित मिळकतींची संख्या ३५०० किंवा त्यापेक्षा अधिक आहे. प्रतिवर्षी अंदाजित ५००० ते ६००० अर्ज मालमत्ता कर देण्यास प्रथम पात्र व्यक्तींचे नावात बदल करणेसाठी दाखल केले जातात. त्यामध्ये मनपा कर आकारणी पुस्तकात रू. १०० चे मुद्रांक लावुन नोटरी केलेले दस्ताऐवजाच्या आधारे नोंद केलेली प्रकरणांची संख्या अधिक आहे.

९) त्यातही मागील १० ते १५ वर्षापासुन एका पेक्षा अधिक व्यक्तींकडे मिळकतीचे मालकी /वारस हक्कांचे हस्तांतरण झालेले असुन संबंधित व्यक्तींनी कर आकारणी पुस्तकात स्वत:चे नावाची नोंद केलेली असुन सद्यस्थितीतील व्यक्ती नावाची नोंद करणेसाठी अर्ज दाखल करीत असल्याचे दिसुन येते.

१०) तसेच यासाठी स्थायी समिती ठराव क्र. ४ दिनांक २९/५/२०१५ व महासभा ठराव क्र. २६ दिनांक ९/७/२०१२ नुसार मालमत्ता नाव हस्तांतरण शुल्क खालीलप्रमाणे स्विकारण्यात येत आहे.

| अ. क्र | तपशिल | प्रस्तावित शुल्क आकारणी |
|---|---|---|
| १ | वारसा हक्काने मिळकती हस्तांतरण करणे | किमान रू. ५००/—<br>कमाल करयोग्य मुल्याच्या २ टक्के |
| २ | वारसा हक्काव्यतिरिक्त मिळकती हस्तांतरण | किमान रू. ५००/— |

| | | |
|---|---|---|
| | करण्यास परवानगी मिळणेबाबत | कमाल करयोग्य मुल्याच्या २ टक्के |

११) उक्त बाबी पाहता महानगरपालिका क्षेत्रातील स्थावर मालमत्तां हस्तांतरणाबाबत नोंदणीकृत व्यवहार होत नसल्यामुळे शासकीय तसेच महानगरपालिका महसुल बुडत आहे.

१२) सदरील बाब मनपाच्या आर्थिक उत्पन्नाशी निगडीत असल्याने वर्ष २०१६–२०१७ पासुन मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ **''मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्तीचे नावाची नोंद''** हस्तांतरण शुल्क वाढीबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता. तथापि, सदरचा प्रस्ताव विचारार्थ स्थायी समितीपुढे घेण्यात आलेला नाही.

| वापर | दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे.<br>(अर्ज दाखल करताना भरणा करणे आवश्यक) | वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे.<br>(अर्ज दाखल करताना भरणा करणे आवश्यक) |
|---|---|---|
| **निवासी** | किमान रू. १,५००/–<br>कमाल करयोग्य मुल्याच्या २ टक्के<br>**किंवा**<br>चालु बाजारभावानुसार मिळकतीचे किंमतीच्या १ टक्के | किमान रू. १,०००/–<br>कमाल करयोग्य मुल्याच्या २ टक्के<br>**किंवा**<br>चालु बाजारभावानुसार मिळकतीचे किंमतीच्या १ टक्के |
| **अनिवासी** | किमान रू. ३,५००/–<br>कमाल करयोग्य मुल्याच्या २ टक्के<br>**किंवा**<br>चालु बाजारभावानुसार मिळकतीचे किंमतीच्या १ टक्के | किमान रू. २,५००/–<br>कमाल करयोग्य मुल्याच्या २ टक्के<br>**किंवा**<br>चालु बाजारभावानुसार मिळकतीचे किंमतीच्या १ टक्के |

सबब, मनपाच्या आर्थिक उत्पन्नाच्या दृष्टीने वर्ष २०१७–१८ पासुन स्थायी समितीच्या मंजुरीने नाव हस्तांतरण शुल्कात वरीलप्रमाणे वाढ करणेसाठी शिफारस करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १३० — दिनांक:– २९/३/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन् २०१७–२०१८ या आर्थिक वर्षाकरिता मालकी/वारस हक्कांचे नाव हस्तांतरण प्रकरणात नाव हस्तांतरण शुल्कात वाढ करण्याचा प्रस्ताव सुधारीत करुन प्रशासनाने फेरसादर करणेचे निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५.२५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. सुनिल सुर्वे यांनी जाहिर केले.

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी )**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२६/५/२०१७

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २६/५/२०१७ रोजीच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेची स्थायी समितीच्या सभापती निवडणूकीची सभा शुक्रवार दिनांक २६/५/२०१७ रोजी दुपारी ३.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत **डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी, ठाणे** हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| २ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ३ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ४ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ५ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |
| ६ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ७ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ८ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | सदस्य |
| ९ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| १० | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| ११ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| १२ | श्रीमती कांचन अमर लुंड | सदस्या |
| १३ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १४ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| १५ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |

१. श्रीमती पुष्पा नाना बागुल हया सदस्या सभेस गैरहजर होत्या.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. डॉ. सुधाकर शिंदे, आयुक्त
२. श्री. बुराडे, सहा. संचालक
३. श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा उप—आयुक्त
४. सौ. प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
५. डॉ. राजा रिजवानी, प्र. वैद्यकीय अधिकारी
६. श्री. भगवान कुमावत, प्र. प्रभाग अधिकारी
७. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गीस खान
३. श्री. बाळु भांगरे

यावेळी दुपारी ३.३५ वाजता सभेची सुरुवात झाली.

<u>महापालिका सचिव :–</u> महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ मधील नियम–४ अन्वये स्थायी समिती सभापती पदाची नेमणूक करण्यासाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी, ठाणे हे आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–** स्थायी समिती सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड करणे.

---

यावेळी सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांनी विचारणा केली की, सदरची निवडणूक २३ तारखे ऐवजी २६ तारखेला का घेण्यात येत आहे. त्यावर मा. महापालिका आयुक्त यांनी खुलासा केला की, सदरची निवडणूक दिनांक २६/५/२०१७ रोजी घेण्यात येईल याची पुर्वसूचना जिल्हाधिकारी कार्यालय यांनी दिनांक २०/५/२०१७ रोजी दिली होती. त्याप्रमाणे सर्व स्थायी समिती सदस्यांना तशी सभा सूचना देण्यात आली होती.

**परंतु यावेळी श्री. राजेंद्र चौधरी, श्री. धनंजय बोडारे, श्री. सुनिल सुर्वे, श्री. कलवंतसिंह सोहटा, श्री. भारत राजवानी या ५ सदस्यांनी निषेध व्यक्त करत सभात्याग केला.**

<u>डॉ. महेंद्र कल्याणकर (पीठासीन अधिकारी):–</u>

**स्थायी समिती सभापती** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक १९/५/२०१७** रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये ०४ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असून ते अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहेत:–

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | श्री. कलवंतसिंग गुरुदेवसिंग सहोता |
| २ | श्रीमती कांचन अमर लुंड | श्री. पुरस्वानी जमनादास खूबचंद | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ३ | श्रीमती कांचन अमर लुंड | श्रीमती लक्ष्मी सुरेन्द्र सिंग | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर |
| ४ | श्रीमती कांचन अमर लुंड | श्री. राजेश वधरिया | श्री. सिरवानी दीपक लक्ष्मणदास |

**स्थायी समिती सभापती** पदाच्या निवडणूका संबंधातील महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ नियम–०५ (२) अन्वये, पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छाननी केली आहे. छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे मराठी वर्णानुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत:–

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. राजवानी (गंगोत्री) भारत रामचंद्र |
| २. | श्रीमती लुंड कांचन अमर |

यावेळेस ३ वाजुन ४४ मिनिटे झाली आहेत.

वरील २ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असेल त्यासाठी १५ मिनिटांची वेळ देण्यात येत आहे. अशा उमेदवारास आपली उमेदवारी मागे घेण्यासंबंधातील विहित नमुन्यामधील अर्ज भरुन देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

डॉ. महेंद्र कल्याणकर (पीठासीन अधिकारी):—आता दुपारचे ३ वाजुन ५९ मिनिटे झाली आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो.

दिलेल्या वेळेमध्ये कोणत्याही उमेदवाराने आपली **उमेदवारी मागे घेतली नाही.**

आता, स्थायी समिती सभापती पदाच्या एका जागेसाठी खालील २ उमेदवार निवडणूक रिंगणात शिल्लक राहिलेले असून त्यांची मराठी वर्णानुक्रमाने नावे पुढील प्रमाणे आहेत :—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. राजवानी (गंगोत्री) भारत रामचंद्र |
| २. | श्रीमती लुंड कांचन अमर |

स्थायी समिती सभापती पदासाठी मराठी वर्णानुक्रमाने अनु. क्र. १ आणि २ च्या उमेदवारांची नांवे जाहिर करण्यात येतील. प्रत्येक उमेदवाराच्या बाजूने ज्यांना आपले मत द्यावयाचे आहे त्यांनी आपला हात वर करायचा आहे. उमेदवार निहाय तयार केलेल्या यादीमध्ये उमेदवाराला मतदान करणा—या सदस्यांच्या नावांची नोंद घेण्यात येईल. हात वर केलेल्या प्रत्येक सदस्याच्या नावासमोर ''होय'' म्हणुन नोंद घेण्यात येईल.

सर्वप्रथम स्थायी समिती सभापती पदाचे अनु. क्र. १ चे उमेदवार श्री. राजवानी (गंगोत्री) भारत रामचंद्र यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. श्री. राजवानी (गंगोत्री) भारत रामचंद्र यांना मतदान करु इच्छिणा—या सदस्यांनी आपला हात वर करावा:—

**मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| | ०० |

त्यानंतर स्थायी समिती सभापती पदाचे अनु. क्र. २ चे उमेदवार श्रीमती लुंड कांचन अमर यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. श्रीमती लुंड कांचन अमर यांना मतदान करु इच्छिणा—या सदस्यांनी आपला हात वर करावा:—

**मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| २ | श्री. राजेश नानिकराम वदारिया |
| ३ | श्रीमती जया प्रकाश माखिजा |
| ४ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग |
| ५ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर |
| ६ | श्रीमती पंचम उमेश कालानी |
| ७ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग |
| ८ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| ९ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| १० | श्रीमती कविता लाल पंजाबी |

स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणुकीमध्ये ज्या सदस्यांनी मतदान केले नाही अशा सदस्यांच्या मताची नोंद पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| | निरंक |

आता निवडणूक प्रक्रिया संपल्याने निवडणूक लढविलेल्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या व निकाल घोषणा मी पुढीलप्रमाणे घोषित करीत आहे.

# निकाल घोषणा

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राजवानी (गंगोत्री) भारत रामचंद्र | ०० |
| २. | श्रीमती लुंड कांचन अमर | १० |
| एकुण मतदान संख्या – | | १० |
| तटस्थ | | ०० |

महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम २००७ च्या नियम–६ मधील पोटनियम (७) अन्वये पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारान्वये **स्थायी समिती सभापती** पदाचे उमेदवार ***श्रीमती लुंड कांचन अमर*** यांना एकुण उपस्थित १५ सदस्यांपैकी १० इतकी म्हणजे सर्वाधीक मते मिळाल्यामुळे त्यांची ***स्थायी समिती*** **सभापती** पदी रितसर नेमणूक झाली आहे असे मी जाहिर करतो.

दिनांक :–२६/५/२०१७

स्थान :– स्थायी समिती सभागृह

(डॉ. महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी, ठाणे
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

यावेळी सांयकाळी ४.०५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे पीठासीन अधिकारी यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
प्र.महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

**मान्य**

(डॉ. महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी, ठाणे
तथा
पीठासीन अधिकारी

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२६/५/२०१७

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २६/५/२०१७ रोजीच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेची स्थायी समितीच्या सभापती निवडणूकीची सभा शुक्रवार दिनांक २६/५/२०१७ रोजी दुपारी ३.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत **डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी, ठाणे** हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| २ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ३ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ४ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ५ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |
| ६ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ७ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ८ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | सदस्य |
| ९ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| १० | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| ११ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| १२ | श्रीमती कांचन अमर लुंड | सदस्या |
| १३ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १४ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| १५ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |

२. श्रीमती पुष्पा नाना बागुल हया सदस्या सभेस गैरहजर होत्या.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

८. डॉ. सुधाकर शिंदे, आयुक्त
९. श्री. बुराडे, सहा. संचालक
१०. श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा उप—आयुक्त
११. सौ. प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
१२. डॉ. राजा रिजवानी, प्र. वैद्यकीय अधिकारी
१३. श्री. भगवान कुमावत, प्र. प्रभाग अधिकारी
१४. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गीस खान
३. श्री. बाळु भांगरे

यावेळी दुपारी ३.३५ वाजता सभेची सुरुवात झाली.

महापालिका सचिव :– महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ मधील नियम–४ अन्वये स्थायी समिती सभापती पदाची नेमणूक करण्यासाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी, ठाणे हे आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १** :– स्थायी समिती सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड करणे.

---

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :– महोदया, जरा शंका आहे आम्हांला विचारायचे होते जिल्हाधिकारी साहेब यांना की २३ तारखेला आपण ही स्थायी समितीची सभा ठेवली होती ती २६ तारखेला करण्यामागचे कारण काय ते जरा आम्हांला सांगीतले तर बरे होईल. वर्तमानपत्रात ज्या बातम्या आलेल्या आहे त्याच अनुषंगाने आम्ही बोलत आहोत.

डॉ. कल्याणकर (पीठासीन अधिकारी):–मी जिल्हयाचा जिल्हाधिकारी या अशा फालतु गोष्टींकडे लक्ष देत नाही.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–साहेब, अशा गोष्टीचे अनुभव आम्हांला भरपुर आलेले आहेत. जिल्हाधिकारी साहेब, आम्ही तुमचा आदर करतो. जिल्हाधिकारी आहेत म्हणुन परंतु आम्हांला कोकण आयुक्त यांचे अनुभव आलेले आहेत. त्याबद्दल आम्ही काय सांगु शकतो आपणांस. कोकण आयुक्तांचे अनुभव आमच्याकडे आहे.

डॉ. महेंद्र कल्याणकर (पीठासीन अधिकारी):–हे व्यक्तीशः मला आवडलेले नाही आणि मी महेंद्र कल्याणकर जिल्हाधिकारी म्हणुन सांगतो. असे माझ्याकडुन झालेले नाही आणि पुढही भविष्यात असे होणार नाही, मी अशा कुठल्याच दडपणाला मी भित नाही. माझी व्यक्तीशः अडचण होती म्हणुन मी आलो नाही. आणि असे आरोप करायचे असवतील आपणांस तर तेथे वर जावुन करा. माझ्यासमोर करायची आवश्यकता नाही.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–शकां विचारायची नाही काय आम्ही? आमचा निषेध आहे. विषय कुठलाही असु दया आम्ही विचारायचे नाही काय? शंका विचारायची नाही काय?

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–लोकप्रतिनिधी म्हणुन काय आम्हांला बोलण्याचा अधिकारी नाही काय?

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–यापुर्वी सुध्दा कोकण आयुक्तांचा आम्हांला अनुभव आलेला आहे.

सदस्य श्री. भारत राजवानी :–कोकण आयुक्तांचे आदेश एका दिवसात बदलतात.

डॉ. महेंद्र कल्याणकर (पीठासीन अधिकारी):–तुम्ही प्रोसीडींग चालु करा.

**यावेळी श्री. राजेंद्र चौधरी, श्री. धनंजय बोडारे, श्री. सुनिल सुर्वे, श्री. कलवंतसिंह सोहटा, श्री. भारत राजवानी या ५ सदस्यांनी निषेध व्यक्त करत सभात्याग केला.**

डॉ. महेंद्र कल्याणकर (पीठासीन अधिकारी):–
**स्थायी समिती सभापती** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक १९/५/२०१७** रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये ०४ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असून ते अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहेत:–

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | श्री. कलवंतसिंग गुरुदेवसिंग सहोता |
| २ | श्रीमती कांचन अमर लुंड | श्री. पुरस्वानी जमनादास खूबचंद | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ३ | श्रीमती कांचन अमर लुंड | श्रीमती लक्ष्मी सुरेन्द्र सिंग | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर |
| ४ | श्रीमती कांचन अमर लुंड | श्री. राजेश वधरिया | श्री. सिरवानी दीपक लक्ष्मणदास |

**स्थायी समिती सभापती** पदाच्या निवडणूका संबंधातील महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ नियम—०५ (२) अन्वये, पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छाननी केली आहे. छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे मराठी वर्णानुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. राजवानी (गंगोत्री) भारत रामचंद्र |
| २. | श्रीमती लुंड कांचन अमर |

यावेळेस ३ वाजुन ४४ मिनिटे झाली आहेत.

वरील २ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असेल त्यासाठी १५ मिनिटांची वेळ देण्यात येत आहे. अशा उमेदवारास आपली उमेदवारी मागे घेण्यासंबंधातील विहित नमुन्यामधील अर्ज भरुन देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

<u>डॉ. महेंद्र कल्याणकर (पीठासीन अधिकारी):—</u>आता दुपारचे ३ वाजुन ५९ मिनिटे झाली आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मी श्री. जमनादास पुरस्वानी उल्हासनगर महानगरपालिकेचा सभागृह नेता व स्थायी समिती सदस्य मोठया खेदाने बोलावे लागत आहे की, विरोधी पक्ष नेत्यांनी जे मा. जिल्हाधिकारी यांच्यावर आरोप लावले ते बिनबुडाचे आहेत. साईपक्ष व भाजपाचे १० सदस्य आहे ते १०हीच्या १०ही सदस्य उल्हासनगर शहरात उपस्थित होते, याचा पुरावा आमच्याकडे आहे. सत्ताधारीपक्षाचे सदस्य नसल्याने व मा. जिल्हाधिकारी यांनी ४ दिवस आधीच सूचना दिली होती, याची आम्ही घोर निंदा करत आहोत. वरच्या सिटवर बसलेले जिल्हाधिकारी साहेबांवर या प्रकारचे आरोप लावणे, एका वर्तमानपत्राचा आधार घेवुन की आमच्यातील एक सदस्य बाहेर होते, आम्ही सिध्द करु शकतो की आमचे सर्व सदस्य उल्हासनगर शहरातच होते. मी सभागृह नेता या नात्याने मी दु:ख व्यक्त करतो. तरी मी साई पक्ष व भाजपाच्यावतीने खेद व्यक्त करत आहे.

दिलेल्या वेळेमध्ये कोणत्याही उमेदवाराने आपली **उमेदवारी मागे घेतली नाही.**

आता, स्थायी समिती सभापती पदाच्या एका जागेसाठी खालील २ उमेदवार निवडणूक रिंगणात शिल्लक राहिलेले असून त्यांची मराठी वर्णानुक्रमाने नावे पुढील प्रमाणे आहेत :—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. राजवानी (गंगोत्री) भारत रामचंद्र |
| २. | श्रीमती लुंड कांचन अमर |

स्थायी समिती सभापती पदासाठी मराठी वर्णानुक्रमाने अनु. क्र. १ आणि २ च्या उमेदवारांची नांवे जाहिर करण्यात येतील. प्रत्येक उमेदवाराच्या बाजूने ज्यांना आपले मत द्यावयाचे आहे त्यांनी आपला हात वर करायचा आहे. उमेदवार निहाय तयार केलेल्या यादीमध्ये उमेदवाराला मतदान करणा—या सदस्यांच्या

नावांची नोंद घेण्यात येईल. हात वर केलेल्या प्रत्येक सदस्याच्या नावासमोर ''होय'' म्हणुन नोंद घेण्यात येईल.

सर्वप्रथम स्थायी समिती सभापती पदाचे अनु. क्र. १ चे उमेदवार श्री. राजवानी (गंगोत्री) भारत रामचंद्र यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. श्री. राजवानी (गंगोत्री) भारत रामचंद्र यांना मतदान करु इच्छिणा–या सदस्यांनी आपला हात वर करावा:–

**मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| | ०० |

त्यानंतर स्थायी समिती सभापती पदाचे अनु. क्र. २ चे उमेदवार श्रीमती लुंड कांचन अमर यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. श्रीमती लुंड कांचन अमर यांना मतदान करु इच्छिणा–या सदस्यांनी आपला हात वर करावा:–

**मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| २ | श्री. राजेश नानिकराम वदारिया |
| ३ | श्रीमती जया प्रकाश माखिजा |
| ४ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग |
| ५ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर |
| ६ | श्रीमती पंचम उमेश कालानी |
| ७ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग |
| ८ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| ९ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| १० | श्रीमती कविता लाल पंजाबी |

स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणुकीमध्ये ज्या सदस्यांनी मतदान केले नाही अशा सदस्यांच्या मताची नोंद पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| | निरंक |

आता निवडणूक प्रक्रिया संपल्याने निवडणूक लढविलेल्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या व निकाल घोषणा मी पुढीलप्रमाणे घोषित करीत आहे.

## निकाल घोषणा

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राजवानी (गंगोत्री) भारत रामचंद्र | ०० |
| २. | श्रीमती लुंड कांचन अमर | १० |
| एकुण मतदान संख्या – | | १० |
| तटस्थ | | ०० |

महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम २००७ च्या नियम–६ मधील पोटनियम (७) अन्वये

पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारान्वये **स्थायी समिती सभापती** पदाचे उमेदवार ***श्रीमती लुंड कांचन अमर*** यांना एकुण उपस्थित १५ सदस्यांपैकी १० इतकी म्हणजे सर्वाधीक मते मिळाल्यामुळे त्यांची ***स्थायी समिती*** **सभापती** पदी रितसर नेमणूक झाली आहे असे मी जाहिर करतो.

दिनांक :—२६/५/२०१७

स्थान :— स्थायी समिती सभागृह

(डॉ. महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी, ठाणे
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

यावेळी सांयकाळी ४.०५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे पीठासीन अधिकारी यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
प्र.महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

**मान्य**

(डॉ. महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी, ठाणे
तथा
पीठासीन अधिकारी

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २/६/२०१७

**दि. २/६/२०१७ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिति सभेचे इतिवृत्त.**

२

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक २/६/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ६ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |
| ७ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ८ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ९ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | सदस्य |
| १० | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ११ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| १२ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| १३ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १४ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. धनंजय बोडारे, २. श्रीमती कविता लाल पंजाबी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. डॉ. विजया कंठे, आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त, मुख्यालय
४. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
५. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
६. श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि
७. श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विद्युत
८. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
९. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता
१०. श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
११. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१२. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
१३. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

दुपारी ३.२५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १ :—</u> महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. 26BO004618000 (Old No. 26/1140) ही नोंद रद्द करून कर रक्कम रू ६८४३९+विलंब शास्ती निर्लेखित करणेबाबत.

---

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>मागील वेळेस यावर व्हॉटसअप येत होता. २०१२ पासुन त्यांनी कर भरलेला आहे का?

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—</u>मुळ प्रापर्टीचा पुर्ण भरलेला आहे. हा विषय जो आहे ही मालमत्ता अस्तित्वात आहे तिची दुबार नोंद आहे, ही मालमत्ता २०१२ पासून आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>तुमच्या म्हणण्याप्रमाणे प्रशासनाने आणलेल्या प्रस्तावाप्रमाणे जर करायचे असेल तर अगोदरच्या प्रस्ताबाबतचा आमचा अनुभव चुकीचा आहे. त्यामध्ये काही लोक कलेक्टर ऑफिसला जावुन उपोषणाला बसले होते. अस्तित्वात नाही.आणि जे काही सदस्य आहेत त्यांनी तो निर्णय घेतला आणि म्हणुन त्यांच्यावर कारवाई करा, पोलिस केस करा असे लोकांनी त्यावेळेस सांगितले होते. त्यावेळी सभापती श्री. सुनिल सुर्वे होते, कारवाई झाली पाहिजे अशी मागणी लोकांनी केली होती. तो विषय आणि हा विषय वेगळा आहे का?

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—</u>आपल्या ब—याच मालमत्ता दुबार नोंद असलेल्या आहेत. स्थायी समितीने या अगोदर बरेचसे नोंद केलेली आहे. इंदर मार्केटचे मालक आहे त्यांनी ५०००/— रुपये भाडयाने दिले होते ते देत असतांना माहित नाही काय झाले तर त्यांनी २०००० रुपये घेत आहेत. आणि ते बॅकेद्वारे ते पैसे घेत आहेत असे समजले आहे. तरी मी त्यांना पत्र देवुन म्हटले आहे की, त्यांनी कागदपत्र सादर केलेले नाही. वाढीव जी भाडे आकारणी आहे त्याचा कुठलाही पेपर महापालिकेकडे उपलब्ध नाही. ती २००० पासून फक्त ५ हजार रुपये आपण भाडे आकारतो. आणि दुसरा असा मुद्दा आहे की मुळ मालक जो आहे त्या मुळ मालकाचे आणि भाडेकरुचे भांडण आहे. आणि महापालिकेच्या खांदयावर बंदुक ठेवुन तो सांगतो की, याला सील करा, याला बाहेर काढा. म्हणजे त्याचा भाडेकरु निघत नाही. आणि भाडेकरु निघत नसल्याने व त्याने मिडीयाचा उलटसुलट वापर करुन कुठली माहिती देतात, कोठे उपोषण करतात, तर त्याच्या म्हणण्यामध्ये काही तथ्य नाही. त्यास २०१२ पासुन भाडे मिळत नाही. त्याने उलटसुलट पत्र दिले आहे त्यामध्ये नमुद नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>त्यात तथ्य नसले तरी महापालिकेची बदनामी होते ना? त्यास जबाबदार कोण, तर यामध्ये तशी तुम्ही त्यांना उत्तरे दया ना. तुम्ही पण त्यांना सोशल मिडीयाच्या माध्यमातुन सांगा की हे चीटर आहेत. बदनामी होते ना उगाचच आता कलेक्टर सारख्या जागी तो उपोषणास बसला तर बदनामी किती होते. उल्हासनगर महानगरपालिकेत असाच कारभार चालतो, अशी लोकांची धारणा होते ना. त्याचे उत्तर तुम्ही दिले पाहिजे, तुमचे पीआरओ आहेत त्यांनी दिले पाहिजे उत्तर. चुकीची माहिती आहे, तुम्ही देतच नाही. अनाधिकृत बांधकामाबाबतचा मॅसेज गेल्या २५—३० दिवसांपासून व्हॉटसअप वर येत आहे. त्या श्री. बुडगेवर कारवाई करा, त्या प्रभाग अधिका—यावर कारवाई करा. काय सत्य आहे, ते सुध्दा लोकांसमोर येवु दया ना. खोटा आरोप लावतात तर त्यावर कारवाई करा, नसेल तर करु नका. आपण काहीच करत नाहीत ना प्रशासनाच्या माध्यमातुन?

<u>सदस्य श्री. भारत राजवानी:—</u>कर विभागात १ लाखाच्यावर थकबाकी असलेल्या मालमत्तेवर जो सील लावण्यात येत आहे, तर त्यांचे का नाही सील करत, त्यांचे लाखोच्यावर थकबाकी आहे. भाडोत्री व मालकाचे जे काही भांडण आहे ते बाजुला ठेवा.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—</u>त्याबाबत उच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे की प्रापर्टी सील करु नका. त्याचे कोर्टात १० वेगवेगळे दावे चालु आहेत.

<u>**सदस्य श्री. सुनिल सुर्वे**:–</u>मागच्यावेळेस आपण या विषयावर चर्चा केली होती. तुम्हांला आम्ही सांगितले होते की, ही चुक आहे. प्रशासन राहिले वेगळे आज तुमच्या म्हणण्याप्रमाणे आलेला हा विषय आहे, दुबार नोंदणी झाली म्हणुन हा विषय तुम्ही आणत आहात. दुबार नोंदणी करणारे कोण होते? त्यांच्यावर तुम्ही कारवाई का करत नाहीत, हे मी वारंवार तुम्हांला विचारतो. मागील पुर्ण वर्षात माझा तोच विषय होता. तुम्ही काय कारवाई केली, ज्यांनी दुबार नोंदणी केली. ही नोंदणी त्या व्यक्तीने तर केली नसेल, महापालिकेतील तुमचा कोणी कर्मचारी, अधिकारी असेल दुबार नोंदणी करणारा. जो दुबार नोंदणी करणारा आहे त्यावर का कारवाई प्रस्तावित केली नाही तुम्ही? दुबार नोंदणी होतेच कशी? महसुलाचा विषय आहे. महापालिकेच्या महसुलाचा विषय आहे तर या विषयाच्या अनुषंगाने मला तुम्ही एवढा खुलासा सादर करा आपण, मी सर्व सदस्यांना विनंती करतो की हा विषय अतिशय गंभीर आहे. मी मागील वेळेस सुध्दा सांगितले नऊ महिला नगरसेविका होत्या. तुम्ही कमीत कमी एवढा तरी विचार करावा, जर कारवाई झाली त्यांच्यावर. एखादया महिला नगरसेविकोस जेल बघावे लागले तर ते चुकीचे आहे. प्रशासन आपले काम करतो असे कोठेच नाही, जो काही निर्णय आहे तो स्थायी समितीने घेतला असे म्हणतात. प्रशासनाच्या कुठल्या अधिका–याने हे केले त्याचा फक्त खुलासा करा. दुबार नोंदणी केली तर कोणीतरी दुबार नोंदणी केली असेल ना. ही कॅबीन आहे, या कॅबीनची दुबार नोंदणी झाली. दुस–या अधिका–याने कोणीतरी केली असेल ना? दुबार नोंदणी केली तर त्याच्यावर तुम्ही काय कारवाई केली याचा प्रथम तुम्ही खुलासा करा. दुबार नोंदणी पहिले कोणी केली, त्या दोघांमधील खराब कोण आहे? तुम्ही त्यांच्यावर काय कारवाई प्रस्तावित केली आहे आणि ही कारवाई का नाही यासोबत आली? कारण असे संपुर्ण शहरामध्ये लोकांचे नुकसान झालेले आहे.

<u>**सदस्य श्री. दिपक सिरवानी** :–</u>हजार मालमत्ता आहेत.

<u>**सदस्या श्रीमती डिंपल ठाकुर** :–</u>जो निर्णय होईल तो आयुक्त घेतील. त्यामध्ये स्थायी समितीचा निर्णय असेल.

<u>**सदस्य श्री. सुनिल सुर्वे**:–</u>हा अधिकार त्यांचाच आहे, परंतु यात आपण गुन्हेगार होतो. यांचे काय, जेलमध्ये आपण जाणार.

<u>**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी** :–</u>मागील वेळेस असाच विषय आला होता.

<u>**सदस्य श्री. दिपक सिरवानी** :–</u>जास्तीत जास्त लोक टॅक्नीकल नाही आहेत?

<u>**सदस्य श्री. सुनिल सुर्वे**:–</u>सदस्य हे टॅक्नीकल नाही, तर तुम्ही काय कारवाई प्रस्तावित केली?

<u>**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी** :–</u>सुपर लॅबलीटी केस नियमानुसार सादर झालेली होती, त्यामध्ये कुठलेही बेकायदेशीर प्रशासनाने दिलेले नव्हते. आता सध्या सुध्दा कुठलेही बेकायदेशीर दिलेले नाही. मी आताच सांगितले की त्यांचे वैयक्तीक भांडणे आहेत व महापालिकेच्या माध्यमातुन लॅबला सील करण्यासाठी ते आग्रह करत आहेत. वास्तविक पाहता नियमानुसार या अगोदर आम्ही दोन वेळा लॅब सील केलेले आहे. आता तिस–या वेळेस कोर्टाने सांगितले आहे की लॅबला सील करु नका. मा. सदस्य श्री. सुर्वे यांनी सांगितले आहे, फक्त सदस्यांचेच नाव नाही आले तर त्यामध्ये माझा काही संबंध नसतांना, त्यामध्ये दुसरे म्हणजे आमच्या सर्व अधिका–यांचे नाव लिहिले गेलेले आहे, ते आपण पहा. यामध्ये फक्त स्थायी समितीचे सदस्यच नाहीत.

<u>**सदस्य श्री. दिपक सिरवानी** :–</u>जबाबदारी घेत नाहीत. श्री. लेंगरेकर साहेब उत्तर देत होते त्या व्यक्तीला.

<u>**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी** :–</u>आम्ही उत्तर दिले आहे. वैयक्तीक बाब आहे. तर वैयक्तीक भांडणे आणु नका तुमच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. आता यामध्ये दुसरा असा विषय आहे की, दुबार मालमत्ता विषयी आता श्री. सुर्वे साहेब बोलले, माझ्याकडे आता २०१६ पासून चार्ज आहे, तो घेतल्यापासुन मी पाहत आहे त्यामध्ये जवळपास ३० कोटीच्या मालमत्ता आहेत. त्याचा कोठेही ठिकाणा नाही. आपण फक्त पेपरवर किंमती वाढवितो. पॅनल्टी सोबत आम्ही त्याचे बिल काढतो. कमीत कमी ३० हजार म्हणजे ३० कोटीच्या मालमत्ता आहेत.

<u>**सदस्य श्री. दिपक सिरवानी** :–</u>डिलीट करा.

**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :**—आम्ही नाही करु शकत. आता आम्हांला भिती वाटते की, एवढे डिलीट केले, हे केले. प्रत्यक्षात तसे काहीच नाही. अशा बरेचसे केसेस आहेत. तेथे कोठेच काही नाही, मालक सुध्दा नाही, जागा जागेवर नाही.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :**—२००२ पासुन मी चार वेळा येथे लिहून दिले आहे की ब्यु स्टार इंडस्ट्री फ्लायओव्हरमध्ये निष्कासित झाली आहे, आज सुध्दा त्याचे सहा लाख रुपये बाकी आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:**—मा. सभापती महोदया, असे बरेचसे विषय या आधी आले आहेत. जी मालमत्ताच नाही त्याचे बिल येत असते. याच स्थायी समितीमध्ये म्हटले होते की, अशा ज्या काही मालमत्ता आहेत त्यांना एकत्रित घेवुन यावे. एक एक करुन मालमत्तेचा विषय आणण्याचा उद्देश काय? आता स्वत: अधिका—यांनी सांगितले की ३० कोटीच्या मालमत्ता आहेत त्या मिळत नाहीत. आपण या विषयास सुध्दा प्रलंबित ठेवा व आणा सर्व शोधुन शोधुन. १००—२०० मालमत्ता एकत्र आणा. आणि दुसरा विषय म्हणजे याच स्थायी समितीने म्हटले होते की ब—याचशा अशा इमारती आहेत त्यात जे बिल येते, त्यात पाण्याचे बिल सुध्दा असते. जेव्हा श्री. सुर्वे साहेब हे सभापती होते, तर त्यावेळी आम्ही म्हटले होते की सर्व इमारतींचे एकत्रित आणावे. एकत्र न आणता वेगवेगळे आणण्याचे उद्देश काय मला तर यामध्ये काहीतरी गडबड वाटते. जर आपण ५०—१०० मालमत्ता एकत्र आणल्यात तर आम्हांला वाटेल की चला सर्व सामुहिक येत आहेत. तर प्रशासनाने याची तपासणी करुन ५०—१०० मालमत्ता आणाव्यात, एकच आणुन काहीतरी शहराशी भेदभाव होत आहे. तर याविषयी जरा सांगण्यात यावे की आपण हे एक एक करुन का आणत आहात?

**सदस्य श्री. भारत राजवानी:**—दुसरे म्हणजे ज्या इमारती बनत आहेत तर त्यांचे खाते बंद झाले पाहिजे.

**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :**—आता नविन कर आकारणी चालु करायची आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :**—जुनी पध्दत बंद करा, नविन इमारत झाली असेसमेंट करा. जुनी कर आकारणी बंद करुन नविन लावावी. परंतु येथे काय होते नविन सुध्दा लावली जाते व जुनी सुध्दा त्यामुळे पाच वर्षानंतर स्थायी समितीपुढे विषय येतो.

**सदस्य श्री. भारत राजवानी:**—१५—१५ वर्षापासुन लोक भटकत आहे रद्द करण्यासाठी परंतु अदयाप काही होत नाही. साहेब, जेव्हा काम सुरु होते तेव्हा आम्हांस कळते की बॅरेकच्या जागेवर इमारत बनत आहे, किती माळयाची बनत आहे, किती फ्लॅट बनत आहेत. तर का नाही असे होता कामा नये की त्यास २० फ्लॅट देवुन एक—दोन वर्षात परत तपासणी झाली पाहिजे. की तेथे इमारत बनली की नाही. तसेच अधिका—यांची स्वत:ची जबाबदारी आहे की रद्द करण्याची. लोकांना भटकण्यासाठी सोडले जाते.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :**—नविन कर आकारणी करुन नविन नंबर लावा.

**श्री. लेंगरेकर, उप—आयुक्त, मुख्यालय:**—मला बोलायला परवानगी दया. आपला हा विषय चर्चेला वारंवार आला आहे. महासभेत म्हणा की येथे म्हणा किंवा मी कर विभागात असतांना सुध्दा हा विषय आलेला आहे, परंतु या विषयाच्या पुढयात कोणी जाण्याचा प्रयत्न करत नाहीत. आपण फक्त वरवर चर्चा करतो व स्थायी समितीत विषय आला तर तात्पुरती चर्चा होते वा कोणी जात नाही. तेव्हा तो विषय तसाच मागे पडुन राहतो. आता सध्या विद्यमान अधिका—यांनी सांगितले की ३० कोटी मुल्याची जे कर मुल्य आहे, ३० कोटीचे डबल बिलींग होते. आता सन्मानानिय सदस्यांनी सांगितले की यावर लक्ष दिले जात नाही परंतु याच्या तांत्रिक अडचणी जर पाहिल्या तर जुन्या काळात मालमत्ता कर आकारणी झालेल्या तर त्या मालमत्तेचा नंबर व्यवस्थित किंवा त्यास लॅण्ड मार्क म्हणतो तर त्या मालमत्ता दिलेल्या असतात आणि माणसाची प्रवृत्ती थोडी स्वार्थी असते. कर मुल्य जास्त झाले की लोक ती मालमत्ता लपवुन ठेवतात. आणि प्रसंगी अधिकारी व निरिक्षकांना अंधारात ठेवले जाते. त्याचे कर आकारणी करुन घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कर निरिक्षक आमिषाला बळी पडुन याचे मुल्य जास्त झाले म्हणुन पुन्हा त्याचे ॲसेसमेंट करतात व त्यापध्दतीने या मालमत्ता डबल झाल्या यासाठी जनरल सर्व्हेक्षण करायला पाहिजे. माणसाची प्रवृत्ती बळी पडते. सगळया मालमत्ता एकाच वेळी आकारणी केली पाहिजे. एक एक विषय जरी आणले तरी आपल्याला पुढचे शंभर वर्ष ते सुध्दा कमी पडतील.कारण की यासाठी आपल्याला सर्वंकष जो सर्व्हे करायला पाहिजे, जनरल सर्व्हे तर तो करण्यासाठी मी मागे सुध्दा प्रस्तावित केले होते. कारण की आपण एक एक प्रापर्टी मन्युअली जरी शोधायची

म्हटली तशी प्रवृत्ती ही माणसाची पाहिजे. त्यास थोडासा आमिष दाखविला तर तो बळी पडतो. त्यामुळे आपला हा महसुलाचा सर्वात महत्वाचा भाग आहे. शासनाकडुन आपणांस बराचसा महसुल प्राप्त होतो व आपण अनुदानावर अवलंबुन असतो. महानगरपालिकेचा सर्वात महत्वाचा कर हा मालमत्ता कर आहे आणि यामध्ये कुठल्याही पध्दतीचे आपण कॉम्प्रामाईज केले तर भविष्यात महापालिका टिकेल असे वाटत नाही आपल्याला. वारंवार शासनाच्या मदतीवर अवलंबुन रहावे लागेल. उदया जर महापालिकेच्या हिताचा आपण विचार करत असु तर सगळया मालमत्तेच्या एकाच वेळी सर्वेक्षण होणे गरजेचे आहे. मुख्य सर्वेक्षण झाल्यानंतर दुबार ज्या नोंदी आहेत त्यासुध्दा यामध्ये येतील. एखादी इमारत नविन झाली आहे परंतु त्याचे जुनेच बिल येते किंवा एखादी इमारत सात मजली आहे परंतु एकच बील येते. अशा ज्या काही घटना आहेत त्या मी आपणांस दाखवु सुध्दा शकतो. जो माणुस पैसे देतो त्याची कर आकारणी वेगळी करायची म्हणजे ते रेकॉर्डवर आहेत. आपण जर कारवाई करायची म्हटली तर कर विभागातील लोक घरी जावुन बसतील. अशी कारवाई करण्यापेक्षा आपणाकडुन जी चुक झालेली आहे चुक झालेली आहे ती फक्त उल्हासनगर महानगरपालिकेची नाही इतर महापालिका म्हणा किंवा अन्य महापालिका राज्यातील महानगरपालिका सर्वच महापालिकेत याबाबतीत कारण पुर्वीच्या काळात तंत्रज्ञान एवढे अदयावत नव्हते. त्यामुळे जी कर आकारणी व्हायची ती निरिक्षकाच्या मर्जीनुसार व्हायची. आता सध्या तंत्रज्ञान अदयावत आहे. आपल्या घराचा पुर्ण नकाशा आपणांस दिसतो. वाहनातुन प्रवास करत असतांना आपण लोकेशन टाकले तर आपण व्यवस्थित प्रवास करु शकतो. जर अदयावत तंत्रज्ञान असतांना आपण का दुर्लक्ष करत आहे यामध्ये? तुम्ही सध्या प्राधान्याने करविभागाकडुन जीआयएस कर मॅपिंग म्हणा, रेडॉर टॅक्कनॉलॉजी आहे त्यापध्दतीने सुध्दा म्हणा, गल्लीगल्लीतुन त्या मालमत्तांचे फोटो रिलिजींग केले जाते त्या पध्दतीने जीओ ट्रॅक करता येते. आपण झाड सुध्दा जीओ ट्रॅकींग पध्दतीने लावता येते. या पध्दतीने झाडे सुध्दा आपणांस ट्रॅक करता येते तशी मालमत्ता सुध्दा का ट्रॅक करता येणार नाही तर ती येवु शकते. दुबार प्रापर्टी टॅक्स होणार नाही. ज्या झाल्या असतील त्या एकाच वेळी आपणाकडे येतील. त्यामुळे आपण त्या एका झटक्यात रद्द करता येवु शकतात. तर हे करण्यासाठी आपल्याला जीएस मॅपिंग आहे ते केले पाहिजे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>जीएस मॅपींगचे या अर्थसंकल्पात तरतुद ठेवली आहे का?

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u> ठेवली आहे पाच कोटीची तरतुद. जीएस मॅपिंग नसेल तर मॅन्युअली करता येवु शकते परंतु मॅनुअल करण्यास चुका होतात. आणि पुन्हा पुन्हा त्या मालमत्तेची कर आकारणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. जेएस मॅपिंग करतांना बाउंडरी दिली जाते. आपण ॲसेस करु शकतो कारण की कॅमेरा फोटो काढायचे तेथे जागेवर काढु शकतो, मोजमाप घेता येते. आपण हा विषय चर्चा करा, हा विषय पास सुध्दा करु शकतात. त्याची सर्व बाजु तपासुन पाहिल्यानंतर आपण करायला काही हरकत नाही. परंतु मुळ जी समस्या आपण २ वर्षात या कर विभागात जी पाहिली, २०११ मध्ये सुध्दा स्थायी समितीत हा प्रस्ताव आला होता, जनरल सर्व्हे करण्यासाठी. निविदा सादर करुन सुध्दा त्याच्यावर काही कार्यवाही केली नाही. हा विषय पुन्हा पुन्हा टाळत गेलो महापालिकेचे हे बजेट फुगवलेले बजेट असते. जे आपण कागदावर वास्तव येणारे पैसे खुप कमी आहेत. त्या भरवश्यावर आपण बजेटची तरतुद करतो, काही लोकांना त्याचा लाभ मिळतो, काही लोकांना मिळत नाही. ज्या लोकांनी प्रामाणीकपणे कर भरायला पाहिजे ते कर कक्षेतुन वगळले जातात. माझ्याकडे थोडयावेळा पुर्वी एक महिला आली होती तिचे १७ वर्षापासून टिअर गर्डर आहे. तर खालच्याच मालमत्तेची आकारणी झाली आहे वरील मालमत्तेची आकारणी झालेली नाही. तर यामध्ये आपण दोषी ठरवायचे म्हटले तर सर्वच दोषी येतील. दिवसेंदिवस जे अनाधिकृत बांधकाम झालेली आहेत ती सुध्दा रेकॉर्डवर येतील. अनधिकृत बांधलेल्या आहेत त्याचे मोजमाप झालेच नव्हते. जानेवारी महिन्यात आपण घेतलेले आहे की अनाधिकृत बांधकामाची शास्ती करण्याबाबत. शासन निर्णय आहे अनाधिकृत शास्ती कमी करण्याबाबत कर विभागात आलेले आहे तो सुध्दा महापालिकेच्या अधिकारात ठेवलेले आहे. जी काही अनाधिकृत बांधकामे असतील त्यास काही शास्ती लागणार नाही. मला वाटते ६०० स्केअर फुट पर्यंत ती मर्यादा दिलेली आहे. तर याबाबत जर थोडासा विचार आपण मोठया मनाने केला किंवा बैठक ठेवुन जर केला, जर मोहिम केली तर महापालिकेचे लवकरात लवकर आर्थिक बाबी साध्य होतील.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी:–</u>श्री. लेंगरेकर साहेब, एक कर विभागाच्या रेग्युलाईज्डसाठी मी एक मेटर दिले होते, ब–याचशा मालमत्ता ज्या कर आकारणी ५०० फुट आहेत तर आता त्यांनी ॲफिडेव्हीट देवुन मोजमाप दिले आहे दिड वर्षाच्यावर झाले आहे परंतु त्यामध्ये काही ॲक्शन घेतलेले नाही.

<u>श्री. लेंगरेकर, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>बरोबर, मी म्हणेल की, आपण आपल्या जागेवर अगदी बरोबर आहात. मी आमच्या कर्मचा–यांची बाजु घेणार नाही. परंतु आता निवडणूक झाली आहे, पनवेलची झाली

आहे, भिवंडीची झाली आहे तर वारंवार इलेक्शनमध्ये इंगेज असतो. आपणाकडे १ लाख ७२ हजार प्रापर्टी आहेत व निरिक्षक फक्त ८ आहेत, २४ हजार प्रापर्टी येतात तर काम करतांना एका वर्षात त्या २४ हजार प्रापर्टीपर्यंत पोहचु देखील शकणार नाही. तर कितीही लवकर ॲसेट होणार नाही. जसे आपण एकोनॉमिक्स डिमांटचा रेशो पाहातो त्यावेळी आपणाकडे निरिक्षक कमी आहेत. तेवढे निरिक्षक व तेवढे कर्मचारी वाढविले पाहिजे. व आला जो डेटा आहे तो आमच्या अनाधिकृत तज्ञ समितीकडे पडुन आहे. डेटा घेवुन त्यावर कार्यवाही करण्यासाठी वेगळी विंग घेतली पाहिजे. वेगवेगळे काम केले पाहिजे.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>तज्ञ समिती फ्री बसली होती त्यांच्याकडुन काम करुन घेतले पाहिजे होते.

<u>श्री. लेंगरेकर, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>आपणांस सर्वांचा उपाय हाच सांगितला की आपण जर छोटे छोटे काम न करता संपुर्ण जनरल सर्व्हे करणार तर आपणांस तो सुध्दा मार्ग निघेल.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>जेव्हा होईल तेव्हा ना.  आता शहराची वसुली किती घाटयात होत आहे?

<u>श्री. लेंगरेकर, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>त्यासाठी फक्त निविदा प्रक्रिया करण्याची बाकी होती.  आता आपणाकडे निवडणूकीचे काम आल्यामुळे काम झाले नाही.  त्यानंतर पनवेल निवडणूकीत आपले कर्मचारी व्यस्त झाले. ती निविदा प्रक्रिया विभागाकडुन काढुन लवकर लवकर करुन घेवु.  कोणतीही कंपनी येवो जर असेसमेंट चांगले केले तर आपण आआयटीयांच्याकडुन सुपरविजन करु.  यात सर्व तांत्रिक बाबी पाहिजे. आपण जर प्रशासनास सांगितले तर लवकर काम होईल.  निविदा काढली की एक महिन्याच्या आत सर्व्हे होण्यास सुरुवात होईल.

<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी:–</u>१ लाख ७४ हजार आपल्या हिशोबाने उल्हासनगरमध्ये मालमत्ता आहेत. लाईटचे मिटर किती आहेत? म्हणजे ५० हजार मालमत्ता आपणाकडे आता सुध्दा नाही. यांचे वर्षाचे १००० पकडले तर किती नुकसान होत आहे आपले.

<u>श्री. लेंगरेकर, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>दोन वर्षाचा माझा अनुभव मी सांगितला मी त्यासाठी मागील दोन वर्षापासुन प्रयत्न करत आहे की यास जेएसमॅपिंग केले तर आमची सर्व समस्या सुटेल.

<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :–</u>निवडणूक येत राहणार, जात राहणार त्याचा अर्थ असा नाही की आपण आपल्या शहराचे नुकसान करणार. कोणी डबल भरत आहेत, कोणी दिडपट तर कुणी सातपट बिल भरत आहेत. कोणी काहीच भरत नाहीत.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u> मग आता आम्हा स्थायी समितीच्या सदस्यांना एवढेच सांगा की, निविदा कधी निघेल व त्या निविदेची जबाबदारी कोण घेणार? कुठला अधिकारी घेणार?

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :–</u>मा. सभापती महोदय, आपणाकडे एकुण ज्या मालमत्ता आहे त्या १ लाख ७२ हजार मालमत्ता आहेत. एमएसईबीकडुन पेनड्राईव्हमधुन त्यांच्या मालमत्तेची माहिती घेतली तर २ लाख २६ हजार मालमत्ता त्यांच्याकडे आहेत. त्या जर वजा केल्या तर आपणाकडे ५६ हजार प्रापर्टी आहेत तर त्याची कर आकारणी झाली नाही असे दिसून येते. मी एमएससीबीचा व आपल्या मालमत्तेचा डेटा गेल्या ४ पासून मी तपासणी करत आहे. ४ महिन्यानंतर अशी माहिती मिळाली की १६ हजार प्रापर्टींना कर लागलेला नाही. आता माझ्याकडे सर्व पत्ते आहेत, ही मालमत्ता त्याचा हा पत्ता. सर्व बाबी आमच्याकडे तयार आहे. २००६ पासुन आपणाकडे नविन कर आकारणी झालेली नाही. कुठल्याही मालमत्तेचा सर्व्हे झालेला नाही. तर मी आता असे केले की आमच्या सर्वच कर्मचा–यांना कामाला लावलेले आहे मालमत्तेची कर आकारणी चालु आहे पुढील ४ महिन्यात मी आपणांस १०० टक्के या शहरामध्ये नविन कर आकारणी झालेली असेल. २ ते ३ टक्के मालमत्ता असेल त्यास कर लावलेला नाही. ते सुध्दा आम्ही लवकरच कव्हर करु. साधारणत: चार महिन्यात २५ कोटी रुपये नविन मालमत्ता मॅन्युअली वसुल करुन देईल. आता सध्या मॅन्युअली करु व ते झाल्यानंतर जीआयएस मॅपिंगसाठी निविदा काढु.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>निविदा लवकर झाली पाहिजे.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>नाही, जीएससच करा ना, मॅन्युअली करणार तर पुन्हा तीच अडचण येईल. परत तो हजार फुट ऐवजी ५०० लिहुन आणेल. सर्वांचे नुकसान होईल.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>ही निविदा किती दिवसात पुर्ण होईल. लवकर करा ना आणि बाजुला तुमचे काम सुध्दा सुरु ठेवा.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :–</u>मा. श्री. सुर्वे साहेब, महापालिकेने पैसे दिल्यानंतर आमच्याकडुन पैसे घेतल्यानंतर ते आमचाच काटा आम्हांला परत देतात अशी परिस्थिती आहे. तांत्रिकदृष्टया अशा पध्दतीने बाजुची कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, मिरा भाईंदर महानगरपालिका याठिकाणी असे प्रयोग झालेले आहेत. लोकांना पैसे दिलेले आहेत आणि करामध्ये कुठलीही वाढ झालेली नाही. ही निविदा देतांना मागील वेळेस ती लोक आलेत आम्हांला जीआयएस डेमो दाखविला. त्यांनी सांगितले की आमचा पेमेंट असा असा असेल त्यावेळी त्यास आम्ही सांगितले की, तु ३–४–६ महिने कालावधी घेतला तेवढा घे. दर महिन्याला तु नविन असेसमेंट करुन दे. ही असेसमेंट झाल्यानंतर आम्हांला जर वाटले की तुझे ॲसेसमेंट चांगले आहे तर तुला आम्ही पाच पेमेंट देत राहु. असे करायला कुठलाही ठेकेदार तयार झालेला नाही. जर कोणी खात्री देवून जर करत असेल, मा. श्री. लेंगरेकर साहेबांना त्यामध्ये पुर्ण कार्यवाही करायला देतो, असे जर कोणी खात्री देणारा भेटल तर त्यास ते काम दयायला काही हरकत नाही. त्याच लोकांनी केलेला सर्व्हेचा अनुभव यामध्ये चांगला नाही तसेच नाशिकचा अनुभव तो देखील चांगला नाही. आपल्याला जर असे वाटले ते करु शकतात, पाच कोटी त्यांना दयावे. तर सर्व मिळुन आपण निर्णस घेवु.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:–</u>प्रथम आपण आपले आंतरिक कर आकारणी तर सुरु करा. १६ हजार मालमत्ता जर आपणांस भेटल्या आहेत तर त्या तरी ऑन रेकॉर्ड आल्या पाहिजेत ना.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :–</u>तेच मी म्हणत आहे, त्या फक्त १६ च नाही तर बाकीचे जे टिअरगर्डरचे काम झाले आहे अशा ज्या मालमत्ता आहेत त्याच्या ॲसेसमेंट झालेल्या नाहीत जो छोटा एरिया होता तो आता मोठा झाला आहे. त्या सर्वांचे मी करत आहे ४ महिन्यात मी सर्व देत आहेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>४ महिन्यात तर देणार परंतु हे जे दुबार नोंदवाले आहे ते किती महिन्यात संपुर्ण देणार. काय होते जेव्हा एक मालमत्ता येते त्याचे काम आहे, तो फॉलो करत आहे, पळत आहे. कुणास सांगत आहे, असे जाहिर होते नाहीतर एकत्र २५–५० मालमत्ता आल्या पाहिजेत. समजा ८ आमचे आहेत, ८ झोनल अधिकारी आहेत, त्या सर्वांना सांगा आपण. की आपण १०–१० मालमत्ता दुबार नोंदीच्या आणुन दया. नाहीतर एकत्र आणा. १०–१० मालमत्ता ज्या दुबार नोंदीच्या आहेत, समजा श्री. चौधरी साहेब, आपण दुबार नोंदीची कुणास फॉलोअप करुन आणत आहात तर यामध्ये चुकीचे नजरेस येत आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:–</u>होवू शकते.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>१४/५/२०१२ रोजीचा अर्ज आहे आता ४ वर्षानंतर तो अर्ज येतो त्यानंतर हे बोलुन बोलुन मला पंधरा वर्ष झालेत, मी बोलुन बोलुन थकलो की एकत्रीत मालमत्तेचा विषय आणा तरी सुध्दा एकेक आणला जात आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>हा विषय वगळा नंतर पाहु.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आज हे पाच वर्षानंतर येत आहे, १४/५/२०१७ नंतर आज पाच वर्ष झालेत. कमीत कमी पन्नास मालमत्ता असतील तर आम्ही करु. एकेका मालमत्तेचे आम्ही करणारच नाहीत.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>या स्थायी समिती सभागृहात आम्ही आले असतांना असे निदर्शनास आले आहे की, सभापती निवडणूकीच्यावेळी बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो लागला होता तो आता नाही, कोणी काढाला. आपल्या महाराष्ट्रातील पिंपरी चिंचवड महापालिकेत शिक्षण मंत्री विनोद तावडे हे तेथे जावुन मा. बाळासाहेब ठाकरे व स्वा. सावरकरांचा फोटो लावुन तेथे उद्घाटन करत आहेत आणि आमच्या महापालिकेत बाळासाहेबांचा लागेलेला फोटो काढुन अपमान करत आहेत बाळासाहेबांचा. ही गोष्ट फार चुकीची आहे. आणि ही चुकीची गोष्ट या महापालिकेत घडत असेल तर हे चुकीचे होणार, म्हणजे आम्हांला आमच्या पध्दतीने त्याचे उत्तर दयावे लागणार. आणि मग त्याची सर्वस्वी जबाबदारी तुमची राहिल. कुणाच्या आदेशानुसार काढला तो फोटो?

एकीकडे पिंपरी चिंचवड महापालिकेत दोन महान पुरुषांचे फोटो महाराष्ट्राचे मंत्री महोदय जावुन लावतात. उल्हासनगर महानगरपालिकेत बाळासाहेबांचा गेल्या ५–६ वर्षापासुन लागलेला फोटो काढला जातो. कोणाच्या आदेशाने काढले गेले त्याचे उत्तर दया पहिले. सभापती महोदया या पध्दतीने जर काम चालत असेल तर त्याची जबाबदारी आपली राहील.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–मा. सभापती महोदया, आपण याची तपासणी करा हा फोटो कोणाच्या आदेशाने व का उतरविला आहे. आमचे बाळासाहेब ठाकरे हे आमच्या हिंदु विचारांशी जोडले आहे. जेथे बाळासाहेबांचा फोटो लावण्यात आला होता तेथे तो मानसन्मानाने लागला पाहिजे. त्यात काय झाले आहे ते पहा आणि तो लावण्यासाठी आपण आदेश करा.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–सभापती बनण्यापर्यंत तेथे फोटो होता आपण सत्कार केल्यापर्यंत होता त्यानंतर वाट्सअपवर आज पाहिले तर तेथे फोटो नाही.

सभापती, श्रीमती कांचन लुंड:–आजच लावुन टाका.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–मी सभापती महोदयांना विनंती करतो की, प्रोटोकॉलच्या हिशोबाने राष्ट्रपती महोदय व प्रधानमंत्री, व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जितके सुध्दा प्रोटोकॉलच्या हिशोबाने कमीत कमी जे संविधानिक पाच पदे आहेत त्या हिशोबाने त्यांचे फोटो असणे आवश्यक आहे. कार्यालयात सुध्दा लावण्यात यावे.

सभापती, श्रीमती कांचन लुंड :–होय.

डॉ. विजया कंठे, आयुक्त :–मा. सभापती महोदया व सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्य, प्रशासनाकडुन उल्हासनगर–३ मध्ये सिंधु भवन बनविण्याविषयी आयत्यावेळचा विषय आणला आहे. त्याचे जे बांधकाम होते तळमजला अधिक दुसरा मजला त्या बांधकामाची १ कोटी २५ लाखाची वर्कऑर्डर देण्यात आलेली आहे. तथापी आपल्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता हे जरी खरे असले तरी उल्हासनगरमध्ये सिंधी बांधवांची संख्या आहे त्याप्रमाणे बांधकाम करणे आवश्यक आहे. फक्त तळमजल्याच्या बांधकामासाठी हा प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करण्यात येत आहे. सन २०१५–१६ च्या अर्थसंकल्पात याची वर्कऑर्डर देवुन झालेली आहे. तथापी हा बदल यामध्ये करत आहोत की फक्त तळमजल्याची परवानगी देण्यात यावी. किंवा पुढचे पैसे उपलब्ध होतील त्यावेळेस आपण पुढचा विचार करु या.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–उशिर झाला यायला, ठिक आहे. आमची हरकत नाही. विषय चांगला आहे. प्रशासनाने रुलिंग चुकवु नये.

डॉ. विजया कंठे, आयुक्त :–अशी चुक व अशी तांत्रिक बाब होणार नाही.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–सभागृहात मा. बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो लावल्याबद्दल सभापती महोदया आपले धन्यवाद।

महापालिका सचिव :–जो आयत्यावेळचा विषय प्रशासनाने आणला आहे त्याचा गोषवारा नाही, सादर आहे त्यामुळे हा विषय नंतर आणा. आता काय करायचे दुसरा विषय घेवु?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–गोषवारा तर असला पाहिजे ना. गोषवारा आणेपर्यंत पुढील विषय घ्या.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :– विषय सामावून घ्या.

काही सदस्य :–पास–पास......

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. १ :–** महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. 26BO004618000 (Old No. 26/1140) ही नोंद रद्द करून कर रक्कम रू ६८४३९+विलंब शास्ती निर्लेखित करणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयास अनसुरून सादर करण्यात येते की, श्री. के तिरूपती रेड्डी राहणार सुभाष नगर उल्हासगनर–3यांनी दि १४/५/१२ रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र **मालमत्ता क्र 27BO004721800(Old No 27/0961)** या एकाच मालमत्तेची **मालमत्ता 26BO004618000 (Old No. 26/1140)** अन्वये झालेली दुबार नोंद वर्ष 2016–2017 अखेर रद्द करून मिळकत करीता आकारण्यात आलेली कर रक्कम रू. 68439++शास्ती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 152 नुसार मा. स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणेसाठी विनंती केली आहे

| अ. क्र. | तपषिल | **मालमत्ता क्र. 26BO004596400 (Old No. 26/0904)** | **मालमत्ता क्र. 26BO004618000 (Old No. 26/1140)** | |
|---|---|---|---|---|
| 1. | मालमत्ता कर भरण्यास प्रथमतः जबाबदार व्यक्तीचे नाव | श्री. रविकर बापूराव कांबळे | श्री. के तिरूपती रेड्डी | ✔ |
| 2. | मालमत्तेचा पत्ता | बॅरेक नं.684 समोर बालकंजी बारी रोड जवळ उल्हासगनर–3 | रा. रूम साई बाबा कॉलनी उल्हासगनर–3 | ✔ |
| 3 | प्रथम कर निर्धारण वर्ष | एप्रिल 1986, | एप्रिल 1986, | ✔ |
| 4. | क्षेत्रफळ | 380चौ फुट | 434 ,112 चौ फुट, | ✔ |
| 5 | बांधकाम प्रकार | एसी सीट ब्रिक्स | एसी सीट ब्रिक्स | ✔ |
| 6 | वपर | निवासी | निवासी | ✔ |
| 7 | भाडेकरू असल्यास वार्षिक भाडे रक्कम | – | – | |
| 8 | प्रथम कर निर्धारणानंतर मालमत्ता कर भरण्यास प्रथमतः जबाबदार व्यक्तींमध्ये बदल झाला असल्यास त्याचा तपषिल (आदेष क्रमांकासह) | श्री. के तिरूपती रेड्डी<br>कर विभाग, युनिट क्र.–4/460/06<br>दिनांक 8/8/2006 | – | |
| 9 | प्रथम कर निर्धारणानंतर वेळोवेळी सुधारीत कर निर्धारण झाले असल्यास त्याबाबतचा सविस्तर तपषिल (मालमत्ता क्रमांक./निर्धारण वर्ष) | | 01/4/1996 एसी सीट ब्रिक्स<br>01/4/1996 एसी सीट ब्रिक्स<br>01/4/1986 एसी सीट ब्रिक्स | |
| 9अ | सुधारीत क्षेत्रफळ | – | 135 चौ फुट, एसी सीट ब्रिक्स<br>16 चौ फुट, एसी सीट ब्रिक्स<br>134 चौ फुट, एसी सीट ब्रिक्स | |
| 9ब | सुधारीत बांधकाम प्रकार | – | – | |
| 9क | सुधारीत वापर | – | – | |
| 9ड | सुधारीत कर निर्धारण भाडेकरू असल्यास वार्षिक भाडे रक्कम | - | – | |
| 10 | वर्ष 2016–17 अखेर मालमत्ता करापोटी थकीत रक्कम | .– | Rs50373/- | |
| 11 | वर्ष 2016–17 अखेर पाणीपट्टी करापोटी थकीत रक्कम | – | Rs.18,056/- | |
| 12 | एकुण थकीत रक्कम | – | Rs 68439/- शास्ती | |
| 13 | मालमत्ता कराचा भरणा केला असल्यास त्याचा तपषिल (पावती क्रमांक, दिनांक, रक्कम) | प्रथम कर निर्धारणापासुन मालमत्ता कराचा भरणा वर्ष 2014–2015 पर्यंत,दि. 20/2/2015 पा.क. 147579 रू 4741/– अन्वये करण्यात आलेचे दिसुन येत आहे. | प्रथम कर निर्धारणापासुन मालमत्ता कराचा भरणा करण्यात आलेचे दिसुन येत नाही | |

विषयांकित प्रकरणी स्थळ पाहणी करण्यात आली असुन पाहणी अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | स्थळ पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व दिनांक | श्री. जेठानंद ताराचंद कर निरिक्षक दिनांक 2 /6 /2012 |
| 2 | महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे संदर्भित दोन्ही मिळकतीकरीता मालमत्ता कर भरण्यास जबाबदार असलेली व्यक्ती म्हणुन असलेल्या नोदीत समानता आहे काय? नसल्यास मालमत्तानिहाय नोंदीचा तपषिल | फरक आहे. |
| 3 | महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे संदर्भित दोन्ही मिळकतीकरीता पत्त्यात असलेल्या नोदीत समानता आहे काय? नसल्यास मालमत्तानिहाय नोंदीचा तपशिल | नाही. |
| 4 | दोन्ही मालमत्तेचे क्षेत्रफळ, बांधकाम प्रकार व वापर इ. करपात्र बाबींत समानता आहे काय? | क्षेत्रफळात तफावत आहे. बांधकाम प्रकार व वापर इ समानता आहे.. |
| 5 | स्थळ पाहणी केली असता सद्यस्थितीत जागेवर एकच मिळकत अस्तित्वात असल्याचे आढळुन आले आहे काय? | कर निरिक्षक यांचे दि.2/6/12 चे अहवालानुसार एकाच मालत्तेची दुबार नोंद झालेचे दिसुन येते |

**अभिप्राय**

दि. 2 /06 /12रोजी संदर्भित दोन्ही मिळकतींची प्रत्यक्ष पाहणी केली असता सद्यस्थितीत श्री. रा. रूम साई बाबा कॉलनी उल्हासगनर–3 यांचे नावे असलेली **मालमत्ता क्र. 26BO004596400 (Old No. 26/0904)** ही अस्तित्वात असल्याचे आढळुन आले. या मिळकतीचे खात्यात वर्ष 2013–14 अखेर थकित रक्कम रू.निरंक असुन मालमत्ता कराचा वेळोवेळी भरणा करण्यात येत असल्याचे दिसुन येत आहे.
तसेच संबंधित प्रभाग क्र26 मध्ये **मालमत्ता क्र.26BO004618000 (Old No. 26/1140)** ही कोठेही अस्तित्वात असल्याचे आढळुन येत नाही .
उक्त बाबी विचारात घेता महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र **मालमत्ता क्र. 26BO004596400 (Old No. 26/0904)** या एकाच मालमत्तेची **मालमत्ता क्र. 26BO004618000 (Old No. 26/1140)** ही दुबार नोंद असल्याचे दिसुन येते. या मालमत्तेपोटी आकारण्यात आलेला मालमत्ता कर रक्कम रू. 68439.+शास्ती वसुल न होण्याजोगे आहे,
सबब, महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र **मालमत्ता 26BO004618000 (Old No. 26/1140)** ही रद्द करून त्यापोटी आकारण्यात आलेली कर रक्कम रू. 68439+.शास्ती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार मंजुरीकरीता स्थायी समितीपुढे शिफारस करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १ दिनांकः–२/६/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. 26BO004618000 (Old No. 26/1140) ही नोंद रद्द करून कर रक्कम रू ६८४३९+विलंब शास्ती निर्लेखित करण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :– विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २ :–** मा. स्थायी समिती ठराव क्रं. ३४ दिनांक २७/०६/२०१६ मध्ये अंशत: फेरबदल करणे.

---

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–विषय काय आहे? नीट समजला नाही हा विषय.

<u>डॉ. विजया कंठे, आयुक्त :–</u>मा. सभापती महोदया, सर्व सन्माननिय सदस्य, मा. स्थायी समितीने ठराव क्र. ३४, दिनांक २७/६/२०१६ मध्ये जी मंजुरी दिलेली आहे, त्यामध्ये अतिदुष्टया दुर्बल घटकांसाठी आपण महिलांसाठी फॉलबिडींगची मशिन वाटप करण्यासाठी ज्या निविदा मागविल्या होत्या, त्यानंतर आपण त्यांना मान्यता दिलेली आहे. परंतु तत्कालीन आयुक्त यांनी अंशत: फेरबदल केला होता. त्यात महिलांसाठी वयाची अट घातली होती वय १६ ते ३५ परंतु या दुर्बल घटक महिलांचे शिलाई काम करतांना त्या मशिनवरील अनुभव लक्षात घेता ती अट शिथील करावी ही अगदी १८ ते ६० कोणत्याही वयोगटातील महिला जिची शारीरीकदृष्टया क्षमता आहे आणि ती शिलाई काम करु इच्छिते त्याचा समावेश व्हावा असे म्हणुन तो बदल करण्यासाठी हा सर्व ठराव स्थायी समितीसमोर सादर केलेला आहे. तत्कालीन आयुक्तांनी घातलेली जी अट होती ती फक्त ३५ वर्षापर्यंतची महिलेची होती हे आवश्यक नाही की फक्त ३५ वर्षापर्यंतचीच महिला शिलाई मशिनवर काम करुन त्यांच्या कुटुंबाचे पालन करु शकते कारण की साधारणत: ही दुर्बल घटकातील बाब आहे. कारण अनेक कौटुंबिक अडचणीनंतर हया महिला कुटुंबाचे पालन करण्यासाठी हातभार लावु इच्छितात. त्यामुळे या अटीतील अडचणी पाहिल्या, लाभार्थी कमी होत आहेत म्हणुन ती अट ६० वर्षापर्यंत वाढवावी, शिथील करावी. त्यासाठी हा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>सर्वात प्रथम एक गोष्ट सांगा की स्थायी समितीच्या ठरावामध्ये बदल करण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत काय? स्थायी समितीचा ठराव झाल्यानंतर आयुक्तांनी त्यानंतर आपल्या मर्जीने बदल केले आहेत. ही कायदयात तरतुद आहे काय? आयुक्तांनी बदल केलेत.

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>मला बोलु दया.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>सर्वांनी समजले पाहिजे जे श्री. सुर्वे यांनी म्हटले आहे. हे सत्यतेने भरले आहे.

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>माझ्या माहितीप्रमाणे सुरुवातीलाच असा प्रस्ताव होता याबाबत आम्ही ब–याचदा जाहिराती दिल्या आमच्याकडे बरेचसे अर्ज आले परंतु यामध्ये १६ ते ३५ वर्षापर्यंत वय आहे यामध्ये गॅप यामध्ये बदल नाही केला. सुरुवातीलाच हा प्रस्ताव होता. त्यामध्ये अटी आहेत. अटी अगोदरच ठरल्या होत्या.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>आम्ही ठराव केला, आम्ही सर्व सदस्य मशिन देणार होतो. इकडे आयुक्तांनी बदल केला व जाहिरातील दिल्या, निविदा झाल्यानंतर आम्ही ठराव पास केल्यानंतर तुम्ही कसा बदल करु शकता?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>श्री. सुर्वे साहेब जे म्हणत आहेत, आम्ही स्थायी समितीमध्ये ठराव पारीत केला होता, प्रत्येक सदस्य मशिन देणार व त्याचे नाव, पत्ता भरुन देणार. जसे आम्ही २० वर्षापासुन करत आलो आहोत. परंतु आपल्या आयुक्त महोदयांनी काय केले की, जाहिराती दिल्या, वर्तमानपत्रात दिले काय काय खर्च केले परंतु कोणी आलेच नाही. आज एका वर्षापासुन त्या मशिन अशाच पडुन आहेत. ५० अर्ज आहेत, १०० अर्ज सुध्दा आलेले नाहीत. कारण त्यांना माहित पडत नाही ते लोक किती पेपर वाचतात? गरीब महिला थोंडच घरी पेपर वाचते की मला मशिन मिळत आहे की नाही मिळत.

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>सभागृहासमोर मी सत्यपरिस्थिती ठेवतो. ११९ लोकांचे आहे. १० डिसेंबर २०१२ रोजी मान्य केले आहे परंतु विधवा, परिवक्ता, दुर्बल महिला यांचे सर्व शहरातुन अर्ज मागवुन निकष ठरवुन यादी करणे आवश्यक राहील. जे आयुक्तांनी अगोदरच ठरविले होते. आपला जो ठराव बनला होता, त्या अनुषंगाने आपण ठरविले होते की प्रत्येक सदस्यास वाटप करायचे परंतु ही पध्दत आयुक्तांना मान्य नव्हती. फाईलची मुव्हमेंट त्या पध्दतीने झाली होती. लाभार्थी हे नगरसदस्यांनी ठरविणे हे उचित नव्हते. सर्वांना समान संधी मिळावी, जाहिरात मागविणे ही योग्य पध्दत आहे, त्या दृष्टीने आपण शहरात जाहिरात मागविली होती. ३५ वयोगटाप्रमाणे आपणाकडे अर्ज कमी आले.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>साहेब, जेव्हा आम्ही ठराव केला, ती तारीख कोणती होती?

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>आयुक्तांचे २००० पुर्वीचे आहे आणि तुमचा २०१६ मध्ये ठराव झालेला आहे. ठराव आपण त्याच्याशी विसंगत केला आहे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—गोषवारा आल्यावर जे अधिकार आहेत, बदल करण्याचे ते आम्ही केले.

श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—त्या हिशोबाने आयुक्तांनी फेरबदल करण्यासाठी आपणाकडे पाठविले आहे. त्या पध्दतीने आपण नगरसेवक स्वत: वाटप करण्यासाठी ...........

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—त्यास आम्ही मान्यता देत नाही. स्थायी समितीच्या अधिकारानुसार बदल करावयास पाहिजे.

श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—लाभार्थी आपण कळवु शकतात परंतु निवड समितीची जी अट आहे, त्या अटीमध्ये बसणा—या सर्व .......

सदस्य श्री. राजेश वदारिया :—एक मिनिट, निवड समिती कोणी बनविली आहे? निवड समिती स्थायी समिती ठरवेल. हे पहा ज्या गोष्टीस स्थायी समिती मागविते तर त्याचा वाटप करण्याचा अधिकार स्थायी समितीचा आहे ना.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—तर समितीकडे पाठवा.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—महासभेपुढे पाठवा.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—वाटप करण्याचा अधिकार हा स्थायी समितीचा आहे. स्थायी समितीसुध्दा आपली समिती बनवु शकते. त्यात सेक्शन ३० व ३१ मध्ये त्यांना सुध्दा अधिकार आहे. हे वाटप करण्यासाठी आम्ही आमची समिती बनवितो.

श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—आपला अधिकार आहे. त्यावर आमचे काहीही म्हणणे नाही.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—ठराव क्र. ३४ आहे ना जो यांनी मान्यता दिलेली आहे, २०१६ मध्ये तो ठराव कायम ठेवा तुम्हांला जर पाहिजे असेल तर, वाढीव पैश्याचा ठराव करायचा असेल तर तो आम्ही करुन देवु.

श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—वयोगटामध्ये सुध्दा आम्हांला बदल हवा आहे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—आपण आता स्थायी समितीची समिती बनवु या तर ही समिती अंतिम करेल.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—ठिक आहे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—आपणाकडे जे अर्ज आले आहेत ते सदस्यांनी पाठविले आहेत, सदस्य जी शिफारस करतो त्यात अंतिम निर्णय स्थायी समिती घेईल.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—ठिक आहे. परंतु यांना जे पैसे वाढवुन पाहिजेत, ५—६ लाख रुपये ते सुध्दा आपण वाढवुन देवु.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—होय, ते सुध्दा वाढवुन देवु.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—श्री. राजेश वदारिया यांनी जसे म्हटले की, प्रत्येक सदस्य प्रशासनाकडे पाठवेल. ५—७—६ जण आपण निर्णय घेण्यासाठी निवड समितीकडे पाठवा, ती निवड समिती आम्ही बनवितो. ती समिती अंतिम करेल.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—आताच बनवा ना. आपण स्थायी समितीच्या सदस्यांनी समिती बनवु या.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—आम्ही ठराव करत आहोत, स्थायी समिती ठराव क्र. ३४ मध्ये अंशत: बदल करत आहोत. यामध्ये आपण ७४७२ की ७४७८ मशिन ५ लाखावरुन ८ लाखाची मान्यता देत आहोत. त्याच बरोबर ही स्थायी समिती अंशत: बदल करुन वाटप करण्याच्या पध्दतीमध्ये समिती बनवुन आपणांस देत

आहे. संपुर्ण शहरातील जे लाभार्थी मागतील लाभार्थींची यादी आमच्याकडे येईल व ती समिति निर्णय घेईल. स्थायी समितीचे संपुर्ण सदस्य त्याचे सदस्य आहेत. स्थायी समितीच्या १६ सदस्यांची समिती नेमावी.

महापालिका सचिव :—ठिक आहे, ठरावात टाकते की खालीलप्रमाणे समिति पारीत करीत आहे. स्थायी समितीच्या १६ सदस्यांची नावे घालण्यात येत आहेत.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—एक महिन्याच्या आत झाली पाहिजे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—२४ तासात येईल एक एक नगरसेवक ६—६ तास करुन पाठवावे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—पुन्हा प्रशासनास विनंती आहे की, स्थायी समितीच्या अधिकारास दखल घेणे, गदा आणणे कायदयाने गुन्हा आहे. मागील वेळेस जे जिल्हाधिकारी महोदय येथे आले होते त्यावेळी देखील मी तेच म्हटले होते. आणि साहेबांनी सुध्दा तेच सांगितले होते, त्यांना अधिकार नव्हता, निवडणूकीची तारीख पुढे ढकलण्याचा त्यांना अधिकार नव्हता. तो निवडणूक आयोगाकडुन किंवा कोकण आयुक्तांकडुन यायला पाहिजे होते. त्यामुळे अधिका—यांनी बेभान वागु नये अशी आमची विनंती आहे. प्रत्येक अधिका—यांनी कायदयात राहुन काम करावे. मग आम्हीच तक्रार केली तर म्हणणार हा तर दुश्मनी काढत आहेत. त्यामुळे त्यांनी कायदयाच्या कक्षेत बसुनच काम करावे. ही स्थायी समिती समोर तुम्हांला विनंती आहे.

महापालिका सचिव :—मी ठराव वाचुन दाखविते. आपण वाढीव खर्चास मंजुरी दिली आहे. मशिन वाटप मंजुर, १ महिन्या आत, .

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—एका महिन्याच्या आत जेवढया काही यादया येतील ते येथे देवु. आम्ही वाटप करुन देवु, कोणते दयायचे ते.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—आयुक्तांनी आपल्या मर्जीने जाहिरात वगैरे काढली होती, या स्थायी समितीने जाहिरात वगैरे काढायला सांगितली नव्हती. हे सदस्यांकरीता आहे, सदस्यांचा अधिकार हिरावुन घेवु नये. कृपा करुन लक्षात घ्या

सदस्य श्री. दिपक सिरवानी :—सभापती महोदय, आमच्याकडे जे शिलाई मशिन आल्या, फॉल बिडींग मशिन सुध्दा होत्या. अधिकांश नगरसेवक जे आहेत त्यांना मागील वेळेस मशिन मिळाल्या होत्या. श्री. सुर्वे साहेब, मागील वेळेस आपणांस किती मशिन मिळाल्या होत्या? मी आपणां सांगेन की सर्वांना मिळेल तीन तीन. मी व सभापती महोदया यांनी रजिस्टर चेक केले माझी स्वाक्षरी सुध्दा आहे त्यावर. मिळाल्या तीन मशिन रजिस्टरवर पाच मशिनींची नोंद आहे.

सभापती, श्रीमती कांचन लुंड:—माझ्या स्वत:च्या प्रभागात ३ मशिन मिळाल्या आहेत. मी स्वत: त्यादिवशी रजिस्टर पाहिले, त्यात पाच पाच लिहिले आहे व मिळाले ३.

सदस्य श्री. दिपक सिरवानी :—मी २०१४ मध्ये ३ मिळाले म्हणुन स्वाक्षरी केली आहे. याची चौकशी झाली पाहिजे ना. कोणाची निविदा आहे, कोणाला वाटले आहे.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—देणारे ३ असतील व दाखविणारे ५ असतील.

सदस्य श्री. भारत राजवानी :— दोन मशिन एक सदस्य, ७८ मग दहा लाखाच्या वरती घोटाळा दाखवत आहे.

डॉ. विजया कंठे, आयुक्त :— सन्माननिय सभापती महोदया, आणि सन्माननिय सदस्य, जो आपण इथे मुद्दा उपस्थित केला आहे, याची नोंद घेऊन प्रत्येक्षात सर्व तपासणी करून त्याच्यामध्ये जे काही आहे ते प्रशासनाच्या वतीने पुढील सभेत सादर केले जाईल. कारण जर त्यामध्ये काही तथ्य असेल त्याची शहानिशा करून प्रशासनाकडू सदर परिस्थिती पुढी सभेत आपल्या पुढे सादर केली जाईल.

सदस्य श्री. भारत राजवानी :— ठेकेदाराकडून किती आल्यात माहीती पाहीजे.

डॉ. विजया कंठे, आयुक्तः—होय, प्रशासनाकडून तसे अश्वासन देतो.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता ठराव पारीत करा.

काही सदस्यः—पास,पास.......

सभापती, श्रीमती कांचन अमर लुंडः—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. २** :— मा. स्थायी समिती ठराव कं. ३४ दिनांक २७/०६/२०१६ मध्ये अंशतः फेरबदल करणे.

**प्रस्तावना**

दिनांक २२/०६/२०१६ रोजी मा. आयुक्त सो यांनी आदेशित केल्यानुसार उल्हासनगर शहरातील विधवा/परितक्त्या/आर्थिक दृष्टया दुर्बल महिलांना स्वयंरोजगारासाठी फॉलबिडींग/ओव्हरलॉक मशिन वाटप करणेकरिता निविदाकार मेंविघ्नेश एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांची रू. ३८,१०,७२०/—एवढया रक्कमेची निविदा मा. स्थायी समिती समोर मान्यतेकरीता ठेवण्यात आली होती.

मा. स्थायी समितीने ठराव कं. ३४ दिनांक २७/०६/२०१६ रोजी अन्वये फॉलबिडींग/ओव्हरलॉक मशिन वाटपच्या संख्येमध्ये बदल करून पदाधिकारी यांना अतिरिक्त मशिन वाटप करणेबाबत आदेशित केले आहे. परंतु फॉलबिडींग/ओव्हरलॉक मशिनच्या संख्येत वाढ झाल्याने निविदा मंजुर रक्कमे पेक्षा खालील प्रमाणे वाढ होत आहे.

या अनुषंगाने निविदेमध्ये प्राप्त न्युन्नत्तम निविदाकार में विघ्नेश एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांचे उषा जॅनमड्रीमस्टीच सेविंग मशिन यांचे न्युन्नतमदर रू. ७,४७२/— एवढा असून वाढीव एकूण ७८ मशिन खरेदी करणेकरिता रू. ७४७२ X ७८ = ५,८२,८१६/— एवढा वाढीव खर्च होणार आहे. सदर वाढीव खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा. आयुक्त सोा यांचेकडे सादर केला असता.

या अनुषंगाने दिनांक १०/०२/२०१६ रोजी मा. आयुक्त सोा यांनी दिलेल्या निर्देशानुसार महिलांची निवड करतांना विधवा, परितक्त्या व आर्थिक दृष्टया दुर्बल महिलाचे सर्व शहरातुन अर्ज मागविणे, महिलांची वयाची अट १६ ते ३५ ऐवजी १८ ते ६० अशी करणे तसेच संपूर्ण शहरातून जाहिरात देऊन लाभार्थ्यांचे अर्ज मागवावेत. त्यांची विहित अटी व शर्ती नुसार निवड समितीव्दारे छाननी करून प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वाने कार्यवाही करणे करिता मा. स्थायी समिती ठराव कं. ३४ दिनांक २७/०६/२०१६ मध्ये अंशतः फेरबदल करण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. २      दिनांकः— २/६/२०१७

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मा. स्थायी समिती ठराव कं. ३४ दिनांक २७/०६/२०१६ मध्ये खालीलप्रमाणे फेरबदल करण्यास मान्यता देत आहे.

१) रू. ७४७२ X ७८ = ५,८२,८१६/— एवढा वाढीव खर्च करण्यास मान्यता देत आहे.

२)महिलांची वयाची अट १६ ते ३५ ऐवजी १८ ते ६० अशी करणेस मान्यता देत आहे.

३) सदर मशीन वाटपबाबत निर्णय घेण्यासाठी स्थायी समितीच्या १६ सदस्यांची खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ६ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ७ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ८ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ९ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | सदस्य |
| १० | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ११ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| १२ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| १३ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| १४ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १५ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| १६ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |

सदर मशिनचे वाटप एक महिन्याच्या आत करणे आवश्यक असेल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३** :– सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–३ येथील शाळा क. ८, ११ आणि २९ यांची पुर्नबांधणी करणे या निविदेतील कामास मान्यता देणे.

---

सदस्य श्री.दिपक सिरवानी :– वडोल गावाचा ब्रिज बंद केला आहे, आपल्याला सगळयांना माहीत आहे. तो ब्रिज कोणती कंपनी बनवत आहे. तरी पण आपण त्यांनाच देणार का? कारण की, मुलांच्या भविष्याचा प्रश्न आहे. त्याचा स्लॅब पडला आहे आणि आयुक्त साहेबांनी स्वत: सांगितले आहे की ठेकेदाला काळया यादीत टाका.या विषयाचे उत्तर देण्यास कोण सक्षम अधिकारी आहे? इंजिनियर आहे, याची तपासणी करून नंतर दया.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–हा विषय वगळा. माझी सदस्यांना विनंती आहे की, या सभेत हा विषय वगळण्यात यावा.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– पहीली गोष्ट अशी आहे की, कुठल्याही कंपनीवर आपण आरोप करीत आहेत, तर त्याबरोबर काही ना काही पुरावा दयायला पाहीजे. जर आयुक्त साहेबांनी त्यांना काळया यादीमध्ये टाकले आहे, तर मी अधिका–यांना विचारतो की, रामचंदानीला काळया यादीमध्ये टाकले आहे का? ए.एम. रामचंदानीचा कुठला स्लॅब पडला आहे, ए.एम. रामचंदानीचा वडोला गावाचा जो ब्रिज आहे त्याला स्थगिती दिली आहे, याबाबतीत माझ्याकडे पत्र आहे, मी पुराव्यासह बोलत आहे. चार दिवस पहीले मा. आयुक्तांनी फक्त त्याला स्थगिती दिली होती की त्या ब्रिजच्या कामाची चौकशी करण्यासाठी त्या ब्रिजचे काम थांबवा. त्यामध्ये जो कन्संल्टट आहे. जो ते काम बघत आहे, त्यासाठी आपण पैसे खर्च करीत आहे. त्या कन्संल्टंटने रिपोर्ट सुध्दा दिला आहे की, वडोल गावाच्या ब्रिजचे काम चांगल्या प्रकारे चालला आहे, त्याला स्थगिती देण्याची आवश्यकता नाही आणि आजच महापालिकमध्ये सादर केले आहे. मी अधिका–यांना सांगतो की, कृपया करून आपण सांगा की ए.एम.रामचंदानीला काळया यादीत टाकले आहे का, जर केले असेल तर माझ्या माहीती प्रमाणे त्यांना देणे ते उचित नसेल. म्हणजे प्रस्तावच तयार होणार नाही. जर ए.एम. रामचंदानी काळया यादीमध्ये टाकले नाही म्हणून प्रशासनाने त्यांना टेंडर दिलेला आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u> कोण सांगणार आहे या बाबत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी–</u> जो कन्सल्टंटन वडोल गावामध्ये कामासाठी नेमला आहे, त्यांनी दिले आहे की, तिथे काम व्यवस्थित चालले आहे. त्याने रीतसर मशिनने स्लॅब भरला आहे, बिम भरले आहेत. ते बरोबर आहे. आज जी फॉरेनची टॅक्नीक चालते त्याच टॅक्नीकने भरलेला आहे.

<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी–</u> आयुक्त साहेबांनी क्वालिटी बघून बंद केले होते, असा मला मॅसेज आला होता. आता आयुक्त साहेब नाहीत, नाही तर आपण विचारू शकतो की, आपण काम का बंद केले होते.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> याच्या बरोबर आपण जो रिपोर्ट ठेवत आहेत, त्यामध्ये एक गोष्ट आहे. पहीले म्हणजे जो टेंडर झाला आहे, तो चुकीचा झाला आहे. त्याची पध्दतच चुकीची आहे, हे माझे पत्र आहे. निविदा काढून त्याला तांत्रिक लखोटा खोलणे बाबत, दिनांक २०/०५/२०१७ चे पत्र आहे. त्यामध्ये माझा असा आक्षेप आहे की, ज्या वेळेस तांत्रिक लखोटा खोलला गेला, त्यावेळी कोणीही अधिकारी उपलब्ध नव्हते. ही तांत्रिक बाब आहे, जी कमिटी नियुक्त केली जाते. ती कमिटी तिथे बसून व्हायला पाहीजे होते. माझ्याकडे त्याचे सर्व रिपोर्ट आहेत. मा. सभापती, महोदया जरा बघा आणि दुसरी गोष्ट म्हणजे थर्ड पार्टी ऑडिट, त्यांनी जो आणलेल आहे, थर्ड पार्टी ऑाडिट पण आला पाहीजे. बाकी निकष आम्ही विचार करून दयायचे आहे किंवा नाही. थर्ड पार्टी आल्यावर आणि त्याचे उत्तर आपल्या इथे ज्या निविदा ओपन होतात तिथे कॅमेरा लावला आहे आणि या निविदा त्यांच्या वेळेनुसार उघडल्या पाहीजेत. आज अधिकारी नसतांना टेंडर उघडला आहे आणि जो अधिकारी इथे हजरच नाही, त्यांची सही आहे. या बाबतीत माझ्या जवळ पुरावे आहेत. या गोष्टीला माझा विरोध म्हणून हा विषय डिफर करा. हा विषय आमच्याकडे आणला तो प्रशासनाने आणि टेंडर प्रशासनाने उघडला.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका–यांना विचारतो की, इथे टेंडरची पध्दत कशी आहे. जर कोणी अधिकारी उपस्थित नव्हते तर टेंडर उघडला कसा? मा. आयुक्त साहेब आपण याचे उत्तर दया. हा विषय आणला प्रशासनाने, आम्ही तर नाही आणला, टेंडर उघडला प्रशासनाने, आमच्याकडे पिषय आणला प्रशाासनाने आहे. आम्ही स्वत: विषय आणला तर नाही ना? आम्हांला फक्त निर्णय घ्यायचा आहे. हा विषय कोणी नगरसेवक, महापौर, उप महापौर यांनी टेंडर उघडुन पाठवला आहे का? किंवा प्रशासनाने पाठवला आहे, कृपया आम्हांला इथे सांगा.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> थर्ड पार्टी ऑडीटचा मुद्दा कन्सल्टंट आहे, जो वडोल गावचा ब्रिज बनवला आहे त्याचा थर्ड पार्टी ऑडिट केले आहे का? सितलानी साहेब सार्वजनिक बांधकामाचे याचे उत्तर कोण देईल. वडोल गावच्या ब्रिजचे काम आयुक्त साहेबांनी बंद केले होते.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> उत्तर दया, जो वडोल गावाचा ब्रिज बनवला आहे, त्या बद्दल विचारत आहेत त्याचा कन्सल्टन कोण आहे. त्यांनी पत्र दिले आहे का?

<u>श्री. महेश सितलानी, उप अभियंता:–</u>सदरचे काम ए.एम. रामचंदानी यांना दिले आहे. पत्र दिले आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> पत्र काय म्हणून दिले आहे.

<u>उप अभियंता, श्री. महेश शितलानी:–</u> पुलाचे टयुब टेस्टींग बरोबर आहे, ते कामाला सुरूवात करू शकतात. परंतु आम्ही अजून त्यांना पत्र दिले नाही.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> फक्त स्थगिती दिली आहे, त्या कंपनीला आपण काळया यादीत टाकले नाही ना.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u> थर्ड पार्टी ऑडीट झाले आहे का? जेव्हा आयुक्त साहेबांचे आक्षेप येतात तर त्यामध्ये थर्ड पार्टी ऑडीट पण यायला पाहीजे हाच कायदा आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> जो पर्यंत ए. एम. रामचंदानी कंपनीला काळया यादीमध्ये टाकले नाही, तो पर्यंत आपण दुसरी ऑर्डर देणार नाही असा काही नियम आहे का?

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> माझा कायदेशिर विरोध आहे, मी सांगितले आहे की, इलिगल प्रकारे तो टेंडर उघडला आहे. आजच निर्णय घ्यायचा आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> हा गोषवारा आम्हांला सगळयांना चार दिवस पहीले मिळालेला आहे. सिस्टमद्वारे आलेला आहे. दुसरा म्हणजे मा. आयुक्त साहेबांची मंजुरी आहे, बिना मंजुरी शिवाय यायला नाही पाहीजे असे लिहीलेले आहे. हा शाळेसाठी बनवला जात आहे, जेवढया उशिराने होईल, तेवढीच शाळा उशिराने सुरूवात होईल.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> ठिक आहे, शाळा उशिराने सुरू होईल, पण पहीले आमचे जेवढे टेंडर पडलेले आहेत ते का उघडले जात नाहीत? सर्वात म्हणजे आमचे पहील्या वर्षाचे टेंडर, जो टेंडर प्रोसेस झाले आहेत ते उघडले का जात नाहीत? जे उघडले आहेत त्यांची वर्क ऑर्डर का दिली जात नाही. जर टेंडरची गोष्ट आहे, आपल्याला फक्त एकच टेंडर महत्वाचा आहे. शहरामध्ये बाकीची महत्वाची कामे नाहीत का?

<u>डॉ. विजया कंठे, आयुक्त:—</u> सन्माननिय सभापती महोदया, सर्व सन्माननिय सदस्य, महोदय तत्कालीन आयुक्तांनी मा. निंबाळकर साहेबांनी हा जो निर्णय दिला आहे, इथे सुर्वे साहेबांनी सांगितल्या प्रमाणे तो नियम लागू आहे. ही निविदा उघडण्यासाठी जे आदेश होते, ते आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे यांनी सांगितले होते आणि हे खरे आहे. कुठलीही गोष्ट आम्ही सभागृहापासून लपविलेली नाही. आम्ही सभागृहासमोर चुकीचे सांगणार नाही. कारण की इथला सर्व जो स्टाफ होता, २० तारखेला ज्या निविदा उघडल्या होत्या, त्यावेळेस इथे कोणीही उपलब्ध नव्हते आणि शिंदे साहेबांनी सांगितल्या प्रमाणे त्या निविदेचा तो तांत्रिक भाग उघडला गेला. संगणकामधून प्रिंट काढण्यात आल्या त्या सादर केल्या. तिथे आम्ही कोणतीही चुकीची पध्दत प्रशासनाने वापरलेली नाही. ही गोष्ट, ही बाब सत्य आहे. त्या नंतर मी निविदा समितीची अध्यक्ष म्हणून लिफापा उघडल्या नतंर कोणत्याही बाबीवर सहया केलेल्या नाहीत. ते मी सन्माननिय सभागृहाला इथे नमुद करते. त्यामुळे दोन आयुक्तांच्या दोन वेगवेगळया भुमिका होत्या. याबाबत सभागृहाने निर्णय घ्यावा. त्याबाबत प्रशासनाने सभागृहाची कुठलीही दिशाभुल केली नाही आणि आताही आम्ही दिशाभूल करीत नाही.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मॅडम तुम्ही लक्षात घ्या, म्हणजे कायदेच्या बाहेर जाऊन करायचे असे आहे का?

<u>डॉ. विजया कंठे, आयुक्त :—</u> असे मी इथे म्हणू शकत नाही. मी फक्त नमुद केले आहे ते लक्षात घ्या निंबाळकर साहेबांनी सगळे टेंडरचे तांत्रिक भाग उघडून ठेवले आहेत. फक्त वर्क ऑर्डर दिल्या नाहीत. हा त्यांचा निर्णय होता. ते स्वत: आयुक्त म्हणून कार्यरत होते. नंतर शिंदे साहेब आल्या नंतर त्यांनी सांगितले की हया तांत्रिक निविदा उघडा त्या उघडल्या गेल्या आणि त्या नंतर आम्ही गोषवारे सादर केले.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> मागील आयुक्तांनी काय केले?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>टक्केवारीने भरले आहे.

<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी:—</u>हे आजच इमरजन्सी आहे काय?

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>कायदयाच्या कक्षेबाहेर आहे काय?

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>कोणत्या विभागतर्फे, सार्वजनिक बांधकाम

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>मतदान घ्या न.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>ठिक आहे.

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त:—</u>शिक्षण मंडळाचा आहे. मी दुरध्वनी करुन विचारल्यानंतर .....

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मतदान करु
<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>माझा तांत्रिक मुद्दा आहे.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—चुका आहेत, टाईमबॉड नाही.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—वेळ असेल तर

डॉ. विजया कंठे, आयुक्त:—सर्व निविदा एकत्र करु.

श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—ही बाब तांत्रिक असल्याने सभागृहास विनंती आहे थर्ड पार्टी ऑडिट करा.

सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—कमी दराच्या मान्यतेने आहेत.

महापालिका सचिव:—सर्वसंमतीने पास?

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—माझा विरोध आहे.

महापालिका सचिव:— यांच्या विरोधाची नोंद करण्यात येत आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—हा विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता अंमलात आणण्यात यावा.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३** :— शिक्षण मंडळ, उल्हासनगर विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर—३ येथील शाळा क्र. ८, ११ आणि २९ यांची पुर्नबांधणी करणे या निविदेतील कामास मान्यता देणे.

प्रस्तावना

शिक्षण मंडळ, उल्हासनगर विभागाअंतर्गत उल्हासनगर—३ येथील शाळा क्र. ८, ११ आणि २९ यांची पुर्नबांधणी करणे या कामांकरीता बी—१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक २७/०३/२०१७ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.४,६३,००,०००/— |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | दैनिक पुण्यनगरी |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २७/०३/२०१७ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक २७/०३/२०१७ ते १५/०४/२०१७ मुदतवाढ दिनांक ११/०५/२०१७ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ११/०५/२०१७ |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक २०/०५/२०१७ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | २४/५/२०१७ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

दिनांक २०/०५/२०१७ रोजी शिक्षण मंडळ विभागाचे विभागाअंतर्गत मा. अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी यांचे उपस्थितीत उल्हासनगर–३ येथील शाळा क्र. ८, ११ आणि २९ यांची पुर्नबांधणी करणे या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. जयभारत कन्स्ट्रक्शन | मे.जयहिंद रोड बिल्डर्स | मे.ए.एम. रामचंदानी |
|---|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का ? | होय | होय | होय |
| ३ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय |
| ४ | कामाचा अनुभव | होय | होय | होय |
| ५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय | होय |
| ६ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये सर्व कनिष्ठ अभियंता व उप–आयुक्त यांनी छाननी केली असता १) मे. जयभारत कन्स्ट्रक्शन २) मे.जयहिंद रोड बिल्डर्स ३) मे.ए.एम. रामचंदानी यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत.

आज **दिनांक** २४/०५/२०१७ रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा.अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. जयभारत कन्स्ट्रक्शन | दिलेले दर १२.३१ टक्के जास्त |
| २) | मे.जयहिंद रोड बिल्डर्स | दिलेले दर १४.२० टक्के जास्त |
| ३) | मे.ए.एम. रामचंदानी | दिलेले दर ००.१ टक्के कमी |

उपरोक्त **उल्हासनगर–३ येथील शाळा क्र. ८, ११ आणि २९ यांची पुर्नबांधणी करणे** या कामाचे उक्त निविदाकारांपैकी **मे. ए.एम.रामचंदानी** यांनी दरसूची वर ००.१ टक्के कमी (00.1% below) प्रमाणे दर दिले असुन त्याप्रमाणे **मे. ए.एम.रामचंदानी** यांची सदर काम देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी **मे. ए.एम.रामचंदानी** यांची दरसूचीपेक्षा ००.१% कमी दराच्या निविदेस मा.स्थायी समितीच्या मान्यतेकरीता प्रस्तावित आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ३ दिनांकः– २/६/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. कलवंतसिंह सोहटा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार शिक्षण मंडळाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–३ येथील शाळा क्र. ८, ११ आणि २९ यांची पुर्नबांधणी करणेस **मे.ए.एम.रामचंदानी** यांची दरसूचीपेक्षा ००.१% कमी दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

**तसेच**

सदर कामाच्या देखरेखीसाठी एक अधिकारी स्वतंत्ररित्या नेमला जावा व हे काम लवकरात लवकर विहित वेळेत व चांगली गुणवत्ता राखणे बंधनकारक असेल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**मंजुर**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :– विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.** ४ :–मालमत्ता कराच्या रक्कमा वसुलीसाठी जप्ती/अटकावणी केलेल्या मिळकतींची लिलावाने विक्री करतेवेळी अधिनियमातील कराधान नियम ४७ (७) अन्वये आयुक्तांच्यावतीने कर निर्धारक व संकलक यांस नाममात्र रु. १ किंमतीची बोली बोलण्यास प्राधिकृत करणे.

---

**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी** :–सभापती महोदया, ४७ मालमत्तेला सील करण्यात आले होते. ते केल्यानंतर काही लोकांनी पैसे भरले, तर काही मालमत्तेचा २ वेळा लिलाव करण्यात आला. बाकीच्या २० मालमत्तांनी पैसे भरलेले आहेत. उरलेले २६ मालमत्तांनी पैसे भरले नाहीत. दोन वेळा लिलाव करुनही पैसे भरलेले नाहीत. त्यासाठी १ रुपया किंमतीच्या बोलीने मालमत्ता बोली करण्यास मालमत्ता मुल्य हे रेडीरेकनेरच्या दराने असेल. लिलावासाठी २ वेळेस कोन्ही पार्टी आलेली नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी** :–२ जुन ते २ जुलै...

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी** :–एक महिन्यानंतर लिलाव करा.

**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी** :–विक्री १ रुपये दराने ठेवली आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी** :–१ रुपये दराने?

**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी** :–मालमत्ता आपली राहील.

यावेळी सदस्य श्री. दिपक सिरवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी** :–२–३ कोटीच्या आसपास असेल.लोकांना भरण्यासाठी संधी देण्याचे बोलत आहे. नाही करु शकत.

यावेळी सदस्य श्री. दिपक सिरवानी यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी** :–दया त्यांना एक महिन्याची वेळ.

**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी** :–२ वेळा लिलाव करण्यासाठी झाला. त्यासाठी स्थानिक पेपर व संपुर्ण स्टेट लेव्हलच्या पेपरात आपण दिलेले नाही.

**सदस्य श्री. राजेश वदारिया**:–कोण कोठे राहतो, कोण कोठे राहतो हे कोणास माहित नाही, सील सुध्दा चुकीचे केले आहेत.

**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी** :–मालमत्ता जागेवर सील सुध्दा केले आहे. प्रापर्टी बंद आहेत.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी** :–दया त्यांना १ महिन्याची मुदत.

यावेळी सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

महापालिका सचिव :–ठराव पास?

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड**:–४५ दिवसांची एक नोटिस देवुन एक वेळ त्यांना संधी देणार. जर नाही झाले तर परत घेवु.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी** :–ठराव कसा करायचा?

<u>महापालिका सचिव :—</u>सर्वसंमतीने पास? ४५ दिवसांची नोटिस देवुन व त्यानंतर वर्तमानपत्रात देखील नोटिस देवुन. सर्वसंमतीने पास करायचा काय?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास...... इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पास.

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४ :—** मालमत्ता कराच्या रक्कमा वसुलीसाठी जप्ती/अटकावणी केलेल्या मिळकतींची लिलावाने विक्री करतेवेळी अधिनियमातील कराधान नियम ४७ (७) अन्वये आयुक्तांच्यावतीने कर निर्धारक व संकलक यांस नाममात्र रु. १ किंमतीची बोली बोलण्यास प्राधिकृत करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका मालमत्ता करापोटी येणे असलेली रक्कम महानगरपालिकेस देण्यास कसूर केली आहे. अशा मिळकतींचे मालक, धारकास कराचे बिल बजावण्यात आले असून, अशा मिळकतींचे मालक/धारकास कराच्या रक्कमा महानगरपालिकेत जमा करणेसाठी नोटीस वजा पत्राने सुचना देण्यात आल्या आहेत. त्यानंतरही कराच्या रक्कमा महानगरपालिकेत जमा न केल्यास, मालमता कराच्या वसुलीसाठी एकुण २९ मिळकतधारकांच्या स्थावर मिळकती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४२ अन्वये जप्ती/अटकावणीचे अधिपत्र काढुन स्थावर मिळकतींची जप्ती/अटकावणी करण्यात आलेली आहे.

त्यापैंकी ३ मिळकतधारकांनी कराची रक्कम भरणा केली असुन उर्वरीत २६ मिळकतधारकाने संपुर्ण कराची रक्कम मुदतीत भरणा केलेली नाही. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | मालमत्ता क्रमांक | मिळकत धारकाचे नाव व पत्ता | क्षेत्रफळ | थकित रक्कम रूपये | वापर |
|---|---|---|---|---|---|
| १ | १२बीआय०१५३९६७०० | श्री.बी. डी. चौधरी, नवरात्री अपार्टमेंट, बॅरेक ४१२, रु. नं. १,२, चौथा मजला, फ्लॅट नं. ४०२, उल्हासनगर—२. | ५५८चौ.फु | १,४५,३४३/— | निवासी |
| २ | ११बीआय००७६९९००० | श्री. तोताराम लालचंद लिलाशाह अपार्टमेंट, तळमजला, पूज्य पंचायत हॉल, बॅरेक नं.७७१, रुम नं.१०,११ पोरसन, उल्हासनगर—३ | ५६०चौ.फु | १,२३,४४२/— | निवासी |
| ३ | १३बीआय०१५५७५७०० | होल्डर, सत्यनारायण अपार्टमेंट, फ्लॅट नं.४०२, उल्हासनगर—१. | ३६९चौ.फु | १,७४,१९९/— | निवासी |
| ४ | १२बीआय०१५३९५६०० | होल्डर, सत्यमाता अपार्टमेंट, बॅरेक.४२२ विंग पं.५,६,७,८,९, सातवा मजला, फ्लॅट नं.७०१, उल्हासनगर—१. | २२४५चौ.फु | २,७६,११०/— | निवासी |
| ५ | २०बीआय०१६४८२७०० | कमल एन. के.बॅरेक.२७४, ४,५,६,७, उल्हासनगर—२. | १८९चौ.फु | ९२,०४९/— | निवासी |
| ६ | २६बीओ००८०२८००० | होल्डर बेसमेंट बी विंग शिवसागर अपार्टमेंट श्शॉप नं १ उल्हासनगर — ३ | ५९८चौ.फु | १,४९,९५३/— | अनिवासी |
| ७ | २६बीओ००८०२८१०० | होल्डर बेसमेंट बी विंग शिवसागर अपार्टमेंट श्शॉप नं २ उल्हासनगर — ३ | ८५८चौ.फु | १,९९,३८३/— | अनिवासी |
| ८ | २९सीओ००७५८७६०० | श्री. प्रेम आर मंनूजा रा. ॲन्ड इतर साईराम कॉम्पलेक्स उलहसनगर —३ | १०६२६चौ.फु | २,३८,२२७/— | निवासी व अनिवासी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | २८बीओ००८२९५१०० | श्री. महेश डी चंचरिया रा. चंद चेबर्स ३०१ प्रिन्समार्केट मागे उल्हासनगर – ३ | ९००चौ.फु | २,३०,८९८/– | अनिवासी |
| १० | २७बीआय ००४९२६८०० | श्री. बालचंद निहालचंद रा. ४०,४१ हुकमतराय आपर्टमेंट विकास हॉस्पिटल समोर | ७४२चौ.फु | १,९७,५४२/– | निवासी |
| ११ | २७बीआय ००४९२६९०० | श्री. बालचंद निहालचंद रा. ४०,४१ हुकमतराय आपर्टमेंट विकास हॉस्पिटल समोर | ६४४चौ.फु | १,८०,५९०/– | निवासी |
| १२ | २८बीआय००८२०१९०० | होल्डर, वुड लॅड कॉम्पलेक्स १ ला माळा सी १९ उल्हासनगर – ३ | ४७३चौ.फु | २,०१,८०६/– | अनिवासी |
| १३ | २९सीओ००५३६४००० | होल्डर , ए १०७ साई श्रध्दा अपर्टमेंट शांतीनगर उल्हासनगर – ३ | ४८९चौ.फु | १,१३,४७९/– | निवासी |
| १४ | २८बीओ००८२९४७०० | होल्डर, २०४ चंद चेबर्स प्रिन्समार्केट मागे उल्हासनगर – ३ | ३१२चौ.फु | ८०,३३८/– | अनिवासी |
| १५ | २८बीओ००८२९४८०० | होल्डर, २०५ चंद चेबर्स प्रिन्समार्केट मागे उल्हासनगर – ३ | २४०चौ.फु | ६१,६०१/– | अनिवासी |
| १६ | २८बीओ००८२९४६०० | होल्डर, २०३ चंद चेबर्स प्रिन्समार्केट मागे उल्हासनगर – ३ | २२७चौ.फु | ५८,५०१/– | अनिवासी |
| १७ | ३४सीओ ००७९०६९०० | होल्डर, पद्मा पॅलेस , बेसमेंट गोडाऊन उल्हासनगर – ३ | १०६९चौ.फु | १,८६,९९८/–. | अनिवासी |
| १८ | ४२सीआय०१२८९६५०० | मोहन के. प्रेमचंदानी, बॅ.न. १३०९/रूम ४, कुंवर को–ऑप.हौ.सोसायटी प्लाट न. ११, ४था माळा, स्टेशन रोड, उल्हासनगर –४ | ३१५चौ.फु | १,२९,७२६ /– | निवासी |
| १९ | ४२सीआय०१२८९६४०० | मोहन के. प्रेमचंदानी, बॅ.न. १३०९/रूम ४, कुंवर को–ऑप.हौ.सोसायटी प्लाट न. १०, ४था माळा, स्टेशन रोड, उल्हासनगर –४ | २२६चौ.फु | १,१२,०६३ /– | निवासी |
| २० | ४२सीआय००९६३३२०० | आर.बी.सी. होल्डर, साई चितंन को.ऑप.हौ. सोसायटी, बॅ. १३११प्लाट ७०१उल्हासनगर–४ | ३९८चौ.फु | १, २२,७३०/– | निवासी |
| २१ | ४२सीआय००९६३३३०० | आर.बी.सी. होल्डर, साई चितंन को.ऑप.हौ. सोसायटी,बॅ. १३११प्लाट ७०२ उल्हासनगर–४ | ४६५चौ.फु | १,३१,७६६/– | निवासी |
| २२ | ४२सीआय००९६३३४०० | आर.बी.सी. होल्डर, साई चितंन को.ऑप.हौ. सोसायटी, बॅ. १३११प्लाट७०३ उल्हासनगर–४ | १७४चौ.फु | ९२,४४५/– | निवासी |
| २३ | ४२सीआय००९६३३५०० | आर.बी.सी. होल्डर, साई चितंन को.ऑप.हौ. सोसायटी, बॅ. १३११ प्लाट ७०४ उल्हासनगर–४ | १७६चौ.फु | ९२,७९६/– | निवासी |
| २४ | ५६डीआय ०११९५३१०० | होल्डर, साई आत्माराम अपार्ट ८ वाजला प्लॅट नं ८०२ उल्हासनगर –५ | ४६७चौ.फु | १,३१,८५४/– | निवासी |
| २५ | ४३सीआय०१२९८५२०० | होल्डर, विठ्ठलवाडी पोलिस स्टेशन ओ.टी सेक्शन मोहन प्लॉझा ए विंग ५ वा माळा प्लॅट नं | ६९७ चौ.फु | १,७४,५०८/– | निवासी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ५०१ उल्हासनगर – ४ | | | |
| २६ | ४९सीआय०१३४६१२०० | होल्डर, ब्लॉक सी ६८४ रूम १३६७,१३६८ डायमंड पार्क प्लॉट नं १०१ उल्हासनगर – ४ | १३५३ चौ.फु | २,४८,५९८/– | निवासी |

त्याअनुषंगाने अधिनियमातील नियम ४६ अन्वये जप्त केलेल्या मिळकतींची जाहिर लिलावाने विक्री करणेबाबत नोटीस दिनांक ०८/०३/२०१७ रोजीचे स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द् करण्यात आली होती. लिलावामध्ये भाग घेण्यासाठी ४ जणांनी अर्ज घेतले होते. परंतु दिनांक २१/०३/२०१७ रोजी लिलावा दरम्यान प्रतिसाद प्राप्त झाला नाही.

उक्त मिळकतींच्या निर्धारीत किंमती एवढी बोली, कोणाकडुन बोलली न गेल्यास अथवा कोणीही लिलावात भाग न घेतल्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४७ (७) अन्वये नाममात्र किंमतीची बोली बोलण्यास मा. स्थायी समितीची पुर्व मान्यता आवश्यक आहे.

सबब, मालमत्ता कराच्या रक्कमा वसुलीसाठी जप्ती/अटकावणी केलेल्या मिळकतींची लिलावाने विक्री करतेवेळी अधिनियमातील कराधान नियम ४७ (७) अन्वये आयुक्तांच्या वतीने कर निर्धारक व संकलक यांस नाममात्र रू. १ किंमतीची बोली बोलण्यास प्राधिकृत करणेसाठी मंजुरीकरिता मा. स्थायी समिती सभेच्या पटलावर ठेवण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ४ दिनांक:– २/६/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :–श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती सदर मिळकतधारकांना संपुर्ण कराची रक्कम ४५ दिवसांच्या मुदतीत भरणेकामी एक वेळ संधी देण्यास मान्यता देउन सदर बाबतची नोटीस मिळकतधारकांना देणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

तसेच

सदर बाबतीत वर्तमानपत्रात प्रंसिध्दी देणे आवश्यक असेल तसेच सदर विषय त्यानंतर स्थायी समितीपुढे आणणे बंधनकारक असेल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ आयत्यावेळचा विषय

विषय क्र. ५ :– **उल्हासनगर-३ येथील सपना उद्यान येथे तळमजला + दुसरा मजला असे सिंधूभवन बनविणे**.

---

सदस्या श्रीमती डिंपल ठाकुर:–उल्हासनगर डेव्हलपमेंटसाठी चांगला आहे.

श्री. महेश सितलानी, उप अभियंता:–ग्राउंड प्लस दोन माळयासाठी. रिव्हाईज्ड ईस्टीमेट आहे. १ कोटीचे होते. २५ आता वाढीव ७५ आहे.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :–ही मान्यता १ कोटी २ लाख घेतलेली आहे.

<u>श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—</u>१०० टक्के च्या वर. आम्ही चेक करु शकतो.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—</u>यापुर्वी आमचा जेव्हा सार्वजनिक बांधकाम विभागाने पाटोल्सचे निविदा काढली होती ती ३.५० कोटी होतीआता यामध्ये १ कोटीची निविदा काढली होती. आता २ कोटीची तरतुद, जबाबदारी मालमत्ता कर

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:— </u>पुढील सभेत आणु

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>पास करुन परत ३ कोटीची वेगळी निविदा काढा.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>आंबेडकर भवन पैसे?

<u>महापालिका सचिव :—</u>सुधारीत गोषवारा आणावा लागेल.

<u>डॉ. विजया कंठे, आयुक्त:—</u>नाही, हा विषय परत घेत आहे. दुसरा सुधारीत करुन आणु.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>ठिक आहे, मागे घेतला ना?

<u>डॉ. विजया कंठे, आयुक्त:— </u>हा मागे घेत आहे.

सायंकाळी ५.०० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २८/६/२०१७

दि. २८/६/२०१७ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती विशेष सभेचे इतिवृत्त.

(४)

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची विशेष सभा बुधवार दिनांक २८/६/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ६ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |
| ७ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | सदस्य |
| ८ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| ९ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| १० | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| ११ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १२ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती पंचम उमेश कालानी, २. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, ३. श्रीमती पुष्पा नाना बागुल, ४. श्रीमती कविता लाल पंजाबी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

३२. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
३३. श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त
३४. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३५. श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त, मुख्यालय
३६. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
३७. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
३८. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
३९. श्री. संतोष जाधव, उप मुख्य लेखा परिक्षक
४०. श्री. हरेश इदनानी, उप लेखा परिक्षक
४१. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
४२. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विद्युत
४३. श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विद्युत
४४. डॉ. राजा रिजवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
४५. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
४६. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता
४७. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
४८. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी

४९.श्री. बाळु नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी
५०.श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
५१.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
५२.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
५३.श्री. राजा बुलानी, प्र. विधी विभाग प्रमुख
५४.श्रीमती निलीमा कदम, कॅशिअर, शिक्षण मंडळ
५५.श्रीमती छाया डांगळे, लिपिक
५६.श्री. सुरेश मरळे, लिपिक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

दुपारी ३.२० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

महापालिका सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :— सन २०१७—१८ साठी अर्थसंकल्पीय अंदाज सादर करणे.

---

आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर:— मा. सभापती महोदया, मी या वर्षाचा अर्थसंकल्प आपणांस सादर करीत आहे.

यावेळी आयुक्त महोदयांनी मा. सभापती महोदय यांच्या समोर अर्थसंकल्प सादर केला.

आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर :—सर्वांना प्रत दया.

**उल्हासगनर** महानगरपालिका स्थायी समितीच्या मा. सभापती महोदया, सर्व सन्माननिय सदस्य व उपस्थित सर्व अधिकारी कर्मचारी......

महानगरपालिकेचा आयुक्त म्हणून पहिल्यांदाच सन २०१७—१८ चा हा अर्थसंकल्प आपणासमोर मांडण्याची संधी मिळाल्याबद्दल मी आपल्या सर्वांचे विशेष अर्थसंकल्पीय सभेत हार्दीक स्वागत करतो.

**आपणा** सर्वांना जाणिव आहे की, माझी नियुक्ती आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका म्हणून दि. २२ सप्टेंबर, २०१६ रोजी करण्यात आली. महानगरपालिकेचा कार्यभार हातात घेतल्यानंतर लगेचच उल्हासनगर महानगरपालिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला. महापालिका अधिकारी कर्मचारी व शहरातील जनतेच्या सहयोगाने निवडणूक शांत व सुरळीत वातावरणात पार पाडल्याबद्दल मला राज्य निवडणूक आयोग यांनी प्रशस्तीपत्रक देवून गौरविण्यात आले. याचे श्रेय मी, महापालिका अधिकारी कर्मचारी व शहरातील जनतेस देवू इच्छितो.

**उल्हासनगर** महानगरपालिकेची निवडणूक संपल्यानंतर नव्याने स्थापन झालेल्या पनवेल महानगरपालिकेचा निवडणूक पार पाडण्याचीजवाबदारी माझेवर सोपविण्यात आली. प्रत्यक्षात एकंदरीत २२ सप्टेंबरपासुन प्रत्यक्षात येथे मला पंधरा दिवस काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे आयुक्त म्हणुन आणि प्रशासनाचा प्रमुख म्हणुन या अर्थसंकल्पामध्ये जे काही सहयोग दयायचे होते ते देण्याचा मी प्रयत्न केला आहे. सदर कार्यक्रमातही उल्हासनगर महानगरपालिकेतील अधिकारी कर्मचा—यांचे सहकार्य प्राप्त झाले व त्यामूळे निवडणूकीचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यास आले.

**दिनांक** ६ जुन, २०१७ रोजी शासनाने मला पुन्हा उल्हासनगर महानगरपालिकेचा कार्यभार सोपविला.
**मी** उल्हासनगर शहरात आल्यानंतर शहराची पहाणी करीत असतांना शहरातील अनेक प्रकारच्या समस्या माझे डोळयासमोर आल्या. त्या प्रामुख्याने साफ सफाई, रस्ते, सार्वजनिक शौचालय, पाणी पुरवठा, भुयारी गटार इत्यादीनिर्देशनास आले. या सर्व समस्या डोळयासमोर ठेवून प्राप्त होणा—या मोजक्याच उत्पन्नातून मी आपल्याला शहरात सोयी सुविधा योग्य व प्रमाणात देण्याचा प्रयत्न करणार आहे.

**महापालिकेच्या** उत्पन्नाचे मुख्य साधन स्थानिक संस्था कर व मालमत्ता कर हे असून स्थानिक करापोटी प्राप्त होणारे उत्पन्न हे अत्यल्प आहे. त्यामूळे महापालिकेस पुर्णत: मालमत्ता करावरच अवलंबून रहावे लागते.

**मालमत्ता** कर वसुलीसाठी विशेष मोहिम सुरु केली असतांना त्याच कालावधीत मा. पंतप्रधान यांनी हजार व पाचशे रुपयांच्या नोटा बंद केल्याने परंतु शासनाने जुन्या नोटांव्दारे मालमत्ता कर, पाणीपट्टी कर व इतरशासकीय कर भरण्याची संधी दिल्यामूळे मालमत्ता कराची विक्रमी वसुली करता आली व वसुलीचे उद्‌दीष्टे गाठता आलेण त्यामूळे त्या कालावधीत सर्व नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या प्रतिसादाबद्‌दल मी आपले सर्वांचे आभार मानतो.

**आता** आपण अंदाजपत्रक प्रक्रिया ही कशी असते ते पाहू या :

**महाराष्ट्** महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी प्रमाणे महापालिकेचे तीन अंदाजपत्रक तयार करावे लागतात.

**अंदाजपत्रक "क"** मध्ये अधिनियमाचे प्रकरण ११ व १२ मध्ये विहितपाणी पुरवठा, जल निसारण व मलनिसारण इ. बाबींसबंधी तरतूद करण्यात येते.

**अंदाजपत्रक"ब"** मध्ये परिवहनसबंधी बाबींचा समावेश असतो. तसेच

**अंदाजपत्रक"अ"** मध्येरस्ते, उदयाने, दवाखाने, आरोग्य, शहर रोशनाई, अग्निशमन सेवाव प्राथमिक शिक्षण इत्यादी बाबींचा समावेश असतो.

उत्पन्न बाजू :
**वर्ष** २०१७—१८ करिता उत्पन्नाचे अंदाज खालील प्रमाणे तयार करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र | लेखा शिर्ष | उपन्न |
|---|---|---|
| १ | स्थानिक संस्थाकर | १८.००कोटी |
| २ | मालमत्ता कर | १८५.२५कोटी |
| ३ | पाणी पट्टी | ४१.००कोटी |
| ४ | एम.आर. टी. पी. अंतर्गत वसूली | ६५.१५कोटी |
| ५ | परवाणे शुल्क वशुल्क | २.०३कोटी |
| ६ | वित आयोग व इतर अनुदान | २२८.१५कोटी |
| ७ | अमृत व सुवर्ण जयंती नगरोत्थानयोजना | ३५.०२कोटी |
| ८ | ठतर | ११.८५कोटी |
| | **एकूण** | ५८६.४५कोटी |

मालमत्ता कर व पाणी पट्टी:—
**महापालिका** श्रेत्रात अंदाजे १,७२,००० मिळकतींवर कर आकारणी करण्यात येते. यासर्व मिळकतीवर मालमत्ता कर आकारणी देयके बजवण्याची प्रक्रिया सुरू असून अंदाजे ३७० कोटी रूपये वसुली करावयाची आहे. शहरातील मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी मालमत्ता कर आकारणी हा मुख्य स्त्रोत असल्याने मी जन प्रतिनिधीनां विनंती करतो की, प्रभागात जास्तीत जास्त जनजागृती करून वसुलीचे ध्येय गाठण्यासाठी मदत करावी. वर्ष

२०१७–१८ मध्ये मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीपोटी अंदाजे ह्वह्वह्वकोटी रूपयांचे उद्दीष्ट् निर्धारित करण्यात आलेले आहे.

स्थानिक संस्था कर :–

**१ ऑगस्ट्** २०१५ पासून राज्य सरकारने एल बी टी आकारणी बंद केलेली आहे. सदर आकारणी आताफक्त मदय विक्री व ज्या व्यापा–यांची ५० कोटी पेक्षा जास्त उल्हाडाळआहे, त्याच्या कडून वसूली केली जाते. सदर वसूली पोटी अंदाजे १८ कोटी रूपये उत्पन्न अपेक्षीत आहे.

अनुदाने :–

**स्थानिक** संस्था कर बंद झाल्यामुळे त्याऐवजी शासनाकडून एल बी टी अनुदान प्राप्त होत आहे. याशिवाय वित आयोगाच्या शिफारसी प्रमाणे महापालिकेस अनुदान प्राप्त होत आहे. शिवाय दलीत वस्ती सुधारणा अनुदान , डी. पी. डी. सी. अनुदान, खासदार निधी अनुदान, रस्ते अनुदान, स्टॅम्प डयुटी अनुदान या सर्व अनुदाना पोटी वर्ष २०१७–१८ मध्ये रूपये २२८ कोटी रूपयांची तरतुद करण्यात आलेली आहे.

बांधकाम परवाणा व इतर फी :–

**आपणसर्वाना** जाणीव आहे की, उल्हासनगर महानगरपालिका विकास आराखडयास मान्यता अंतीम टप्प्यात आहे व ती कोणत्याही क्षणी अपेक्षितआहे.  सदर विकास आराखडयात क्लस्टर डेव्हलपमेंट, मोडककीस आलेल्या इमारती व ९० मीटर पर्यंत इमारत बांधणे या सर्व बाबींची तरतुद करण्यात आलेली आहे. एम. एम. आर. डी. ए. क्षेत्रात महापालिकांसाठी समान डी.सी. रूल्स मध्ये महापालिकेकडून टी.डी.आर खरेदी करण्याचे प्रावधान आहे. या सर्व बाबी लक्षात घेता, बांधकाम परवानगी या लेखाशीर्षापोटी ६५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

खर्च बाजू :–

| अ.क्र | लेखाशिर्ष | खर्च |
|---|---|---|
| १ | पगार भत्ते व इतर प्रशासकिय खर्च | ११२.२१कोटी |
| २ | एम्. आय. डी.सी. | ३०.५०कोटी |
| ३ | कर्ज परतफेड | ४०.८५कोटी |
| ४ | शहर रोषणाई | ११.०८कोटी |
| ५ | कचरा वाहतूक व जंतूनाशक इत्यादी | ३२.३१ कोटी |
| ६ | उदयाने | ८.३५कोटी |
| ७ | अग्निशमन व आणिबाणी व्यवस्थापन | २.४१कोटी |
| ८ | दवाखाना व आरोग्य विषयक कार्यक्रम | ४.९१कोटी |
| ९ | रस्ते व पायाभूत सूविधा विकास | ८९.६०कोटी |
| १० | प्रभाग समित्या | ३.१२कोटी |
| ११ | पाणी पुरवठा | २३.००कोटी |
| १२ | मल निसारण | ३४.२५कोटी |
| १३ | भूयारी गटार | २.६७कोटी |
| १४ | प्राथमिक शिक्षण | ५३.८१कोटी |
| १५ | परिवहन सेवा | २.१५कोटी |
| १६ | असाधारण लेखे | २६.४१कोटी |
| १७ | इतर | १४.०९कोटी |
|  | **एकूण** | ४९१.७२कोटी |
|  | **अमृत योजना** | ९१.००कोटी |
|  | **अमृतयोजनेसह एकूण** | **५८२.७२ कोटी** |

खर्च बाजू :––

प्रशासकिय खर्च व संगणकीकरण :–

**महापालिकेत** कार्यरत अंदाजे २३०० कर्मचारी व अंदाजे १३०० निवृत्ती वेतन धारक यांचे पगार भत्ते व प्रशासकिय खर्चासाठी वर्ष २०१७–१८ मध्ये ११२.२१ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.

घनकचरा व्यवस्थापन :–

**मी,** याद्वारे सर्वाना माहीती देवू इच्छीतो की, शासनाने नुकतेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ जाहीर केले आहे.सदर नियम दिनांक ८ एप्रील पासून लागू करण्यात आले असूनत्याचे पालन करणे सर्व नागरिकांना बंधनकारक आहे. या नियमाप्रमाणे कच–याचे विलीनीकरण करून ३ वेगवेगळया जैविक कुजणारे, अजैविक न कुजणारे व घरगुती वापरास हानीकारक अशा तीन कचरा कुंडीत वेगवेगळया स्वरुपात साठवणे व ते महापालिका किंवा अधिकृतरित्या कचरा गोळा करणाराकडे वेगवेगळया स्वरूपात देणे आवश्यक आहे. बांधकाम व विध्वसांचा घनकचर–याची विल्हेवाट **Construction and Demolition Waste Management Rules** २०१६ प्रमाणे लावायची आहे. कोणत्याही कचरा निर्मात्याने कचरा हा रस्त्यावर अथवा सार्वजनिक ठिकाणी फेकू नये, गाढू नये अथवा जाळू नये, गटारात, विहीरीत, नदीत टाकू नयेअशे नियमात बंधनकारक करण्यात आले आहेण मी जनप्रतीनिधी द्वारे सर्व नागरिकांना विनंती करतो कि, स्वच्छतेचा संकल्प करून नव्याने जाहीर करण्यात आलेला घनकचरा हाताळणी नियम २०१६ याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. घनकच–याची विल्हेवाट व तद्संबधी बाबीसाठी वर्ष २०१७–१८ च्या अंदाज पत्रकात रू ३२.३१ कोटींची तरतुद करण्यात आलेली आहे.

<u>सार्वजनिक बांधकाम</u> :–

**शहरातील** रस्त्यांचे शुशोभिकरण, गटार दुरूस्ती सी. सी. पायवाटा व इतर पायाभुत सुविधा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पुरविण्यात येतात. आमदार निधी, खासदार निधी, दलीत वस्ती निधी, नगरसेवक निधी, पायाभूत सुविधा निधी या सर्व फंडातून विकास कार्य सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येते. रस्त्यांची डागडुंजी करण्यासाठी रू. ७ कोटी, नविन डांबरी रस्त्यांसाठी ५ कोटी, रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीटीकरणा साठी ५ कोटी अशा प्रकारे अनेक विकास कामांसाठीएकुण रूपये ८९.६० कोटीची तरतुद या विभागा अंर्तगत करण्यात आलेली आहे.

**शहरातील** मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण करणेसाठी २३.७५ कोटी रुपये राज्य शासना कडून विशेष अनुदान मंजूर करून घेण्यात आले आहे. सदर अनुदानातून २० कोटी रुपयांचे खालील ४ कामांचे कार्यादेश जारी करण्यात आले असून ते लवकरात शुरू करण्यात येईल.

नेहरू चौक ते फालोवर लाइन चौक उल्हासनगर पर्यन्त रस्त्याचे डांबरीकरण रुपये ५.५० कोटी.
शमशान भूमी ते विठलवाडी स्टेशन पर्यन्त रस्त्याचे डांबरीकरण रुपये ५.५० कोटी.
वीटीसी स्पोर्ट्स काम्प्लेक्स तेआशेला गाँव पर्यन्त रस्त्याचे डांबरीकरण रुपये ४.०० कोटी.
वीर सावरकर चौक ते जिजामाता उदयान पर्यन्त रस्त्याचे डांबरीकरण रुपये ५.०० कोटी.

**उर्वरित** ३.७५ कोटी रुपये अपेक्षित अनुदानातून खालील ४ कामांची निविदा मागविण्यात आली असून ते ही लवकरात सुरू करण्याचा मानस आहे.

बस स्टँड एरिया आणि आशा कोल्डड्रिंक ते पोलिस चौकी उल्हासनगर घ पर्यन्त रस्त्याचे डांबरीकरण रुपये ७५.००लाख
प्लोयवूड फॅक्टरी ते गॅस गोडाउन प्रबोध नगर उल्हासनगर ि पर्यन्त रस्त्याचे डांबरीकरण रुपये ७५.०० लाख
कैलाश कालनी चौक रस्त्याचे डांबरीकरण रुपये १.५० कोटी
मा. आनंद दिघे प्रवेश द्वार श्रीराम सिनेमा चौक रस्त्याचे डांबरीकरण रुपये ७५.००लाख

**या शिवाय** एम.एम.आर.डी.ए. या वित्तीय संस्थेने शहरातील खालील मुख्य रस्त्यांचे सीमेंट कांक्रिटीकरण करण्यासाठी सहमति दिली आहे.

१. कटकेश्वर मंदिर ते म्हराळ नाका व बिर्ला गेट उल्हासनगर १ पर्यन्त रुपये २६.४७ कोटी.

२. कांसई पूल ते बाबासाहेब आंबेडकर उल्हासनगर ४ पर्यन्त रुपये २.६८ कोटी.

३. सेक्शन २५ उल्हासनगर ४ येथील कारंजा ते आरओबी व्हाया लाल चक्की पर्यन्त रुपये ६.८६ कोटी.
४. कैलाश कॉलनीते पालेगाँव जाकत नाका अंबरनाथ तसेच आकाश कॉलनीते पालेगाँव पर्यन्तरुपये १३.१४ कोटी.

<u>भुयारी गटार प्रकल्प</u> :–

केंद्र व राज्य शासनाच्या सहभागाने जाहीर करण्यात आलेल्या अमृत योजनेअंतर्गत भुयारी गटार योजना राबविण्यासाठी पहिल्या टप्प्यात७१ कोटी रूपयांचे प्रकल्प मंजुर करण्यात आलेले आहे.या साठीएम.जे.पी.या संस्थेची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असून एम.जे. पी. च्या स्तरावर पाठपुरावा करण्याची कार्यवाही सुरु आहे. यासाठी वर्ष २०१७–१८ च्या अंदाज पत्रकात संबधीत लेखा शिर्षा अंतर्गत पुरेशी तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

हरित क्षेत्र विकास :–

केंद्र व राज्य शासन पुरसकृत अमृत अभियान अंतर्गत उल्हासनगर शहरासाठी दिनांक ७ जून २०१७ रोजीच्या आदेश अन्वये पहिल्या टप्प्यात एक कोटी रुपयांचे हरित क्षेत्र विकास प्रक्लपास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. शिवाय १.५० कोटी रुपयांचे दुर्सया प्रक्लपास पुडील महिन्यात प्रशासकीय मान्यता अपेक्षित आहे. या अभियान अंतर्गत पहिल्या टप्प्यात ५३१५ झाडे लावायचे आहे व त्या बरोबर इतर सुविधा पुरावयाचे आहे. या सर्व बाबी व महापालिका वर्गणी पोटी पुरेसी तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आली आहे.

खेमानी नाला विकास :–

महाराष्ट् प्रदूषन नियंत्रण महामंडळाकडून सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी वारंवार सुचना प्राप्त होत आहेत. तसेच जनतेच्या आरोग्यास होणारा धोका लक्षात घेवून व प्रदूषण टाळण्यासाठी खेमानी नाला बांधण्याचे काम सुरू करण्यात आलेआहे व त्यासाठी अंदाज पत्रकात पुरेशी तरतुद करण्यात आलेली आहे. या कामासाठी रू. ३२ कोटींची निवीदा अंतीम करण्यात आलेली आहे.

स्वच्छ भारत अभियान :–

स्वच्छ भारत हा राष्ट्रीय कार्यक्रिम राष्ट्पिता महात्मा गांधी यांच्या जन्मदिनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी राजघाट, नवी दिल्ली मा. पंतप्रधान यांनी जाहीर केला असून सदर कार्यक्रमा अंतर्गत नेमून दिलेले उदिद्ष्टे पार पाडण्याची जवाबदारी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे. सुवच्छ्ता व हागणदारी मुक्त भारत हे स्वच्छ भारत अभियानाचे मुख्य उदि्दष्ट् आहे. सदर अभियाना अंर्तगत घरोघरी शौचालयाची व्यवस्था होणे आवश्यक आहे. हाकार्यक्रम राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जन्मदिनी म्हणजेच २ ऑक्टोबर २०१९ पर्यत पुर्ण करावयाचा आहे. या योजने अंर्तगत अंदाजे ७५०० अर्ज प्राप्त झाले असून यापैकी २४६० शौचालय उभारण्यासाठी शासन सहाय्यता रू. १२ हजार व मनपा वर्गणी रू. १० हजार असे एकूण २२ हजार अनुदान देण्यात येत आहे. उर्वरित अर्जाची छाननी सुरू असून ती अंतिम करून त्यांना अर्थ सहाय्य पुरविण्यासाठी पुरेशी तरतुद अंदाज पत्रकात करण्यात आलेली आहे.अंदाजपत्रकात फक्त महिलांसाठी शौचालय सुविधा करिता रुपये २० लाख व फिरते शौचालय साठी रुपये क्त लाख वेगळी तरतूद करण्यात आली आहे.

शहरातील सार्वजनिक शौचालयांची पहाणीसुरू असून ते वापरणे योग्य व सुस्थितीत करण्याची कार्यवाही सुरू आहे. वर्ष २०१७–१८ मध्ये या बाबींवर लक्ष केंद्रित करण्याचा मानस आहे. सार्वजनिक शौचालयाचे व्यवस्थापन करण्यासाठी व सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यकता वाटल्यास खाजगी संस्थांचा सहभागा अन्वये बांधा व वापरा या तत्वावर प्रकलप राबविणार आहे.

राष्टीय कार्यक्रम :––

केंद्र सरकार व राज्य शासन यांनी आखलेल्या धोरणानुसार आर्थिकदृष्टया दुर्बल व्यक्ती, अंध व दिव्यांग व्यक्ती, महीला व बालक यांच्या विकासासाठी तसेचइतर राष्टीय कार्यक्रमार्तगत खालील प्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| १ महीला व बालकल्याण | ५ कोटी |
| २ वेडे व कुष्ठरोगी वसाहतीतील विकास कार्य | ५० लाख |
| ३ वेडे व कुष्ठरोगी कल्याण योजना | २० लाख |
| ४ दिव्यांग व्यक्तींसाठी कल्याणकारी योजना | २ कोटी |
| ५ कुटुंब नियोजन कार्यक्रम | १० लाख |
| ६ हिवताप व डेंगु प्रतिबंधक योजना | ५० लाख |
| ७ एडस टी.बी व इतर साथीचे रोग प्रतिबंधात्मक योजना | १० लाख |

प्राथमिक शिक्षण :––

शहरातील विदयार्थाना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी व इतर कार्य व कर्तेव्ये पार पाडण्यासाठी शिक्षण विभागाची स्वतंत्ररित्या स्थापना करण्यात आलेली आहे. शिक्षण मंडळाअंतर्गत शहरात एकूण ३० शाळा असून त्यामध्ये एकूण अंदाजे ११ हजार विदयार्थी शिक्षण घेत आहेत. विदयार्थाना गणवेश, वहया, बूट, रेणकोट, व इतर

शैक्षणिक साहित्य पुरविण्यासाठी शासन अनुदान ५० टक्के व महापालिका हिस्सा ५० टक्के निधीच्या स्वरूपात पुरविण्यात येते. यासाठी रूपयें ५३ कोटी मनपा वर्गणीपोटी तरतूद करण्यात आलेली आहे.

**प्राप्त** परिस्थीतीमध्ये स्वावलंबन व काटकसर या तत्व व धोरणाशिवाय पर्याय नाही. सदर धोरणानुसार शहर वाशियांना जास्तीत जास्त सेवा व सुविधा पुरविण्याकरिता आवश्यक ती निधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने सर्व सन्माननीय सदस्थ उत्पन्नात वाढ करण्यास सहर्काय करतील व उत्तम अंदाजपत्रक बनवतील अशी अपेक्षा बाळगतो व  मी माझे निवेदन संपवितो. जयहिंद ! जय महाराष्ट्र !

एकंदरीत आपण पाहिले तर आपले स्वत:चे उत्पन्नाचे असलेले साधन बळकट करणे, खर्चावर मर्यादा आणणे. खर्च करतांना ते नियोजनबध्द असणे, प्रत्येक खर्चाचे काम योग्य पध्दतीने व गुणवत्तेने करणे, काटकसर व स्वावलंबन हे धोरण प्रत्येकाने करणे गरजेचे आहे. शहरवाशियांना जास्तीत जास्त व दर्जेदार सुविधा योग्य वेळेत आणि कमीत कमी खर्चात आपण देण्याचा प्रयत्न करु या. मी अंदाजपत्रकाचे निवेदन संपवितांना माझी सांगायची इच्छा आहे, आपण सर्वांनी आम्हांला सहकार्य दिले आहे, यापुढे देखील स्थायी समिती मा. सभापती व सदस्यांचे सहकार्य राहील, अशी आशा मी याठिकाणी व्यक्त करतो.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**यामध्ये वॉटर हार्वेस्टींगचे दिले आहे का?

अ**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**वॉटर हार्वेस्टींगचे पाहिजे तर आपण मालमत्ता करात करु.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**आपण करु या नंतर आधी पुर्णपणे माहिती तर दया.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**आपण वाचा, आपण पाहिजे तर आमच्या लोकांना सुध्दा बोलावु शकतात. तुम्हांला यामध्ये जास्त चांगल्या पध्दती थोडक्यात समजुन घ्यायच्या असतील, काही लोक नविन सुध्दा असतील, गेल्या दोन—तीन वर्षाची ॲक्चुअलमध्ये पोजिशन कशी आहे ती जी पाहिली तर आपणांस कळेल आणि माझी विनंती राहील, गेल्या वर्षी आपण ७४० कोटीचा अर्थसंकल्प बनविला, पुर्वी ४०० कोटीचा सुध्दा आपणाकडे अर्थसंकल्प नव्हता. त्यामध्ये फुगवुन आपण आकडे धरणे व त्याप्रमाणे खर्च करणे हे मला वाटते हे शुध्द आपण कोठेतरी स्वत:च्या पायावर मारण्यासारखे होईल, तर जेवढे आपले जमेच्या शाश्वत आणि ख—या पाय—या काय आहे ते विचारात घेवुन आपण अर्थसंकल्पात पाहिले पाहिजे. आपण एक ट्रेड लायसन्सचा सुध्दा विषय आणत आहोत ज्यामध्ये मला अपेक्षा आहे किमान ५० कोटी केले आहे तर तो विषय येईल आपणाकडे, उत्पन्न वाढविण्याचा जो अर्थसंकल्प आहे, तो ५० कोटीचा आहे. हा खुप महत्वाचा विषय आहे यामध्ये गेले अनेक वषार्पासुन प्रलंबित आहे. सर्वसाधारण सभेपुढे तो मागील वर्षी मान्य नव्हता झाला आता व्यवस्थीत सांयटीफिक रेट सुध्दा जसे जीएसटी रेट त्यांनी गरजेचे केले आहे, गरजेच्या वस्तुना जीएसटी नाही परंतु चैनीच्या वस्तुंना जीएसटी आहे. तर त्यांना हायर रेट अशा पध्दतीचे आपण प्रपोज केलेले आहे. आज आपण जे बघतो जे ट्रेडर्स आहेत किंवा व्यापारी आहेत, प्रॉपर्टी टॅक्सशिवाय इतर कुठलाही टॅक्स जे व्यापारी लोकांना एक्स्ट्रा कर हे एक माध्यम आहे की ज्याने त्यांच्याकडुन आपण चांगल्याप्रकारे वसुल करु शकतो.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**आपण मालमत्ता कराची ॲसेसमेंट केलेली नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**होय. आपण हा विषय सुरु केला होता. परंतु हा तीन महिन्याचा जो गॅप आहे त्यामुळे एचओडी प्राधान्य प्रायोरीटी आणि थोडी लिडरशिप बदलली की त्याप्रमाणे बदल करावा लागतो. तो लाईनवर येईपर्यंत आणि नविन जे काही विषय आहेत.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**मालमत्ता करावर आपण भर देवु शकतो. त्यात बरेचसे सोर्स आहेत. आपल्या शहरात पार्किंग नाही, आपण किती निविदा काढल्या काय केले? निविदेची मुदत संपते तरी दुसरी निविदा काढत नाहीत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**नाही, नाही आता आम्ही प्रभाग कार्यालयातुन यादी घेतली आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**पब्लीक पैसे देण्यास तयार आहे परंतु पार्किंगची जागा नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**यामध्ये काय आहे मागील वेळेस आम्ही निविदा काढली होती. परंतु त्यामध्ये आम्ही फिक्स रेट ठेवले होते.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**एकच उदाहरण देतो, शांतीनगर गेट जवळ, दोन–तीन वर्षापुर्वी तीन वर्षाची निविदा ठेकेदारास दिली त्याची मुदत संपली आता दुसरा माणुस तेथे पैसे जमा करतो. ही जबाबदारी महापालिकेची आहे, त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे ना?

**<u>महापालिका सचिवः–</u>**ही अर्थसंकल्पाची सभा आहे यामध्ये इतर विषयी चर्चा करु नका.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः–</u>**मी आपल्या माहितीसाठी सांगतो याआधी आपण काय करायचो, ती निविदा फॉल्टी होती, समजा एक उदाहरण घेतले की एक जागा...

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः–</u>**आम्ही अशीच चर्चा करतो. इतिवृत्तात घेवु नका. आपण ही सभा स्थगित करु या व पुन्हा नंतर लावु या.

**<u>सभापती, श्रीमती कांचन लुंड :–</u>**ही सभा ३ जुलै २०१७ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.

सांयकाळी ४.२० वाजंता सभेचे कामकाज स्थगित केल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— ३/७/२०१७

दि. ३/७/२०१७ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती विशेष सभेचे इतिवृत्त.

४

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची विशेष सभा बुधवार दिनांक २८/६/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदर सभा स्थगित केल्याने सदर सभा सोमवार दिनांक ३/७/२०१७ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| ४ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |
| ५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राजेश नानिकराम वदारिया, २. श्रीमती जया प्रकाश माखिजा, ३. श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर, ४. श्रीमती कविता लाल पंजाबी, ५. श्रीमती पंचम उमेश कालानी, ६. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, ७. श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा, ८. श्रीमती पुष्पा नाना बागुल, ९. श्री. राजेंद्र शांतराम चौधरी, १०. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे, ११. श्री. धनंजय बोडारे

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. हरेश इदनानी, उप लेखा परिक्षक
४. श्री. नंदु समतानी, वरिष्ठ लिपिक, एलबीटी
५. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

सांयकाळी ४.२० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**सभेत आयुक्त उपस्थित नसल्याने ही सभा सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत स्थगित करावी.

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंडः—**सदरची सभा सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.

सांयकाळी ४.२५ वाजंता सभेचे कामकाज स्थगित केल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

सदर सभा पुन्हा सांयकाळी ५.१५ वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ४ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ५ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |
| ६ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ७ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ८ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | सदस्य |
| ९ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| १० | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| ११ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| १२ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| १३ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १४ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| १५ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |
| १६ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
४. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
५. डॉ. राजा रिजवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
६. श्री. हरेश इदनानी, उप लेखा परिक्षक
७. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विद्युत
८. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
९. श्री. बाळु नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी
१०. श्री. नंदु समतानी, वरिष्ठ लिपिक, एलबीटी
११. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
१२. श्रीमती निलिमा कदम, कॅशिअर, शिक्षण मंडळ
१३. श्रीमती छाया डांगळे, लिपिक, लेखा विभाग

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

यावेळी श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** सन २०१७—१८ साठी अर्थसंकल्पीय अंदाज सादर करणे.

---

**सभापती, श्रीमती कांचन लुंड:—**मा. आयुक्त महोदयांनी मागील सभेत अर्थसंकल्प सादर केला होता. आयुक्तांनी उत्पन्नाची बाजु ५८६.४५ कोटी व खर्चाची बाजु ५८२.७२ कोटी दाखविले.आम्हांला आशा आहे की आयुक्त महोदय ७१२ कोटी ३२ लख ३० हजार रुपयाचे उत्पन्न वाढवतील व ७११ कोटीपर्यंत खर्च करतील.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**मा. आयुक्तांनी जो अर्थसंकल्प सादर केला होता तो ५८६ कोटीचा होता. आयुक्त महोदय,कर विभागाच्या वसुलीसाठी मेहनत घेत आहेत, त्यांची कार्यप्रणाली पाहुन आम्हांला अंदाज आहे की आयुक्त साहेब, हे अंदाजपत्रक ७१२ कोटी पर्यंत नक्कीच घेवुन जातील. आता काय आहे की १ कोटी ७० लाखाचा फायदयाचा अर्थसंकल्प स्थायी समितीने बनविला आहे. ते मी आपल्यासमोर ठेवत आहे, हा अर्थसंकल्प एक असा अर्थसंकल्प बनविला आहे तर आम्ही असा विभाग न नगरसेवक व न प्रशासनाकडुन डेव्हलप झालेला नाही. जसे औद्योगिक क्षेत्र आहेत की ते डेव्हलप होत नाहीत, काही इंडस्ट्रियल विभाग आहेत तेथे चांगली वसुली होवु शकते परंतु तेथे विकासकाच्याबाबत कोणी विचार करत नाहीत. मा. सभापती महोदयांनी यावर लक्ष दिले आहे. त्यांनी सांगितले की कर विभागाची वसुली ६२ कोटी चा जो अंदाज आहे तो ६२.५० कोटीपर्यंत, सर्वसाधारण कर, पथकर,शिक्षणकर, उपकर, बांधकाम परवाना, साफसफाई कर असे विविध कर मिळुन ६२.५० कोटीपर्यंत वसुली करु. ज्या मालमत्ता महापालिकेच्या अशाच पडुन आहेत त्यांचा जर विनियोग केला तर १० कोटीचा महापालिकेस लाभ होईल. पाणी बिलामध्ये १५ कोटी जो आयुक्तांचा अंदाज आहे त्यापेक्षा अधिक वसुली करु. व अमृत योजनेचा जो अनुदान आहे तो मिळुन जवळजवळ १ कोटी ६८ लाख व दुसरे १८ कोटी ८६ लाख,आम्हांला अंदाज आहे किती पैसे येणार ते आम्ही दाखविले आहेत. रोजगार हमी कर, पाणी पुरवठा लाभ कर हे सर्व मिळुन १०.५० कोटी आपणांस मिळणार आहे. वाहनतळसाठी ५ कोटीपर्यंत येण्याचा अंदाज आहे. हे सर्व मिळुन स्थायी समितीने ७१२ कोटी ३२ लाख्वा ३० हजाराची वसुली केली आहे, आपणांस आणखीन देखील अंदाज आहे की आपण ८०० कोटीपर्यंत जाण्याची शक्यता आहे. आता आम्ही ७१२ कोटीचा अंदाज ठेवला आहे. जर आपण ८०० कोटीचा पण टार्गेट ठेवणार, आपणाकडे कर अॅसेसमेंट व कर वसुली जर चांगली आली तर ८०० कोटीपर्यंत जावु शकतो. याप्रकारे आमच्या सभापती महोदयांनी प्रभाग समिती सभापती, विशेष समिती सभापती, संविधानीक पदावर बसलेले महापौर, उप—महापौर, स्थायी समिती सभापती यांच्यासाठी विशेष निधी ठेवला आहे. नगरसेवकांसाठी सुध्दा, मागील २ वर्षापासुन नगरसेवकांनी विकासाचे कार्य प्रभागात केलेले नाहीत त्यात सुध्दा निधीमध्ये चांगल्याप्रकारे वाढ केलेली आहे. आणखीन दुसरी गोष्ट म्हणजे सभापती महोदयांनी आणखी काही वाढ केलेली आहे ते मी आपणांस सांगतो, प्रभाग क्षेत्राच्या मुलभुत सुविधांसाठी १ कोटी ४२ लाख अशा चारही प्रभाग समितीत वाढ केली आहे. महापौर निधी ठेवण्यात आलेला नव्हता तो ५ कोटी केला आहे. उप—महापौर निधी ५ कोटी,स्थायी समिती सभापती निधी ५ कोटी केला आहे. जो नगरसेवक निधी होता तो ४ कोटी १३ लाखाने वाढविला म्हणजे प्रत्येक नगरसेवकास १० लाखाचा निधी, दुर्बल घटकात ३ कोटी ३६ लाख, नविन रस्ते जे आयुक्त महोदयांनी ठेवले आहेत त्यात ९.५० कोटीची वाढ केलेली आहे. डांबरीकरणाचे जे रस्ते आहेत त्यात ४.५० कोटी, स्थायी समिती सदस्यांसाठी आम्ही एक एक कोटी असे १६ कोटी, अशा प्रकारे सभापती महोदयांनी ठेवले आहे. सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता यांच्यासाठी ५—५ कोटी, प्रभाग समिती सभापतींसाठी १—१ कोटी असे ४ कोटी, ९ विशेष समिती सभापती यांच्यासाठी १—१ कोटी प्रमाणे ९ कोटी वाढ केली आहे. संपुर्ण शहरात जे वेलकम गेट आहे, समाज मंदिर, यात्री निवास, स्पोर्ट कॉम्पलेक्स यांच्या दुरुस्ती व नविन बनविण्यासाठी आम्ही ७५ लाख रुपये दाखविले आहे. समाज मंदिर, यात्री निवास, स्पोर्ट कॉम्पलेक्स यामध्ये आणखी २ कोटी ठेवले आहेत त्यांचे नुतनीकरण करणेसाठी. पुतळे, स्मारक व राष्ट्रीय ध्वज हे सर्व बनविण्यासाठी आपण २ कोटी ७० लाखाचा निधी ठेवला आहे. गलिच्छ वस्तीसाठी १ कोटी रुपये व दुर्बलघटकासाठी १ कोटी रुपये जे आयुक्त महोदयांनी आकडे दाखविले त्यापेक्षा जास्त १ — १ कोटी आम्ही वाढविले आहेत. नाला व गटरची सफाई याबाबत नगरसेवक त्रस्त होतात की १०—१० लोक सफाईसाठी मिळणे कठिण असते, आम्ही यामध्ये दिड कोटी वाढविले आहे जेणेकरुन आम्हां प्रत्येक नगरसेवकांना वर्षातुन तीन वेळा व पावसाळयापुर्वी, होळीपुर्व व वर्षाच्या शेवटी अशा तीन वेळा सफाई कामगार दिड कोटी अधिक वाढविले आहे. आणि कचरा कुंडी, मुख्य म्हणजे स्वच्छ भारत अभियान यामध्ये सुका कचरा व ओला कचरा सेग्रिकेशन करण्यासाठी दोन—दोन कुंडया एक ग्रीन व एक ब्ल्यु कलरची दिड लाख लोकांना उपलब्ध करुन देणार व सहा कोटीचा जो निधी ठेवला आहे तो आणि सुका व ओला कचरा कशाप्रकारे संपृष्टात आणणार तर

त्यासाठी जे डंम्पींग ग्रांउड आहे त्यास कशाप्रकारे आपण संपृष्टात आणणार त्यासाठी एक कोटी खर्च ठेवला आहे. मार्केटमध्ये कशाप्रकारे रस्त्याची निर्मिती करणार त्यासाठी एक कोटी, कब्रस्तान व शमशानभुमी बनविण्यासाठी त्याच निधी वेगळा ठेवला आहे. जेणेकरुन डेव्हलप मेंट प्लान आल्यानंतर कब्रस्तानसाठी ५० लाख खर्च करु शकु. क्रिडासाठी आम्ही ५० लाखाचा निधी ठेवला आहे. क्रिकेट कबड्डी किंवा अन्य कोणते टुर्नामेंट महाराष्ट्रात व संपुर्ण शहरात असेल तर त्यावर आपण खर्च करु शकु. आयुक्त साहेबांनी २५ कोटी निधी ठेवला असून त्यास कमी करुन आमच्या सभापती महोदयांनी १५ कोटी ठेवला आहे. तसेच स्टेशन विभाग जो आहे, उल्हासस्टेशन, विठ्ठलवाडी स्टेशन, शहाड स्टेशन या विभागातील आजुबाजुच्या परिसरातील सुशोभिकरण, विकास व गार्डन बनविण्यासाठी, लोकांना बसण्यासाठी प्रत्येक स्टेशनवर १ –१ कोटीचा निधी ठेवला आहे. महापौर व आयुक्तांच्या निवासासाठी जो ब–याच वर्षापासुन बनला नाही तर त्यासाठी दिड दिड कोटी ठेवले आहे, असे ३ कोटी दोन्हींसाठी ठेवले आहे. संपुर्ण शहरात पे ॲण्ड पार्कची समस्या आहे. वाहनतळ बनविण्यासाठी १ कोटी वाढीव दाखविले आहे, महापालिका इमारतीसाठी सुध्दा आम्ही वाढीव रक्कम ठेवली आहे. तसेच हजेरी शेड तुटलेले आहे, त्यांना दुरुस्त करायचे आहे तसेच ते बायोमेट्रिक करायचे आहे. त्यास लाख रुपये ठेवले आहेत. तसेच अन्य अनेक जे खर्च आहेत त्याचा आम्ही येथे उल्लेख केलेला नाही तो पुढे करु. नाला दुरुस्ती करण्यासाठी आयुक्त महोदयांनी जो निधी ठेवला आहे जेणेकरुन पावसाळयापुर्वी जेवढे काही नाले असतील ते चांगल्याप्रकारे बनु शकतील. शहरातील पाणी निघुन जाण्यासाठी आयुक्त महोदंयानी जो निधी ठेवला आहे त्यात दिड कोटी रुपये वाढविले आहेत. शहरातील सार्वजनिक शौचालय, एमएमआरडीएचे जे शौचालय आहे लोकांना चांगल्या सुविधा देण्यासाठी,त्याची रंगरंगोटी करण्यासाठी एक कोटी रुपये वाढीव खर्च ठेवला आहे. दुर्बल घटकांसाठी नाला, युनिनार बनविण्यासाठी यासाठी दिड कोटी निधी वाढीव ठेवण्यात आलेला आहे. तसेच आपल्या डंम्पीं ग्राउंडवर एवढा मोठा कच–याचा ढिग पहाडासारखा आहे त्या कच–यावर प्रक्रिया करण्यासाठी राणा ट्रेडिंग मार्फत करण्यासाठी आयुक्तांनी जो निधी ठेवला आहे त्यापेक्षा दिड कोटी निधी ठेवण्यात आलेला आहे, जेणेकरुन संपुर्ण कचरा संपुष्टात आणण्यात येईल. तसेच विकास आराखडयात जो ट्रक टर्मिनल येणार त्यासाठी आम्ही ५० लाख रुपये ठेवले आहेत, त्यास सुध्दा डेव्हलप केले जाईल. याप्रकारे ७११ करोड, १४ लाख ९४ हजार सभापती महोदयांनी अर्थसंकल्प बनविला आहे, तो फारच सुंदर अर्थसंकल्प आहे. तसेच स्वच्छ शहरासाठी, हरीत शहरासाठी, सर्व गार्डन डेव्हलप होण्यासाठी, हरीत उल्हासनगर शहरासाठी, सर्वीकडे झाडे लावण्यासाठी निधी ठेवला आहे. त्यात सपना गार्डन, नाना नानी गार्डन, पुष्पवन गार्डन, नेताजी गार्डन, गोलमैदान, यात्री निवास गार्डन, उल्हासनगर १, पोलिस स्टेशन येथिल गार्डन तसेच इतर काही असतील या सर्वांना आम्ही विकसित करणार. शासन व केंद्र शासनातर्फे जो निधी आहे तो सुध्दा आपण खर्च करणार. त्यापेक्षाही जास्त गार्डन डेव्हलप मेंटसाठी आपणाकडे निधी आहे. तसेच येथे ब–याचशा गोष्टींचा उल्लेख करण्यात आलेला आहे, राणा ट्रेडिंग सपाटीकरण, आयुक्त, महापौर निवास, बायोमेट्रीक हजेरी शेड, या सर्व गोष्टी पाहुन हा फारच सुंदर असा अर्थसंकल्प आहे, यामध्ये ब–याचशा गोष्टी करणे आवश्यक आहे. यामध्ये आपण मराठी, सिंधी, हिंदी नाटय करण्यासाठी निधीची तरतुद ठेवली आहे. कमला नेहरु नगर येथे उत्तर भारतीय भवन बनविण्यासाठी १ कोटी रुपयाची तरतुद केलेली आहे. मिनाताई ठाकरे नगर, शांतीनगर उल्हासनगर–३ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बनविण्यासाठी १ कोटीची तरतुद, सम्राट अशोक नगर, सिध्दार्थ बालवाडी जवळ मा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक बनविण्यासाठी १ कोटीची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. कैलास कॉलनी येथे भारतीय राष्ट्रीय ध्वज बनविण्यासाठी दोन जागी आपण ६० लाख रुपये, गोल मैदान येथे मुख्य प्रवेशद्वार डेव्हलप करण्यासाठी आम्ही अर्थसंकल्पात तरतुद ठेवली आहे. अशा प्रकारे फारच सुंदर असा अर्थसंकल्प तयार करण्यात आलेला आहे. तसेच आपणाकडुन आणखीन काही सूचना असतील त्याचा सुध्दा येथे समावेश केला जाईल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>मा. सभापती महोदय, आयुक्त साहेब, मागील वर्षाचे उत्पन्न आपले ४२८ कोटीचे होते. यावर्षी तुम्ही ५८६ कोटी दाखविले आहे. १२५ कोटीचा गॅप आहे. मागील वर्षी १५–१६ चे ३२१ कोटी होते, खर्च ९५ कोटी झाले होते. असे होत असेल तर आम्ही टाळया वाजविणार, शहरातील विकास होणार, पुढील वर्षी आपणांस काम करण्याची आवश्यकताच नाही. मागील वर्षी आमचे नगरसेवक निधी काहीच दिलेला नाही. १५७ कोटी ठेवले तर मागील वर्षी का नाही देण्यात आले? मागील दोन वर्ष विकास थांबवुन ठेवला. १५७ कोटी वाटलेले असतील.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>गेल्यावर्षीचे उत्पन्न जे होते ते ४२८ कोटी आणि जे अपेक्षित उत्पन्न ठरलेले होते त्याची वसुली झालेली नाही, त्याचे कारण असे आहे की, आपल्या विकास आराखडयानुसार आम्ही अपेक्षित केले होते की दरवर्षी ५० कोटी वाढतील. परंतु अदयापपर्यंत आपला विकास आराखडा मंजुर झालेला नाही. आणि नगररचनाकार सुध्दा आपणाकडे कायम स्वरुपात नाहीत. त्यामुळे जवळपास आपणाकडे काहीच उत्पन्न आलेले नाही.

<u>**सदस्य श्री. धनंजय बोडारे:-**</u>विकास आराखडा व नगररचनाकार हे गेल्या चार वर्षापासुन कधीच कायम स्वरुपात नाहीत. श्री. इदनानी साहेब, हाच विचार करुन १५७ बनणार आहे का? एकदा आम्ही व श्री. लाल पंजाबी यांनी म्हटले होते दशा व दिशा, उल्हासनगर शहराची दशा काय आणि दिशा काय आहे, जर योग्य दिशेस जायचे असेल तर त्यासाठी प्रत्यक्ष पाहिजे, प्रत्यक्ष असेल तर सांगा, तर आपण जे वाढविले त्यात आम्ही आणखी वाढवु. फक्त टाकुन चालणार नाही.

<u>**सदस्य श्री. राजेश वदारिया :-**</u>मा. आयुक्त महोदयांना तेवढा अंदाज आहे.

<u>**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-**</u>५८६ चे उत्पन्न करणार, आयुक्त महोदय जेव्हा अर्थसंकल्प देतात, तर तेवढी तर क्षमता असली पाहिजे की आपण वसुली करुन ५८६ पर्यंत वाढ करेल. तर मामुली ६५ कोटीची आपण वाढ केलेली आहे.

<u>**सदस्य श्री. धनंजय बोडारे:-**</u>अर्थसंकल्प हा अंदाजपत्रक आहे आपण अर्थ ईसंकल्प नाही बनवत.

<u>**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-**</u>कराची वसुली आणखी १०० कोटी तर वाढवु.

<u>**सदस्य श्री. धनंजय बोडारे :-**</u>मी आपल्या अर्थसंकल्पावर येत नाही, जर प्रशासनाकडे एवढे स्त्रोत असेल तर मागील वर्षी नगरसेवक निधी का रोखुन ठेवला होता. २ वर्षापासुन प्रभाग समितीचा सुध्दा निधी देण्यात आलेला नाही. १५७ चा कोटेशनल आहे, १५७ आहे ना? आमचा नगरसेवक निधी किती होता? २४ कोटी आहे कमीत कमी, संपुर्ण वर्षभर. मागील वर्षाच्या अंदाजावरच काम केले जाते. अदयाप नगरसेवकांना एक पैसा दिलेला नाही. जर तुम्ही प्रशासनानेच कबुल केले की मागच्या वर्षी १५७ कोटी उरले तर आम्हांला का नाही दिले? सरळ आहे, एकतर मागील वर्षी खोटे बोलत होते किंवा आता खोटे आहे. मागील वर्ष नगरसेवक निधी, सभासद निधी एक रुपये सुध्दा भेटलेले नाहीत. आता आयुक्त साहेब स्वत: म्हणतात की १५७ कोटी आपले वाढु शकते किंवा वाढणार, म्हणजे पैसे असतांना सुध्दा आम्हांला निधी मिळत नाही.

<u>**सदस्य श्री. राजेश वदारिया :-**</u> मागील वर्षी ४७० कोटी वसुली केली.

<u>**सदस्य श्री. धनंजय बोडारे:-**</u>नगरसेवक निधी मिळाला काय?

<u>**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-**</u>४७० कोटी रुपये वसुलीही झाली आहे व खर्च सुध्दा झाले आहे.

<u>**सदस्य श्री. धनंजय बोडारे:-**</u>आम्हांला नगरसेवक निधी का नाही दिला? येथे काय कबुल केले प्रशासनाने?

<u>**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-**</u>मागील वर्षी ४७० कोटी या वर्षाचा ५४७ कोटी आहे.

<u>**सदस्य श्री. धनंजय बोडारे:-**</u>आता प्रशासनाने काय उत्पन्न दाखविले आपले?

<u>**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी**</u>:-कराचे पैसे लोकांकडे ब-याच वर्षापासुन प्रलंबित आहे. यावेळी टार्गेट ठेवला आहे की सर्वच्या सर्व वसुली करणार.

<u>**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-**</u>नाही, नाही, सभागृहनेताजी, आपले म्हणणे बरोबर आहे. प्रत्येक वेळी असे होते आयुक्त साहेब आपणासमोर जो अर्थसंकल्प मांडतात तो प्रत्यक्ष असतो, यावेळी आयुक्त महोदयांनी वाढवुन पाठविला आहे. मराठीत म्हणतात फुगवुन पाठविले आहे. आयुक्त महोदय,अर्थसंकल्प फुगवुन पाठवित आहेत.

<u>**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-**</u>ती तर आयुक्तांची जबाबदारी आहे. ते देतात तर आम्ही कमीत कमी तेवढी तरी वसुली वाढवु शकतो.

<u>**सदस्य श्री. धनंजय बोडार:-**</u>नंतर हे होता कामा नये की पैसे नाहीत. जसे मागील वेळेस झाले.

सदस्य श्री. भारत राजवानी:—मागील सभेत ३० कोटी डबल दाखविण्यात आले. काहींची डबल डबल एन्ट्री आहे ती आणखीन कमी होईल.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—यावेळी कराची वसुली आणखी कमी होणार आहे. मागील वर्षी कर वसुली जी झाली त्याचे एक कारण होते ते म्हणजे नोटबंदी झाली होती. तर जुन्या नोटा लोक आपल्या येथे येवुन भरत होते. नोटबंदीमुळे कराची वसुली झाली होती.

सदस्य श्री. भारत राजवानी:—आयुक्त महोदय मागील वेळेस ३० कोटी रुपये डबल दाखविले होते, ज्यांची डबल एन्ट्री आहे ती वजावट केली पाहिजे. ती झाली नाही, ती दाखविण्यात आलेली आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—आपण ३० कोटी बोलत आहात ना तर आपण ७५ कोटी सोडले आहेत.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—मला फक्त छोटे प्रश्न विचारायचे आहेत. आमच्या निधीमध्ये तुम्ही कपात केली. अधिका—यांनी आपल्या पगारात कपात केली का कोणी?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—नाही केली.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—का नाही केली? शहराच्या नागरीकांकडुन तुम्ही कर वसुली करतात. आणि आमचा निधी तुम्ही दिलेला नाही. का तुम्ही कपात केली पैसे नाही म्हणुन? आणि आता तुम्ही सांगता १५७ कोटी तुम्ही प्रशासनाने जास्त दिले. तर हे पैसे घेणार कोठुन तुम्ही,मागचा आमचा निधी दिला नाही तो आधी देणार की नंतर, त्याचा सुध्दा खुलासा करा. कायदयाने १०५ नुसार तुम्हांला मागील अर्थसंकल्प सुध्दा दयाचा आहे. खुलासा आपण कराल तर, आयुक्त स्वत: पाहिजे होते. माझी सभापती महोदयांना विनंती आहे की ही सभा तहकुब करा.

महापालिका सचिव:—एकदा सभा तहकुब केली परत दुस—यांदा होत नाही.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—तहकुब कोठे केली सभा? आपण वेळ फक्त वाढवीली ना तहकुब कोठे केली? आपण आजच्या आज करु.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—आपणच केली ना ४ वाजता ५ वाजेपर्यंत, १ तासासाठी सभा तहकुबच केली ना.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—वेळ वाढविला ना तहकुब कोठे केली? उत्तर देण्यासाठी आयुक्त नाहीत, तर मग आम्ही कसा निर्णय घेणार? आम्ही जो अर्थसंकल्प दिला तो मी मान्य कसा करणार?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—हे पहा, पावसाळयापुर्वी शेतकरी शेतात बी टाकतात. त्यात अंदाज असतो की पाऊस पडणार. जर तो विचार करणार की पाऊस पडेल की नाही पडेल, मी बी नाही टाकणार तर मग शेती कोठुन होणार. बी तर टाका तरच शेती होईल.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—हे बीज नाही, जे प्रत्यक्षात उत्पन्न येईल, वसुलीचे आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—जुने शिल्लक व प्रत्येक वर्षाची जी वसुली आहे त्यात जेवढे होते त्यात ७५ कोटी आपण ....

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—श्री. जमनुजी आम्ही प्रशासनाकडुन उत्तर मागत आहे, तुम्ही का उत्तर देता? आपण शांत बसा ना.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—आपणाकडे १७—१८ ची जी मागणी आहे, मालमत्ता कराची ती आहे ३४५ कोटीची. तर त्या ३४५ कोटीपैकी ब—यापैकी रक्कम वसुल होवु शकते. गेल्यावर्षी आपण हे पहा पहिल्याच वर्षी चांगली वसुली केली ९० कोटी ५६ लाख रुपये. त्या आधी मालमत्ता कराची रक्कम कधीच ७ कोटीच्यावर गेलेली नाही. नोटबंदीचे आम्ही आकडेवारी काढली

तर त्यात फक्त ८ कोटी रुपये नोटबंदीमुळे वाढलेली आहे. मागील डेटा जर आपण पाहिला तर ८ कोटीपेक्षा जास्त वाढलेले नाही.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—हुयमनमध्ये आपण कमी ठेवले आहे. दलित वस्ती व दुर्बल घटकात १६० च्या वर जर ५ टक्के आहे तर आपण ११ टक्के ठेवले आहे.

श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :—कारण ते खर्च नाही करत जर आपणांस वाढवायचे असेल तर वाढवा.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—ते कंम्पल्सरी आहे आपण खर्च सुध्दा करतो.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—ते कंम्पल्सरी आहे, हा बजेटच बरोबर आणलेला नाही. १५० चे ५० टक्के त्या हिशोबाने वाढविले आहे का?

श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :—१५ टक्के ठेवायचे आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—नेट बजेट किती आहे?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—७११ कोटी.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—त्यात नेट उत्पन्न किती? टक्केवारीप्रमाणे आहे का?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—टक्केवारीप्रमाणे ठेवले आहे बरोबर.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—टक्केवारीने वाढविले आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—आधी खर्च करायचा मग उत्पन्न वाढवाचे.

श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :—१९०—१९० च्या आसपास आहे. मी आपणांस स्टेटमेंट देतो ते तयार आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—सर्व बरोबर ठेवले आहे.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—असे पण बजेट बनविण्याची जबाबदारी आपली आहे, त्यात काय ठेवायचे आहे, काय नाही. चुकीचे झाले तरी त्यास जबाबदार आपणच आहात. जाणुनबुजुन केले असेल तर ते सुध्दा चुकीचे आहे.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—कंम्पलसरी खर्च आपणांस ५ टक्के ठेवावेच लागतात. महिला बालकल्याणला ५ टक्के ठेवावे लागतात, दुर्बल घटकाला १५ टक्के ठेवावे लागतात. ती कमी जास्त असेल तर १०० टक्के ठेवले जातात कमी नाही होत.

सदस्य श्री.. धनंजय बोडारे :—यांनी आपली आकडेवारी जुळवाजुळव केली व झाले, झाले झाले असे म्हणतात. हे सांगा नेट इनकम किती होत आहे, त्याचे ५० टक्के किती होत आहे. ७१२ वजा ५७५ किती टक्के ठेवावे लागेल.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—कायदेशीर ठेवावीच लागेल आपणांस.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—ठेवली आहे का?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—ठेवली आहे, दाखवितो तुम्हांला.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—बरोबर ठेवले आहे ना?

श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :—देतो, महिला व बालकल्याणसाठी ५० लाख कमी पडेल. १ कोटीच्या आसपास वाढवावे लागेल.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—बरोबर आहे, ७५ लाख वाढवावे लागेल. घेतले आहे ना, १.७५, ८० च्या आत आहे.

श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :—होय, ते मी आपणांस सांगतो.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—७ वा वेतनाचे ठेवले आहे का?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—७११ मध्ये वाढविले नाही. यात कसे वाढणार?

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—यात जर वाढले तर कसे करणार?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—यात काय केले फक्त निधी वाढविला आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—खर्च नाही होणार परंतु नाही दाखविला तर चालते काय?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :— ५ टक्के आहे खर्च पण केला पाहिजे. आमदाराच्या समित्या आहेत आणि ते विचारत असतात ५ टक्के खर्च झाला काय? दलित वस्तीमध्ये १५ टक्के केले आहे. २५ टक्के साफसफाईवर तो सुध्दा कंम्पल्सरी केला आहे.

श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :—५ कोटीच्या जागी ५ कोटी ९९६ म्हणजे ९४ हजार वाढविले आहे. खर्च होत नाही.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:— उल्हासनगर महानगरपालिका दुर्बल घटकात नेट इनकम १५ कोटी ६६ दाखविले आहे. ५२० च्या वर आहे. ५७० लिहिले आहे.

श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :—१७ कोटी ठेवायचे आहे २४ कोटी ठेवले आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—११८ कोटी होणार जे आपण वाढविले आहे.

श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :— निव्वळ उत्पन्न त्यात आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—तर १५ कोटीच्यावर ५० कोटी आपणास ठेवायचे आहे.

श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :—मी देतो चार्ट.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—११८ कोटीच्या वर ५० टक्के ठेवायचे आहे.

श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :—मी देतो चार्ट.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—१५ कोटीच्यावर ११ कोटी ५० टक्के येतो काय?

श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :—होय.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—जास्त तर ठेवु शकतो ना? कमी नाही ठेवु शकत ना.

श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :—तर जास्त ठेवले आहे ना. २ कोटी ३४ लाख करायवयाची तरतुद आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—आपण त्यात काय काय घेतले, स्कुल बोर्ड, एमआयडीसी इत्यादीचे चार्जेस.

श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :—१५ कोटीचे ५० टक्के.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—१५ कोटी?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—१५ कोटी ६६ लाख नेट त्याचे २० टक्के दुर्बल घटकाचे.

श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :—ते वजा केलेल्या ५८२ तुन ग्रंड आपणास उत्पन्न नाही, डिपॉझिट आणि त्यातुन बांधील खर्च वजा करता.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—म्हणजे आपणाकडे पीडब्ल्युडी बाकी सर्व कामे करण्यासाठी १५ कोटी.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—आयुक्त महोदयांनीच दाखविले होते की, आम्ही १५ कोटी खर्च करु.

श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :—१५ च्या वर आपणांस २ कोटी आम्ही ठेवले ११ कोटी ते होतात.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—तुम्ही काही पण करा, यामध्ये गडबड आहे. स्कुलबोर्डचे आपण लिहिले आहे ५३८ ते आपले आहे का? १५ च्या वर ५० टक्के. ११ कोटी येणारच नाही.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—म्हणजे लवकरच अजुन दिल्यावर १ कोटी वाढतात.

सदस्य श्री. दिपक सिरवानी :—जास्तीत जास्त २० टक्के.

श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :—१ कोटी वाढवितो.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मी सांगतो आपणांस यांनी जो आकडा दाखविला आहे ना तो १५ आणि २० टक्केप्रमाणे नाही दाखविला आहे. दुर्बल घटकात ११ कोटी खर्च दाखविला होता. २० टक्केने नव्हता. २० टक्के कमीत कमी घ्यायचे जास्त कितीही घेवु शकतात. आपण ११८ कोटीचे २० टक्के घेतलेले आहे. ११८ कोटीचे २० टक्के किती होते तर २४ कोटी आपण ठेवले आहे दुर्बल घटकासाठी व ११८ कोटीचे ५ टक्के महिला बालकल्याणसाठी ते ५ कोटी ८० लाख होतात. १ कोटी जे उरले आहे ते आपण महिला बालकल्याणसाठी वाढवित आहोत. तर आमचा प्रत्यक्ष आकडा होईल.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी: नंतर एक कोटी वाढेल.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—४ कोटी ८० लाख महिला बालकल्याणसाठी होते.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—१५ च्या वर ११ आहे.

श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :—होय होईल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>एकुण किती होईल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>आता आपण ११८ कोटी केले आहे, त्यात वाढविले आहे. आयुक्तांनी जो अर्थसंकल्प दिला आहे त्यात आपले स्वत:चे तर ठेवले आहे ना.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>चुकीचे आहे. टक्केवारीने दिले काय? कमी केले काय?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>कमी नाही करु शकत.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—</u>साहेब, यामध्ये असे आहे की आम्ही फक्त तुमच्यापुढे जमा खर्च सादर करतो. आणि अर्थसंकल्प बनविणेचे काम स्थायी समितीचे व महासभेचे आहे. आम्ही फक्त तुमच्यासमोर जमा व खर्च सादर केलेला आहे. बजेट सादर केलेला नाही.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>परंतु खर्च करतांना तो व्यवस्थित आला पाहिजे ना?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>आमच्याजवळ जे आले आहे त्यास व्यवस्थित आम्ही केले आहे. आयुक्तांचा अंदाज असा होता की दुर्बल घटकात ११ कोटी खर्च करावे लागेल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>श्री. जमनुजी आम्हांस बोलण्यास लावु नका. बरोबर केले काय?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>केले ना. आयुक्त काहीही सांगतील की ११ कोटी दुर्बल घटकात करा.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>आयुक्त असे कसे करतील.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>केले आहे, त्यांची आशा अशी होती की ११ कोटीमध्ये करणार, आम्ही तर २४ कोटी करुन दिले आहे. ११८ कोटी बनवुन त्याचे २० टक्के. हे बरोबर लिहिले आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>जबाबदारी आपली आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>११८ कोटीचे २० टक्के बरोबर लिहिले आहे आपण.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>जर यामध्ये काही चुक असेल तर आपण जबाबदार राहाल.

<u>सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी:—</u>महिला व बालकल्याणमध्ये आपण ५ टक्केच्या हिशोबाने ८० लाख वाढवित आहोत. आपले ७१२ कोटी ३१ लाख उत्पन्न, ७११ कोटी १४ लाख खर्च १ कोटी आपली जी बचत आहे ती महिला व बालकल्याणसाठी आहे. बाकी ते ५ टक्क्याने बरोबर होईल. आयुक्तांनी लक्ष न देता पाठविले आहे आम्ही लक्ष देवुन टाकले आहेम. आमचे कॅल्क्युलेशन बरोबर आहे दुर्बल घटकासाठी ३० कोटी रुपये ११८ कोटीचे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>ठिक आहे, होवुन जाईल आयुक्त साहेब? काम करणे आपले काम आहे. महापौर, उप—महापौर, स्थायी समिती सभापती, प्रभाग समिती निधी आपण ठेवला आहे, तो ५ कोटीचा. प्रत्येक प्रभागात काम झाले पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>करतील की नाही ते नंतर पाहु. परंतु रक्कम तर टाका.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>महापौर उपमहापौर, आयुक्त साहेब, संविधानिक पदावर जे पाचजण बसले आहेत, प्रत्येकाचे कर्तव्य असले पाहिजे की प्रत्येकास निधी मिळाला पाहिजे. एका प्रभागात न देता जास्तीत जास्त प्रभागात दयावे. ते बंधनकारक ठेवावे की जेथे जास्तीत जास्त गरज आहे तेथे निधी दयावा.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>उल्हासनगर महानगरपालिका तीन विधानसभा क्षेत्रात वाटली गेली आहे.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—साहेब, आता जो मुद्दा आपण उपस्थित केला आहे की तुम्ही महासभेत विशेष धोरण अवलंबुन जर आम्हांला प्रशासनाला दिले तर ते शक्य होणार अन्यथा शक्य होणार नाही. शिफारस केल्यानंतर महासभेत तुम्ही असा निर्णय घ्या की कशापध्दतीने निधी खर्च करायचा आहे. सविस्तरपणे दया की कोठे कसे खर्च करायचे आहे. तर ते शक्य होणार अन्यथा ते शक्य होणार नाही.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—सर्वसंमतीने हा विषय पारीत करा.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—सर्वसंमतीने पास करु या परंतु सभापतीच्या महोदयाच्या मान्यतेने आपण जो अर्थसंकल्प वाचला आहे की शिवाजी महाराज स्मारकासाठी हा हा निधी ठेवण्यात आला आहे. आपल्या महापालिकेची तेथे जागा आहे काय? आपण बाबासाहेब आंबेडकरबद्दल बोललात, शिवाजी महाराजाबद्दल बोललात आणि काही गेट बनविण्यासाठी बोललात, १ नंबर कॅम्प येथे गार्डन बनविण्याचे बोललात जागा आहे काय?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—१ नंबर बसस्टॉप जवळ मागील बाजुस, मी कंपाउंड वॉल लावुन, गेट लावुन तयार केले आहे, ते बनले आहे, गार्डनसाठी निधी नव्हता, त्यामुळे डेव्हलप केले नव्हते, ते बनले आहे.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—शिवाजी महाराजांचा पुतळा बनविण्यासाठी बजेटमध्ये तरतुद आहे काय ती तरतुद असली पाहिजे. मागील वर्षीचे या वर्षी सुध्दा झाले पाहिजे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—पुतळा नुतनीकरण यासाठी जी तरतुद आहे त्यात आपण एक वाक्य टाकु या की शिवाजी चौकात घोडयावर शिवाजी महाराजांचा पुतळा बनविण्यासाठी त्यात एक नाव टाकुन देवु या.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—गेल्या वर्षी पाच कोटी ठेवले होते ना, तर आपण त्यातुन वापरु शकतो. यावर्षी ठेवायची काय गरज आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—त्यामध्ये आपले ५० टक्के टाकले पाहिजे.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—गेल्या वर्षी केलेले आहे ना आपण. गरज नाही ना यावर्षी करायची. नियम १०५ नंतर आपण स्थायी समितीत ठेवु शकतो. गेल्या वर्षीचा आपण वापर करु शकतो.

सदस्य श्री. भारत राजवानी:—आयुक्त महोदय, प्रभागाच्या विकासासाठी यावेळी निधी मिळेल की फक्त कागदपत्रांवरच असेल. कारण की दोन वर्षापासुन तर असेच होत आहे. निविदा मागवेपर्यंत सर्व प्राकलने तयार केली होती. ते तसेच प्रलंबित आहेत, तर यावर्षी मिळेल की तसेच होईल. काय पेपरावरच राहिल?

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—वसुली चांगली झाली तर मिळेल ना.

सदस्य श्री. भारत राजवानी:—म्हणजे आपले प्रशासन वसुली नाही करणार तर आम्हांस विकासासाठी काहीच मिळणार नाही.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—साहेब, वसुली करणार ना, चांगली होईल वसुली.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—शहरात राहणारे गरीब लोक जे आहेत त्यांना म्हणतात कर भरा. या शहरात जे बिल्डर लोक आहेत त्यांच्यावर पैसे शिल्लक आहेत, ती वसुली करत नाहीत.

सदस्य श्री. भारत राजवानी:—आम्हांला सांगतात कोणार्क कंपनीवाल्यांना ९ कोटी ७५ लाख रुपये भरण्यास मना केले आहे.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—शहरातील बिल्डरांकडुन २० कोटी येणे बाकी आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मी सांगतो आता आपणांस डेव्हलपमेंटचा फंड व बजेटमध्ये काही बदल नाही झाले आपणांस जे काही नाव दयायचे आहे आम्ही समावेश करणार, जसे येथे ४—५ उदयान आहेत, जीजामाता उदयान, धर्मवीर आनंद दिघे साहेब उदयान, सोनीनी गार्डन विठ्ठलवाडी, बोटक्लब, हिराघाट, शांतीनगर स्मशानभुमी जवळ, तसेच आणखीन काही असेल, बोधराज गार्डन, शोभराज गार्डन, तसेच काही नाव असेल ते आपण दया. अर्थसंकल्पाचा जो विषय असेल तो घेवु या. तर काम होईल, तसेच दुसरे म्हणजे शिवाजी महाराज यांचा पुतळा, शिवाजी चौक येथे पुतळा करण्यासाठी निधी, तसेच मालमत्ता विनियोग, जी आपणाकडे ब—याचशा मालमत्ता आहेत त्यांचा विनियोग करण्यासाठी १० कोटी वाढवत आहोत, ५ कोटीचा निधी शिवाजी महाराज यांच्या पुतळयासाठी असे १५ कोटी ठेवत आहोत. ठिक आहे ना, जो सुधारीत अर्थसंकल्प येईल तो कामात येईल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>१०० कोटीचे काय होते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>एलबीटीमध्ये आपण ५ कोटी वाढवु या.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u> :—एलबीटीचे टार्गेट जास्त ठेवले पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>२० कोटी येणे बाकी आहे. आपण प्लान पास केले आहे. डेव्हलप मेंट चार्जेसचे पैसे येणे बाकी आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>जोपर्यंत शासनाकडुन येत नाही तोपर्यंत नाही होणार, वसुली जर झाली तर आपण सुधारीत अर्थसंकल्पात टाकु या ना.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>त्यांना कशासाठी सुविधा देण्यात आली आहे? लेट भरण्याची त्यांना का एवढी सुविधा देण्यात आलेली आहे? डेव्हलपमेंट चार्जेस जे बिल्डरांकडे प्रलंबित आहे २० कोटी रुपये ते का नाही मिळत.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—</u>२०१६ मध्ये जो शासन निर्णय आला होता, जे प्लान पास केले होते त्यानुसार जो दर होता त्यानुसार सर्व पैसे वसुल केले होते. जे जुने होते ते आपण घेतले आहे, आता शासनाचे जे वाढीव आले आहे ते घेतले नाही, आपण त्या लोकांना नोटिस दिलेली आहे.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>सर्व २० कोटीचा असाच निधी आहे काय?

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—</u> ते २० कोटी नाही १२ कोटी आहे. २० कोटीचे जे आहे ना जे मोनार्च कंपनी आहे ती बंदच आहे. त्यासाठी त्यांचे पकडले नाही. खरे तर १२ कोटी आहेत.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>त्यास सील करा.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>गेट सिल करु नका.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>एलबीटीमध्ये गॅप आहे १५० कोटी गॅप.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—</u>आपण त्यामध्ये जे पकडले टर्नओव्हर ५० कोटीचे आहे त्यानुसार आपणांस उत्पन्न मिळेल. खास करुन रेयॉनचे आहे. त्याचे साधारणत: ५० लाख महिन्याला येते. आणि त्यानंतर शासनाने दारु बंद करायला सांगितले आहे त्याचे दिड कोटी येते. असे करुन ते ११ कोटी धरलेले आहे. मागील जी थकबाकी आहे एलबीटीची त्याचे उप—आयुक्त जे आहेत त्यांनी व्यवस्थित सांगितले असते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>२ कोटी कमी आले आहेत.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>आता सुध्दा चालु आहे असेसमेंट त्यांनी ते भरलेले नाही. २ ते अडीच वर्ष आपणांस ना जकात ना एलबीटी मिळाली, पैसे भरलेले नाहीत जवळ जवळ १५० कोटीचा गॅप आहे. आता वसुल केले पाहिजे ना.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>वसुली सुध्दा हेच करत आहेत व खर्च सुध्दा हेच करत आहेत, त्यांना माहित आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>जेव्हा आपले आयुक्त श्री. बालाजी खतगांवकर होते तेव्हा आम्ही म्हणत होतो जकातीचे व एलबीटीची वसुली येत नाही तर ते म्हणायचे ते कोठे जाईल? ॲसेसमेंटमध्ये होईल, आज नाही तर उदया व्यापा–यांना दयायचेच आहे. २०० कोटी जकात होत होती व ५० कोटी एलबीटी येत होती.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u> कोणाला कंन्स्टल्टंट ठेवले आहे का?

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u> होय ठेवले आहे. या दोन वर्षात आपल्याला फक्त साडेपाच लाख रुपये जमा झालेले आहे. जास्त जमा झालेले नाही त्यामुळे मला नाही वाटत की त्यामध्ये फार पैसे मिळतील.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:– जकात किती होते शासनाचे?</u>

<u>श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी :–</u>११.३२

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>११.३२, तर मग आपले कोणार्कचे किती वसुल होत होते? १८ कोटी, १६ कोटी आपण पकडले होते. आपल्या एलबीटीची वसुली होती ७ कोटी. प्रत्येक महिन्यात व प्रत्येक वर्षात ९० ते ५० कोटी, अडीच वर्षात किती झाले तर २०० कोटीपेक्षा जास्त वसुल झाले आहे. मी ते म्हणत आहे की आपण जर तोडणार तर वसुली नाही होणार. जी रक्कम ठेवली आहे ती नाही होणार खर्च तर कमी करा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>टार्गेट ठेवा. २ कोटी यासाठी करा की ती मालमत्ता पडुन राहणार, भाडयाने नाही जाणार, ८ कोटी कमी करुन आपण एलबीटीमध्ये ५ व ८ असे १३ कोटी वाढवत आहोत. महापालिका मालमत्ता विनियोग ५ कोटी ते १० कोटी

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>किती टक्के हे आपण नमुद ठेवा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>किती ठेवले एलबीटीचे १८ कोटी?

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी</u>:– होय

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>आयुक्त महोदयांनी जे एलबीटीसाठी १८ कोटी ठेवले आहे ते आपण ३३ कोटी करत आहोत. १०० ते १५० कोटी जुने बाकी आहे. १० कोटीचे आपण उद्देश ठेवणार. महापालिका मालमत्ता विनियोगाचे १० कोटी कमी करणार. ठिक आहे?

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u>होय. गेल्या अनेक वर्षापासुन आपणाकडे ॲसेसमेंट झालेले नव्हते. आता नविन ॲसेसमेंट चालु केलेले आहे, आता जवळपास नविन १० ॲसेसमेंट झालेल्या आहेत. १० महिन्याच्या आत तुमचे कुठलेही ॲसेसमेंट राहिलेले नसेल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>योग्य रितीने प्रशासनाने त्याची रिकव्हरी केली तर यावेळी आपण उद्देशापेक्षा जास्त वसुली करणार अशी माझी आशा आहे. यासाठी या ७११ कोटीच्या अर्थसंकल्पास मान्यता देवु या. ठिक आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>इतिवृत्ताची वाट न पाहता महासभेसमोर सादर.

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u>मी सर्व सदस्यांचे आभार मानते सर्वसंमतीने आपण सर्वांनी अर्थसंकल्प पारीत केले, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठी २ कोटी ठेवु या १ कोटी कमी पडणार. सम्राट अशोक नगर, बालवाडी जवळ, समजा तेथे जागा नसेल तर त्याच्या आजुबाजुची जागा शोधुन बनविणार नक्की. शिवाजी महाराज स्मारक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे बनविणार. तसेच नगरसेवकांचे जे पत्र येणार, रस्त्यासाठी किंवा अन्य गोष्टीसाठी तर ते महासभेत समाविष्ट करु. आता येथे करत नाही, आपण सर्व समावेश महासभेत करु.

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १ :—सन २०१७—१८ साठी अर्थसंकल्पीय अंदाज सादर करणे.**

<u>प्रस्तावना</u>

अंदाजपत्रक हे महानगरपालिकेचे वार्षीक बाब आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदीप्रमाणे प्रत्येक वर्षी सर्व प्रथम उत्पन्न व खर्च यांचे अंदाज आयुक्तांनी तयार करावयाचे आहे. सदर अंदाजात अधिनियमाचे विविध कलमान्वये महानगरपालिकेस पार पाडावयाची कार्य व कर्तव्ये तसेच प्राथमिक शिक्षण निधीत घ्यावयाच्या अनुदानाची रक्कम अशा बाबींसंबधी करावय्या लागणा—या खर्चाची तरतुद करणे आवश्यक आहे . तसेच पुढील वर्षात या अधिनियमाच्या तरतुदीन्वये जे कर लादणे आवश्यक असेल अशा कराधाना संबधीच्या प्रस्तावांचे विवरण पत्र व कराधाना पासून मिळणा—या जमा रक्कमांचे अदांज ही सादर करणे आवश्यक आहे . वरील सर्व बाबी लक्षात घेता, प्रत्येक बाबी अंतर्गत अपेक्षित उत्पन्न व अपेक्षित खर्च यांचे वर्गीकरणा सहित अंदाजपत्रक तयार करण्याच्या प्रयोजनासाठी सादर करण्यांत येत आहेत.

सन २०१६—२०१७ चे सुधारीत अंदाज व सन २०१७—२०१८ चे मूळ अंदाजपत्रकासंबधी तपशिल पुढील प्रमाणे.

<u>सन २०१६ — २०१७ चे सुधारीत अंदाजपत्रक :—</u>

सन २०१६—२०१७ साठी एकूण रुपये ७४०.२० कोटी चे मुळ अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले होते . मागील ८ महिन्याचे प्रत्यक्ष उत्पन्न लक्षात घेता, २०१६—२०१७ वर्षासाठी खालीप्रमाणे सुधारीत अंदाज तयार करण्यात आले आहे .

(आकडे हजारात)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ अंदाजपत्रकीय उत्पन्न** | : | **रुपये.** | ३२५३०२५/— | |
| **ब अंदाजपत्रकीय उत्पन्न** | : | **रुपये.** | .... | |
| **क अंदाजपत्रकीय उत्पन्न** | : | **रुपये.** | <u>१०३६१८७/—</u> | <u>४२८९२१२</u> |
| **अ अंदाजपत्रकीय खर्च** | : | **रुपये.** | ३२१४४३५/— | |
| **ब अंदाजपत्रकीय खर्च** | : | **रुपये** | १०००/— | |
| **क अंदाजपत्रकीय खर्च** | : | **रुपये.** | <u>१०३५३०२/—</u> | |

<u>४२५०७३७</u>

प्रत्येक वर्षाप्रमाणे मालमत्ता कर, पाणी पट्टी व अन्य करापोटी अधिक वसुली होईल, महानगरपालिका मालमत्ता विनियोग करण्यात येईल असे गृहित धरुन स्थायी समितीने अंदाज तयार केले होते तथापी त्यानुसार वसुली व विनियोग करण्यात आला नाही. दर वर्षात उत्पन्नाचे अवास्ताविक अंदाज गृहित धरुन विविध लेखाशीर्षातर्गत विविध प्रकल्पासाठी तरतूद करण्यात येते . वर्षा अखेर उत्पन्नाचे अवास्ताविक उद्दिष्टे पार पाडणे शक्य होत नाही परंतु खर्च मात्र पुर्ण करण्यात येतो. काही वर्षापासून सुरु असलेल्या या प्रथेमूळे कर्जाची अदायगी शक्य होत नाही व ठेकेदार व पुरवठादारांचे थकीत देयकांचे प्रमाणही वाढत चालले आहे. ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे कर्मचा—यांच्या पगारात २० ते २५ टक्के वाढ झालेली आहे. मासिक वेतनात शिफारसीप्रमाणे वाढ देण्यात येत आहे. परंतु कर्मचा—यांना २००६ पासूनची थकबाकीचे काही हाप्ते अद्याप अदा करावयाची आहे. जानेवरी २०१६ पासून ७ व्या वित आयोग शिफारशी प्रमाणे वेतन व थकबाकी अदा करावे लागेल. महानगरपालिकेने जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेत पाणी पुरवठा प्रकल्प हाती घेतले असून त्यासाठी महापालिकेने ६३ कोटी कर्जाची एम.एम.आर.डी.ए. या वित्तीय संस्थेकडून उभारणी केलेली आहे त्याची परतफेड पुढील सुरु झाली आहे. महानगरपालिकेने अमृत योजनेत भुयारी गटार, शिल्लक पाणी पुरवठा योजना व बस खरेदी असे तीन नवीन प्रस्ताव सादर केलेले आहेत. त्या करिता महानगरपालिका वर्गणी पोटी नवीन कर्जाची उभारणी एम.एम.आर.डी.ए. या वित्तीय

संस्थेकडून करावयाची आहे. एम.आय.डी.सी. ने दिनांक १/४/२०१३ पासून ७००० ऐवजी ८००० प्रति घन लिटर दर निश्चित केली आहे. एम.आय.डी.सी. ने पाण्याच्या दरात वाढ केल्यामूळे महापालिकेस प्रत्येक वर्षात फक्त पाणी खरेदी पोटी ३५ कोटी रुपये दयावे लागतील. महापालिका सुरूवातीपासूनच खरेदीपेक्षा कमी दराने ग्राहकांना पाणी पुरवठा करीत आहे. त्यामूळे महापालिकेची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे. या सर्व बाबी लक्षात घेता, महापालिकेच्या वित्तीय स्थितीत सुधार होईपर्यंत काही कालावधीसाठी अति आवश्यक कामे वगळता सर्व कामांना पुर्णविराम देणे गरजेचे राहील. सर्व विभागीय स्तरावर प्रलंबीत देयकांचे तपशिल दर्शविणारी यादी सोबत जोडली आहे.

सन २०१७—२०१८ चे मूळ अंदाजपत्रक :—

आर्थिक वर्ष २०१७—२०१८ साठी तयार करण्यात आलेला उत्पन्न व खर्चाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे .

(आकडे हजारात)

| | | |
|---|---|---|
| अ अंदाजपत्रकीय उत्पन्न | : रुपये. | ४७२००००/— |
| ब अंदाजपत्रकीय उत्पन्न | : रुपये. | १६०००/— |
| क अंदाजपत्रकीय उत्पन्न | : रुपये | ११२८४९६/— |
| | | ५८६४४९६ |
| अ अंदाजपत्रकीय खर्च | : रुपये. | ३५६७४१३/— |
| ब अंदाजपत्रकीय खर्च | : रुपये. | २१५००/— |
| क अंदाजपत्रकीय खर्च | : रुपये | २२३८२८१/—५८२७१९४ |

शिक्षण मंडळाचे सन २०१७ — १८ चे मुळ अंदाज :

प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील पार पाडावयाची कार्ये व कर्तव्य लक्षात घेता, उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातर्फे वर्ष २०१७—२०१८ साठी खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .

(आकडे हजारात)

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : ६५६००१/—

अंदाजपत्रकीय खर्च रुपये : ६५५४२५/—

उपरोक्त दर्शविलेल्या एकूण अंदाजात रुपये ११७१०३/— शासकीय अनुदान व रक्कम रु ५३८१२३/— महापालिकेकडून महापालिका वर्गणी म्हणून अपेक्षित करण्यात आले आहे. सबब शिक्षण मंडळाचे सन २०१७—२०१८ चे अंदाजपत्रक स्थायी समिती मान्यतेसाठी प्रस्तावीत करीत आहे.

सन २०१६ — १७ चे सुधारित अंदाज :

शिक्षण मंडळाचे वर्ष २०१६— १७ करिता मुळ अंदाजपत्रकीय तरतुद, जमा व खर्चाच्या प्रत्येक लेखा शिर्षात प्रत्यक्ष झालेले उत्पन्न व खर्च (तक्ता सोबत) तसेच महापालिकेची वित्तिय परिस्थिती लक्षात घेता , शिक्षण मंडळाचे वर्ष २०१६ —२०१७ चे अंदाजपत्रक पुढील प्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्तावित आहे. .

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : ५१०५११/—

अंदाजपत्रकीय खर्च रुपये : ५१०१६१/—

अखेरची शिल्लक रुपये : ३५१/—

उपरोक्त अंदाजापोटी रक्कम रु. ३९९३०१/— महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

परिवहन उपक्रमाचे अंदाज :

**परिवहन उपकमाचे वित्तिय वर्ष 2016—2017 चे उत्पन्न व खर्चाचे सुधारीत व वर्ष 2017—18 चे मूळ अंदाज परिवहन समिती मार्फत पुढील प्रमाणे तयार करण्यात आले आहे.**

(आकडे हजारात)

| अ क | उत्पन्न तपशिल | वर्ष 2016—17 मूळ अंदाज | वर्ष 2016—17 सुधारित अंदाज | वर्ष 2017—18 मूळ अंदाज | अ. क. | खर्च तपशिल | वर्ष 2016—17 मूळ अंदाज | वर्ष 2016—17 सुधारित अंदाज | वर्ष 2017—18 मूळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | परिवहन सेवा उत्पन्न | 2500 | —— | 1000 | 1 | परिवहन सेवा खर्च | 15000 | —— | 1000 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | बस खरेदी अनुदान (अमृत योजना) | 15000 | —— | 15000 | 2 | सभासदांना मानधन, सभा व इतर भत्ते | 1000 | 1000 | 500 |
| | अ अंदाजपत्रकातून वर्ग | 19500 | 1000 | 5500 | 3 | सभासद प्रशिक्षण व प्रवास खर्च | 1000 | —— | —— |
| | | | | | 4 | बस खरेदी | 20000 | —— | 20000 |
| | एकूण | 37000 | 1000 | 21500 | | एकूण | 37000 | 1000 | 21500 |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ९८ च्या तरतुदीप्रमाणे परिवहन उपक्रम अंदाजपत्रक स्थायी समिती मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**<u>वृक्ष प्राधिकरणाचे चे अंदाजपत्रक</u> :**

**नागरी क्षेत्रात झाडांचे संरक्षणासाठी महाराष्ट् (नागरी क्षेत्र) झाडांचे रक्षण व संरक्षण अधिनियम करण्यात आले आहेत. सदर अधिनियमातील तरतूदीनुसार झाडांची लागवड , संरक्षण इत्यादी बाबींसाठी स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करावयाचे आहे. त्यानुषंगाने वर्ष 2016—2017 चे सुधारित व 2017—18 चे मूळ अंदाज वृक्ष प्राधिकरण समिती मार्फत पुढील प्रमाणे तयार करण्यात आले आहे.**

(आकडे हजारात)

| अ.क. | उत्पन्न तपशिल | वर्ष 2016—17 मूळ अंदाज | वर्ष 2016—17 सुधारित अंदाज | वर्ष 2017—18 मूळ अंदाज | अ.क. | खर्च तपशिल | वर्ष 2016—17 मूळ अंदाज | वर्ष 2016—17 सुधारित अंदाज | वर्ष 2017—18 मूळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वृक्ष कर | 8000 | 7500 | 17500 | 1 | उदयाने विभाग पगार | 20513 | 24353 | 19197 |
| 2 | अमृत योजना (बगीचे विकास) अनुदान | —— | —— | 18750 | 2 | नवीन झाडे माती व ट्री गार्डस इ. लावणे | 5000 | 7500 | 1000 |
| 3 | वृक्ष तोडण्यासाठी अनामत रक्कम | 100 | 50 | 100 | 3 | वृक्ष गणना | 2500 | —— | 2500 |
| 4 | अ अंदाजपत्रकातून वर्ग करावयाची रक्कम | 95513 | 72803 | 62947 | 4 | नर्सरीची निगा व विकास | 500 | 500 | 500 |
| | | | | | 5 | झाडे व रोपांचे प्रदर्शन | 500 | —— | 500 |
| | | | | | 6 | उदयाने निगा व दुरुस्ती | 30000 | 20000 | 40000 |
| | | | | | 7 | नवीन उदयाने | 30000 | 25000 | 7500 |
| | | | | | 8 | सपना,दशहरा, गोलमैदान, रोटरी, नेताजी, जिजामाता, स्वामी बोधराज व मनपा (मु) उदयान संवर्धन (प्रत्येकी 5 लाख) | 13000 | 3000 | —— |
| | | | | | 9 | प्रशिक्षण व अभ्यास दौरा | 500 | —— | 500 |
| | | | | | 10 | वृक्ष तोडण्यासाठी अनामत रक्कम परतावा | 100 | —— | 100 |
| | | | | | 11 | वृक्ष तोडणे | 1000 | —— | 2500 |
| | | | | | 12 | अमृत योजना (बगीचे विकास) | — | — | 25000 |
| | एकूण | 103613 | 80353 | 99297 | | एकूण | 103613 | 80353 | 99297 |

**सबब अधिनियमाचे कलम 16 नुसार वर्ष 2016—17 चे सुधारित व 2017—18 चे मूळ अंदाजपत्रक स्थायी समिती मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.**

**शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक, परिवहन उपकमाचे अंदाजपत्रक , वृक्ष प्राधिकरणाचे चे अंदाजपत्रक , आयुक्तांचे महापालिकेसाठी सन 2016–17 चे सुधारीत अंदाजपत्रक व सन 2017–18 चे जमा व खर्चाचे अंदाज, कर व दरवाढी इत्यादी प्रस्ताव तसेच प्रशासनाकडून इतर माहिती घेवून अधिनियमाचे कलम 96 नुसार अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यासाठी प्रस्तावीत.**

**स्थायी समिति ठराव कमांक : 08 दिनांक 03/07/2017**

**सुचकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी**

**अनुमोदकाचे नाव : श्री. दिपक सिरवानी**

ही स्थायी समिति शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक , परिवहन उपक्रमाचे अंदाजपत्रक, वृक्ष प्राधिकरणाचे अंदाजपत्रक, आयुक्तांचे महापालिकेसाठी सन २०१६—२०१७ चे सुधारित अंदाजपत्रक, आयुक्तांचे सन २०१७—१८ चे जमा व खर्चाचे अंदाज वर्ष २०१५—२०१६ चे लेखा विवरण पत्र , अर्थसहाय देवून पुरविण्यात येणा—या सेवांचा तपशिल तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९६ मधील सर्व तरतूदी व सभेत चर्चेअंती सुचविलेला फेरफार विचारात घेवून खालील प्रमाणे शिफारस करीत आहे.

१) मालमत्ता कर पाणी पट्टी व इतर करांचे दर : मालमत्ता कर , पाणी पट्टी व इतर करांचे प्रचलीत दर कायम ठेवण्यात येत आहे.

२) वर्ष २०१५—१६ मध्ये अर्थसहाय देवून पुरविण्यात येणा—या सेवांबाबतचा तपशिल विचारात घेवून महापालिकेच्या इतर उपलब्ध निधीतून अर्थसहाय कायम ठेवण्यास शिफारस करण्यात येत आहे . साफसफाई व घनकचरा व्यवस्थापनासाठी देण्यात येणारे अर्थसहाय स्थानिक संस्था कर व मालमत्ता करातील सामान्य कर या दोन्ही उत्पन्नाच्या बाबीतून वर्ग करण्यात यावे .

३) वर्ष २०१५—१६ चे लेखा विवरण पत्र , कर्ज विवरण पत्र, विविध खात्यात जमा रक्कम, आयुक्तांचे वित्तीय परिस्थिती बाबत अभिप्राय, इतर विवरण पत्र, प्रलंबीत कामे व देयकांच्या माहितीची नोंद घेण्यात येत आहे. प्रलंबित कामे लवकरात लवकर पुर्ण करून विकास कामाना गती देण्यात यावी.

<u>शिक्षण मंडळाचे सन २०१७—१८ चे मूळ अंदाजपत्रक</u> :

शिक्षण मंडळाचे वर्ष २०१७—१८ करिता मूळ अंदाजपत्रकीय तरतूद , मागील वर्षात प्रत्येक लेखा शिर्षात प्रत्यक्ष झालेले उत्पन्न व खर्च तसेच महापालिकेची वित्तीय परिस्थिती लक्षात घेता , पुढील प्रमाणे मंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : ६५६००१/—

अंदाजपत्रकीय खर्च रुपये : ६५५४२५/—

उपरोक्त दर्शविलेल्या एकूण अंदाजात रुपये ११७१०३/— शासकीय अनुदान व रक्कम रु ५३८१२३/— महापालिकेकडून महापालिका वर्गणी म्हणून मंजूर करण्यास शिफारस येत आहे.

## <u>शिक्षण मंडळाचे सन २०१६-१७ चे सुधारित अंदाजपत्रक</u> :

शिक्षण मंडळाचे वर्ष २०१६-१७ करिता मूळ अंदाजपत्रकीय तरतूद , जमा व खर्चाच्या प्रत्येक लेखा शीर्षात प्रत्यक्ष झालेले उत्पन्न व खर्च तसेच महापालिकेची वित्तीय परिस्थिती लक्षात घेता , पुढील प्रमाणे मंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे व वर्ष २०१६-१७ करिता रक्कम रुपये ३९९३०१/- महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : ५१०५११/—

अंदाजपत्रकीय खर्च रुपये : ५१०१६१/—

अखेरची शिल्लक रुपये : ३५१/—

<u>परिवहन उपक्रमाचे अंदाजपत्रक</u> :

परिवहन उपक्रमाचे वित्तिय वर्ष २०१५-२०१६ चे सुधारित व वर्ष २०१६-१७ चे मूळ अंदाजपत्रक फकरफार करुन पुढील प्रमाणे मंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे

(आकडे हजारात)

| अ.क. | उत्पन्न तपशिल | वर्ष 2016–17 मूळ अंदाज | वर्ष 2016–17 सुधारित अंदाज | वर्ष 2017–18 मूळ अंदाज | अ.क. | खर्च तपशिल | वर्ष 2016–17 मूळ अंदाज | वर्ष 2016–17 सुधारित अंदाज | वर्ष 2017–18 मूळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | परिवहन सेवा उत्पन्न | 2500 | —— | 1000 | 1 | परिवहन सेवा खर्च | 15000 | —— | 1000 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | बस खरेदी अनुदान (अमृत योजना) | 15000 | –– | 15000 | 2 | सभासदांना मानधन, सभा व इतर भत्ते | 1000 | 1000 | 500 |
| | अ अंदाजपत्रकातून वर्ग | 19500 | 1000 | 5500 | 3 | सभासद प्रशिक्षण व प्रवास खर्च | 1000 | –– | –– |
| | | | | | 4 | बस खरेदी | 20000 | –– | 20000 |
| | एकूण | 37000 | 1000 | 21500 | | एकूण | 37000 | 1000 | 21500 |

वृक्ष प्राधिकरणाचे अंदाजपत्रक :

**वृक्ष प्राधिकरण अधिनियमाचे कलम 16 मधील तरतूदीस अधिन राहून वृक्ष प्राधिकरण उपकमाचे वर्ष 2015–2016 चे सुधारित व वर्ष 2016–17 चे मूळ अंदाजपत्रक पुढील प्रमाणे मंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.**

(आकडे हजारात)

| अ.क. | उत्पन्न तपशिल | वर्ष 2016–17 मूळ अंदाज | वर्ष 2016–17 सुधारित अंदाज | वर्ष 2017–18 मूळ अंदाज | अ.क. | खर्च तपशिल | वर्ष 2016–17 मूळ अंदाज | वर्ष 2016–17 सुधारित अंदाज | वर्ष 2017–18 मूळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वृक्ष कर | 8000 | 7500 | 17500 | 1 | उदयाने विभाग पगार | 20513 | 24353 | 19197 |
| 2 | अमृत योजना (बगीचे विकास) अनुदान | –– | –– | 18750 | 2 | नवीन झाडे माती व ट्री गार्डस इ. लावणे | 5000 | 7500 | 1000 |
| 3 | वृक्ष तोडण्यासाठी अनामत रक्कम | 100 | 50 | 100 | 3 | वृक्ष गणना | 2500 | –– | 2500 |
| 4 | अ अंदाजपत्रकातून वर्ग करावयाची रक्कम | 95513 | 72803 | 62947 | 4 | नर्सरीची निगा व विकास | 500 | 500 | 500 |
| | | | | | 5 | झाडे व रोपांचे प्रदर्शन | 500 | –– | 500 |
| | | | | | 6 | उदयाने निगा व दुरुस्ती | 30000 | 20000 | 40000 |
| | | | | | 7 | नवीन उदयाने | 30000 | 25000 | 7500 |
| | | | | | 8 | सपना,दशहरा, गोलमैदान, रोटरी, नेताजी, जिजामाता, स्वामी बोधराज व मनपा (मु) उदयान संवर्धन (प्रत्येकी 5 लाख) | 13000 | 3000 | –– |
| | | | | | 9 | प्रशिक्षण व अभ्यास दौरा | 500 | –– | 500 |
| | | | | | 10 | वृक्ष तोडण्यासाठी अनामत रक्कम परतावा | 100 | –– | 100 |
| | | | | | 11 | वृक्ष तोडणे | 1000 | –– | 2500 |
| | | | | | 12 | अमृत योजना (बगीचे विकास) | – | – | 25000 |
| | एकूण | 103613 | 80353 | 99297 | | एकूण | 103613 | 80353 | 99297 |

महापालिकेचे सन २०१६–१७ चे सुधारित अंदाज :

सन २०१६–१७ करिता उत्पन्न रुपये ४२८.९२ कोटी व रुपये ४२५.०७ कोटी खर्चाच्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज मंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

महापालिकेचे सन २०१७–१८ चे अदाज :

स्थानिक संस्था कर, मालमत्ता कर, पाणी पुरवठा व इतर थकबाकी या सर्व बाबी लक्षात घेता आयुक्तांनी वर्ष २०१७–१८ करिता उत्पन्न व खर्चाचे जे अंदाज सादर केले आहेत ते पुढील प्रमाणे फेरफार करून मंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

| पान क्रमांक | उत्पन्न (आयुक्तांचे अंदाज) | ५८६४४९६ | खर्च (आयुक्तांचे अंदाज) | ५८२७१९४ | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| १ | सर्व साधारण कर | +205000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —१) | +14200 | १७ |
| २ | महापालिका शिक्षण कर | +40000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —१) (दुर्बल घटक) | +22000 | १७ |
| २ | व्रक्ष कर | +5000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —२) | +12000 | १७ |
| ६ | पथ कर | +60000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —२) (दुर्बल घटक) | +22200 | १८ |
| ३३ | अग्निशमन कर | +15000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —३) | +26000 | १८ |
| ३३ | बांधकाम परवाना व नकाशे छाननी फी | +250000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —३) (दुर्बल घटक) | +10200 | १८ |
| ७ | साफ सफाई कर | +50000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —४) | +13600 | १८ |
| ८ | महापालिका मालमत्ता विनियोग | +20000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —४) (दुर्बल घटक) | +20200 | १८ |
| ३३ | पाणी बीले वसुली (कर) | +150000 | महापौर निधी | +50000 | २३ |
| ३३ | अमृत योजना अनुदान हरित क्षेत्र | +18750 | उप महापौर निधी | +50000 | २३ |
| ८ | शिक्षण कर | +60000 | स्थायी समिती सभापती निधी | +50000 | २३ |
| ८ | रोजगार हमी कर | +10000 | नगरसेवक निधी | +41300 | २३ |
| ३५ | पाणी पुरवठा लाभ कर | +35000 | नगरसेवक निधी (दुर्बल घटक) | +33600 | २३ |
| ३५ | मल प्रवाह सुविधा लाभ कर | +20000 | नविन रस्ते (सिमेंट कॉंक्रीट) | +95000 | २३ |
| ३ | वाहन तळ भाडे | +49975 | नविन रस्ते (डांबरी) | +45000 | २३ |
| ५ | शिक्षण कर सूट | +1200 | स्थायी समिती सदस्य निधी | +160000 | २५ |
| ५ | रोजगार हमी कर सूट | +200 | सभागृह नेता निधी | +50000 | २६ |
| ३७ | अमृत योजना अनुदान {भुयारी गटार} | +188607 | विरोधी पक्ष नेता निधी | +50000 | २६ |
| १ | एल. बी. टी. वसूली | +145000 | प्रभाग समिती सभापती निधी | +40000 | २६ |
| | | | विशेष समिती सभापती निधी | +90000 | २६ |
| | | | समाजमंदिर, वेलकम गेट, यात्री निवास स्पोर्टस कॉम्पलेक्स इ. दुरूस्ती व निघा | +7500 | १७ |
| | | | समाजमंदिर, वेलकम गेट, यात्री निवास स्पोर्टस कॉम्पलेक्स इ. नुतनीकरण व बनविण | +30000 | २२ |
| | | | पुतळे स्मारक व राष्ट्रीय ध्वज इ. बनविणे | +87000 | २३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | गलिच्छ वस्त्यात विकास कार्य | +10000 | २३ |
| | | | दुर्भल घटक वसाहतीत विकास कार्य | +10000 | २३ |
| | | | नाला व गटार सफाइ खर्च | +15000 | ४० |
| | | | कचरा कुंडी खरेदी | +60000 | १३ |
| | | | कचरा वाहतूक खर्च | +10000 | १३ |
| | | | झाड तोडणे खर्च | +1500 | १५ |
| | | | सांस्कृत कार्यक्रम खर्च | +9000 | १६ |
| | | | अंत्यविधी स्थान दुरूस्ती खर्च | +5000 | १७ |
| | | | मार्केट दुरूस्ती व निघा | +10000 | ४३ |
| | | | क्रीडा खर्च | +5000 | १९ |
| | | | आयुक्त निधी (भांडवली) | - 80000 | २६ |
| | | | आयुक्त निधी (महसूल) | - 20000 | १७ |
| | | | रेल्वे स्टेशन परिसर विकास | +30000 | २६ |
| | | | महापौर व आयुक्त निवास | +30000 | २६ |
| | | | आधुनिक वाहन तळ बनविणे | +10000 | २३ |
| | | | महापालिका इमारत इतर | +38000 | २२ |
| | | | हजेरी शेड विकास | +7500 | २२ |
| | | | महापालिका मालमत्ता व जन सुरक्षा | +5000 | २६ |
| | | | अमृत योजना विकास (हरित क्षेत्र) | +25000 | २२ |
| | | | विपरीत परिस्थती व्यवस्था साहित्य | +8000 | २१ |
| | | | शिक्षण कर परतावा | +60000 | २७ |
| | | | रोजगार हमी कर परतावा | +10000 | २८ |
| | | | सार्वजनिक नाला व गटार दुरूस्ती | +15000 | ४० |
| | | | सार्वजनिक शौचालय व मुर्ताया दुरूस्ती | +10000 | ४० |
| | | | दुर्बल घटक वसाहतीत शौचालय मुता—या नाले गटार व कलव्हट इत्यादी खर्च | +15000 | ४० |
| | | | शहर स्वच्छता आराखडा—कच—यावर | +19000 | २२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रक्रिया खच | | |
| | | | शौचालय विद्युत देयक | +1500 | ४० |
| | | | ट्रक टेर्मिनल | +5000 | २७ |
| | | | महिला व बाल कल्याण | +15000 | १६ |
| | **एकुण** | ७१८८२२८ | **एकुण** | ७१८६४९४ | |
| | | | **अखेरची शिल्लक** | १७३४ | |

उत्पन्न : ७१८८२२८

**खर्च** : ७१८६४९४

**अखेरची शिल्लक** : १७३४

नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्पासाठी भांडवली खर्चामधून २५ टक्के तरतूदी बाबत :——

पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६, नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० व जल (प्रदुषण प्रतिबंधक नियंत्रण) अधिनियम १९७४ मधील प्राप्त अधिकारानुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून जारी करण्यात आलेल्या निदेर्शांच्या अनुषंगाने नागरी घन कचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्प इत्यादीसाठी वर्ष २०१७—१८ चे अंदाजपत्रकात पुढील प्रमाणे तरतूद करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

| अ. क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | शहर स्वच्छता आराखडा अंतर्गत घनकचरा प्रकल्पासाठी जमिन विकास | १०००० |
| २ | शहर स्वच्छता आराखडा अंतर्गत कच—यावर प्रक्रिया प्रकल्प राबविणे | २०००० |
| ३ | खेमानी नाला विकास | २०००० |
| ४ | वालधुनी नाला विकास | २०००० |
| ५ | भुयारी गटार दुरुस्ती व विकास | २६७०० |
| ६ | भुयारी गटार नविन योजना | ७१०००० |
| ७ | शौचालय, नाला व गटार विकास | ३७९००० |
| ८ | घनकचरा व्यवस्थापन व सार्वजनिक आरोग्य | ३८२१५० |
| ९ | सांडपाण्याचे पुनर्चकीकरण | १०००० |
| | एकूण तरतूद | १५७७८५० |

**नगरसेवक निधीसाठी करण्यात आलेल्या एकूण तरतूदीमध्ये नामनिर्देशित सदस्यांसाठी प्रत्येकी २५ लाख नगरसेवक निधीचा समावेश आहे.**

**वर्ष २०१७—१८ चे अंदाजपत्रकातील नमूद असलेल्या विविध लेखा शीर्षातून हाती घेण्यात आलेली कामे प्राधान्याने पुर्ण करण्यात यावे तसेच खालील नविन कामे हाती घेण्यात यावे.**

| अ. क्र. | तपशील | लेखा शिर्ष | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर शहरातील सर्व प्रवेशव्दार,प्रमुख चौक,उल्हासनगरच्या हददीतील रेल्वे स्टेशन येथे सी.सी. टिव्ही कॅमेरा लावणे. | महापालिका मालमत्ता व जन सुरक्षा आणि वायफाय सेवा | १ कोटी |
| २ | प्रत्येक पॅनेलच्या समाज मंदिरात इंनडोर स्पोर्टस व जीमन्यास्ट्रीक व व्यायामासाठी व लायब्रेरी (वाचनालय). | समाज मंदिर, वेलकम गेट,यात्री निवास,स्पोटर्स कॉ. स्टेज इ. नुतनीकरण व बनविण | रु. १० लाख (२० पॅनेल साठी रु.२ करोड रुपये). |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | उल्हासनगर शहरातील प्रमुख बाजार व मार्केट यांचे विकास. | मार्केट दुरूस्ती व निगा | २ कोटी |
| ४ | उल्हासनगर शहरात गजाजनंद मार्केटच्या मागे उल्हासनगर–२ तसेच जिन बाजार व गाउन बाजार, उल्हासनगर–५ येथे मॉर्डन फायरफायटीग सीस्टीम. | विपरीत परिस्थती व्यवस्था साहित्य | १ कोटी |
| ५ | विकास आराखडयामध्ये ट्रक टमिनलच्या राखीव जागा विकसत करणे. | ट्रक टेर्मिनल | ५० लाख. |
| ६ | उल्हासनगर–२ येथील नेहरुचौक जवळ महानगरपालिका दवाखाना व बस स्टॉप उल्हासनगर–५ येथील महापालिकेचे शाळे जवळ येथे मार्डन टुव्हीलर पार्कीग. | वाहन तळ बनविण | १ कोटी |
| ७ | विकास आराखडयात मुस्लीम समाजाचे कब्रस्थान भुमीवर विकास. | अंत्यविधी स्थाने दुरूस्ती व निगा | ५० लाख. |
| ८ | कब्बडी , क्रिकेट तसेच ईतर टूर्नामेट, मेरेथॉन, महाराष्ट्र स्तरावर खेळण्यासाठी. | क्रिडा खर्च | १ कोटी |
| ९ | मराठी, सिंधी, हिंदी नाट्यकला क्षेत्रा करिता. | सांस्कृतिक कार्यक्रम | १ कोटी |
| १० | धोबीघाट नियर कमला नेहरुनगर गार्डन मध्ये उत्तर भारतीय भवन बनविणे. | मनपा इमारती बनविणे {इतर} | १ कोटी |
| ११ | मीनाताई ठाकरे , शांतीनगर उल्हासनगर–३ येथे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक भवन बनविणे करीता रु. १ करोड. | पुतळे, स्मारक व राष्ट्रीय ध्वज इ. बनविण | १ कोटी |
| १२ | सम्राट अशोकनगर येथील सिध्दार्थ बालवाडी येथे डॉ. बाबा साहेब आंबेडकर यांचे स्मारक बनविणे. | पुतळे, स्मारक व राष्ट्रीय ध्वज इ. बनविण | २ कोटी |
| १३ | राजीव गांधी उदयाना मध्ये झुलेलाल समाज मंदिर बनविणे. | मनपा इमारती बनविणे {इतर} | ४० लाख |
| १४ | उल्हासनगर–१ मधील गोलमैदान येथे तसेच उल्हासनगर–५ मध्ये कैलाश कॉलनी येथे भारतीय राष्ट्रीय मोठा ध्वज. | पुतळे, स्मारक व राष्ट्रीय ध्वज इ. बनविण | ६० लाख |
| १५ | उल्हासनगर–१ मधील गोलमैदानाचे बाहेरील बाजुच्या सौदर्यीकरणा. | नवीन रस्ते सिमेंट कॉंक्रीट | १.५०कोटी |
| १६ | धोबीघाट येथील मोठे प्रवेशव्दार स्वतंत्रा सेनानी (शहिद हेमु कालानी) प्रवेशव्दारासाठी. | समाजमंदिर, वेलकम गेट, यात्री निवास स्पोर्टस कॉम्पलेक्स इ. नुतनीकरण व बनविण | १ कोटी |
| १७ | उल्हासनगर शहरातील विविध ठिकाणी असलेले नाले दुरुस्ती. | सार्वजनिक नाला व गटार दुरूस्ती | २ कोटी |
| १८ | उल्हासनगर स्टेशनच्या दोन्ही बाजुस सौदर्यीकर, गार्डन, रोड, पार्कींग इत्यादी विकास. | रेल्वे स्टेशन परिसर विकास | १ कोटी |
| १९ | शहाड स्टेशन गार्डन, रोड पार्कीग इत्यादी विकास. | रेल्वे स्टेशन परिसर विकास | १ कोटी |
| २० | विठ्ठलवाडी स्टेशन, गार्डन, पार्किग, रोड विकास. | रेल्वे स्टेशन परिसर विकास | १ कोटी |
| २१ | संपुर्ण उल्हासनगर शहरातील इंडस्ट्रीज एरिया तसेच औदयोगिक विकास क्षेत्र तसेच सीमेंट कॉंक्रीटचे रस्ते करणे. | नवीन रस्ते {सिमेंट कॉंक्रीट} | २ कोटी |
| २२ | संपुर्ण उल्हासनगर शहरातील हजेरी शेड, व समाज मंदिर नविन व दुरुस्तीचे काम. | हजेरी शेड सुधारणा | १ कोटी |
| २३ | राजीवगांधी गार्डन समोर सिंधू भवन. | मनपा इमारती बनविणे {इतर} | १ कोटी |
| २४ | सार्वजनिक शौचालय व एम.एम.आर.डी.ए. शौचालय, बायो सेनीटायजर दुरुस्ती, कलर, लाईट व्यवस्था करणे. | सार्वजनिक शौचालय व मुता–या दुरूस्ती | २ कोटी |
| २५ | कचरा वर्गीकरण कुंडी अंदाजित १५०००० मालमत्ते साठी ३ लाख कुंडी | कचरा कुंडी खरेदी | ६ कोटी |
| २६ | राणा ट्रेडिंग डम्पींग ग्राऊंड, सपाटीकरणा. | कचरा वाहतूक खर्च | १ कोटी |
| २७ | आयुक्तांचे निवास स्थान व महापौर यांचे निवासस्थाना. | महापौर व आयुक्त निवास | ३ कोटी |
| २८ | बायोमेट्रिक उपस्थिती, उपस्थिती शेड इत्यादी. | हजेरी शेड सुधारणा | ५० लाख. |
| २९ | पावसाळया पुर्वी नाला सफाई करणे. | नाला व गटार सफाइ खर्च | ४ कोटी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | ओला (गिला )कच—याची विल्हेवाट लावण्यासाठी आणि त्यातून ऊर्जा व विज तयार करणे करीता नविन यंत्रणा तयार करणे. प्रत्येक प्रभाग समिती प्रमाणे ५० लाख रुपये. | शहर स्वच्छता आराखडा—कच—यावर प्रक्रिया खर्च | २ कोटी |
| ३१ | **उद्याने विकास** सपना गार्डन (राजीव गांधी), नाना नानी गार्डन, महिला उदयान (गोलमैदान),नेताजी गार्डन, पुश पवन गार्डन, बस स्टॉप उल्हासनगर—१ चे मागील गार्डन, यात्री निवास गार्डन,उल्हासनगर—५ मधील नेहरु गार्डन, झुलेलाल गार्डन, उदासी गार्डन क्र.२ उल्हासनगर, पप्पु गार्डन, रोटरी गार्डन सेक्शन १७, नारायणदास वनवारी गार्डन उल्हासनगर—५, ऑक्सी गार्डन, उल्हासनगर—५, साई वसन शाह गार्डन प्लॉट नं. ७०५ , स्वामी बोधराज गार्डन, स्वामी त्रिलोकदास गार्डन, दशहरा मैदान उल्हासनगर—३, बॅरेक नं. १०२ सेक्शन २०, बॅरेक नं. १०४० सेक्शन २४. | उदयाने बनविणे | ४ कोटी |
| ३२ | शिवाजी चौक उल्हासनगर —३ येथे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक | पुतळे, स्मारक व राष्ट्रीय ध्वज इ. बनविण | ५ कोटी |

अंदाजपत्रक छापून प्रत्येक पालिका सदस्यास प्रत पाठविण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानला जाईल.

सुचकाची सही /—

अनुमोदकाची सही /—

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पिठासन अधिकारी
स्थायी समिती
उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ६.१५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१५/७/२०१७

## दि. १५/७/२०१७ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शनिवार दिनांक १५/७/२०१७ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ६ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |
| ७ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ८ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ९ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | सदस्य |
| १० | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ११ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| १२ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| १३ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १४ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| १५ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |

तर,

१. सदस्य श्री. सुनिल मुकुंद सुर्वे हे अनुपस्थित होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

५७.श्रीमती विजया कंठे, आयुक्त तथा उप—आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त
५८.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
५९.श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय
६०.श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
६१.श्री. संतोष जाधव, उप मुख्य लेखा परिक्षक
६२.श्री. विनायक फासे, सहा. लेखा परिक्षक
६३.श्री. अशोक जाधव, उप लेखा परिक्षक
६४.श्री. राम जैसवार, शहर अभियंता
६५.श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विद्युत
६६.श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
६७.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
६८.श्री. बाळु नेटके, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
६९.श्री. नितेश रंगारी, कर निरिक्षक
७०.श्रीमती निलिमा कदम, कॅशिअर, शिक्षण मंडळ

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

सांयकाळी ४.१५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

महापालिका सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** मागील स्थायी समिती सभेचे दिनांक २९/३/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी**:—पास.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—मागील सभेचे दिनांक २९/३/२०१७ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १** :— मागील स्थायी समिती सभेचे दिनांक २९/३/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नांव : श्री. कलवंतसिंग सोहटा

स्थायी समिती ठराव क्र. :— ८ अ दिनांक : १५/७/२०१७

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक २९/३/२०१७ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ३६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २ :—** माहे **जुलै २०१६ पासुन मार्च २०१७** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

---

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—मा. स्थायी सभापती, आजच्या सभेला मा. आयुक्त नाही, ठीक आहे, आयुक्त कामानिमित्त बाहेर गेले असतील परंतू बाकीचे अधिकारी कुठे आहेत, या सभेला येणे आवश्यक आहे की नाही, प्रभाग अधिकारी दिसत नाहीत, आरोग्यवाले दिसत नाहीत, पाणी भरले का कुठे?

सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:— स्थायी समिती बैठकीला अधिकाऱ्यांनी ५ ते १० मिनीटे आधी उपस्थित असणे गरजेचे आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u>:—मा. स्थायी समिती बैठकीला सर्व विभागप्रमुख उपस्थित असलेच पाहिजेत. शहर अभियंता, विभाग प्रमुख प्रभाग अधिकारी उपस्थित असले पाहिजेत, उपस्थित न राहण्याचे आदेश दिले आहेत काय? सचिव मॅडम पूर्वीपासून सर्व प्रभाग अधिकारी व इतर उपस्थित असायचे ना?

<u>महापालिका सचिव</u> :—होय.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u>:—मग सभा सूचना पाठवूनही येत का नाहीत. त्यांना तशी ऑर्डर काढा, पुढच्या वेळेस सर्व विभागप्रमुख, सर्व प्रभाग अधिकारी उपस्थित राहिले पाहिजेत. काय प्रशासनाला त्यामध्ये काही अडचण आहे. पत्र अशा प्रकारे काढा की ते आले पाहिजेत.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u>:—आम्ही जर आलो ना आमच्या याच्यावर तर ते सगळे प्रभारी मुकादम बिकादम यांची, काय आहे ते काल परवाच्याच पेपरात वाचले. टायपिस्ट नाही बरोबर त्यांचे खोटे प्रमाणपत्र आहेत, अशा लोकांच्या मागे लागावे लागेल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u>:—त्यांना काय वाटले विषय निघनार नाही येथे कोणत्याही वेळी आयत्यावेळी सदस्य विषय काढु शकतात. शेवटी महासभा आहे. त्यांना नोटीस काढा.

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड</u> :—आज जे अधिकारी आले नाहीत मिटींगला त्या अधिका—यांवर कारवाई केली जावी.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u> :—आज जो विषय येथे उपस्थित झाला आहे याच्या पूर्वी हा विषय दोन वेळा सभेमध्ये उपस्थित झाला होता. त्यावेळी स्थायी समिती सभापतींनी आदेश दिला होता की कार्यवाही करा. परंतू काय कार्यवाही झाली याचा अहवाल आज पर्यंत या सभेत सादर केलेला नाही,आणि आता तिसऱ्या वेळेस सांगण्यात येत आहे, नुसत सांगून होणार नाही त्यावर काय कार्यवाही झाली याचा अहवाल स्थायी समितीच्या बैठकीत आला पाहिजे. पूर्वी एक मिटींग होती ४ वाजता सुरु होणार होती परंतू ४:३० वाजेपर्यंत कोणीही उपस्थित नव्हते, मा. आयुक्त साहेब देखील उपस्थित नव्हते. त्या वेळेला आम्ही १ तासासाठी ॲडजॉन करुन ५ वाजता ठेवण्यात आली होती.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u>:—अधिकाऱ्यांनी वेळेआधी आले पाहिजे त्यांनी सभागृहाचा शिष्टाचार पाळला पाहिजे, आम्ही त्यांची वाट पहायची हे बरोबर नाही.

<u>श्रीम. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त</u> :— मा. सभापती महोदया, आणि सर्व सन्माननिय सदस्य, स्थायी समिती. आता मला यायला उशिर झाला यासाठी मी पहिल्यांदा दिलगीरी व्यक्त करते, मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या निवडणूकीकरीता ज्या मशीन दयायच्या आहेत, ई.व्हि.एम. मशीन ज्या आपल्या व्हि.टी.सी. गार्डन मध्ये ठेवलेल्या आहेत, त्यांना महत्वाच्या कामासाठी मेमरी चीप देण्यासाठी मला उशीर झाला त्यामुळे मी दिलगीरी व्यक्त करते. तसेच प्रशासनाच्या वतीने सर्व विभाग प्रमुखांना स्थायी समितीला उपस्थित राहणेसाठी आम्ही सांगितलेले आहे, जसे आपणाला सभेचा अजेंडा येतो त्याच प्रमाणे त्यांना ही अजेंडा दिलेला असतो हे आमच्या नियमावली आहे की, प्रत्येक सभेला उपस्थित राहणे, मा. महापौरांनी किंवा इतर सर्व सभापतींनी बोलवल्यास तात्काळ जाणे, ही प्रशासकीय दृष्टीने खेदाची व चुकीची बाब आहे. आता जे लोक उपस्थित नाहीत, मोबाईल माझा बाहेरच आहे, पण त्यांना मी फोन करुन विचारले आहे. ते १० ते १५ मिनीटांत येतीलच, आपल्या समक्ष चर्चा होईल. परंतू येथून पुढे मात्र तसे हवे असेल तर पुन्हा लेखी परिपत्रक काढून सर्व विभाग प्रमुखांना सूचीत केले जाईल. आणि प्रशासनाकडून स्थायी समितीचा अवमान करण्याचा कोणताही हेतू नाही. परंतु एकवेळ अशी गोष्ट घडत असल्यास परिपत्रक काढुन मुख्यालयाच्या तसेच अतिरीक्त आयुक्तांच्या वतीने अशी ग्वाही देते की, यापुढे पुन्हा अशी बाब होणार नाही. तरी कृपया आपली आताची जी सभा आहे तीचे कामकाज सुरु करावे, व अशी चुक पुन्हा आमच्याकडुन झाली तर प्रशासनाकडून कठोर पावले नक्कीच उचलले जातील. हे आपणांस आयुक्त नसल्याने त्यांचे अधिपत्याखाली त्यांचे म्हणणे सांगण्यात येत आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u>:—तुमचे अधिकारी या विषयाकडे किती गांभिर्याने बघतात आणि किती लवकर येतात मिटींगला ते तुम्ही आधी बघा तरी.

<u>श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षकः–</u> गोषवारा वाचतात.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u>:–हा प्रस्ताव कोणत्या विभागाचा आहे ते आधी सांगा तरी, बलमे साहेब, गोषवारा कोणत्या विभागाचा आहे. त्याच विभागाने प्रस्ताव सांगायचा असतो.

<u>श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक :–</u>बरोबर आहे. मी फक्त विभागाचा गोषवारा स्थायी समितीपुढे मांडत आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u>:–श्री.बलमे साहेब, तुम्ही काय पुट अप करत आहात हे तर तुम्हांला माहित असले पाहिजे ना. आणि फक्त पुटअप करायचं नाही, जे गोषवारा आणतात त्यांनी मांडायचं असतं.

<u>श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक :–</u>आपण मागच्या साईटला जर पाहिल तर कळेल की, सर्व संख्या लेखा विभागाच्या आहेत त्यांनी जश्या दिल्या त्याच आम्ही घेत असतो. ज्या लेखा विभागाने दिलेल्या आहेत, आणि त्याच घ्यायच्या असतात. त्याच स्थायी समितीच्या समोर ठेवायच्या असतात.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u>:–कधी दर महिन्याने ठेवायच्या असतात की सहा महिन्यांनी ठेवायच्या असतात.

<u>श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक :–</u>दर महिन्याला ठेवायच्या असतात पण लेखा विभागाकडून वेळेवर येत नसल्याने आम्हाला दर महिन्याला ठेवता येत नाहीत.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u>:–मग, आता हे किती महिन्याचे आलेले आहे आपल्याकडे?

<u>श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक :–</u>जुलै ते मार्च...

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u>:–तीन महिन्याचे आलेले आहे.

<u>श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक :–</u>साहेब आम्ही लेखा विभागाकडे पाठपुरावा केला होता पण आम्हाला लेखा विभागाकडुन फिगर आले नाहीत म्हणून आम्हाला पुटअप करता आले नाहीत.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u>:–हे प्रशासनाचे काम आहे. प्रशासनाचा एक अधिकारी दुसऱ्या अधिकाऱ्यावर आरोप करतात किंवा विभागावर आरोप करतात. आम्ही मागणी करतो आम्हाला अहवाल मिळत नाही. आणि त्यामुळे १ वर्षानंतर आमच्या स्थायी समितीपुढे अहवाल सादर केला जातो. १ महिन्याने दयायचा आहे आणि १ वर्षानंतर आलेला आहे. ही प्रशासनाची कार्यपध्दत आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u>:–आम्ही नुसत हो बोलायचे, पण आकडे काय आहेत.

<u>श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक :–</u>लेखा विभागाकडून आलेले आकडे आहेत.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u>:–पण काय करायचं याचं

<u>श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक :–</u>याचे उत्तर लेखा विभागावाले देतील.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u>:–सांगाना कोणीही सांगा. आम्ही कार्पोरेशन एकत्र बघतोय, तुम्ही डिपार्टमेंट वाले आपापसात भांडा, भांडा म्हणजे एकमेकांवर आरोप करा. शेवटी आम्ही आयुक्तांना सांगतो.

<u>श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक :–</u>हे फिगर लेखा विभागाचे असल्याने त्याचे उत्तर जास्त देवु शकतील.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u>:–मला काही माहिती नाही जाधव साहेब, फक्त फीगर कसल्या आहेत ते सांगा.... आम्हाला हा विषय फक्त माहितीस्तव आहे ना.

<u>श्री. संतोष जाधव, उप मुख्य लेखा परिक्षक:—</u>हे ॲक्चुअल एक्सपेंडीचर खर्च आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u>:—मग ते तिकडेच पास करुन घ्या कशाला आणता इकडे एका वर्षाने. एका महिन्यात आणावा लागतो की एका वर्षात.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>बघा, ही एक प्रक्रिया आहे. आम्ही गेल्या दहा वर्षात हेच पाहत आलो आहेत की, सहा किंवा बारा महिन्यांचा अहवाल येतो. सेक्शन १०५ प्रमाणे प्रत्येक महिन्याचा अहवाल आला पाहिजे. आजच्या प्रकरणांना आपण मंजूरी देऊ पण पुढील प्रत्येक महिन्याचा अहवाल वेळोवेळी आला पाहिजे. एप्रिल ते जून महिन्यांचा अहवाल पुढील सभेत घेऊन या.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> आता सुधार तर झाला पाहिजे. हे २०१६ चे आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>नाही साहेब, २०१७ चे सुध्दा आहे. मी मा. सभापतींना विनंती करतो की, एप्रिल, मे व जुन महिन्याचा आपण पुढील सभेत आणा. दर महिन्याचा अहवाल सभेपुढे मांडले जावे, जेणेकरुन समजण्यात त्रास होणार नाही. सेक्शन १०५ प्रमाणे प्रत्येक महिन्याचा अहवाल आला पाहिजे, असा ठराव पारित करण्यात यावे.

<u>महापालिका सचिव :—</u>मी ठराव वाचुन दाखविते. ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे जुलै २०१६ पासुन मार्च २०१७ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवालाची नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे. तसेच सदर अहवाल दर महिन्यात आणणे आवश्यक असेल

<u>काही सदस्य:—पास</u>,पास.......

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :—** माहे **जुलै २०१६ पासुन मार्च २०१७** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे जुलै २०१६ पासुन मार्च २०१७ अखेर चा जमा खर्चाचा एकत्रित अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

<u>जमा:—</u>

वित्तीय वर्ष २०१६—२०१७ च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खालीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | ५३२७१७५००० |
| “ब” | १५०००००० |
| “क” | १९४८०००००० |
| एकूण | ७२८६९७५००० |

सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | ५००,९६,६५,००० |

| | | |
|---|---|---|
| ३ | शासकीय अनुदान | ५४,८५,८५,,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | १३,६६,२५,००० |
| ५ | एकुण | ५६९४८७५००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ११२४९५००० |
| ७ | एकुण :— | ५८०७३७०००० |

वित्तीय वर्ष २०१६—२०१७ च्या अर्थसंकल्पात सुधारीत महसूल जमा रक्कम रुपये ५५१७०६५०००./— अपेक्षित धरलेली आहे. मार्च,२०१७ अखेर समप्रमाणात रुपये ५५१७०६५०००./— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रुपये २६१८०९८५९६/— (एकूण अपेक्षित महसूल जमेच्या ४७.४५ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे मार्च २०१७ अखेर प्रारंभिक अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष | | सन २०१६—१७ चे अंदाजे महसूली उत्पन्न | माहे मार्च,२०१७अखेर अपेक्षित महसूली उत्पन्न | माहे मार्च,२०१७ अखेर प्रत्यक्ष महसूली जमा उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| | अर्थ संकल्प "अ" | १ | २ | ३ |
| १ | स्थानिक संस्था कर | २५०००००००० | २५०००००००० | १२५४८२०८०९ |
| २ | मालमत्ता कर | ५७२०००००० | ५७२०००००० | ४३८३३७२४४ |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ९८६५००००० | ९८६५००००० | १२८८८०९८७ |
| ४ | अनाधिकृत बांधकाम दंड वसूली | २०००००००० | २०००००००० | ० |
| ५ | मार्केट | १००००००० | १००००००० | ४० |
| ६ | रुग्णालय फी | ४५०००० | ४५०००० | ६२०६९४ |
| ७ | परवाना व इतर फी | ४१८००००० | ४१८००००० | ७६९०२६० |
| ८ | संकीर्ण | २८६१५००० | २८६१५००० | ८५२८७३०३ |
| ९ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | ३०४९००००० | ३०४९००००० | २७२२६६५१ |
| | एकूण "अ" | ४६४४२६५००० | ४६४४२६५००० | १९४२८६३९८८ |
| | अर्थसंकल्प "ब" | | | |
| | महसूल उत्पन्न | २५००००० | २५००००० | ४००० |
| | एकूण "ब" | | | |
| | अर्थसंकल्प "क" | | | |
| १ | पाणी बिल वसुली (कर) | ५०००००००० | ५०००००००० | २४११३९८३६ |
| १ (अ) | पाणी बिल वसुली (पाणी पट्टी) | २०००००००० | २०००००००० | २०४१५०१३ |
| २ | मालमत्ता कर | १६९०००००० | १६९०००००० | १२६३०३१०९ |
| ३ | परवाना/इतर फी | १०००००० | १०००००० | ९६७९३४६ |
| ४ | संकीर्ण | ३००००० | ३००००० | ४४७६० |
| | एकुण "क" | ८७०३००००० | ८७०३००००० | ३९७५८२०६४ |
| | एकुण "अ","ब" व "क" | ५५१७०६५००० | ५५१७०६५००० | २३४०४५००५८ |

सन २०१६—१७ च्या 'अ''ब'व'क' अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ७४०१९७००००/— (प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित धरलेले आहे. मात्र प्रत्यक्षात माहे , मार्च,२०१७ अखेरपर्यंत रू. ३८०७१४३३२६/— (प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे.

पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पन्नाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील वर्षाचे जमेचे लेखापरिक्षण करण्यात येत असून अनियमितता आढळल्यास निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात.

खर्च—

मार्च, २०१७ अखेर पर्यंत २९६१३३३२०५/— खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसूलाच्या ७७.७८ टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे मार्च,२०१७ ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे—माहे मार्च, २०१७ अखेर मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा—यांची १०२ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ०६ (१) अ च्या तरतुदीप्रमाणे):— अर्थसंकल्पिय अंदाजाप्रमाणे महानगरपालिकेस फारच कमी उत्पन्न मिळाले आहे. त्यामुळे १) स्थानिक संस्था कर २) मालमत्ता कर ३) महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न ४)पाणी बिल वसूली (कर) ५) पाणी बिल वसुली(पाणीपट्टी) या महसूली उत्पन्नात वाढ होणे आवश्यक आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ९ दिनांक:— १५/७/२०१७

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे **जुलै २०१६ पासुन मार्च २०१७** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवालाची नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे.

तसेच सदर अहवाल दर महिन्यात आणणे आवश्यक असेल

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ३ :— म.न.पा .शाळांमध्ये CCTV व अनुषंगिक यंत्रणा लावणे

---

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करा.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—इतिवृत्तांची वाट न पाहता पास.

सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

विषय क्र. ३ :— म.न.पा .शाळांमध्ये CCTV व अनुषंगिक यंत्रणा लावणे

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका म.न.पा. शाळांमध्ये CCTV व अनुषंगिक यंत्रणा लावणेबाबतची निविदा ई—टेंडरींगद्वारे प्रसिध्द करून जाहीर निविदा सुचना विविध वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालिकेच्या वेब साइटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करून ई—टेंडरिंग पध्दतीने इंटरनेटद्वारे मागविण्यात आल्या होत्या.

सदर ई—निविदेचा कालावधी दि. ०७/०४/२०१७ पर्यंत होता. वर्तमान पत्रामध्ये तसेच ई—निविदेमध्ये दिलेल्या जाहीराती प्रमाणे म.न.पा. शाळांमध्ये CCTV व अनुषंगिक यंत्रणा लावणेबाबत एकूण ०३ निविदाधारकांच्या प्राप्त निविदा, निविदा समितीचे सदस्य मा. अतिरिक्त आयुक्त, उपआयुक्त (शिक्षण), मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी, तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांचे समोर दि.१०/०४/२०१७ रोजी ई—निविदा संगणक प्रणालीव्दारे उघडण्यात आल्या. प्राप्त निविदांच्या निविदाधारकांनी लिफाफा क्र.१ मध्ये आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांच्या निविदेचा दुसरा लिफाफा उघडण्यास निविदा समितीने मान्यता दिली. त्यानुसार निविदेचा वित्तीय लिफाफा दि.१२/०४/२०१७ रोजी निविदा समिती अध्यक्ष, सदस्य, निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष संगणकाद्वारे उघडण्यात आला. पात्र झालेल्या निविदाकारांकडुन सादर केलेल्या सदर पूरवठयाबाबतच्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | तपशिल | नग | प्रति | मे. श्रीकुष्णा इंन्टरप्राझेस | प्रति एक | मे. विघ्नेश | प्रति | मे. सिध्दांत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ अंतर्गत असणाऱ्या २८ शाळांकरीता CCTV व अनुषंगिक यंत्रणा तीन वर्ष वॉरंटी, इंटरनेट कनेक्शन व देखभाल दुरूस्ती सह पूरवठा करणेबाबत. | १ सेट | ६३०० | ४६५४३०० | ७५१७० | ४५८५३७० | ५७५० | ४६२०७५० |
| | एकुण | | | ४६५४३०० | | ४५८५३७० | | ४६२०७५० |

उपरोक्त तीनही निविदाकारांनी दिलेल्या दरांची तुलना केली असता मेसर्स विघ्नेश इंटरप्रायझेस यांनी सर्वात कमी दर सादर केलेले आहेत. सबब त्यांनी निविदेत सादर केलेले दरांनुसार उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ अंतर्गत असणाऱ्या २८ शाळांकरीता CCTV व अनुषंगिक यंत्रणा बे–वॉच टेक्नॉलाजी Software नुसार विद्यार्थी शाळेत आल्यानंतर त्यांच्या पालकांना मोबाईल वर Massage जाणार तसेच शाळा सुटल्यावर देखील Massage जाणार त्याच प्रमाणे मुख्याध्यपक, शिक्षक व कर्मचारी कामावर हजर झाल्यानंतर उप–आयुक्त (मुख्यालय/शिक्षण) किंवा मा.आयुक्त उमपा यांना देखील Massage जाणार विद्यार्थी व कर्मचारी हे शाळेत हजर झाल्यावर व सुटल्याची माहिती इंटरनेट प्रणालीद्वारे पालक व मनपा अधिकारी यांना त्वरीत कळेल हया उद्देशासह तीन वर्षाची वॉरंटी, देखभाल दुरूस्ती सह तसेच तीन वर्ष इंन्टरनेट सुविधा व मशिन नादुरूस्त असल्यास त्वरीत रिपलेसमेंटसह पूरवठा करणेकरीता रू. ४५,८५,३७०/–एवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च 'खेळणी साहित्य, संगणक, सीसीटीव्ही, बायोमेट्रीक मशिनस, दूरदर्शन संच खरेदी' या लेखाशिर्षकांतर्गत भागविता येवू शकतो.

तरी सदरच्या खर्चास व तसेच सदर कामाचा पूरवठा करणेसाठी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मेसर्स विघ्नेश इंटरप्रायझेस यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १० दिनांक:–१५/७/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार म.न.पा .शाळांमध्ये CCTV व अनुषंगिक यंत्रणा लावणेकामी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मेसर्स विघ्नेश इंटरप्रायझेस यांच्याशी संविदा करणेस तसेच येणा–या खर्चास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :–** म.न.पा .शाळांमध्ये शिपाई पूरवठा करणेबाबत.

---

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करा.

काही सदस्य:–इतिवृत्तांची वाट न पाहता पास.

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.** ४ :– म.न.पा .शाळांमध्ये शिपाई पूरवठा करणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ अंतर्गत असणाऱ्या २८ शाळांमध्ये प्रती महा ४२ शिपाई नुसार १वर्षा शिपाई पूरवठा करणे कामा साठी निविदा ई–टेंडरींगद्वारे प्रसिध्द करून जाहीर निविदा सुचना विविध वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालिकेच्या वेब साइटवर ई–निविदा सुचना प्रसिध्द करून ई–टेंडरिंग पध्दतीने इंटरनेटद्वारे मागविण्यात आल्या होत्या.

सदर ई–निविदेचा कालावधी दि.०७/०४/२०१७ पर्यंत होता. वर्तमान पत्रामध्ये तसेच ई–निविदेमध्ये दिलेल्या जाहिराती प्रमाणे म.न.पा. च्या २८ शाळांमध्ये ४२ शिपाई पूरवठा करणेकरीता एकूण ०३ निविदाधारकांच्या प्राप्त निविदा, निविदा समितीचे सदस्य मा. अतिरिक्त आयुक्त, उपआयुक्त (शिक्षण), मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी, तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांचे समोर दि.१०/०४/२०१७ रोजी ई–निविदा संगणक प्रणालीद्वारे उघडण्यात आल्या. प्राप्त निविदांच्या निविदाधारकांनी लिफाफा क्र.१ मध्ये आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांच्या निविदेचा दुसरा लिफाफा उघडण्यास निविदा समितीने मान्यता दिली. त्यानुसार निविदेचा वित्तीय लिफाफा दि.१२/०४/२०१७ रोजी निविदा समिती अध्यक्ष, सदस्य, निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष संगणकाव्दारे उघडण्यात आला. पात्र झालेल्या निविदाकारांकडुन सादर केलेल्या सदर पूरवठयाबाबतच्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | तपशिल | नग/ मागणी | प्रति एक शिपाई दर | मे. आदर्श अदिवासी विकसस आणि शैक्षणिक संस्था | प्रति एक शिपाई दर | मे.सिध्दांत समाज विकस संस्था | प्रति एक शिपाई दर | मे.मानव विकास सामाजिक सेवा संस्था |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ अंतर्गत असणाऱ्या २८ शाळांमध्ये ४२ शिपाई पूरवठा करणेकरीता | ४२ शिपाई X १२ महिने = ५०४ शिपाई | १४३०० | ७२०७२०० | **१३५००** | **६८०४०००** | १३७५० | ६९३०००० |
| | एकुण | | | ७२०७२०० | | **६८०४०००** | | ६९३०००० |

उपरोक्त तीन निविदाकारांनी दिलेल्या दरांची तुलना केली असता **मेसर्स सिध्दांत समाज विकास संस्था** यांनी निविदा दरपत्रकात नमुद केलेले दर हे सर्वात न्युनतम आहेत. बाजार भावा नुसार वाजवी असून शासनाच्या किमान वेतन श्रेणी प्रमाणे आहेत. सबब त्यांनी निविदेत सादर केलेले दरांनुसार उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ अंतर्गत असणाऱ्या २८शाळांकरीता प्रति महीना ४२ शिपाई आवश्यक आहे. त्यानुसार X १२ महिण्यासाठी =५०४ शिपाई X१३५०० यांच्या करीता रू. ६८,०४,०००/–एवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च 'म.न.पा. शाळेसाठी पहारेकरी व शिपाई पूरवठा करणे' या लेखाशिर्षकांतर्गत भागविता येवू शकतो.

तरी सदरच्या खर्चास व तसेच सदर पूरवठा करणेसाठी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार **मेसर्स सिध्दांत समाज विकास संस्था** यांच्याशी संविदा करण्याकरीता मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. त्याकरिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u> ११ <u>दिनांक:– १५/७/२०१७</u>

सुचकाचे नाव :– श्री. भारत राजवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार म.न.पा .शाळांमध्ये शिपाई पूरवठा करणेकामी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मेसर्स सिध्दांत समाज विकास संस्था यांच्याशी संविदा करण्यास तसेच येणा–या खर्चास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५** :—उल्हासनगर शहरातील मनपा शाळेना पाणी शुध्दीकरण यंत्र उपलब्ध करून देणेबाबतच्या निविदेतील न्युन्नत्तम निविदाकार में. ओम मनिष इंटरप्राईजेस, उल्हासनगर यांचेकडून खरेदी करण्यासाठी खर्चास मा.स्थायी समितीची प्रशासकिय व वित्तिय मंजुरी मिळणे.

---

**सदस्य श्री. धनंजय बोडारे**:—प्रशासनाने हा चांगला विषय घेतला आहे. मी खाजगी शाळा पाहतो. खाजगी शाळांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी ॲक्वागार्ड असतो. महानगरपालिका शाळेतील मुलांना पिण्याच्या पाण्याची सोय करणे गरजेचे आहे, आवश्यक आहे. आपण खाण्याची सोय करतो पण साथीचे आजार पिण्याच्या पाण्यामुळे होते, त्यामुळे प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाच मी स्वागत करतो. अशा प्रकारचे उपक्रम राबविले पाहिजे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी**:—मी सभापती महोदयांना विनंती करतो की, ज्या प्रमाणे आपण काम करीत आहात त्याप्रमाणे आपल्या महानगरपालिकेच्या इमारती आहेत, प्रभाग समिती कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभागातील इतर कार्यालये या सर्व कार्यालयात अशी योजना राबविली पाहिजे. सर्व जागी पाण्याची व्यवस्था वॉटर प्युरेशनद्वारे झाली पाहिजे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे**:—उल्हासनगर शहरातील जुनी पाणी पुरवठा लाईन गटारीतून व नवीन लाईन ही गटारीतूनच आलेली आहे. या महापालिकेतसुध्दा पूर्वी आणलेली मशीन खराब असल्याने श्री. भुल्लर महाराज यांनी सर्व तोडफोड केली होती. कॅन्टीन नाही, पण पिण्याचे पाणी तरी व्यवस्थित असली पाहिजे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी**:—महापालिकेतील ५ संविधानिक पदे आहेत. महापौर, उपमहापौर, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, स्थायी समिती येथे असणे गरजेचे आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत विभाग व प्रत्येक प्रभाग समितीत असणे गरजेचे आहे.

**श्रीम. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त**:—पाणी पुरवठा विभाग तसा प्रस्ताव सादर करा.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ५** :—उल्हासनगर शहरातील मनपा शाळेना पाणी शुध्दीकरण यंत्र उपलब्ध करून देणेबाबतच्या निविदेतील न्युन्नत्तम निविदाकार में. ओम मनिष इंटरप्राईजेस, उल्हासनगर यांचेकडून खरेदी करण्यासाठी खर्चास मा.स्थायी समितीची प्रशासकिय व वित्तिय मंजुरी मिळणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरातील मनपा शाळेना पाणी शुध्दीकरण यंत्र उपलब्ध पुरवठा देणेकरिता "ई टेंडर प्रक्रयेव्दारे" दोन लिफाफा पध्दतीने जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या.सदर ई निविदा Upload व Submission चा कालावधी दिनांक ०४/०८/२०१६ ते १०/०८/२०१६ असा ७ दिवसांचा कालावधी

ठेवण्यात आला होता. त्या कालावधीत नियमानुसार खालील तीन निविदाकारांनी वेबसाईटवरुन निविदा Submit केल्या आहेत.

१. में. ओम मनिष इंटरप्राईजेस, उल्हासनगर
२. में. सिध्दांत समाज विकास संस्था, उल्हासनगर
३. में. विघ्नेश इंटरप्राईजेस, उल्हासनगर

दिनांक १०/०८/२०१६ रोजी प्राप्त झालेल्या निविदा मंगळवार दिनांक २३/०८/२०१६ रोजी दुपारी ठिक ०५:०० वाजता मा. अति. आयुक्त तथा निविदा समिती अध्यक्ष यांचे दालनात निविदा समिती समक्ष उघडण्यात आल्या आहेत.लिफाफा क्र १ च्या अहवालानुसार तीनही निविदाकार पात्र ठरल्याने लिफाफा क्रं २ वरिल सर्व उपस्थितांच्या समक्ष उघडण्यात आला.प्राप्त तिन निविदाकारांच्या दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

(लिफाफा क्रं. २ चा तुलनात्मक तक्ता).

| अ क्रं | तपशिल | एकूण लाभार्थी | पुरवठादाराचेनांव व त्यांनीसादरकेलेलेदर | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | में.ओम मनिष इंटरप्राईजेस,उल्हासनगर | | में. सिध्दांत समाज विकास संस्था, उल्हासनगर | | में.विघ्नेश इंटरप्राईजेस, उल्हासनगर | |
| | पाणी शुध्दीकरण यंत्र पुरवठा करणे. | | प्रति नग दर | एकूण दर | प्रति नग दर | एकूण दर | प्रति नग दर | एकूण दर |
| १ | वॉटर प्युरीफायर | २८ | ३६,४०० | १०,१९,२०० | ३८,५०० | १०,४९,७७६ | ३७,४९२ | १०,७८,००० |
| २ | ५००० लि Water Tank per machine ०२ | | १३,६५० | ७,६४,४०० | १४,२५० | ७,८७,३६० | १४,०६० | ७,९८,००० |
| ३ | वॉटर प्युरीफायर UV+UF Machine & water Tank Installation | | ११,३७५ | ३,१८,५०० | ११,५०० | ३,२८,०७६ | ११,७१७ | ३,२२,००० |
| ४ | Case fabrication for वॉटर प्युरीफायर UV+UF Machine | | १३,६५० | ३,८२,२०० | १३,९०० | ३,९३,६८० | १४,०६० | ३,८९,२०० |
| ५ | Annual Maintenance Contract (5 Years) | | १८,२०० | ५,०९,६०० | १८,५०० | ५,२४,८८८ | १८,७४६ | ५,१८,००० |
| एकुण | | | ९३२७५ | २९,९३,९०० | ९६०७५ | ३०,८३,७८० | ९६६५० | ३१,०५,२०० |

उक्त तुलनात्मक तक्त्यानुसार तीन निविदाकारांपेक्षा में. ओम मनिष इंटरपगाईजेस, उल्हासनगर यांचे दर रू. २९,९३,९००/— हे न्युनत्तम आहे.परंतु अंदाजित किमंतीपेक्षा ३ टक्केनी जास्तीचे आहेत.यास्तव मा. उप आयुक्त (मबाकस) यांनी आदेशित केल्यानुसार सदर निविदेतील दराच्या वाटाघाटीसाठी में. ओम मनिष इंटरप्राईजेस, उल्हासनगर यांना पत्र क्रं. उमपा/मबाकस/२७८ दिनांक २८/१०/२०१६ अन्वये दिनांक ०२/११/२०१६ रोजी दुपारी ३:०० वाजता मा. उप आयुक्त (मबाकस) यांचे दालनात बोलविण्यात आले व त्यांनी त्यांचे पत्र दिनांक ०२/११/२०१६ अन्वये सदर साहित्याचे एकूण दर रू. २९,९३,९००/— वरून ३ टक्केनी रू. १,२३,९००/— एवढे कमी करण्यात आले.व त्यानुसार संबधित निविदाकाराने दिनांक ०२/१०/२०१६ रोजी लेखी पत्र दिले आहे.

या अनुषंगाने में. ओम मनिष इंटरपगाईजेस, उल्हासनगर यांना उल्हासनगर शहरातील शाळेना पाणी शुध्दीकरण यंत्र उपलब्ध करून देणे पोटी रू. २८,७०,०००/— एवढया खर्चास मा. आयुक्त सो यांचे मंजुरीस्तव सादर केले असता मा. आयुक्त सो यांनी दिनांक १६/१२/२०१६ रोजी अन्वये चर्चा करण्यास कळविले होते. या अनुषंगाने दिनांक २७/१२/२०१७ रोजी उप आयुक्त, मबाकस यांनी मा. आयुक्त सो यांचेशी चर्चा केली त्यानुसार सदर प्रस्तावित विषयाच्या बाजारभावाची पुन्हा खात्री करून Specification च्या बाबी समक्ष करण्याबाबत निर्देश दिले. मा. आयुक्त सो यांनी निर्देशित केल्यानुसार पुन्हा बाजारभावाची खात्री केली असता सदरचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अनु. क्र | तपशील | निधी इंटरप्राईजेस, उल्हासनगर | धनलक्ष्मी इंटरप्राईजेस, पुणे | निविदेतील प्राप्त न्युनत्तम दर रू.(में. ओम मनिष इंटरप्राईजेस, उल्हासनगर ) |
|---|---|---|---|---|
| १ | वॉटर प्युरीफायर | ३९,२०० | २७,००० | ३६,४०० |
| २ | ५००० लि Water Tank per machine ०२ | ३०,१०० | ३१,००० | १३,६५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | वॉटर प्युरीफायर UV+UF Machine & water Tank Installation | १२,००० | १२,५०० | ११,३७५ |
| ४ | Case fabrication for वॉटर प्युरीफायर UV+UF Machine | १३,८९० | १५,००० | १३,६५० |
| ५ | Annual Maintenance Contract (5 Years) | २२,००० | १९,५०० | १८,२०० |
| | एकूण | **३२,८१,३२०** | **३२,२०,०००** | **२९,३५०००/—** |

उक्त तुनात्मक तक्त्यानुसार मे. धनलक्ष्मी इंटरप्राईजेस, पुणे यांचे दर रू ३२,२०,०००/— व मे. निधी इंटरप्रईजेस, उल्हासनगर यांचे दर रूं ३२,८१,३२०/— प्राप्त झाले असून दोन्ही कंपनीचा दर हा निविदेतील प्राप्त दरापेक्षा १३ टक्केनी जास्ती आहे. या अनुषंगाने उपरोक्त पाणी शुध्दीकरण यंत्र निविदेमध्ये प्राप्त न्युन्नत्तम निविदाकार में. ओम मनिष इंटरप्राईजेस, उल्हासनगर यांचेकडून खरेदी करण्यासाठी पुढील आदेशास्तव सादर केले असता मा. आयुक्त सो यांनी दिनांक ७/०३/२०१७ रोजी सर्व प्रथम सर्व शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध आहेत का? याबाबत अहवाल सादर करण्यास आदेशित करण्यात आले.

मा. आयुक्त सो यांनी आदेशित केल्यानुसार सर्व प्रथम सर्व शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध आहे कि नाही याबाबत पहाणी करून अहवाल प्राप्त करून घेणेसाठी कनिष्ठ अभियंता, शिक्षण मंडळ यांना दिनांक २४/०३/२०१७ पत्रान्वये कळविण्यात आले होते.

या अनुषंगाने दिनांक २७/०३/२०१७ रोजी कनिष्ठ अभियंता यांनी "सर्व शाळांची पहाणी केली असता शाळा क्रं १३/१४ मध्ये पाईप लाईन खराब असून बदलणे आवश्यक वाटते तसेच शाळा क्रं. १८/२४ मध्ये नविन पाईप लाईन टाकावी लागेल. तरी सर्व शाळांमध्ये पाण्याची व्यवस्था सुस्थितीत असून पाणी शुध्दीकरण यंत्र बसविणेस हरकत नसावी" असा अहवाल सादर केला आहे.

या अनुषंगाने में. ओम मनिष इंटरपगाईजेस, उल्हासनगर यांना उल्हासनगर शहरातील शाळेना पाणी शुध्दीकरण यंत्र उपलब्ध करून देणे पोटी रू. २८,७०,०००/— एवढया खर्चास मा. आयुक्त सो यांनी मान्यता दिलेली असून उपरोक्त पाणी शुध्दीकरण यंत्र निविदेमध्ये प्राप्त न्युन्नत्तम निविदाकार में. ओम मनिष इंटरप्राईजेस, उल्हासनगर यांचेकडून खरेदी करण्यासाठी रू. २८,७०,०००/— एवढा खर्चास मा.स्थायी समिती च्या प्रशासकिय व वित्तिय मंजुरीस्तव सविनय सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u> १२ — <u>दिनांकः— १५/७/२०१७</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील मनपा शाळेना पाणी शुध्दीकरण यंत्र उपलब्ध करून देणेबाबतच्या निविदेतील न्युन्नतम निविदाकार में. ओम मनिष इंटरप्राईजेस, उल्हासनगर यांचेकडून खरेदी करण्यासाठी रू. २८,७०,०००/— एवढा खर्चास प्रशासकिय व वित्तिय मंजुरी देत आहे.
या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ४.३० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—३/८/२०१७

दि. ३/८/२०१७ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

६

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक ३/८/२०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ६ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |
| ७ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ८ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ९ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | सदस्य |
| १० | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ११ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| १२ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| १३ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १४ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य अनुपस्थित होते.
१. श्री. धनंजय बोडारे, २. श्री. भारत रामचंद्र राजवानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

७१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
७२. श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त
७३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
७४. श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय
७५. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
७६. श्री. अशोक जाधव, उप मुख्य लेखा परिक्षक
७७. डॉ. राजा रिजवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
७८. श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि
७९. श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विद्युत
८०. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
८१. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता
८२. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
८३. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
८४. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
८५. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
८६. श्री. नितेश रंगारी, कर अधिक्षक
८७. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

दुपारी १२.३५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

महापालिका सचिव:—सभा सुरु केली आहे.

श्री. युवराज भदाणे, प्र. कर निर्धारक व संकलक:—२६ प्रापर्टी, नाममात्र किंमतीत ताबा घेवु शकतो त्यासाठी आयत्यावेळाचा प्रस्ताव आणला आहे.

महापालिका सचिव :—ठिक आहे, ॲडमीट करायचा काय?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—ॲडमीट करा आणि मान्यता दया.

महापालिका सचिव:— आता ॲडमीट करु नंतर विषय येईल तेव्हा मान्यता देता येईल.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—साहेब, याचबरोबर दुसरे मुद्दे सुध्दा आहेत मशिन वाटपाविषयी. नाहीतर साहित्य खराब होणार.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—याबाबत मी मागे सुध्दा सूचना दिल्या आहेत. वाटप करुन टाका नाहीतर जे अपंग आयोग आहे पुण्याला त्यांच्याकडे पाठवुन दया. मग ते कोठेही पाठवतील, जर आपल्या शहरास गरज नसेल तर.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—गरज आहे साहेब.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—त्याच्यावर कोण आहे? कोण निर्णय घेणार हा प्रश्न आहे.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—हा लवकर निर्णय घ्या ना, कोणाचा विषय आहे तो?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—श्री. देहेरकर यांचा आहे ना.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—मा. आयुक्त साहेब, मागील सभेत बैठक होण्यापुर्वी महापालिकेचे सर्व अधिकारी स्थायी समितीच्या बैठकीत हजर नसतात. आजही मला वाटते बरेचसे अधिकारी हजर नाहीत. ज्या ज्या वेळेस स्थायी समितीची बैठक होते, त्या त्या वेळेस स्थायी समितीत अधिका—यांनी बैठकीस हजर असले पाहिजे की नाही, याबाबत तशी तरतुद नाही काय?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—नाही, आज फक्त श्री. देहेरकर आलेले दिसत नाही, श्रीमती कंठे महोदया आहेत ना.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—श्रीमती कंठे महोदया कोठे आहेत?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. आयुक्त महोदय, आता श्री. सुर्वे व श्री. चौधरी यांनी आता जो विषय काढला, आपणाकडे भांडार विभागात जे जे सामान आहेत, ब—याचदा आपणाकडे वस्तु येतात परंतु त्याचे वाटप करत नाहीत. आणि त्या वस्तु ठेवुन ठेवुन ४—५ वर्षात खराब होतात, तसेच एक डायरीची गोष्ट आहे, महापालिका डायरी प्रत्येक वर्षी बनविते परंतु ती डायरी जानेवारी ते डिसेंबरपर्यंत असते, आणि आम्हांस एप्रिल मे, जुन पर्यंत मिळते. अशाच ब—याचशा शिलाई मशिन आहेत, व्हीलचेअर आहेत असे बरेचसे सामान आहेत, तर मी असे म्हणतो की पुढील स्थायी समिती सभेत संपुर्ण यादी देण्यात यावी की कोणकोणते सामान उरले आहेत ते गरीबांमध्ये वाटावे व त्याची पध्दती की आपण त्यास कशाप्रकारे वाटावे ही सूचना या सभेत अवश्य दयावी. जेणेकरुन आपले होणारे नुकसान आपण वाचवु शकु.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>त्यामध्ये अर्ज खुप कमी आले होते आणि आता काही अर्ज घेतले आहेत त्यांनी.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>तुमची वाटपाची काय पध्दत आहे?

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—</u>साहेब, शिलाई मशिन महिला आणि बालकल्याण समिती मार्फत घेतल्या होत्या.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>त्या मशिन आता कोठे आहेत?

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—</u>आता त्या मशिन आता भांडार विभागात नाहीत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>मशिन कोठे आहेत, कोठे ठेवुन दिल्या आहेत?

<u>श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—</u>साहेब पुर्वी महिला व बालकल्याण समितीमार्फत त्या मशिन घेतल्या होत्या. मा. स्थायी समिती सदस्यांकडुन त्या मशिन लाभार्थींना वाटल्या जातील असे म्हटले होते. मा. श्री. हिरे साहेबांनी सांगितले होते की, जाहिरात दया तेव्हा वयाची अट शिथील करण्यात आली होती. त्यानुसार आता ४५० अर्ज आले आहेत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>मशिन किती आणल्या?

<u>श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—</u>५९० मशिन होत्या.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>घेतल्या.

<u>श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—</u>मशिन विकत नाही घेतल्या अजुन?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>मशिन आपल्या ताब्यात नाही?

<u>श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—</u>साहेब, अर्ध्याच घेतल्या ना.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>५९० ची मान्यता झाली आणि तुमच्याकडे अर्ज ४५० आले बरोबर?

<u>श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—</u>होय.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>म्हणजे ४५० मशिन तुम्हांला लागणार.

<u>श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—</u>होय.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>आज तुमच्याकडे मशिन किती घेतल्या?

<u>श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—</u>आता आपल्याकडे १३४ ची यादी पाहुन पुन्हा त्यामध्ये.....

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>तुम्ही वर्कऑर्डर किती मध्ये दिले? खर्च किती झाला.

<u>श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—</u>साहेब मी पाहुन देते.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>तुम्हांला नीट माहित नसेल तर नंतर दया.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>५९० चे वर्कऑर्डर दिले होते. ते दिल्यानंतर काय झाले की प्रत्येक नगरसेवक आपणाकडील दुर्बल घटक, गरीब, विधवा यांचे पत्र येथे देत होतो परंतु यावेळी काय झाले ते डायरेक्ट पेपरात देवुन अर्ज मागविले. गरीब लोक पेपर वाचत नाही कोणता पेपर आहे, काय आहे त्यामुळे

त्या लोकांना माहित पडले नाही. तरी आम्ही थोडयाफार लोकांना येथे पाठविले. तर ४५० ची जी यादी आहे त्यामध्ये अदयाप हा निर्णय झाला नाही की यातुन कोणास दयायचे आहे व कोणास दयायचे नाही. त्याची समिती बनली नाही की यामध्ये कोणते वैध आहेत, कोण लायक आहेत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—मला हे समजले नाही की कोणतीही वस्तु खरेदी करण्याआधी आपण निर्णय घेतला पाहिजे की त्याच्या अटी काय असतील.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—प्रत्येक वेळी असे करत होते की, ७८ नगरसेवक आहेत, ५ नामनिर्देशीत पकडुन ८३ झालेत. महापौर, उप—महापौर, स्थायी समिती सभापती, गटनेता हे लोक १०—१०, १२—१२ लोकांचे नाव देत होते, त्यात आम्ही नगरसेवक ५—५ नावे देत होतो, काही अधिकारी देत होते तर ६०० नावे येत होती, प्रत्येक वेळी असे होत होते परंतु यावेळी जी रोख लावली त्यामुळे नावे आली नाहीत. व छाटणी नाही झाली.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—काय रोख लावली?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—पेपरात जाहिरात देण्यात आली.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—आपण एक करु, आपण नावे दया व पेपरात असे देवु की आमच्याकडे जी नावे आली आहेत त्या व्यतिरिक्त आपणांस कोणास दयायचे असेल तर या या तारखेपर्यंत देवु शकतो, तर दोन्ही बाजुने होईल.

सदस्य श्री. सुनिल सुर्वेः—एक सेकंद साहेब, यामध्ये काय आहे काही नगरसेवकांनी जी अर्ज पाठविले आहेत ती १२० की २२० असे आहेत. बाकीचे जाहिरातप्रमाणे जनतेने दिलेले आहेत. आता काय झाले आहे, जे काही उरलेले असतील १०—२० किंवा ५०—१००, ते बरोबर मला माहित नाही.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—मग ही प्रोसेस कधी झाली?

सदस्य श्री. सुनिल सुर्वेः—ही मागच्या दिड महिन्यापुर्वी.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—बरोबर आहे. मला वाटते त्यावेळचे अर्ज व त्यावेळचे नगरसेवक, आता बॉडी नविन आहे, नव्याने एक ठरवु या आणि नगरसेवकांना हे कळवु या की प्रत्येकाने तुम्ही तुमचे ५—५ लोक किंवा पदाधिका—यांचे जे काही असतील ते परत नावे दयावीत. तुम्ही ३० नावे दिलीत तरी काही अडचण नाही ना.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—त्या मशिनी आपल्याकडे आल्यात का? जर आल्यात तर त्या कोठे आहेत? मी तोच प्रश्न पहिला विचारला की त्या आहेत कोठे? की त्यांना दिल्या आपण?

श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्तः—नाही, नाही.

सदस्य श्री. सुनिल सुर्वेः—आयुक्त साहेब, मागच्या स्थायी समितीमध्ये ठरविले होते आणि समिती बनविली होती, आपण ती यादी पाठवा आम्ही ते करुन देतो म्हणुन.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— वर्क ऑर्डर दिल्या तर त्या मशिन आल्या का आपणाकडे?

सदस्य श्री. सुनिल सुर्वेः—किती आल्या त्या माहित नाही पण आलेल्या आहेत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—कोठे ठेवल्या आहेत त्या? एवढया ३०० मशिन कोठे तरी ठेवलेल्या असतील ना.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—आल्यात काय, त्याची परिस्थिती काय, की परस्पर वाटप केल्यात.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—तुम्ही स्पष्ट का नाही सांगत, हे साध उत्तर आहे की आल्या आहेत की नाही आल्यात मशिन?

श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—फाईल मागविले आहे त्यात पाहुन.....

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—पण आल्या आहेत का? कोठे आहेत त्या मशिन? किती मशिन आहेत?

श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—फाईल फक्त मागविते.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—फाईल जावु दया. मला फक्त मशिन किती आल्या ते सांगा. आहेत का मशिन? तुम्ही स्वत: बघितल्या का मशिन? कोणी पाहिल्या आहेत येथे बसलेल्यांपैकी, काही तरी चालले आहे एब्स्ट्रेकमध्ये. साधा प्रश्न विचारतो मशिन आल्या आहेत की नाही आल्यात.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— बर, पुढे जावुन त्यांचे बिल सुध्दा दिले असेल यांनी. बिल दिले का ते सुध्दा पहावे लागेल.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—व्हीटीसी ग्राउंड वर त्या व्हिल चेअर्स सुध्दा पडलेल्या आहेत हे मला पर्सनली माहित आहे. त्याचेही आपल्याला करावे लागेल तर त्याचे सुध्दा आपण नावे देवुन टाका.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—साहेब, कुंडी सुध्दा आहेत, त्या ऑर्डर दिलेल्या आहेत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—कसली कुंडी?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—कच—याच्या.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—त्या किती घेतल्या आहेत?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—१० हजार आहेत. स्लमसाठी घेतल्या आहेत, गरीब वस्तीस देण्यासाठी घेतल्या आहेत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—श्री. केणी तुम्हांला माहित असेल ना कुंडयांचे? कुंडया १० हजार घेतलेल्या कोणाकडे आहे?

श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—साहेब, या ही महिला बालकल्याण समिती मार्फत घेतल्या आहेत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—कोठे ठेवल्या आहेत?

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—आलेल्या आहेत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—कोठे आहेत?

श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—ती मी माहिती घेतो. आणि पाहतो.

श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—साहेब, मशिन आपणाकडे आलेल्या नाहीत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—ठिक आहे मग विषयच संपला ना जर मशिन आलेल्या नाहीत तर. जे व्हिल चेअर्स आहेत त्या किती आहेत आणि किती सुस्थितीत आहे ते सांगा, आणि कुंडया १० हजार आहेत त्या व्हिटीसीला आहेत म्हणतात तर त्या सुध्दा पहा.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—२०० मोठया कुंडया त्या सुध्दा.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>जर त्यांनी शिलाई मशिन आपणांस पुरवठाच केलेला नाही तर याचाच अर्थ जी वर्कऑर्डर दिली आहे तर त्यास एक वर्ष झाला तर माझ्या मते त्या रद्द झाल्या. आता शिलाई मशिनमध्ये नविन मॉडल आले असतील त्या हिशोबाने आपण मागवु शकतो.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—</u>साहेब, बहुतेक शिलाई मशिन आलेल्या आहेत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>कोठे आहेत? बोलुन घ्या त्या ठेकेदारास. आणि कुंडीवाल्यालाही बोलवुन घ्या, या दहा हजार अधिक २०० मोठया कुंडयावाल्याचे ठेकेदार.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १</u> :— मागील स्थायी समिती सभेचे दिनांक २/६/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>पास, पास...

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u>मागील सभेचे दिनांक २/६/२०१७ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. १** :— मागील सभेचे दिनांक २/६/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. दिपक सिरवानी

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्र चौधरी

<u>स्थायी समिती ठराव क्र. :—</u> १२ अ <u>दिनांक : ३/८/२०१७</u>

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक २/६/२०१७ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते २४ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २** :— सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या प्रभाग समिती १, २ आणि ३ येथील रस्त्यावर ट्रॅफिक साईन बोर्डस आणि थर्मो प्लास्टीक पेंटचे काम करणे या कामाकरिता मे. सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—करायचे आहे का? केले आहे आपण?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—कोणाचा विषय आहे?

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—सार्वजनिक बांधकाम विभागाचा.

श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—साहेब, आम्ही ट्राफिक साईन बोर्ड प्रभाग समिती क्र. १,२,३ आणि ४ मध्ये तसेच थर्मो प्लास्टीक पेंट साठी निविदा मागविली. सर्व जागी झेब्रा पेंटींग होणार. नो पार्किंगचे कोड असणार आणि हे ३४.२६ चे काम आहे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—याची आपण निविदा मागविली आहे १७/१२/२०१६ रोजी तर याची वैधता तारीख किती आहे निविदेची?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :— कोणत्याही निविदेची वैधता १२० दिवस असते त्यापेक्षा जास्त दिवस राहत नाही, नियमानुसार आणि आपणाकडे २—२, ३—३ वर्ष होत नाही.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—तुम्ही निविदा उघडली , ती २०१६ ला अंतिम झाली.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—मग हा उशिरा का आला निवडणूकीमुळे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—नाही साहेब, फेब्रुवारीमध्ये निवडणूकीची आचारसंहिता लागली. फेब्रुवारीच्या ३ तारखेला.

श्री. राम जैसवार, शहर अभियंता :—१७/१२/१६ ला स्थायी समितीत आले होते.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—स्थायी समितीत येण्याची तारीख आहे ती १६/६/२०१७ ला. ज्या दिवशी आले ती तारखी येथे लिहिलेली आहे.

सदस्य श्री. उजमनादास पुरस्वानी :—या विषयास सर्वसंमतीने अमान्य करु या. ४ महिन्याच्या आत १२० दिवसात जी निविदा ती........

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—जी कायदयात तरतुद आहे त्याप्रमाणे कराल.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—होय त्याचप्रमाणे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—ती परत येथे आणु नका.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—रिजेक्ट म्हणजे यास रद्द करुन नविन निविदा मागवा.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—रिजेक्टचाच अर्थ रद्द अमान्य झाले.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—आणि यात नविन निविदा मागवा व कार्यवाही करा नाहीतर परत सहा महिने निविदा येण्याची वेळ जाईल.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—१५ दिवसाची त्यात करा.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—होय, पंधरा दिवसात पुढची निविदा मागवा.

महापालिका सचिव :—अमान्य करण्याचे कारण सांगा.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—कारण हे लिहा की स्थायी समितीत १२० दिवसानंतर आले, उशिरा आले.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> काही अडचण आहे का?ठिक आहे ना?

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे ना, पंधरा दिवसात नविन निविदा मागविण्यास...

<u>काही सदस्य:—</u>होय.

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :—** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या प्रभाग समिती १, २ आणि ३ येथील रस्त्यावर ट्रॅफिक साईन बोर्डस आणि थर्मो प्लास्टीक पेंटचे काम करणे या कामाकरिता मे. सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र.२ मधील मंजुरी मिळालेल्या **प्रभाग समिती १, २ आणि ३ येथील रस्त्यावर ट्रॅफिक साईन बोर्डस आणि थर्मो प्लास्टीक पेंटचे काम करणे** या कामांकरीता बी—१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक २८/१०/२०१६ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.३४७४३२५/— |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २८/१०/२०१६ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०२/११/२०१६ ते २१/११/२०१६ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १७/१२/२०१६ |
| (अ) | प्रथम मुदतवाढ | दिनांक १५/११/२०१६ |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | दिनांक ७/१२/२०१६ |
| क) | तृतीय मुदतवाढ | दिनांक १४/१२/२०१६ |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक २१/१२/२०१६ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक २१/१२/२०१६ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | २ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |

दिनांक २१/१२/२०१६ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत **प्रभाग समिती १, २ आणि ३ येथील रस्त्यावर ट्रॅफिक साईन बोर्डस आणि थर्मो प्लास्टीक पेंटचे काम करणे** या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन | मे. पियारा कन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय |
| ३ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय |
| ४ | कामाचा अनुभव | होय | होय |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय |
| ६ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** २) **मे. पियारा कन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

आज दिनांक २१/१२/२०१६ रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा.अतिरिक्त आयुक्त साो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

१) **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** दिलेले दर १४.०० टक्के कमी

२) **मे. पियारा कन्स्ट्रक्शन** दिलेले दर ९.१८ टक्के कमी

उपरोक्त **प्रभाग समिती १, २ आणि ३ येथील रस्त्यावर ट्रॅफिक साईन बोर्डस आणि थर्मो प्लास्टीक पेंटचे काम करणे** या कामाचे उक्त निविदाकारांपैकी **मे.साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** यांनी दरसूची वर १४.०० टक्के कमी (**14.00% below**) प्रमाणे दर दिले असुन त्याप्रमाणे **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** यांची सदर काम देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** यांच्या **१४.००%** टक्के कमी या निम्न दराच्या निविदेतून सदर काम करणेस व सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या पटलावर ठेवणेस सादर करणेत येत आहे

तरी **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** यांची दरसूचीपेक्षा **१४.००%** कमी दराच्या निविदेस मा. स्थायी समितीचे मान्यतेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १३ दिनांकः— ३/८/२०१७

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या प्रभाग समिती १, २ आणि ३ येथील रस्त्यावर ट्रॅफिक साईन बोर्डस आणि थर्मो प्लास्टीक पेंटचे काम करणे या कामाकरिता मे. सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मान्यता देण्याचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

कारण

१. सदर निविदेस १२० दिवस पुर्ण झाले असून मंजुरी देणे कायदयात बसत नाही.

२. तसेच १५ दिवसात सदर निविदा नव्याने आणणे आवश्यक आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३** :— भांडवली मुल्यावर आधारीत महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) दर राजपत्रात अधिसूचित करणेसाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर करणेसाठी मंजुरी देणे.

---

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–काय नेमका विषय हा?

श्री. युवराज भदाणे, प्र. कर निर्धारक व संकलक:–मा. सभापती महोदया, हा जो विषय आहे हा २०१५ मध्ये मा. महासभेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी अंतर्गत २९ मधील उपक्रमाच्या अंतर्गत भांडवली मुल्यावर मालमत्तांच्या मिळकतींचा कर लावायचा आहे. त्याअनुषंगाने महापालिकेने लावायचे जे कर आहेत त्यास मा. महासभेने अंदाजपत्रकात मान्यता दिलेली आहे. परंतु जे हे दोन कर आहेत शिक्षण आणि रोजगार हमी हे कर शासनाचे आहेत आणि या कराच्या माध्यमातुन जो पैसा जमा होता तो शासनाला आपणांस दयावा लागतो आणि कमीत कमी ०.०१ व जास्तीत जास्त ०.०२ हे दोनमध्ये आपणांस लावायचा आहे आणि दुसरे म्हणजे ००.०१ यावर आपणांस शासन कर लावायचा आहे. हे मा. स्थायी समितीसमोर सादर केलेले आहे. आणि रोजगार हमी कर हा ०.०५ कमीत कमी.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–हा कर नाही का आता. आताचे काय?

श्री. युवराज भदाणे, प्र. कर निर्धारक व संकलक:–हे भांडवली आतापेक्षा जास्त आहे. आता उलट कमी केला.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–म्हणजे आता ०.०१ जेव्हा आपण लागु करणार तर निवासीसाठी त्याचे एक्झीस्टींग किती आहे.

श्री. युवराज भदाणे, प्र. कर निर्धारक व संकलक:– ०.१ पर्यंत आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–०.१ म्हणजे ते आता १–१० झाले.

श्री. युवराज भदाणे, प्र. कर निर्धारक व संकलक:–होय. आतापर्यंत जे २८रुपये दयावे लागायचे आता ते १० रुपये लागतील.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–कर्मशिअलसाठी वाढविणार काय?

श्री. युवराज भदाणे, प्र. कर निर्धारक व संकलक:–होय, सर्वच.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–१/४/१६ म्हटले तर १/४/१७ पाहिजे तेथे.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :–नाही, नाही, १६ बरोबर आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–मग मागच्यावर्षीचे कसे?

श्री. युवराज भदाणे, प्र. कर निर्धारक व संकलक:–आर्थिक वर्षासाठी निविदा जी आहे, आपल्या अंदाजपत्रकात त्याची मान्यता घेतली आहे. परंतु हे जे दोन कर राहिले होते ते शासनाने नविन अध्यादेश काढुन कोकण आयुक्तांच्या पातळीवर....

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–म्हणजे थोडक्यात राज्य शासनाला जिल्हाधिकारी मार्फत जे पैसे जमा करतो त्या रक्कमेमध्ये आता कमी होणार.

श्री. युवराज भदाणे, प्र. कर निर्धारक व संकलक:–होय.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–काय उद्देश आहे याचा?

श्री. युवराज भदाणे, प्र. कर निर्धारक व संकलक:–शहरातील मालमत्ता धारकाचा कमी बोजा म्हणुन दुसरा काही उद्देश नाही.

सदस्य श्री. राजेश वदारिया :–एक गोष्ट सांगा आता वार्षिक वर्षात हा निर्णय घेवु शकतो काय?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—हे काम आपण १/४/१६ पासुन करत आहोत. दिड वर्ष पुर्वीपासुन काम करत आहोत. तुम्ही याचा इफेक्ट कसा देणार? १/४/१६ पासुन तर लोकांनी कर भरलेत.

श्री. युवराज भदाणे, प्र. कर निर्धारक व संकलक:—नाही आता जी आपण बिले दिली आहेत ना, यात तरतुद प्रोव्हीजनल मध्ये केली आहे तरतुदीप्रमाणे घेवु शकतो.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—हे या वर्षी झाले, नंतर तुम्ही त्याला रिवाईज्ड करणार.

श्री. युवराज भदाणे, प्र. कर निर्धारक व संकलक:—होय.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—आपले कॅपीटल बेसवर बिल निघाले नाही. १८—१९ नंतरच निघणार.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—मला तेच म्हणायचे आहे. फक्त तुम्ही जे १/४/१६ पासुन अधिसूचीत करायचे म्हटले आहे ना ते तुम्ही १/४/१८ पासून म्हणायला पाहिजे. कॅपीटलचेच आपले प्रोसेसमध्ये चालु आहे.

श्री. युवराज भदाणे, प्र. कर निर्धारक व संकलक:—आपण १२९ कलम प्रमाणे जी बिले देतो ते प्रोविजनलच बिले देतो.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—आपण एक सांगा, आपण प्रोविजनलच बिल दिले, आपण जे दिड वर्षाचे लावाल तर काय ते वेगळे बिल पाठविणार काय सर्वांना?

श्री. युवराज भदाणे, प्र. कर निर्धारक व संकलक:—त्यामध्ये सुध्दा आम्ही परत डिडक्शन करुन देणार. मा. कलेक्टर महोदयांची मान्यता मिळाली तर आम्हांला सिस्टममध्ये करावी लागेल.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—मला हे सांगा की आपणाकडे अशी यंत्रणा तयार आहे का? मालमत्ताचे आपण आरआरच्या हिशोबाने व्हॅल्युएशन करणार की व्हॅल्युएशन करुन त्यास टक्केवारी लावणार, आपणाकडे काय यंत्रणा आहे.

श्री. युवराज भदाणे, प्र. कर निर्धारक व संकलक:—आपणाकडे जी माहिती तंत्रज्ञानाचे जे काम बघते त्या कंपनीकडे या प्रकारचे सॉफ्टवेअर अदयावत आहे. कलेक्टर महोदयांची मान्यता घेतल्यानंतर आपण जेव्हा बिल देणार त्याच्यामध्ये तेवढी सुट मिळणारच.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—त्याला कारण काय घडले? कोणी आपणांस सांगितले की त्यात आरआर करा म्हणुन?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—याबद्दल एक माहिती दया की एक मालमत्ता आहे त्यावर किती भार वाढत आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—कमी होत आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—ते आपण कसे करणार आहात? आपण कसे ०.०१....

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—नाही साहेब, ती अशी गोष्ट आहे, खरे तर जीएसआरच लावायचा होता परंतु आपणाकडे सर्व डेटा व ब—याच गोष्टी नव्हत्या. जुन्या हिशोबाने हे कर लावलेत परंतु आपणांस हे कर लावायचा आहे तो १८—१९ साठी. त्यावेळेसच याची अंमलबजावणी होईल.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—हे पहा आधी तर या विषयास व्यवस्थित समजले पाहिजे, आणि यासाठी आपणांस पुढची काय तयार करायची आहे, त्यासाठी एक वेगळी सभा लावु या. जी करासाठी विशेष असेल.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—हा महापालिकेचा कर नाही तो शासनाचा कर आहे. त्याचे दर निश्चित नाही केले.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—महानगरपालिकेने २०१६ मध्ये ठराव पारीत केला आहे. त्याचा यानंतर अंमलबजावणी होणार. २९/३/२०१६ रोजी रेडीरेकनर प्रमाणे टॅक्स सिस्टम बनवु इच्छिता जोपर्यंत आपण समजला नाही, ठिक आहे आपण तर अर्थसंकल्पात पारीत केला परंतु त्याचा इफेकट काय होईल पुढे काय होईल ते तर समजले पाहिजे ना सर्वांना.

सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :—आपण म्हणता की प्रापर्टीचा जो कर घेत आहोत तो कमी होईल.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—वाढणार.

सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :—आता तर म्हणालात कमी होणार. दुप्पट वाढणार.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—हा तर पारीत झाला विषय.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—ठराव परत घेण्याचा आमचा अधिकार आहे. व सुधारीत करण्याचा आपणांस अधिकार आहे. महासभेत सुधार करु शकतो. हा विषय आम्हांस समजण्यास वेळ दया.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—यावर शासनाचे मेंडेंट आहे का? आपले काही ग्रांटस् डिपेन्डन्स आहे काय?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—जे पैसे येणार आहे त्यावर अवलंबुन आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—त्याच्यावर अवलंबुन आहेत, उलट यामध्ये त्यांना कर कमी मिळणार आहे. तर याच्यावर अडुन बसण्याचे त्यांचे कारण काय?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—हा कर आपण प्रपोज केलेला आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—शासनाचे पत्र काय आहे?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—नाही आले आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—तर कशाच्या आधारे करणार?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—आपण मिनिमम दिलात, बाजुच्या महापालिकेचे पाहुन दिले आपण.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—मला असे म्हणायचे आहे, मला सुध्दा विषय निट समजत नाही. तुम्ही हा विषय वगळा ना काय होईल?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—ठिक आहे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—हा विषय आपण वगळत आहे. यावर एक वेळ आपण वेगळी चर्चा करु या. कारण की याचा इफेक्ट काय येईल ते पाहणे आवश्यक आहे. इतर महापालिकेचे सुध्दा पहावे लागेल की त्यांचे उत्पन्न वाढले आहे की कमी झाले आहे.
श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—उत्पन्न वाढेल व कर सुध्दा वाढणार आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—एखादया कोण्या व्यक्ती, किंवा एखादया पलॅटला आठ हजार रुपये येणार आहे. तर त्यांना सोडुन आपण कॅल्क्युलेशन करुन सांगा की किती होणार ते.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—</u>आता आपला जो कराचा दर आहे तो ३३ टक्के तर जात आहे. तर यामध्ये जास्तीत जास्त ४० टक्क्याच्या वर जाता कामा नये. वाढले तर ५ टक्के वाढतील नाही तर ते सुध्दा वाढणार नाहीत. त्या पातळीपर्यंत येईल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>म्हणजे जास्त वाढणार नाही.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—</u>यामध्ये अशीच तरतुद आहे की ४० टक्के आणि समजा आपला कर आला ६० टक्के तर ते ६० टक्के करायचे नाही, ४० वरच असेल.

<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :</u>—ना महापालकेस ना जनतेला अडचण येता कामा नये.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>संपुर्ण सिस्टमला आधी समजले पाहिजे. त्यासाठी आपण या विषयास आता वगळत आहोत.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—</u>ठिक आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>या विषयास स्थगित करु या, आपण एकवेळ आपसात बसु या. व त्यानंतर यावर चर्चा करु या की कसे आहे ते.

<u>काही सदस्य :—</u>विषय वगळा.

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ३** :— भांडवली मुल्यावर आधारीत महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) दर राजपत्रात अधिसूचित करणेसाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर करणेसाठी मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

राज्य शासनाने सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यामध्ये सुधारणा करून इमारती व जमिनीचे भांडवलीमुल्य यांवर मालमत्ता कर बसविण्याचे प्रयोजन केले आहे. तसेच महालेखाकार कार्यालय, मुंबई यांचेकडील सुचना व महानगरपालिकेने अमृत योजनेत भाग घेतला असुन केंद्र व राज्य शासनाकडुन अनुदान प्राप्त करण्यासाठी कर आकारणी व्यवस्थापनेत सुधारणा करणेची अट आहे. केंद्रीय वित आयोगाच्या शिफारशी नुसार ज्या ''ड'' वर्ग महानगरपालिका आपल्या क्षेत्रात भांडवलीमुल्य आधारीत कर आकारणी सुरू करतील त्या महानगरपालिकांमध्ये उत्तेजनार्थ निधी वितरीत करण्याचे धोरण आहे. राज्यातील इतर महानगरपालिकांना हे धोरण राबविणे आहे.

वर्ष २०१६—१७ पासुन **(अ)**उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात करयोग्य मूल्य ऐवजी भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणी करणे **(ब)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची 'ड' चे प्रकरण ८ ''कराधान नियम'' यातील नियम ७—अ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आयुक्त, उक्त पोट—कलम (७अ) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे उल्हासनगर शहरातील इमारती व जमिनी यांच्या वापरकर्त्याच्या घटकांसाठी आणि प्रवर्गासाठी आणि इमारती व जमिनी यांचे भांडवलीमूल्य निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी, अशा विविध घटकांना आणि प्रवर्गांना द्यावयाच्या बहुविध भारांकाच्या बाबतीत तरतूद करण्या करीता, विनियम **(क)** करांचेदर यांसस्थायीसमितीठराव क्र. १०६, दिनांक १४/०३/२०१६ व महासभाठराव क्र. ८९, दिनांक २९/०३/२०१६ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.

परंतुमहाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अध्यादेश, २०१२ याद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगारहमी (उपकर) अधिनियम, १९६२ (१९६२ चा महा. २७) च्या कलम ४ च्या खंड (अ) मधील उप—खंड (दोन) व कलम ६ब च्या खंड (अ) मधील उप—खंड (दोन) नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ३) या अन्वये घटित केलेल्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या, नगरपालिका क्षेत्राच्या बाबतीत दिनांक १ एप्रिल २०१० पासून जमिनींचे किंवा इमारतींचे

भांडवलीमुल्य मालमत्ताकराच्या आकारणीचा मूलाधार म्हणून स्वीकारलेल्या, निवासी व निवासेतर प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याच्या हेतू असलेल्या जमिनींवर व इमारतींवर आकारण्यात येणाऱ्या दरांचा प्रस्ताव, महानगरपालिकेकडून प्राप्त झाल्यावर, दर राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अधिसूचित करण्याचे अधिकार, जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत.

त्याअनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रासाठी, निवासी व निवासेतर प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याच्या हेतू असलेल्या जमिनींवर व इमारतींवर आकारण्यात येणाऱ्या भांडवलीकृत मूल्यावर आधारित राज्य शिक्षण उपकर व रोजगार हमी उपकर ज्यादराने उल्हासनगर महानगरपालिकेने आकारावयाचे व गोळा करावयाचे आहेत ते दर, खालील प्रमाणे नमूद केल्याप्रमाणे, दि. १ एप्रिल २०१६ पासून अधिसूचित करणेसाठी स्थायी समिती, महासभेच्या मंजुरीने मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर करावयाचा आहे.

# अनुसूची

| अनु क्रमांक | वापरकर्ताप्रवर्ग | राज्य शिक्षण उपकर | रोजगार हमी उपकर |
|---|---|---|---|
| १. | <u>निवासीइमारती</u><br>खोली, किंवा सदनिका किंवा वेश्म (अपार्टमेंट) किंवा गाळा व तत्सम<br>जलतरण तलाव<br>स्टील्ट किंवा तळघर किंवा पोडियम मधील कारपार्कींग<br>जोडलेले गॅरेज<br>सोसायटी कार्यालय | ०.०१ % | लागूनाही |
| २.. | <u>दुकाने/वाणिज्यिक/अनिवासीइमारती</u><br>दुकान, रेस्टॉरंट, विविध वस्तू भांडार आणि शॉपिग सेंटर, दवाखाना, हॉस्पिटल, क्लिनिक आणि पॅथोलॉजी प्रयोगशाळा, खाजगी हेल्थ क्लब, जिम्नॅशियम, जलतरणतलाव, कार्यालय, गोदाम/साठवण/कोठार, वजनकाटा व इतर कोणत्याही गटात समाविष्ट नसलेले घटक<br>रेस्टॉरंट व बार, मंगल कार्यालय/हॉल/कन्वेन्शनलहॉल/कम्युनिटीहॉल/पार्टी हॉल इत्यादी, मॉल, सिनेमा हॉल/ सिनेमागृह/ नाटयगृह, खुले सिनेमागृह–रंगमंच व इतर बांधकाम, मल्टिप्लेक्स, बॅक, बॅकेतर वित्तीय संस्था, जीवन व जीवनेत्तर विमा निगम कंपनी, शिकवणी वर्ग, टॉवर, जाहिरात फलक, ऑटोमॅटिकटेलर मशीन आणि मनीचेंजिंग सेंटर, पेट्रोलपंप/सर्व्हीस स्टेशन/एलपीजी, सीएनजीस्टेशन/केरोसिनस्टेशन यांचे बांधकाम शैक्षणिक संस्था, नर्सरी किट्स कॉर्नर, प्लेग्रुप तबेला<br>स्टील्ट/तळघर/पोडियम मधील कार पार्कींग जोडलेले गॅरेज<br>सोसायटी कार्यायल | ०.०१ % | ०.००५% |
| ३. | <u>औद्योगिकइमारती</u><br>औद्योगिक वसाहत<br>सेवा औद्योगिक वसाहत<br>स्टील्ट/तळघर/पोडियममधील कार पार्कींग<br>जोडलेले गॅरेज<br>सोसायटी कार्यालय | ०.०१ % | ०.००५% |
| ४. | <u>जमीन</u><br>खुली जमीन–निवासी<br>खुलीजमीन–अनिवासी<br>(क) वाणिज्यिक<br>(ख) औद्योगिक<br>राखीव असलेली खुली जमीन<br>(क) अंशत: अननुज्ञेयता<br>(ख) एकूण अननुज्ञेयता | ०.०१ % | लागूनाही |

तरी वरील प्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजुरी करीता सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १३ अ दिनांक:— ३/८/२०१७

सुचकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार भांडवली मुल्यावर आधारीत महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) दर राजपत्रात अधिसूचित करणेसाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर करणेसाठी मंजुरी देण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४** :— वर्ष २०१७ —१८ मध्ये पावसाळयापूर्वी उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र. १ ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाची निविदा कार्यवाही करणेस स्थायी समितीची मान्यता मिळणे..

---

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—यामध्ये काय करणार आहे नेमके आपण? स्थायी समितीची मान्यता घेवुन निविदा मागविणार आहेत की काय करणार आहेत?

श्री. राम जैसवार, शहर अभियंता :—आपल्या प्रभाग समिती क्र. १ ते ४ मधील खड्डे भरण्यासाठी त्याची निविदा करण्यासाठी स्थायी समितीसमोर सादर केले आहे. रस्ते दुरुस्तीसाठी अंदाजपत्रकात जी तरतुद आहे यामध्ये जे खड्डे भरणार ते डब्ल्युबीएमने आणि बीएमएसीने भरणार, काही गणपती येण्यापुर्वी काही प्रमुख रस्ते आपण भरुन घेतो आणि काही पावसाळयानंतर भरुन घेतो.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—असे नाही, आता जे आपण पावसाळयात काम करतो त्यासाठी ही निविदा आहे असा आपला प्रस्ताव आहे. पावसाळा संपल्यानंतर तातडीने तोपर्यंत निविदा प्रक्रिया होईल. व १ ऑक्टोंबरनंतर जेव्हा पावसाळा संपेल तेव्हा याचे काम पुर्ण करु. यावेळी आपण बदल करत आहोत, आपण प्रत्येक वर्षी अशीच निविदा काढतो पाटोल्सची. आपण खड्डे पाहुन निविदा करत असायचो परंतु आता विदाउट नंबर ऑफ पाटोल्स सर्व रस्ते आपण दिले आहेत, तो संपुर्ण रस्ता पाटोल्स फ्री म्हणुन त्याने करुन दयायचा आहे, संपुर्ण रस्ता एस्कॉल्टींग सोबत फ्री करुन दयायचा आहे. तसेच काम संपल्यानंतर १ वर्षापर्यंत तो पाटोल्स फ्री ठेवण्याची त्याची जबाबदारी राहील. तो रस्ता पाऊस कितीही असला तरी आठ दिवसात त्याने पुर्ण करुन दयायचा आहे. ही निविदेची विशेषत: आहे व त्या आधारावर आपण करणार. साधारणत: ऑक्टोंबर पहिल्या आठवडयापर्यंत त्यास वर्क ऑर्डर देणार. १५ दिवसात हे काम पुर्ण होईल आणि त्यानंतर ऑक्टोंबर अखेरपर्यंत काम पुर्ण झाल्यावर एका वर्षापर्यंत त्यास मेंटेन करणार. २० टक्के त्याची निविदा रक्कम थांबवुन ठेवणार, काम झाल्यावरच रिलीज होणार असा आमचा प्रस्ताव आहे.

सदस्य श्री. कलवंतसिंग सोहटा :—आता मान्सुनमध्ये गणपतीसाठी काय करणार?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—त्यासाठी तात्पुरती व्यवस्था आम्ही करत आहोत त्यासाठी कोटेशन व निविदा वेगळया मागविल्या आहेत. जास्त आवश्यकता असेल तर ते सुध्दा आम्ही करत आहोत.

सदस्य श्री. राजेश वदारिया:—एका तासात किती खडीची गाडी येणार, रिट येणार.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>ते एका मलमपट्टीसारखेच काम आम्ही करत आहोत. आणि लोकांचे सेंटीमेंट फुलफिल करत आहे की चला काहीतरी काम होत आहे. पण फक्त उल्हासनगरच नाही तर कोणतेही शहर घ्या, पावसाळयामुळे अडचण होत आहे. हे काम जे आपण आणले आहे ना ते काम तत्काळ इलेक्शनंतर मार्च किंवा मे महिन्यात पुर्ण करायचे होते परंतु काही कारणामुळे आपण निविदा करु शकलो नाहीत. यासाठी आपण हे काम एप्रिल, मे महिन्यात करण्याऐवजी ऑक्टोंबरमध्ये करत आहोत. आमचा प्रस्ताव असा होता की आपण त्यांच्याकडुन १ जुन पर्यंत काम संपवु या या वर्षाचा पावसाळा ते पुढच्या वर्षाच्या पावसाळयापर्यंत काम संपण्यासाठी त्यांना सांगीतले.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>हे पहा, शहरातील रस्त्याची परिस्थिती फारच खराब आहे. फक्त गोष्ट सेंटीमेंटची नाही आहे, तर गोष्ट अशी आहे की जनतेला त्या रस्त्यावरुन जाण्यासाठी आम्हांला सुध्दा, फक्त जनतेसच नाही तर आम्हांला सुध्दा त्रास आहे, तुम्हांला सुध्दा त्रास आहे, तसेच शहराच्या बाहेरील सुध्दा लोक येथे येतात खरेदी करण्यासाठी किंवा अन्य कोणत्या गोष्टीसाठी तर त्यांच्यामते आपली प्रतिमा फारच खराब होत आहे. तसेच सोशल मिडीयावर सुध्दा महापालिकेस क्रिटीसाईज करत आहेत की खड्डे भरले जात नाहीत. माझे म्हणणे असे होते की ही संपुर्ण तयारी आधीच सार्वजनिक बांधकाम विभागास करायचे होते. परंतु शहर अभियंता अर्थसंकल्पाबाबत सांगत आहेत तर आपणाकडे, आयुक्त साहेबांकडे त्यावेळी सुध्दा संपुर्ण अधिकार होते. की अर्थसंकल्पास किती कालावधी लागला, तेव्हा त्यांच्याकडे संपुर्ण अधिकार होता सर्व त्यांच्या हातात होते. शासनाने त्यांना संपुर्ण अधिकार दिले होते. प्रत्येक वर्षी पाऊस पडतो, प्रत्येक वर्षी खड्डे पडतात. व आम्ही हे पाहिले आहे की सार्वजनिक बांधकाम विभागास त्याची काही तयारी नसते. त्यामुळे जनता आम्हांसच बोलते की तुम्ही तेथे बसुन काय करतात. त्याचबरोबर मी युएमसी ग्रुपवर फोटो पाठविले होते, ही ही परिस्थिती आहे, त्यात अमीरखानचा फोटो येतो की मला उल्हासनगरचे खड्डे पाहुन रडायला येत आहे. इतका अपमान महापालिकेचा असो की आपला असो, तो नाही झाला पाहिजे.

<u>सदस्य श्री. कलवंतसिंह सोहटा :—</u>आता हा विषय नाही आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आम्ही काही दिवसांपुर्वी रस्त्याची परिस्थिती पाहायला गेलो होतो, आयुक्त साहेब सुध्दा होते, शहरातील रस्त्यांची परिस्थिती खराब आहे, काही रस्ते तर असे आहेत की श्री. सोहटा यांच्या प्रभागातील खड्डे तर असे होते की तेथे कार सुध्दा पलटी होईल. मी आयुक्तांना धन्यवाद देतो की, त्यांनी पहिल्यांदा असा विचार ठेवला आहे की आपले पैसे वाया जाता कामा नये. त्यात लायबिलीटी परिअड टाकावे, असे होता कामा नये की खड्डे भरले नाही भरले. खड्डा नविन झाला असे होता कामा नये. ग्रीटद्वारा किंवा खडीद्वारा मायनर दुरुस्ती करतो आणि त्याची वाट जर पाहता तर २५ तारखेला गणेशोत्सव आहे आणि २१ व २२ तारखेला चालीया उत्सव आहे तर आपण २० तारखेपर्यंत जरी खड्डे भरले आणि जोरदार पाऊस आला तर खड्डी किंवा ग्रीट टिकणार नाही. २४ तास सुध्दा टिकणार नाही. व उदया गणपती उत्सवासाठी लोक निघतील तर अशी परिस्थिती होईल जशी आज आहे. म्हणजे थोडापण फरक पडणार नाही. तर यामध्ये निविदेत जर लॅबिलीटी कालावधी आहे आणि जर आपण हा विषय ५ (२)(२) अंतर्गत देतो व काही ठेकेदाराचे नाव जोडुन त्यांना बीएम करा असे सांगितले तर एक महिना वाट पाहुन त्यात आपले थोडेफार दुरुस्ती सोबत करु व एका वर्षाची गॅरेंटी घेवु. माझ्यामते पैश्यांची उलटी बचत होईल. आमच्या विरोधी पक्ष नेता यांनी विरोध केला होता त्यांच्या विरोधात आपली बचत होत आहे. खडी जी टाकत आहे त्यावर पैसे वाया जातील. आणि जर आपण हे सरळ देत आहोत त्यात आपणांस ग्रीट व खडीचा पैसा सुध्दा लागणार नाही. कोणी ॲटपार मिळत नाही ती शक्यता नाही आणि एक वर्षाची गॅरेंटी आपण देत आहोत.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>आयुक्त साहेबांनी असा कुठे प्रस्ताव आणला की ५ (२)(२) अंतर्गत दयायचे आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आयुक्त साहेब, आपला प्रस्ताव देत आहेत व आपण सदस्य आहोत आम्ही प्रस्ताव देत आहोत, खड्डे दुरुस्त करत करत ऑक्टोंबर होत आहे. तर का नाही आपण ५ (२)(२) अंतर्गत देत आहोत या आधी सुध्दा दिले आहे. ब—याच वर्षी उशिर होत आहे म्हणुन आपण ५ (२)(२) अंतर्गत दिले आहे. आता उत्सव आहे, दोन—दोन, तीन—तीन उत्सव आहे. श्रावण महिना चालु आहे, चालीया चालु आहे, गणेशउत्सव येणार आहे, यावेळी आपण त्या भरोश्यावर राहणार की आपण ग्रीट भरणार, मला नाही वाटत, कारण यावेळी काय गॅरेंटी की २४ तारखेला पाऊस येईल, नाही येणार, २५ तारखेला गणपती येणार व २६तारखेपासुन रोज गणपती उठणे चालु होणार, नऊच्या नऊ दिवस पाऊस येईल तर कसे होईल. त्यावेळी

आपण काही करु शकणार नाही, तरी सर्व सदस्यांचा जो निर्णय असेल तर जेणेकरुन आपल्या पैश्याची बचत होईल, काम सुध्दा होईल व उत्सव सुध्दा साजरा करता येईल.

सदस्य श्री. दिपक सिरवानी:—जे महत्वाचे रस्ते आहेत ते तरी केले पाहिजे कसेही करुन. जेथे गणेश विसर्जन होते जेथुन गणपती घेवुन जातात तेथे तरी रस्ते व्यवस्थीत झाले पाहिजे. क्वालिटीच्या हिशोबाने.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—आमचे सुध्दा तेच म्हणणे आहे. गटनेत्यांनी म्हटल्याप्रमाणे आज आपण डांबर करतो व पावसाने तो नंतर खराब होईल, नंतर दुस—यावेळेस दुसरा निधी आणुन काम करणार काय? या सर्व गोष्टी झाल्या पाहिजे, सर्व रस्ते झाले पाहिजे. मध्यंतरी २४ रस्त्यांचे काय झाले, त्यांची तर निविदा दिली सर्व झाले त्याचे काम चालु करत नाही, त्याचे काय कारण आहे? त्याच रस्त्यांची स्थिती खराब आहे व त्याच रस्त्यांचे फोटो येत आहेत. व त्यावरुनच महापालिकेचे नाव खराब होत आहे. त्याची जबाबदारी कोणाची?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मी सर्वांना विनंती करतो, शहर अभियंत्यांनी याबाबत यादी सुध्दा दयावी त्याविषयी आपसात गटनेत्यांची बैठक घेण्यात यावी. कारणे देणे अधिक उचित होईल, दोन तीन एजन्सीचे नाव देवुन त्यास करावे. तसेच कोणकोणते रस्ते करत आहेत याबाबत आपण यादी सुध्दा दिलेली नाही.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—जी काही यादी आहे प्रभागवाईज ती देण्यात यावी.मला ठेकेदारांची नावे सांगा.

सदस्य श्रर. जमनादास पुरस्वानी:— प्रभाग क्षेत्र क्र. १ व ४ मध्ये मेसर्स जयभारत कंन्स्ट्रक्शन व प्रभाग क्षेत्र क्र. २ व ३ मध्ये मेसर्स झा पी ॲण्ड कंपनी.

श्री. राम जैसवार, शहर अभिंयता :—प्रभाग समिती क्र. १ दुनिचंद कॉलनी ते......

सदस्य श्री. दिपक सिरवानी :—आम्हांला यादी दया.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—आम्हांला यादी तर देण्यात यावी, दुसरे साहेब असे आहे की हे जे २४ कोटीचे रस्ते आहेत ते सुध्दा यामध्ये आहे का ते आधी पहा. जर ते असतील तर मग आपले पैसे वाया जातील.

श्री. राम जैसवार, शहर अभिंयता :—ते नाही असणार.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—ते नाही असणार, चला आपण यादी दया आम्हांला. ती पाहु दया.

श्री. राम जैसवार, शहर अभियंता :—होय, यादी देतो आता.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—श्री. जैसवार हे जे चार व चार आठ रस्ते आहेत ते साडेचार कोटीमध्ये एक सुध्दा नाहीत, बरोबर?

श्री. राम जैसवार, शहर अभियंता :—नाही साहेब, आता पावसात जे रस्ते खराब झालेत ती ३० टक्के आहेत.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—ते तर केले पाहिजेत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—ते तर आपण करणार, आपण हे आता अंतिम करत आहोत.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—साहेब, मी बोलतो. यामध्ये आपल्या यादी ८ कोटी मध्ये पाच आहेत, आपण ज्या एजन्सीला काम दिले त्याच्याकडुन काम करुन घ्या. हे पहा, डबल नाही झाले पाहिजे.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—त्यांच्याकडुन करायचेच नाही तर जेवढे मोठे खड्डे पडले आहेत ते दयायचे त्यांना, ते काम करत नाहीत.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—मी आता काय म्हणत आहे, ते करतील ना.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>एक ऐकुन घ्या, पावणे चार कोटीचा प्रस्ताव आहे व आपण ५(२)(२) मध्ये करत आहोत. यामध्ये मुलभुत अंतर असे आहे की त्यांच्याकडुन आपण तीन वर्षाची गॅरेंटी घेत आहोत. व खड्डे भरण्या चे काम करत आहोत त्यासाठी आपण एक वर्षाची गॅरेंटी घेत आहोत. हा फरक आपण लक्षात घ्या.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>हे जे रस्ते आहेत त्यात सुध्दा काही खड्डे असतील, त्याच एजन्सीस बोलुन केले पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>परंतु केले पाहिजे ना.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>माझे म्हणणे असे आहे की त्याचे काम एक वर्षाच्या गॅरेंटीने नाही तर तीन वर्षाच्या गॅरेंटीने करणार.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>साहेब, मी तेच म्हटले आपण जे वर्कऑर्डर दिले आहे तीच एजन्सीकडुन त्या रस्त्यांचे काम करुन घ्या. तर आपोआप त्याची गॅरेंटी तीन वर्षाची असेल.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>ठिक आहे. ते त्यांना सांगु या ना.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>आता अंतिम कामामध्ये तात्पुरते खड्डे भरण्याचे काम तर करु शकता ना त्यामध्ये?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे हे जे ओव्हरलॅपिंगवाले आहे, त्यात रक्कमेची बचत होईल, साडेचार कोटीमध्ये किती होईल?

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>जितकी बचत होते ती दुस—या जागी कामात येईल ना साहेब.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आपण जे प्राकलन बनविले साडेचार कोटीचे आपण हे जे रस्ते दिले आहेत त्यात माझ्या प्रभागातील बस स्टॉप येथिल सुध्दा काम आहे. तर हा रस्ता बनणार तोपर्यंत आपण दिवाळीची वाट नाही पाहणार. श्री. राजेंद्र चौधरीचे प्रभागातील सुध्दा असतील तर त्यामध्ये या प्राकलनाचे नाही टाकले आहे तर ते सुध्दा टाका.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>एक मिनिट, त्यामध्ये असे आहे त्यामध्ये जे आठ रस्ते दिले आहेत, त्यांच्याकडुन करुन घ्या.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>याची क्वांटीटी चांगली असली पाहिजे. काय होते काम करता करता दुस—या जागी खड्डे पडतात तर ती क्वांटीटी काम करतांना कामी येईल ना साहेब.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>दुसरे म्हणजे आयुक्त साहेबांबरोबर आम्ही जात होतो तर आम्ही आयुक्तांना दाखविले होते. आपण काय करता स्वत:चा रस्ता आहे, २० किंवा ३० टक्के रस्ते आपण बनवत जातो. प्रत्येकवेळेस खड्डे भरले जातात, कोठे १७ फुट, कोठे १२ फुट, तर कोठे भरतच नाहीत.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>माती जमा होते, गाडया उभ्या राहतात,जी खराब गाडी आहे,भंगार गाडी आहे ती उभी राहते. बनविले पाहिजे तर ते महापालिकेची थट्टा करत आहेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आपले ड्रेन ६० फुटावर बनली आहे. ३० फुट काम केल्याने तो रस्ता ३० फुटाचा कामात येतो. व ३० फुट, म्हणजे १५ —१५ फुट दोन्ही बाजुला वेस्ट गाडया उभ्या राहतात. आयुक्त साहेबांनी स्वत: पहाणी केली. जर यामध्ये प्राकलन वाढते तर वाढवा आम्ही आयुक्तांना प्राधिकृत करतो.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>ते आवश्यक आहे, आपण लवकरात लवकर करा.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—असे करण्यासाठी आम्ही दोन रस्ते अंतिम केले एक खेमाणीचा व एक धोबीघाटचा.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—तिसरा मी सांगतो ना साहेब आपणांस. तिसरा रस्ता असा असेल शांतीनगर नाक्यापासून पवई चौकपर्यंत.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—आणि दुसरे म्हणजे नेहरु चौकचा रस्ता तर यामध्ये आहे तो आपण करणारच यामध्ये.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—तिसरा रस्ता सुध्दा आहे शांतीनगर नाक्यापासून पवई चौकपर्यंत. त्याबाबत आपण जावुन पाहणी करु या. शांतीनगर ते पवई चौकचा रस्ता तेथे दोन्ही बाजुला गाडया उभ्या असतात तेथिल रस्त्याची परिस्थिती खराब आहे. तेथे लोक पायी चालु शकत नाहीत. ६० फुटाचा रस्ता आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—प्राकलनात किती आहे?

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—गेल्या पंधरा वर्षापासुन ६० फुटाचा रस्ता आहे तो ४० फुटच भेटतो.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—ठिक आहे. खेमाणीमध्ये २० लाखाचे प्राकलन होईल, धोबीघाटमध्ये किती पडेल? तेथे किती प्राकलन वाढेल?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—जे काही वाढेल त्याबाबत आपण मा. आयुक्त महोदयांना प्राधिकृत करु या. आणि त्याबाबत प्राकलन बनवु या.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—तीन रस्त्यांचे फक्त घेवु या.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—होय तीन रस्त्यांचेच.

सभापती, श्रीमती कांचन लुंड:—व्हीटीसी ग्राउंड येथिल सुध्दा करा वर्कऑर्डर सुध्दा झाले आहे.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—तो रस्ता यादीमध्ये आहे ना, तो सुरु करा लवकरात लवकर.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—आता पावसाळा कमी झाला आहे, तर बाकीचे रस्त्यांचे काम सुध्दा सुरु केले पाहिजे ना. हे सर्व इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता करा.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—श्री. जमनुजी, झाले काय सर्वांचे? साहेब काय आहे, आपण जसे म्हणालात की वाढवी आहे, दिले पाहिजे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—मी आणखी एक सांगतो आपणांस जर वाटत असेल तर यात ठेकेदार सुध्दा देवु शकतो. रोडवाईज किंवा प्रभागवाईज.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—प्रभाग समिती क्र. १ व ४ मध्ये जयभारत कंस्ट्रक्शन कंपनी व प्रभाग समिती क्र. २ व ३ मध्ये झा पी ॲण्ड कंपनी यांनाच दिले जावे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—त्यामध्ये असे होता कामा नये की यास क्वांटीटी जास्त दिली व यास कमी दिली.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—प्रभाग समितीवाईज देवु या.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—प्रभाग समितीवाईज दया ना.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>परंतु त्यात ७२ लाख व दिड कोटी आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>प्रभाग समिती क्र. १ व ४ जयभारत कंस्ट्रक्शन कंपनी व प्रभाग समिती क्र. २ व ३ मध्ये झा पी ॲण्ड कंपनी यांना दयायचे आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>होय.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>क्वालिटी व क्वांटीटी तपासण्याचे काम प्रशासनाचे आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आयुक्त महोदयांनी एक वर्षापर्यंत टाकले.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>अटी कायम राहिल्या पाहिजे आणि त्या प्रमाणे काम झाले पाहिजे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>किती रक्कम रिफंड करायची २० टक्के, इनक्ल्युडींग एसडी. त्यात जे ८० टक्के आहे ना तर त्यास सुध्दा ब्रेक लावावे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आणि जे अतिरिक्त काम असेल तर आयुक्तांना प्राधिकृत करत आहोत. आपण ठराव वाचुन दाखवा ना.

<u>महापालिका सचिव :—</u>आता आपण निविदा न करता सरळ आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>होय आणि एजन्सीचे सुध्दा नाव टाकावे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>होय, ठरावात एजन्सीचे सुध्दा नाव टाका.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आपण ५(२)(२) मध्ये मंजुरी देत आहोत. प्रभाग समिती क्र. १ व ४ जयभारत कंस्ट्रक्शन कंपनी व प्रभाग समिती क्र. २ व ३ मध्ये झा पी ॲण्ड कंपनी यांना दयायचे आहे. व हे तीन रस्तेंबाबत मा. आयुक्त महोदय जे काही प्राकलन बनवतील त्यात जे काही वाढते त्या रस्त्याचे संपुर्ण काम झाले पाहिजे.

<u>सदस्य श्री. कलवंतसिंह सोहटा :—</u>हे अधिकार आयुक्त साहेबांना दया.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>साहेब, शीट नं. ५० ही जी मालमत्ता आहे ती खाजगी मालमत्ता आहे, तो ठेकेदाराने बळकावला होता न्यायालयाने आपली चांगली बाजु मांडुन तो आपणांस परत मिळालेला आहे तर त्याठिकाणी आपणांस माहिती आहे आता गणेशोत्सव आहे, तर अशावेळी कॅम्प नं. ५ मध्ये कुठलाही गणेशविसर्जनासाठी घाट नाही, कुठलीही जागा नाही तर आपण त्याठिकाणी जर कुठली जागा बनवली, तेथे कृत्रिम तलाव बनविला आणि गणेशविसर्जनाची व्यवस्था केली तर बरे होइल.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>पुर्वी कोठे विसर्जन करत होते.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>तेथिल लोक अंबरनाथच्या तलावात किंवा अंबरनाथच्या खदानमध्ये जातात. आणि गणरायांची विटंबना होते. विटंबना थांबविण्यासाठी महापालिकेने जसे दोन घाट बनविले आहे तसे तिसरे तेथे तात्पुरता कृत्रिम तलाव बनवावा आणि तेथे घरगुती असतील, सार्वजनिक असतील तर तेथे तशी विसर्जनासाठी व्यवस्था करावी.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>आयुक्त साहेब, तेथे एका बाजुला बनविण्यात यावे. त्या प्लॉटमध्ये एका कॉर्नरला बनवियात यावे.

<u>महापालिका सचिव:—</u>एक मिनिट, हा विषय संपला का?

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>होय तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता संपला, आता आम्ही अशीच चर्चा करत आहोत ते इतिवृत्ता नाही घेतले तरी चालेल.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ४ :— वर्ष २०१७ —१८ मध्ये पावसाळयापूर्वी उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र. १ ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डे भरणेचया कामाची निविदा कार्यवाही करणेस स्थायी समितीची मान्यता मिळणे**

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील डांबरी रस्त्यांची दरवर्षी पावसाळयापूर्वी, पावसाळयामध्ये व पावसाळयानंतर दुरुस्ती करण्यात येते. शहरातील काही रस्ते एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प — २ मधील आहेत व इतर काही प्रमुख रस्ते आहेत. टेलीफोन विभागाच्या केबल्स, विद्युत विभागाच्या विद्युत वाहिन्या व पाणी पुरवठा विभागाच्या जलवाहिन्या टाकण्याकरीता खंदके खोदले जातात. तसेच मोठया प्रमाणातील वाहतूकीमुळे व पावसामुळे खड्डे निर्माण होतात. असे खड्डे पावसाळयापूर्वी भरणे आवश्यक आहे. पावसाळयादरम्यान ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यात गणेशोत्सव हा सार्वजनिक सण येत असल्याने पावसाळयापूर्वी भरलेले खड्डे अतिपावसामुळे पुन्हा भरावे लागतात, व नव्याने निर्माण होणारे खड्डेही भरणे आवश्यक असते. तसेच पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा न झाल्यास रस्त्यांवर पाणी जमा झाल्यानेही खड्डे निर्माण होतात असे खड्डे पावसाळयानंतर बुजवून रस्ते वाहतूकीस सुस्थितीत ठेवावे लागतात. याकरीता शहरातील नागरीक, सामाजिक संस्था, लोकप्रतिनिधी यांचाही सातत्याने पाठपुरावा सुरु असतो.

वर्ष २०१७-१८ या आर्थिक वर्षात ज्या रस्त्यांवर खड्डे पडले आहे अशा रस्त्यांची यादी सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे प्रभाग क्षेत्र निहाय तयार करण्यात आली आहे. त्याप्रमाणे प्रभाग क्षेत्र निहाय प्राकलने तयार करुन त्यांची किंमत खालील प्रमाणे होत आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्षेत्र क्रमांक | प्राकलनिय खर्च |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्षेत्र क्रमांक १ | रु. ७३,६५,३८५/- |
| २ | प्रभाग क्षेत्र क्रमांक २ | रु. १,२२,९८,९२६/- |
| ३ | प्रभाग क्षेत्र क्रमांक ३ | रु. १,०९,४०,६९०/- |
| ४ | प्रभाग क्षेत्र क्रमांक ४ | रु. १,५०,३५,६२३/- |
| | **एकूण** | **रु.४,५६,४०,६२४** |

वर्ष २०१७-१८ च्या महापालिका अर्थसंकल्पातील "अ" अंदाजपत्रक भाग — १ क ६ (ii) "रस्ते दुरुस्ती" या लेखाशिर्षात रुपये ७.०० कोटी एवढी तरतूद ठेवण्यात आली आहे. सदर लेखाशिर्षातून उक्त खर्च करणे आहे. सध्या पावसाळा सुरु झाला असल्याने शहरातील रस्त्यांवरील खड्डे लवकरात लवकर भरणे आवश्यक आहेत. अन्यथा शहरातील नागरीक, रिक्षाचालक संघटना, लोकप्रतिनिधी असंतोष व्यक्त करुन आंदोलने करतात.

तरी वर्ष २०१७-१८ च्या महापालिका अर्थसंकल्पातील "अ" अंदाजपत्रक भाग — १ क ६ (ii) "रस्ते दुरुस्ती" या लेखाशिर्षातील तरतूदीच्या अधीन राहुन शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १४ <u>दिनांक:— ३/८/२०१७</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती जया माखिजा

ही स्थायी समिती सभेत झालेल्या चर्चेअंती उल्हासनगर शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामी निविदा न मागविता प्रभाग क्षेत्र क्र. १ व ४ मध्ये मेसर्स जयभारत कंन्स्ट्रक्शन व प्रभाग क्षेत्र क्र. २ व ३ मध्ये मेसर्स झा पी ॲण्ड कंपनी यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदा करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील प्रकरण ५ चे कलम २ (२) अंर्तगत आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

<u>कारण</u>

शहरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्डयांमुळे वाहतुक व्यवस्था पुर्णपणे विस्कटली असून गणेशोत्सव व चालीया उत्सवामुळे रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम तातडीने करणे आवश्यक आहे.

तसेच

१. सदर कामात काही वाढीव काम झाल्यास आणि १) खेमाणी कालानी महल ते अमरधाम चौक पर्यंत, २) मच्छी मार्केट (फकड मंडली) ते धोबीघाट रोड व ३) शांतीनगर जकात नाका ते पवई चौक पर्यंत या तीन रोडवरील वाढीव काम करणेकामी होणा–या खर्चासाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.
२. पावसाळयात प्रस्तावित एकूण यादीत समाविष्ट केलेल्या ६१ रस्त्यांचे खड्डे भरणे.
३. गणपती विसर्जनसाठी प्रमुख गणपती विसर्जन रस्त्याचे खड्डे भरणे तसेच रस्त्यांचे डांबरीकरण (BM) चे करुन देणे.
४. पाऊस संपल्यानंतर एकूण यादीत समावेश रस्त्यांचे डांबरीकरण पुर्ण करणे (निविदा नुसार)
५. सर्व रस्त्यांचे काम पुर्ण झाल्यानंतर सर्व रस्त्यांचे एक वर्षासाठी कुठेही रस्ता खराब झाल्यानंतर अगर खड्डा पडल्यानंतर आठ दिवसात डांबरीकरण करून पुर्ण रस्ता सुशोभित ठेवणे ठेकेदारास बंधनकारक राहील.
६. वरील सर्व यादीत समावेश रस्त्यांचे काम पुर्ण केल्यानंतर कंत्राटदाराच्या देयकातून १५ % रक्कम वजा करून डिपॉझिट मध्ये ठेवण्यात येईल. तसेच ५ % सिक्युरिटी डिपॉझिट ठेवण्यात येईल. १५ % रक्कम एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर रस्त्यांच्या देयकाबाबत कंत्राटदाराने केलेली कार्यवाही विचारात घेऊन देण्यात येईल. तसेच ५ % रक्कम defect liability संपल्यानंतर देण्यात येईल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ५:–महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. 26BO004618000 (Old No.26/1140) ही नोंद रद्द करून कर रक्कम रू 68439+विलंब शास्ती निर्लेखित करणेबाबत.

---

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:– महोदया, यावर मागच्या वेळेस चर्चा झाली होती व आदेश झाले होते व पुन्हा याचा विषय का आला?

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–मागील वेळेस सुध्दा हा विषय आला होता की पुढील वेळेस स्थायी समितीत असे विषय एकत्रित आणावे. एकत्र आणा सर्वांचे एकत्रित आम्ही करतो.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :–हा पुर्वी आलेला विषय होता.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–निर्लेखित करण्यासाठी हा विषय होता का?

महापालिका सचिव :–हा विषय पुर्वीच्या सभेत आला होता.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–यांचे असे म्हणणे आहे की हजार, दोन हजार मालमत्ता आहेत तर माझे म्हणणे असे आहे की २५–२५ मालमत्ता घेवुन या ना. आम्हांला वाटते कोणावर तरी अन्याय होत आहे.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :–सर्व डबल एंन्ट्रीचे विषय आहेत जास्त मालमत्ता आहेत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–ठिक आहे, डबल एन्ट्री काढायला किती वेळ लागणार आहे.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :–आता काही प्रस्ताव आलेले आहेत.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>मी आपणांस एक उदाहरण देतो.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>मला काय पाहिजे की बाकीच्या लोकांना सुध्दा विसावा मिळावा. जे अनावश्यक आहेत त्यांची वसुली बाकी आहे, डबल एन्ट्रीमुळे जे काही आहे ते तरी जाईल, बाकी लोकांचे वेगळी अडचण आहे की तुम्ही जास्त एक्सेसीव्ह केले ती वेगळी काढावी लागेल. जे काही आहे ते सॉप्टवेअरमुळे करायला सोपे जाईल. डबल एन्ट्री काढायला तुम्हांला किती वेळ लागणार आहे?

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी</u> :–खरे तर आपली जी या वर्षाची मागणी आहे ना ती ३८५ कोटीची आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>एक मिनिट, प्रोग्रामर महोदया आहेत का? त्या कोठे आहेत? तुम्ही डबल एन्ट्री म्हणजे श्री. राजेंद्र निंबाळकर यांच्या नावावर जेवढया काही मालमत्ता आहे त्या दिसतील, तुम्ही एक श्री. राजेंद्र निंबाळकरचा शोध टाकला तर त्याच्या नावावर ज्या काही मालमत्ता असतील त्या दिसतील. असे तुम्ही काढुन टाका ज्याच्यावर डबल एन्ट्री आहे, आणि त्या फिल्टर करुन टाकल्या तर खरोखर माझ्या ज्या असतील एकापेक्षा जास्त त्या आयडंटीफाय करायचे आणि तुम्ही जे डबल एन्ट्री आहे त्याचे प्रस्ताव ठेवायचे. पाहिजे तर त्या लोकांचे एक स्टेटमेंट घेवुन टाका.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>साहेब, प्रकार थोडासा वेगळा आहे. हे सांगतात ते बरोबर आहे, ब–याच जणांनी काय केले आहे, त्यावेळच्या अधिकारी कर्मचारींनी काय केले की माझी एक कर पावती आहे आणि त्या कर पावतीला आता ३० हजार भरायचे आहेत, दहा हजार पुर्वीची प्रकरण आहेत, साधारणत: २००० पुर्वीची प्रकरणे आहेत, त्या आधीची नाही. त्यावेळेस आपण खाजगी सर्व्हेअर लावले होते त्यांनी काही पावत्या दिल्या आणि मालकांनी काय केले ती पावती दाखविली नाही आणि कर आकारणी झाली नाही म्हणुन तुम्ही पावती दया अशा पध्दतीने हा प्रकार झालेला आहे. जी ॲसेसमेंट आधीच झालेली होती.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>म्हणजे दोन वेळा ॲसेसमेंट झाले. परत नविन ॲसेसमेंट झाली.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>होय, पुन्हा त्याठिकाणी काय केले दुसरी पावती काढली. आणि आता तो म्हणतो की आम्ही दोन पावत्यांचे बिल कसे देवु? माझ्याकडे मालमत्ता एवढीच आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>काही ठिकाणी आपली सुध्दा चुक झाली. काही ठिकाणी आपण सुध्दा दोन दोन बिले दिलीत.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>ते तसेच आहे का हे पाहणे योग्य आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>एक मिनिट यावर्षी एक सांगतो, आपण जे म्हणालात की आपल्या नावाची मालमत्ता कॉम्प्युटरमध्ये टाकले तर दिसेल दोन कोणकोणत्या आहेत ते. आता एक मालमत्ता दोन लोकांच्या नावाने आहे, तर हा जो विषय आला आहे तर एकाजणाच्या नावाने नाही तर दोन व्यक्तींच्या नावाने एक मालमत्ता, जसे त्यात एक माझे नाव व एक आपले नाव, मालमत्ता एकच आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>त्यापध्दतीने सुध्दा शोधु शकतो ना कॉम्प्युटरवर एका मालमत्तेचे नाव टाकले तर किती व्यक्ती येतात ते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आता काय लिहिले आहे यांनी महानगरपालिका कर आकारणी नोंदवही संदर्भाप्रमाणे दोन्ही मालमत्ता कर भरण्यास जबाबदार असलेली व्यक्ती असलेल्या नोंदीत समानता आहे काय? असे बरेचसे विषय आहे जेथे एकच मालमत्ता आहे व मालक वेगवेगळे लिहिले आहे. तसेच मालमत्ता सुध्दा वेगवेगळया दाखविल्या आहेत, नंबर सुध्दा वेगवेगळे दाखविले आहेत, अशा मालमत्ता कॉम्प्युटरमध्ये शोधणे कठिण जाईल. तर ज्या लोकांचे अर्ज येतात कमीत कमी तर एका वेळेस आणावे. कटअप असे किती माहिती आली त्याची माहिती तेवढी तर आली आपणाकडे हजार अर्ज असतील तर त्यामुळे काय होते की दोष सिध्द होती आपण कोणा न कोणा व्यक्तीवर चुकीचा व्यवहार करत आहेत.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>अगोदर आलेले अर्ज सुध्दा आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>हजार अर्ज आले आहेत आणि आपण मार्चपर्यंतचे अर्ज आणले आणि दुस–या वेळेस एप्रिलचे अर्ज आणि आणि तिस–यावेळेस मे चे आणले व नंतर जुनचे आणिले तर एक समानता दिसेल.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>त्यांना न्याय मिळेल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>असे करावे, सर्व एकत्र नाही आणु शकत तर १००–१०० आणावे. एका मालमत्तेचे दोन–दोन नाव, नंबर सुध्दा वेगवेगळे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>सभागृहनेताजी, आपण म्हटले होते की सर्वांचे एकत्रित विषय आणावे, त्याबाबत आपण एकच निर्णय घेवु.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>वगळा, मलाही समजण्यास कठिण जाते, असे हजारो विषय आहे व एक एक आणले जात आहेत. एवढा वेळ व्यर्थ वाया घालणे बरोबर नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मी म्हणतो १००–१०० आणावेत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>ठिक आहे, हे १००–१०० च नाही तर एकत्रीत आपण करु शकतो का ते पाहतो, आता हा विषय वगळण्यात यावा.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>हा विषय वगळा.

<u>काही सदस्य :–</u>वगळा, वगळा.

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ५ :– महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. 26BO004618000 (Old No.26/1140) ही नोंद रद्द करून कर रक्कम रू 68439+विलंब शास्ती निर्लेखित करणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयास अनसुरून सादर करण्यात येते की, श्री. के तिरूपती रेड्डी राहणार सुभाष नगर उल्हासगनर–3यांनी दि १४/५/१२ रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र **मालमत्ता क्र 27BO004721800(Old No 27/0961)** या एकाच मालमत्तेची **मालमत्ता 26BO004618000 (Old No. 26/1140)** अन्वये झालेली दुबार नोंद वर्ष 2016–2017 अखेर रद्द करून मिळकत करीता आकारण्यात आलेली कर रक्कम रू. 68439++शास्ती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 152 नुसार मा. स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणेसाठी विनंती केली आहे

| अ. क्र. | तपषिल | **मालमत्ता क्र. 26BO004596400 (Old No. 26/0904)** | **मालमत्ता क्र. 26BO004618000 (Old No. 26/1140)** | |
|---|---|---|---|---|
| 1. | मालमत्ता कर भरण्यास प्रथमतः जबाबदार व्यक्तीचे नाव | श्री. रविकर बापूराव कांबळे | श्री. के तिरूपती रेड्डी | ✔ |
| 2. | मालमत्तेचा पत्ता | बॅरेक नं.684 समोर बालकंजी बारी रोड जवळ उल्हासगनर–3 | रा. रूम साई बाबा कॉलनी उल्हासगनर–3 | ✔ |
| 3 | प्रथम कर निर्धारण वर्ष | एप्रिल 1986, | एप्रिल 1986, | ✔ |
| 4. | क्षेत्रफळ | 380चौ फुट | 434 ,112 चौ फुट, | ✔ |
| 5 | बांधकाम प्रकार | एसी सीट ब्रिक्स | एसी सीट ब्रिक्स | ✔ |
| 6 | वपर | निवासी | निवासी | ✔ |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | भाडेकरू असल्यास वार्षिक भाडे रक्कम | — | — |
| 8 | प्रथम कर निर्धारणानंतर मालमत्ता कर भरण्यास प्रथमतः जबाबदार व्यक्तींमध्ये बदल झाला असल्यास त्याचा तपषिल (आदेष क्रमांकासह) | श्री. के तिरूपती रेड्डी<br>कर विभाग, युनिट क्र.—4/460/06<br>दिनांक 8/8/2006 | — |
| 9 | प्रथम कर निर्धारणानंतर वेळोवेळी सुधारीत कर निर्धारण झाले असल्यास त्याबाबतचा सविस्तर तपषिल (मालमत्ता क्रमांक./निर्धारण वर्ष) | | 01/4/1996 एसी सीट ब्रिक्स<br>01/4/1996 एसी सीट ब्रिक्स<br>01/4/1986 एसी सीट ब्रिक्स |
| 9अ | सुधारीत क्षेत्रफळ | — | 135 चौ फुट, एसी सीट ब्रिक्स<br>16 चौ फुट, एसी सीट ब्रिक्स<br>134 चौ फुट, एसी सीट ब्रिक्स |
| 9ब | सुधारीत बांधकाम प्रकार | — | — |
| 9क | सुधारीत वापर | — | — |
| 9ड | सुधारीत कर निर्धारण भाडेकरू असल्यास वार्षिक भाडे रक्कम | - | — |
| 10 | वर्ष 2016—17 अखेर मालमत्ता करापोटी थकीत रक्कम | .— | Rs50373/- |
| 11 | वर्ष 2016—17 अखेर पाणीपट्टी करापोटी थकीत रक्कम | — | Rs.18,056/- |
| 12 | एकुण थकीत रक्कम | — | Rs 68439/- शास्ती |
| 13 | मालमत्ता कराचा भरणा केला असल्यास त्याचा तपषिल (पावती क्रमांक, दिनांक, रक्कम) | प्रथम कर निर्धारणापासुन मालमत्ता कराचा भरणा वर्ष 2014—2015 पर्यंत,दि. 20/2/2015 पा.क. 147579 रू 4741/— अन्वये करण्यात आलेचे दिसुन येत आहे. | प्रथम कर निर्धारणापासुन मालमत्ता कराचा भरणा करण्यात आलेचे दिसुन येत नाही |

विषयांकित प्रकरणी स्थळ पाहणी करण्यात आली असुन पाहणी अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | स्थळ पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व दिनांक | श्री. जेठानंद ताराचंद कर निरिक्षक<br>दिनांक 2 /6 /2012 |
| 2 | महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे संदर्भित दोन्ही मिळकतीकरीता मालमत्ता कर भरण्यास जबाबदार असलेली व्यक्ती म्हणुन असलेल्या नोदीत समानता आहे काय? नसल्यास मालमत्तानिहाय नोंदीचा तपषिल | फरक आहे. |
| 3 | महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे संदर्भित दोन्ही मिळकतीकरीता पत्त्यात असलेल्या नोदीत समानता आहे काय? नसल्यास मालमत्तानिहाय नोंदीचा तपशिल | नाही. |
| 4 | दोन्ही मालमत्तेचे क्षेत्रफळ, बांधकाम प्रकार व वापर इ. करपात्र बाबींत समानता आहे काय? | क्षेत्रफळात तफावत आहे. बांधकाम प्रकार व वापर इ समानता आहे.. |
| 5 | स्थळ पाहणी केली असता सद्यस्थितीत जागेवर एकच मिळकत अस्तित्वात असल्याचे आढळुन आले आहे काय? | कर निरिक्षक यांचे दि.2/6/12 चे अहवालानुसार एकाच मालत्तेची दुबार नोंद झालेचे दिसुन येते |

**अभिप्राय**

दि. 2 /06 /12रोजी संदर्भित दोन्ही मिळकतींची प्रत्यक्ष पाहणी केली असता सद्यस्थितीत श्री. रा. रूम साई बाबा कॉलनी उल्हासगनर—3 यांचे नावे असलेली **मालमत्ता क्र. 26BO004596400 (Old No. 26/0904)** ही अस्तित्वात असल्याचे आढळुन आले. या मिळकतीचे खात्यात वर्ष 2013—14 अखेर थकित रक्कम रू.निरंक असुन मालमत्ता कराचा वेळोवेळी भरणा करण्यात येत असल्याचे दिसुन येत आहे.

तसेच संबंधित प्रभाग क्र26 मध्ये **मालमत्ता क्र.26BO004618000 (Old No. 26/1140)** ही कोठेही अस्तित्वात असल्याचे आढळुन येत नाही .

उक्त बाबी विचारात घेता महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र **मालमत्ता क्र. 26BO004596400 (Old No. 26/0904)** या एकाच मालमत्तेची **मालमत्ता क्र. 26BO004618000 (Old No. 26/1140)** ही दुबार नोंद असल्याचे दिसुन येते. या मालमत्तेपोटी आकारण्यात आलेला मालमत्ता कर रक्कम रू. 68439.+शास्ती वसुल न होण्याजोगे आहे,

सबब, महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र **मालमत्ता 26BO004618000 (Old No. 26/1140)** ही रद्द करून त्यापोटी आकारण्यात आलेली कर रक्कम रू. 68439+शास्ती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार मंजुरीकरीता स्थायी समितीपुढे शिफारस करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४ अ — दिनांकः— ३/८/२०१७

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. 26BO004618000 (Old No.26/1140) ही नोंद रद्द करून कर रक्कम रू 68439 + विलंब शास्ती निर्लेखित करण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—आयत्यावेळचा हा विषय आहे.

विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. ६ :—** मालमत्ता कराच्या रक्कमा वसुलीसाठी जप्ती/अटकावणी केलेल्या मिळकतींची लिलावाने विक्री करतेवेळी अधिनियमातील कराधान नियम ४७ (७) अन्वये आयुक्तांच्या वतीने कर निर्धारक व संकलक यांस नाममात्र रू. १ किंमतीची नाममात्र रू. १ किंमतीची बोली बोलण्यास प्राधिकृत करणे, सदरील मालमत्ता मनपाच्या ताब्यात घेवुन महानगरपालिका मालकीचा फलक लावणे व तदअनुषंगिक अधिनियमानुसार आवश्यक पुढील कार्यवाही करणेकामी मंजुरी मिळणेबाबत.

---

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—देवुन टाका, आधी त्यांना संधी देण्यात आली होती.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—हा विषय आपण समायोजित करुन टाकु या. पटलावर घेवु या, यावर कोणास हरकत असेल तर सांगा. या विषयास घेवुन संपवुन टाका.

महापालिका सचिव :—हा विषय आधीच सामावुन घेतला आहे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—घेतला ना, आता विषय असा आहे की आपण २/६/१७ मध्ये ही स्थायी समिती सदर मिळकतधारकांना संपुर्ण कराची रक्कम ४५ दिवसांच्या मुदतीत भरणेकामी एक वेळ संधी देण्यास मान्यता देवून सदर बाबतची नोटीस मिळकतधारकांना देणेस प्रशासनास निर्देश देत आहे, असा ठराव झाला होता. त्यानंतर यास इफेक्ट देण्यासाठी आपण काय केले ते जरा सांगावे.

श्री. युवराज भदाणे, प्र. कर निर्धारक व संकलक :—या विषयामध्ये मा. स्थायी समिती जो ठराव केलेला आहे. या अनुषंगाने आमच्या यादीमध्ये ज्या ज्या मालमत्ता आहेत, त्यांना नोटिस देवुन त्यांना इंटीमेट करुन मा. स्थायी समितीने आपणांस ४५ दिवसाची मुदत दिली आहे, कृपा करुन आपले पैसे भरावे, मालमत्ता लिलावात असून त्यास मुकावे. त्यानंतर मा. स्थायी समिती सभापती व श्री. अमरलाल लुंड यांच्या समक्ष पाच सहा लोकांशी संपर्क साधुन येथे बोलावले नंतर त्यावर चर्चा करुन त्यांच्याकडुन पैसे भरुन घेतले, एका व्यक्तीने

चेक दिला होता तोही घेतला, त्याच्या पाच मालमत्ता होत्या त्या यातुन डिलीट केल्या. आधी २५ होत्या आता २१ आहेत.

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u>साहेब, माझे असे म्हणणे आहे की यास आणखी मुदतवाढ दया. आणखी एक महिन्याची मुदत दया.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>काय होते आमची सर्व मेहनत वाया जाते.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>यांना ही जी वेळ देण्यात आली होती ४५ दिवसांची...

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आपण निर्णय घेणार नाही तर आपले शहर सुधरणारच नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>कडक निर्णय घ्यावा लागेल.

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u>कर्मचा–यांचे सहकार्य मिळाले होते व श्री. अमरजी व आम्ही १२ लोकांकडुन तर भरुन घेतले आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>१२ नाही ५ लोकांनी भरले आहे. समजा ही मालमत्ता आम्ही आमच्या नावावर केली, आपण मान्यता दिली व आम्ही आमच्या नावावर केली जर त्यानंतर कोणी येतो तर त्याची काय पध्दत आहे?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>अजुन त्यांना मुदत देवु या ना. ८ दिवस मुदत दिल्यानंतर आपण त्यांना सांगु या की स्थायी समितीने आपले रद्द केले आहे आपणांस काही उपाय नाही राहणार.

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u>होय साहेब, त्यांना आठ दिवस मुदतवाढ दया.
<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>पंधरा दिवस देवु या ना साहेब.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>ठिक आहे, पंधरा दिवस दया. परंतु माझी एक सूचना आहे की, आपण असा संदेश दया की, कायदेशीर कारवाई केल्यानंतर, आपण एवढी मेहनत केल्यानंतर, मालमत्तेस वारंट दया, नोटिस दया, मग कोर्टास निपटा. यानंतर असा मॅसेज देवु या की, सुप्रिम कोर्ट झाल्यानंतर स्थायी समिती एक असा आसरा आहे की ४५ दिवसाची मुदत दिल्यानंतर त्यानंतर परत १५ दिवस दिले, जर नाही झाले तर त्यास रद्द करु या अशी आमची विनंती आहे. या नंतर अशा कोणत्याही प्रस्तावास आपण लक्ष देवू नका असा संदेश शहरास देणे आवश्यक आहे, तो गेलाच पाहिजे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>होय संदेश जाणार.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>आपण स्थानिक वृत्तपत्रात सुध्दा दया. महापालिकेने कडक कारवाई केली आहे. यांना आता संधी नको.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>उत्साहित करण्याची व त्यांना निरुत्साह करण्याचे कारण म्हणजे आम्ही त्यांचे वेतनवाढ रोखतो जर ते ५० हजार कमी आणत असतील तर. ते लोक सुध्दा विचार करतात की आपण एवढा दंडा मारतो व येथे हा निर्णय घेतात. त्यांना एक वॅटेज मिळाले पाहिजे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>समजा दोन किंवा तीन लाखाच्या मालमत्ता आहेत, ज्या कंपन्या आहेत, आयडीआय कंपनी वगैरे बंद झाल्या आहेत. ज्या कंपन्या बंद झाल्या आहेत आणि त्यांचे लाखो करोडो रुपये बाकी आहेत. मध्ये एक प्रकरण वगैरे आले होते सुपर लॅबचे तर अशा जे तीन लाखाच्या आतचे जे दिसत आहेत, तर आताच्या स्थितीला अशा ब–याचशा मालमत्ता आहेत. ज्या एक कोटी, दिडकोटी पेक्षा सुध्दा जास्त आहेत, जास्तीत जास्त पन्नास लाख, कोटी बाकी आहेत, तीस लाख बाकी आहेत, तर त्याची कार्यवाही सुध्दा या अनुषंगाने चालु करावी अशी माझी मागणी आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>आम्ही मागच्या सभेत सर्व लिपिक, अधिकारी यांना सूचना दिल्या आहेत की रजिस्टर ठेवणे, कमीत कमी रोज २० मालमत्तेस भेट देणे, सर्वात मोठया मालमत्तेची त्यांनी भेट दिली पाहिजे,

आता बचतगट महिलांनी जी बिले वाटली, त्यात शिक्षित महिल आहेत अशा १०० महिलांची सुध्दा मदत आपण घेणार आहोत, मोहिम तेज करणार आहोत, फक्त काय होते एक एक गळती थांबवायला बघतो, आणि एक मोठा ढोबळा स्थायी समितीमार्फत आपण पाळायला गेले तर सर्व कार्यवाही फेल जाते. दुसरा मुद्दा जी सुपरलॅबची जी केस आहे ना त्याची वाच्यता ब—याच पेपरात होत आहे. आपण जो निर्णय घेतला तो आपण विखंडीत करण्यासाठी शासनाकडे पाठविला. सर्वांचे जर एकमत असेल तर हा विषय पुन्हा आणु. त्यास विखंडीत करु नका त्यास परत आणा जेणेकरुन सुपरलॅबचा सुध्दा मॅसेज गेला पाहिजे, हे सुपरलॅब काय आहे तर संपुर्ण शहराचा एक मामुली टिमका आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>सुपरलॅबमुळे आपले नाव खराब होत आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>पुढच्या सभेत घेवुन येवु या.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>या प्रस्तावाच्या विरोधात आम्ही होतो.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>मला काय म्हणायचे आहे, हा आयत्यावेळचा माझा विषय आहे असे समजुन तुम्ही का मान्यता देत नाही. लिखित आणु किंवा तोंडी मी जबाबदार आयुक्त म्हणुन बसलो होतो. हया गोष्टी ब—याचदा आपणांस पिंच करतात. नागरीकांचे प्रश्न बरोबर आहे ना, उत्तर देण्यास आम्हांला तोंड नाही.

<u>महापालिका सचिव :—</u>नाही, नाही हा आयत्यावेळचा विषय घेता येणार नाही, गोषवारा लागेल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>आता आपण हा प्रस्ताव पारीत करुन देवु या.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>होय देवु या.

<u>महापालिका सचिव :—</u>हे विषयानुसार नाही, गोषवारा दयावा लागेल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>बरेचसे प्रकरण आहे, जसे श्री. शंकर लुंड यांनी वॉटसअॅपवर आम्हांला पाठविले होते की बिगबाजारचा जो विषय आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>तर बिगबाजाराविषय मी लगेच वकिलांना बोलावले. तर वकिलांना मी म्हटले स्टे आहे आपण तोंडी सांगु शकत नाहीत. कोर्टाकडुन लिखित ऑर्डर दया नाहीतर जे तोंडी आहे ते कोर्टाकडुन लिहुन दया. आज लिहुन पाठविले आहे, ते मी वाचुन दाखवितो. बिगबाजारविषय कोर्टात स्टे आहे असे सांगितले जर असेल तर मी पाहतो, नाही आहे तरी पाहतो, आणि असेल तर मी लवकरात लवकर वकिलांकडुन निपटारा करतो. आणि तर यामध्ये मला वकिलांविषयी संशय वाटतो तर मी वकिलच बदलतो.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>असे विषय आपण आणले तर आम्ही आपणांस मदत करु, स्थायी समितीच्या माध्यमातुन. आणि यानंतर देखील बरेचसे मोठे मोठे मुद्दे आहेत त्यावर लक्ष दयाल तर बरे होईल. तसेच महापालिकेचा मालमत्तेचा जो विषय आहे की २५ टक्के जे बिल्डरकडुन नागरीकांनी घेतले त्याचा काय विषय आहे तो सुध्दा लवकर घ्या.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>या सोबत एक विषय महत्वाचा आहे. आपल्याकडे जेवढे लॉन्स आणि हॉटेल्स वगैरे भाडयाने आहेत. भाडोत्रीबाबत योग्यरित्या जात आहे परंतु कर्मशिअलबाबत आपण तपासा. कारण जर भाडयाने आहे तर भाडयाचे मुल्य आपणांस मिळायला पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>साहेब, त्या सुध्दा घ्या आणि ज्या २५ टक्के मालमत्ता बिल्डरांकडे आहेत ती यादी आमच्याकडे दया.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>ती यादीत ७ ते ८ मालमत्ता आपण म्हणतो, मालमत्तेचे कोण आहे? कोठे आहे श्रीमती सावंत महोदया?

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>माझे तेच म्हणणे आहे की अधिकारी स्थायी समितीच्या बैठकीत येत नाहीत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**बोलावुन घ्या त्यांना. तर ती यादी आपण पुढच्या पंधरा दिवसात किंवा तीन आठवडयात ते ताब्यात घेवु. आणि ते लिलावाने विक्रीचा सुध्दा प्रस्ताव आणला जातो. आता आपण भाडयाने देण्याचा विषय नाही करणार. ती मालमत्ता आपण ताब्यात घेवु या. आणि ती विक्री करुन टाकु.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**होय विक्री करुन टाका.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हा जो पाटोल्सचा विषय आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**हा जो विषय आणला आहे ना साहेब आपण तर हा विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा. तुमचा विषय जो होता मालमत्तेचा तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता लवकरात लवकर ताब्यात घ्या.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**सर्व विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

## ☑ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. ६ :—** मालमत्ता कराच्या रक्कमा वसुलीसाठी जप्ती/अटकावणी केलेल्या मिळकतींची लिलावाने विक्री करतेवेळी अधिनियमातील कराधान नियम ४७ (७) अन्वये आयुक्तांच्या वतीने कर निर्धारक व संकलक यांस नाममात्र रू. १ किंमतीची नाममात्र रू. १ किंमतीची बोली बोलण्यास प्राधिकृत करणे, सदरील मालमत्ता मनपाच्या ताब्यात घेवुन महानगरपालिका मालकीचा फलक लावणे व तदअनुषंगिक अधिनियमानुसार आवश्यक पुढील कार्यवाही करणेकामी मंजुरी मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

वर्ष २०१६—१७ मध्ये मालमता कराच्या वसुलीसाठी एकुण २६ थकबाकीदारांच्या जप्ती/अटकावणी केलेल्या मिळकतींची लिलावाने विक्री करतेवेळी अधिनियमातील कराधान नियम ४७ (७) अन्वये आयुक्तांच्या वतीने कर निर्धारक व संकलक यांस नाममात्र रू. १ किंमतीची बोली बोलण्यास प्राधिकृत करणेसाठी मंजुरीकरीता सादर केलेल्या प्रस्तावावर स्थायी समिती ठराव क्र. ४, दिनांक ०२/०६/२०१७ नुसार संबंधित मिळकतधारकांना ४५ दिवसांत संपुर्ण थकीत कराचा भरणा करणेसाठी एक वेळ संधी देवुन सदरचा विषय स्थायी समितीपुढे आणणेबाबत निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने संबंधित थकबाकीदारांना कराची रक्कम भरणा करणेसाठी मुदत देण्यात आली असुन एकुण २६ पैंकी ५ मिळकतधारकांनी कराचा भरणा केला आहे. उर्वरीत थकबाकीदारांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | मालमत्ता क्रमांक | मिळकत धारकाचे नाव | मिळकतीचा पत्ता | थकित कराची रक्कम चालु मागणीसह |
|---|---|---|---|---|
| १ | ११बीआय००७६९९००० (जुना क्र. ११/२८१०) | श्री. तोताराम लालचंद | लिलाशाह अपार्टमेंट, तळमजला, (पूज्य पंचायत हॉल), बॅरेक नं.७७१, रुम नं.१०,११ पोर्शन उल्हासनगर—३ | रूपये १,३४,६४४/— |
| २ | १२बीआय०१५३९६७०० (जुना क्र. १२/१९३१) | श्री. बी. डी. चौधरी | नवरात्री अपार्टमेंट, बॅरेक ४१२, रु. नं.१,२, चौथा मजला, फ्लॅट नं. ४०२,उल्हासनगर—२. | रूपये १,५७,३५३/— |
| ३ | १२बीआय०१५३९५६०० (जुना क्र. १२/१९२०) | होल्डर | सत्यमाता अपार्टमेंट, बॅरेक.४२२ विंग नं. ५,६,७,८,९, सातवा मजला, फ्लॅट नं.७०१, उल्हासनगर—१. | रूपये २,९६,५१०/— |
| ४ | १३बीआय०१५५७५७०० (जुना क्र. १३/१४८३) | होल्डर | सत्यनारायण अपार्टमेंट, फ्लॅट नं.४०२, उल्हासनगर—१. | रूपये १,८६,५९६/— |
| ५ | २६बीओ००८०२८००० | होल्डर | बेसमेंट बी विंग | रूपये ६२,४६९/— |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (जुना क्र. २६/१७४६) | | शिवसागर अपार्टमेंट,<br>शॉप नं १ उल्हासनगर – ३ | |
| ६ | २६बीओ००८०२८१००<br>(जुना क्र. २६/१७४७) | होल्डर | बेसमेंट बी विंग<br>शिवसागर अपार्टमेंट,<br>शॉप नं २ उल्हासनगर – ३ | रूपये ९१,८२९/– |
| ७ | २७बीआय००४९२६९००<br>(जुना क्र. २७/३१२१) | श्री.बुलचंद निहालचंद | प्लॉट नं. २३, विकास नर्सिंग होम समोर, हुकूमतराय अपार्टमेंट, ७ वा मजला, फ्लॅट नं. ४२, उल्हासनगर–३ | रूपये<br>१,९६,६८५/– |
| ८ | २७बीआय००४९२६८००<br>(जुना क्र. २७/३१२०) | श्री.बुलचंद निहालचंद | प्लॉट नं. २३, विकास नर्सिंग होम समोर, हुकूमतराय अपार्टमेंट, ७ वा मजला, फ्लॅट नं. ४० व ४१, उल्हासनगर–३ | रूपये<br>२,१५,००३/– |
| ९ | २८बीओ००८२९५१००<br>(जुना क्र. २८/३३९९) | श्री.महेश डी चंचरिया | चांद चेबर्स, प्रिन्समार्केट मागे, ३ रा मजला, शॉप नं. ३०१ उल्हासनगर – ३ | रूपये<br>२,५२,१६१/– |
| १० | २८बीआय००८२०१९००<br>(जुना क्र. २८/३२४१) | होल्डर | वुड लॅड कॉम्पलेक्स, न्यु लिंक रोड जवळ, १ला माळा ऑफिस नं. सी १९ उल्हासनगर – ३ | रूपये<br>२,१८,६५९/– |
| ११ | २९सीओ००५३६४०००<br>(जुना क्र. २९/२५२४) | होल्डर | श्री साई श्रध्दा को. ऑ. हौ. सो. लि, फ्लॅट नं. १०७ उल्हासनगर – ३ | रूपये<br>१,२४,०६५/– |
| १२ | ३४सीओ००७९०६९००<br>(जुना क्र. ३४/१२४१) | होल्डर | बॅरेक नं. ९८० समोर, स्टेशन रोड, पद्मा पॅलेस, बेसमेंट गोडाऊन उल्हासनगर –३ | रूपये<br>२,०६,६६०/– |
| १३ | ४२सीआय०१२८९६५००<br>(जुना क्र. ४२/२०७१) | मोहन के. प्रेमचंदानी | बॅ.न. १३०९/रूम ४, कुंवर को– ऑप. हौ.सोसायटी प्लाट न. ११, ४था माळा, स्टेशन रोड, उल्हासनगर –४ | रूपये<br>१,४१,४४६/– |
| १४ | ४२सीआय०१२८९६४००<br>(जुना क्र. ४२/२०७०) | मोहन के. प्रेमचंदानी | बॅ.न. १३०९/रूम ४, कुंवर को–ऑप.हौ. सोसायटी प्लाट न. १०, ४था माळा, स्टेशन रोड, उल्हासनगर –४ | रूपये<br>१,२२,४५६/– |
| १५ | ४२सीआय००९६३३२००<br>(जुना क्र. ४२/१६४६) | आर.बी.सी. होल्डर, | साई चितंन को.ऑप.हौ. सोसायटी, बॅरेक १३११ जवळ फ्लॅट ७०१उल्हासनगर–४ | रूपये<br>१,३३,३३८/– |
| १६ | ४२सीआय००९६३३३००<br>(जुना क्र. ४२/१६४७) | आर.बी.सी. होल्डर, | साई चितंन को.ऑप.हौ. सोसायटी,बॅरेक १३११ जवळ फ्लॅट ७०२ उल्हासनगर–४ | रूपये<br>१,४२,९६१/– |
| १७ | ४२सीआय००९६३३४००<br>(जुना क्र. ४२/१६४८) | आर.बी.सी. होल्डर, | साई चितंन को.ऑप.हौ. सोसायटी, बॅरेक १३११ जवळ फ्लॅट ७०३ उल्हासनगर–४ | रूपये<br>१,०१,०७६/– |
| १८ | ४२सीआय००९६३३५००<br>(जुना क्र. ४२/१६४९) | आर.बी.सी. होल्डर, | साई चितंन को.ऑप.हौ. सोसायटी, बॅरेक १३११ जवळ फ्लॅट ७०४ उल्हासनगर–४ | रूपये<br>१,०१,४४८/– |
| १९ | ४३सीआय०१२९८५२००<br>(जुना क्र. ४३/३४४५) | होल्डर, | विठ्ठलवाडी पोलिस स्टेशन समोर, ओ.टी सेक्शन,<br>मोहन प्लाझा, ए विंग,<br>५ वा मजला प्लॅट नं ५०१ उल्हासनगर – ४ | रूपये<br>१,९०,२५५/– |
| २० | ४९सीआय०१३४६१२००<br>(जुना क्र. ४९/१७७६) | होल्डर, | ब्लॉक सी ६८४ रूम १३६७,१३६८<br>डायमंड पार्क फ्लॅट नं. १०१<br>उल्हासनगर – ४ | रूपये<br>२,७५,०२८/– |
| २१ | ५६डीआय०११९५३१००<br>(जुना क्र. ५६/१८१६) | होल्डर, | बॅरेक नं. २०२९ रूम नं. १७, १८, १९, २० साई आत्माराम अपार्टमेंट, ८ वा मजला प्लॅट नं ८०२ उल्हासनगर –५ | रूपये<br>१,४३,०६९/– |

सबब, मालमत्ता कराच्या रक्कमा वसुलीसाठी जप्ती/अटकावणी केलेल्या मिळकतींची लिलावाने विक्री करतेवेळी अधिनियमातील कराधान नियम ४७ (७) अन्वये आयुक्तांच्या वतीने कर निर्धारक व संकलक यांस नाममात्र रू. १ किंमतीची बोली बोलण्यास प्राधिकृत करणे, सदरील मालमत्ता मनपाच्या ताब्यात घेवुन महानगरपालिका मालकीचा फलक लावणे व तदअनुषंगिक अधिनियमानुसार आवश्यक पुढील कार्यवाही करणेसाठी मा. स्थायी समितीपुढे मंजुरीकरिता शिफारस करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १५ **दिनांक:– ३/८/२०१७**

सुचकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मालमत्ता कराच्या रक्कमा वसुलीसाठी जप्ती/अटकावणी केलेल्या मिळकतींची लिलावाने विक्री करतेवेळी अधिनियमातील कराधान नियम ४७ (७) अन्वये आयुक्तांच्या वतीने कर निर्धारक व संकलक यांस नाममात्र रू. १ किंमतीची नाममात्र रू. १ किंमतीची बोली बोलण्यास प्राधिकृत करीत आहे तसेच सदरील मालमत्ता मनपाच्या ताब्यात घेवुन महानगरपालिका मालकीचा फलक लावणे व तदअनुषंगिक अधिनियमानुसार आवश्यक पुढील कार्यवाही करणेकामी मंजुरी देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता कायम करण्यात येत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सभापती, श्रीमती कांचन लुंड:–**ठिक आहे, सभा संपली.

दुपारी १.२५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.